१२९१२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १३६

043

म. ग्रं. सं. ठाणे
विषय— चरित्र
अ. नं. ९३५५

RLFBK-0000753

# महात्मा—परिचय.

७५३

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प पांचवें.

सं. च. 235

# महात्मा-परिचय.

( स्वामी विवेकानंदांनीं करून दिलेला. )



नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगवान् श्रीकृष्ण.

लेखकः

विश्वनाथ विनायक केळकर, बी. ए.

सन १९१२.

साधी प्रत किंमत आठ आणे.] [ कापडी प्रत किंमत दहा आणे.

Publisher

**P. S. BHASE.**

MANAGER,

BHARAT GOURAV GRANTHA MALA,

GIRGAON, BOMBAY.

Printed by

Bhiva Hari at the Tatwa Vivechaka Press, Khetwadi
Main Road, Bombay from pp. 17 to the end and
pp. 1 to 16, Cover and Pictures by G. N. Kul-
karni at his Karnatak Press, No. 7,
Girgaum Back Road,
BOMBAY

८५३

# प्रकाशकाचे दोन शब्द.

## आमचे टीकाकार.

समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ॥
गुण सांगतां पाहे अवगुण । तो एक पढतमूर्ख ॥

—श्रीसमर्थ रामदास.

'सत्ता हें अर्थे मद्य असून सत्ताधीश आणि टीकाकार यांच्या अंगीं सारखाच उन्मत्तपणा असतो,' असें एका इंग्रजी कवीचें अवतरण ग्रंथमालेचें तिसरें पुस्तक जें सावित्री सत्यवान, त्यांत आह्मीं प्रस्तावनेंत मुद्दाम नमूद केलें होतें. अवतरण खरें करून दाखविण्याच्या उद्देशानेंच कीं काय, कोण जाणे, ग्रंथमालेचें चौथें पुस्तक प्रवासिनी प्रसिद्ध झाल्यावर एकदोघां टीकाकारांनीं त्या पुस्तकांतील गुण आणि दोष यांची वजावाकी जनतेच्या समोर ठेवण्याचा सरळ प्रयत्न न करितां, लष्करी अधिकाऱ्याप्रमाणें प्रवासिनी कादंबरीवर 'सेन्सार पाहिजे' ह्मणून फर्मान काढलें आहे. या प्रमादजनित उद्गाराबद्दल आह्मांस यत्किंचितहि वाईट वाटत नाहीं. जनतेनें या टीकाकारांच्या फर्मानाला काडीइतकीहि किंमत न देतां, प्रवासिनीचा गौरवच केल्यामुळें टीकाकारांच्या हिरमुसलेपणाबद्दल मात्र आह्मांला त्यांची कींव येते. भोळी विचारी जनता ! तिला काय माहित कीं, कस्तुरी नेपाळच्या राजाशिवाय दुसऱ्याच्या कपाळावर दिसल्यास खुशाल माती ह्मणावी, किंवा प्रत्यक्ष डुकराच्या पिलाच्या आवाजापेक्षां नकल्याचा आवाज अधिक खरा हणून ह्मणावें ! प्रवासिनींतले विचार कांहीं नवीन नाहींत. ज्यांना आज जगांत वंद्य समजतात अशा बऱ्याच तत्ववेत्त्यांच्या ग्रंथांत ते विचार दृष्टीस पडतात. तेच विचार थोड्या निराळ्या शब्दांनीं जनतेपुढें ठेवतांच, एखाद्या बड्या विद्वानाचें त्यावर शिक्कामोर्तब नाहीं ह्मणून, किंवा अशाच वेडगळ लहरीसाठीं प्रवासिनीवर सेन्सारची सूचना करणें जितकें अन्यायाचें तितकेंच उद्वेगजनक होय. यावरून आमच्या पुस्तकावर टीकाच होऊं नये किंवा तीं सर्वांनीं उत्तमच ह्मणावीं, असें आमचें ह्मणणें नाहीं. आह्मी जोंपर्यंत माणसें आहोंत, तोंपर्यंत आमच्यांत थोडेबहुत दोष हे असणारच; अर्थात आमच्या हातून होणाऱ्या कृतींतहि कांहीं दोष हे असतीलच आणि ते दोष ग्रंथमालेची हितेच्छा बाळगून कोणी दाख-

विल्यास, अशा टीकाकारांचे आह्मी मनःपूर्वक आभार मानूं व ते दोष पुन्हां होऊं नयेत ह्मणून शक्य तितकी काळजी घेऊं; परंतु चांगल्याला चांगलें आणि वाईटाला वाईट ह्मणण्याच्या सदुद्देशानें लेखणी न उचलतां चांगल्यालाहि वाईट ह्मणण्याच्या मत्सरी बुद्धीनें जे आपल्या लेखणीचे फटकारे ग्रंथमालेवर मारतात, त्यांना शिरोभागीं लिहिलेलें रामदास स्वामींचें वचन नजर करणें आह्मास भाग झालें आहे. एवढें उत्तर आमच्या मत्सरी मित्रांना पुष्कळ आहे, असें वाटतें.

वाङ्मयासाठीं वाङ्मय निर्माण करावयाचें, साहित्यासाठीं साहित्य निर्माण करावयाचें, हें ग्रंथमालेचें ध्येय असून या प्राप्तव्यासाठीं न्याय मार्गानें ती शक्य तितका प्रयत्न करीत आहे. वेळ येईल त्याप्रमाणें आपल्या साहित्याचा रंग पालटावयाचें तिला माहित नसल्यामुळें आमच्या कांहीं व्यवसायबंधूंना आमचा प्रयत्न न आवडणें साहजिक आहे; परंतु तेवढ्यासाठीं त्यांनीं आमच्या हेतूंचा विपर्यास करण्याचें निंद्य कृत्य मात्र करूं नये. दुसऱ्याचीं मतें आपणास पसंत नसल्यास त्याबद्दल शक्य तितकी नापसंति खुशाल दर्शवावी; परंतु असा सरळ प्रयत्न न करितां सेन्सारकडे बोट करणें माणुसकीला कितपत शोभण्यासारखें आहे, याचा विचार आम्ही वाचकांवरच सोंपवितों. 'शिकलेल्या स्त्रियांची बदनामी करण्याचा प्रवासिनीनें प्रयत्न केला आहे,' असा प्रवासिनीवर एक आरोप आहे; पण प्रवासिनी व आमचीं सर्व पुस्तकें समग्र आणि शांतपणें वाचून पाहिल्यावर हा आरोप ग्रंथमालेवर केवळ दुष्टपणानें केला आहे, असें कोणासहि दिसून येईल. वास्तविक ही ग्रंथमाला स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध नाहीं, उलट स्त्रिया सुशिक्षित होऊन त्यांना आपलें शील व संस्कृति उच्चदर्जाची करण्यास ग्रंथमाला आपल्या पुस्तकप्रकाशनानें मदतच करीत आहे. कादंबरीकारानें दोषारोप लादलेलीं पात्रें केव्हांहि अशिक्षित समाजांतून घ्यावींत आणि निर्दोषी पात्रें शिक्षित समाजांतून घ्यावींत असा निर्बंध निसर्गाला सोडून आहे. जंगलांत झोंपडींत राहणारी भील कोळ्याची स्त्री जशी सद्गुणी असूं शकेल, तशी शिकलेली स्त्री दुर्गुणी असूं शकणार नाहीं, असें आजच्या स्थितींत कोण सांगण्यास तयार आहे ? दुर्गुण आणि सद्गुण हे जसे झोंपडींत राहूं शकतात, तसे ते राजवाड्यांतहि राहूं शकतात; मग त्यांनां शिक्षित स्त्रीच्या घरांत शिरण्यास तरी हरकत कसली ? सुशिक्षण ही फार निराळी चीज आहे. आजन्मांत शाळेची पायरी न चढणारासहि तें लाभतें ! राम हा शब्द धड उच्चारतांहि न येणाऱ्या वाल्मिकीनें सच्छीलबलानें सगळ्या जगांत आपणास वंद्य

करून घेतलें आणि मोठ्या अभिमानानें आपणास ब्रह्मज्ञ ह्मणविणाऱ्या विश्वामित्राची यःकश्चित मेनकेनें कुत्र्यासारखी शोचनीय अवस्था केली ! ! सुशिक्षण आणि शिक्षण यांतील फरक तो हा ! ! !

## ग्रंथमालेचें पुढील धोरण.

आज पांच महिन्यांनीं ग्रंथमालेचें हें पांचवें पुस्तक भगवान् श्रीकृष्णकृपेनें तयार झालें असून तें आश्रयदात्यांच्या सेवेला सादर करीत आहों. प्रत्येक तीन महिन्यांनीं एक पुस्तक देण्याचें आमचें अभिवचन असतां तीनच्या ऐवजीं पांच महिने झाल्यामुळें पुष्कळ आश्रयदाते नाखुष झाले व कित्येकांनीं तर पत्रावर पत्रें पाठविण्याचा अगदीं सपाटा चालविला. आपल्यावर त्या सर्वांचा रोष करून घेतला, ही ग्रंथमालेची चूक तर खरीच; परंतु आश्रयदात्यांच्या त्या रोषांत मालेविषयीं प्रेम व हितेच्छा दिसून आल्यामुळें एकीकडे दैवी आपत्ति जरी आह्मास कर्तव्यक्षेत्राच्या बाहेर ओढीत होत्या, तरी आश्रयदात्यांच्या उत्साहानें आह्मास पुढेंच ढकललें; इतकेंच नव्हे, तर कर्तव्यक्षेत्राच्या केंद्रस्थानाजवळ आणून ठेवलें, असें ह्मटलें तरी चालेल. ग्रंथमालेचीं पुस्तकें कितीहि सर्वोत्कृष्ट असलीं आणि त्या मानानें कितीहि स्वस्त असलीं, तरी तीं फार उशिरां प्रसिद्ध होतात, एवढ्या एकाच कारणामुळें पुष्कळ आश्रयदाते कांहींसे रुष्ट होतात; परंतु ईश्वराच्या कृपेनें ही अडचण निघाली असून आतां तीन महिन्यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध होईलच, असें आह्मी आमच्या आश्रयदात्यांना निश्चयाचें अभिवचन देतों. हें अभिवचन देण्यास ईश्वराची कृपा जितकी कारण झाली आहे, तितकेंच आमच्या सहृदय आश्रयदात्यांचे प्रयत्नहि कारण झाले आहेत. मालेचीं पुस्तकें लवकर लवकर प्रसिद्ध होण्यासाठीं चार दोन छापखान्यांचें सहाय्य सतत असावयास पाहिजे; परंतु बाल्यावस्थेंत असलेल्या या संस्थेची सांपत्तिक स्थिति तशा प्रकारची नसल्यामुळें एकेक पाऊल हळूहळू आणि तेंहि मोठ्या कष्टानें व सावधगिरीनें टाकावें लागल्यामुळें सहजच पांच महिन्यांचा अवधी आश्रयदात्यांच्या भेटीला लागला. ही खरी स्थिति माहित नसणारे संस्थेवर रुष्ट होत व कित्येक तिचा उपहासहि करीत; परंतु ज्यांना सांपत्तिक संकटाची कल्पना करतां आली अशा आश्रयदात्यांना ग्रंथमालेची साहजिक करुणा आली व ते मनोभावानें मालेला नवीन आश्रयदाते मिळवून देऊं लागले. अशा रीतीनें लोकाश्रय मिळवून पुढील तयारी करण्यासाठीं या वेळेला बरेच दिवस गेले. दिरंगाईचीं कारणें कितीहि सयुक्तिक असलीं; तरी त्याबद्दल आह्मी आश्रयदात्यांची क्षमा मागतों.

साधारणतः मनोरंजकच पुस्तकें प्रसिद्ध करावयाचीं, असें जरी ग्रंथमालेचें धोरण आहे, तरी मधून मधून तात्विक विषयाचीं पुस्तकेंहि प्रकाशित करणें तिला आतां भाग झालें आहे. सहस्रावधि आश्रयदात्यांत सगळेच कांहीं कादंबऱ्यांचे भोक्ते नाहींत; शिवाय एकामागून एक चार कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्यामुळें कादंबऱ्यांचे चाहते देखील कादंबरीपेक्षां निराळ्या पुस्तकांची गरज दर्शवूं लागले. इतक्यांत रामतीर्थ, विवेकानंद यांच्या निरनिराळ्या पुस्तकांविषयीं जिकडे तिकडे जाहिराती फडकूं लागल्यावर आमच्या कित्येक विद्वान आश्रयदात्यांनीं ग्रंथमालेच्या नियमाप्रमाणें सहा आणे किंमतींत विवेकानंदासारख्या महात्म्याच्या अमृतवाणीचा लाभ झाल्यास दीडदोन रुपये एकदम भरण्यास असमर्थ असलेल्या आश्रयदात्यांवर मोठे उपकार होतील, असें विशेष आग्रहानें सुचविल्यामुळें कर्तव्य ह्मणून हा प्रयत्न करण्याचें योजिलें व त्याप्रमाणें स्वामींच्या ओजपूर्ण वाणीनें व लेखणीनें दृष्यमान् झालेल्या महात्म्यांचीं तात्त्विक पण मनोरंजक चरित्रें यथाशक्ति गुंफून तीं आश्रदात्यांना नजर केलीं आहेत. आमचे आश्रयदाते हा प्रयत्न गोड करून घेतील. अशी आह्मास उमेद आहे. पावणेदोनशें पानांचा सुंदर मजकूर, पांच सुवक चित्रें आणि उत्कृष्ट वाह्यांग या सर्वांचा विचार केला ह्मणजे या महात्म्यांचा परिचय अवघ्या सहा आण्यांत करून देण्यांत भारत–गौरव–ग्रंथमालेनें मोठें साहस केलें आहे, असें कोणीहि कवूल करील. आमच्या आश्रयदात्यांना आमचा हा प्रयत्न आवडल्यास मधून मधून अशा प्रकारचीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. विशेषतः श्रीकृष्ण चरित्र, स्वामी विवेकानंद यांचें संपूर्ण चरित्र, आणि श्रीमद्भगवद्गीता हीं तीन पुस्तकें महाराष्ट्रांतील विद्वान् लेखकांनीं लिहिलेलीं असून तीं त्यांच्या कित्येक वर्षांच्या व्यासंगाचीं फळें आहेत. शिवाय या पुस्तकांत उत्कृष्ट कादंबरीच्या वाचनानें होणाऱ्या आनंदापेक्षांहि अधिक आनंद व चित्ताकर्षकपणा असल्यामुळें तीं फारच अपूर्व झालीं आहेत; परंतु हीं पुस्तकें मिळविण्यासाठीं संस्थेच्या मस्तकावर विलक्षण कर्ज झालें आहे. त्यांतून विवेकानंदाच्या चरित्रासंबंधानें स्वामींनीं स्थापन केलेल्या मायावतीआश्रमालाहि कांहीं रक्कम पोहोंचविण्याचा संस्थेनें संकल्प केलेला असल्यामुळें ग्रंथमालेला प्रत्येक महाराष्ट्रसाहित्याभिमान्यानें आश्रय देणें हें त्याचें कर्तव्य होय. आमचा हा प्रयत्न केवळ साहित्योन्नतिसाठीं आणि तोहि निःस्वार्थबुद्धीचा असल्यामुळें महाराष्ट्रांतले विद्वान आपलें साहित्यप्रेम पोकळ आहे, असें जनतेच्या दृष्टोत्पत्तीस आणूं देणार नाहींत, अशी आशा आहे. तसेंच

या पुण्य कृत्यासाठीं आमच्या आश्रयदात्यांनींहि आश्रयदाते वाढवून देण्याचा शक्य तितका प्रयत्न करावा अशी त्यांना आमची विनंति आहे.

## महात्मा–गौतम.

हें या ग्रंथमालेचें सहावें पुस्तक असून तें कल्पनातीत सर्वांगसुंदर करण्याचा आह्मी शक्य तितका प्रयत्न करीत आहों. या पुस्तकांत गौतमबुद्धाची जन्मापासून तों मृत्यूपर्यंतची हकीकत कादंबरीरूपानें विशेष मनोरम व हृदयंगमतेनें एकत्र केली आहे. या कादंबरींत प्रसंगानुरोधानें लंकेंतील बुद्धदंत, सारनाथस्तूप, बुद्धगया, पेशावर येथें सांपडलेलें चिताभस्म वगैरे ऐतिहासिक विषयांचा समावेश मुद्दाम केला असून त्यासंबंधाचीं सुंदर चित्रेंहि दिलीं आहेत. पुस्तक सर्वोत्कृष्ट ऐन्टिक कागदावर छापत असून बाह्यांगाचा कागदहि अगदींच नवीन आहे. हें पुस्तक मकरसंक्रमणाचे वेळीं आश्रयदात्यांच्या हातांत पडावें असा आह्मी प्रयत्न करीत आहों. ईश्वरकृपेनें जर आमच्या दैवी आपत्तींनीं तोंपर्यंत विसावा घेतला, तर वरील मुदतींत हें पुस्तक निश्चयानें प्रसिद्ध होईल. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर वर्षप्रतीपदेच्या दिवशीं–

## जाईचा मंडप.

ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध करण्याची खटपट आतांपासूनच चालविलेली आहे. उज्वल कर्तव्यनिष्ठा, पवित्र प्रेम, सात्विक स्वाभिमान या ईश्वरी सद्गुणांपुढें आसुरी सामर्थ्याचा अखेर कसा नाश होतो, याचें परिणामकारक कथानक या कादंबरींत रेखाटलें आहे. अकबर बादशहाच्या कारकीर्दीत एका लहानशा संस्थानांत घडलेल्या हकीकतीवरून ही कादंबरी स्वतंत्रपणें लिहिलेली असून लेखकाच्या काव्यमय कल्पनौघामुळें वाचक जणूं काय त्यावेळच्या भरतखंडाच्या परिस्थितींत जाऊन पोहोंचतो.

शरच्चंद्र व कुमुदनाथ यांच्या निःसीम स्नेहानें श्रीरामचंद्र व भरत यांच्या प्रेमाची आठवण होते. शरच्चंद्र व सरला यांच्या निःस्वार्थ प्रीतीनें अंतःकरण गहिंवरून जातें. शरदाचें असामान्य धैर्य, कर्तव्याबद्दलची जागरुकता, मातृभूमीवरील अढळभक्ति इत्यादि सद्गुण पाहून त्याच्याविषयीं धन्यधन्य असे उद्गार बाहेर पडतात. जन्मभूमीच्या कल्याणासाठीं महातेजस्वी धैर्यधर महाराज यांचें उग्र पण उदात्त व्रत पाहून रघुकुलांतील नृपतींची आठवण होते. उलटपक्षीं तुंगवीर्यांची अखंड अधोगामी प्रवृत्ति, अमर्याद नीच कृष्णकारस्थानांनीं गुरफटलेलें त्याचें मन, त्याचा स्वजनद्रोह, त्याची कुटिलता वगैरेमुळें त्याच्या आसुरी हृद-

याचें प्रतिबिंब सहज दृग्गोचर होतें. राणी नलिनीची राज्यतृष्णा, तिच्या पतित हृदयानें सुवर्णपूरला लागलेली परसत्तेची कालिमा पाहून मन साहजिक उद्विग्न होतें. याशिवाय विमलेचें विमलप्रेम, तिची वीर वृत्ति, कमलाकांत व विपिन यांची स्वामिभक्ति, मदनिका व वत्सला यांचा स्वार्थत्याग, अफजुल्ला व मोहवतखां यांची चढाओढ वगैरे सर्वच प्रकार जितके चित्ताकर्षक तितकेच बोधप्रद आहेत.

कादंबरीची भाषा काव्यसूत्राप्रमाणें मनोहर व प्रतिभायुक्त असून निसर्गाचीं वर्णनें विपुल व फारच बहारीचीं आहेत. लेखकाच्या लेखनकौशल्यामुळें वाचक कथानकाशीं साहजिक तन्मय होतो व त्यास संपूर्ण पुस्तक वाचल्यावांचून कांहींहि सुचेनासें होतें. ज्यांचीं हृदयें नाना प्रकारच्या उपाधींनीं तप्त झालीं असतील, निराश बनलीं असतील, उदासीनतेनें व्यापून गेलीं असतील, त्यांनीं निदान एकवार तरी या जाईच्या मंडपांत प्रवेश करावा, म्हणजे तीं शांत, कर्तव्यतत्पर व आशेनें प्रफुल्ल होतील.

## आश्रयदात्यांना विनंति.

यानंतर पद्ममधु व जहांगीर हीं पुस्तकें प्रसिद्ध होतील. वर्षप्रतिपदा, नारळीपौर्णिमा, विजयादशमी, व मकरसक्रांत या चार मंगलदिवशीं एकेक पुस्तक प्रसिद्ध व्हावें असा आमचा हेतु व प्रयत्न असून तो ईश्वरकृपेनें सफल होईल, असें वाटतें. व्यासपीठावरून महाराष्ट्रसाहित्याविषयीं केवळ कीर्तिविवश होऊन पोकळ वल्गना करण्यापेक्षां प्रत्यक्ष कृतीनें परमेश्वर देईल त्या बुद्धीनें साहित्यसेवा करण्यासाठीं आम्ही जें हें साहस केलें आहे, तें कितीहि प्रशंसनीय असलें, तरी हा सांपत्तिक संकटाशीं सामना आहे. त्यांतून संस्थेला निभावून नेणें सर्वपरी आमच्या आश्रयदात्यांच्या स्वाधीन आहे, आणि हें निभावून नेणें म्हणजे प्रत्यक्ष खिशांतून पैसा द्यावयाचा नसून चारदोन नवीन आश्रयदाते मिळवून देणें होय. आश्रयदात्यांवर आम्ही जो हा वारंवार भार टाकतों, त्याचें कित्येकांना आश्चर्य देखील वाटत असेल; परंतु राजेमहाराजे यांचा आश्रय मिळविण्याचे निराळे मार्ग, गुळाचाच गणपति आणि गुळाचाच नैवेद्य, या न्यायानें न्यायदेवतेच्या गळ्यांतल्या संपादकांचीं प्रशंसापत्रें मिळविण्याची हातोटी आणि विद्वानांच्या नांवानें लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याची खुबी, ग्रंथमालेला माहित नसल्यामुळें आश्रयदात्यांवर भार टाकल्यावांचून तिला दुसरा इलाज नाहीं. गरीब विचारी भारत–गौरव–ग्रंथमाला! मोठाले विद्वान सहा आणे किंमतीचें साहित्य म्हणून हातांत

पुस्तक घ्यावयाला भितात, तर मोठाले श्रीमान पुस्तकाची किंमत सहाच आणे ह्मणून पुस्तकाला हात लावायला कचरतात! अशा स्थितींत संस्थेच्या भावी उन्नतीची आशा सर्वसाधारण आश्रयदात्यांवरच अवलंबून रहावी, यांत मोठेंसें नवल तें काय? आमच्या एका आश्रयदात्यानें आह्मास पत्र पाठवून असें कळविलें आहे, कीं, "**अशा प्रकारची माला जर अमेरिकेंत कोणी काढली असती, तर तिचीं पुस्तकें मजुराच्या झोंपडीपासून तों प्रेसिडेंटच्या व्हाइट हाउसपर्यंत सर्वांच्या पुस्तकालयांत दिसलीं असतीं!**" कोणी सांगावें? कदाचित् हें खरेंहि असेल; पण आह्मी आमच्या मातृभाषेचा व साहित्याचा अभिमान बाळगून हा प्रयत्न मराठींत करण्यांत कांहीं चूक केली आहे, असें वाटत नाहीं. चूक असेल, तर ती एवढीच कीं, हा उद्योग आह्मी विद्वानांच्या नांवानें करीत नाहीं; पण केवळ तेवढ्याच साठीं निःपक्षपातबुद्धीच्या सहृदय महाराष्ट्रीयांनीं ग्रंथमालेला आश्रय न देणें ह्मणजे जाणूनबुजून महाराष्ट्र-साहित्याची अवहेलना करण्यासारखें आहे. स्वतःचें नांव, स्वतःचें चित्र आणि स्वतःची प्रतिकृति, एवढेंच ज्यांना साहित्य वाटतें, त्यांनीं या संस्थेला आश्रय न देणें, हें त्यांचें शीलच आहे; पण साहित्य या शब्दाचा जे यापेक्षां खरा अर्थ करतात, त्यांनीं संस्थेला आश्रय देणें, हें त्यांचें कर्तव्य होय आणि आपल्या बंधुमित्रांना हें कर्तव्य बजावण्यास आमचे आश्रयदाते भाग पाडतील अशी दृढतर आशा बाळगून तेवढ्यासाठीं यासोबत मुद्दाम दोन विनंतिपत्रें पाठविलीं आहेत.

गिरगांव,
मुंबई, तारीख १ दिसेंबर १९१२.

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**

# अनुक्रमणिका.

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ. |
| १ | प्रस्तावना. ... ... ... ... | १३ |
| २ | श्रीरामकृष्ण स्तोत्र. ... ... ... ... | १४ |
| ३ | श्रीरामकृष्ण परमहंस. ... ... ... | १५ |
| ४ | स्वामी विवेकानंद. ... ... ... | १६ |
| ५ | माझे गुरुदेव. ... ... ... ... | १७ |
| ६ | देवदूत ख्रिस्त. ... ... ... ... | ५८ |
| ७ | जगाचे महागुरू. ... ... ... ... | ७९ |
| ८ | पव्हारी वावा. ... ... ... ... | ९९ |
| ९ | भगवान् बुद्ध. ... ... ... ... | ११६ |
| १० | डेट्राइट येथील व्याख्यान ... ... ... | १२८ |
| ११ | प्रोफेसर मॅक्समुल्लर... ... ... ... | १३२ |
| १२ | रामकृष्ण; त्यांचें चरित्र आणि वचनें. ... ... | १३८ |
| १३ | भरतखंडांतील महात्मे. ... ... ... | १५१ |

# प्रस्तावना.

फोडिलें भांडार। धन्याचा हा माल।
मी तंव हमाल। भारवाही ॥ १॥

सर्वांचा नम्र,
**विश्वनाथ.**

# श्रीरामकृष्ण स्तोत्र.


आचंडालाप्रतिहतरयः यस्य प्रेमप्रवाहः।
लोकातीतोप्यहह न जहौ लोककल्याणमार्गम् ॥

त्रैलोक्येप्य प्रतिममहिमा जानकी प्राणबंधः।
भक्त्या ज्ञानं वृतवरवपुः सीतया यो हि रामः ॥

स्तब्धीकृत्वा प्रलयकलितंवाहवोत्थं महांतम्।
हित्वा दूरं प्रकृतिसहजामंधतामिस्रमिश्राम् ॥

गीतं शांतं मधुरमपि यः सिंहनादं जगर्ज।
सोयं जातः प्रथितपुरुषः रामकृष्णस्त्विदानीम् ॥

विवेकानंद.



भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस.

# श्रीरामकृष्ण परमहंस.

यांचा जन्म शके १७५६ फाल्गुन शुद्ध २ ला बंगाल्यांतील कामारपुकुर गांवीं ब्राह्मण वंशांत झाला. वडिलांचें नांव खुदिराम असून मातुश्रीचें नांव चंद्रमणि होतें. खुदिराम जितके धार्मिक, तितकीच त्यांची पत्नी भाविक होती. रामकृष्ण लहान असतांनाच त्यांचे वडील वारल्यावर घरची गरिबी असल्यामुळें ते कलकत्त्याच्या दक्षिणेश्वराच्या मंदिरांत श्रीभवतारणी देवीची पूजाअर्चा करून आपला निर्वाह करूं लागले. त्यांचें मन यापूर्वीच ईश्वराची ओळख करून घेण्याच्या विचाराकडे लागलें होतें. आतां ते कालीमातेच्या मूर्तीपुढें बसून 'आई, तूं खरोखरच असशील तर दर्शन दे.' असा टाहो फोडूं लागले. या तन्मय वृत्तीमुळें त्यांना भगवद्दर्शन झालें. परंतु ती पराविद्या चोरून न ठेवतां, गोड, सोप्या, पण प्रतीतीच्या शब्दांनीं जो कोणी येईल, त्याला ते सांगूं लागले. त्या ज्ञानासत्राच्या प्रभावानें केशवचंद्रांसारखे ब्राह्मो व मॅक्स मुल्लरसारखे ख्रिस्त धर्मी आपला पक्षभेद विसरून जाऊन वैदिक बनले. चार दोन साध्या शब्दांत ब्रह्मांडाएवढें गहन तत्व ते सहज समजावून सांगत. त्यांचा विवाह झाला होता. स्त्रीचें नांव शारदामणि होतें. ती त्यांची पट्ट शिष्यीण होती. गुरुदेव रामकृष्ण व मातुश्री शारदामणि दोघेंहि आमरण ब्रह्मचर्यव्रती होतीं. परमहंसांनीं शके १८०८ भाद्रपद शुद्ध प्रतीपदेला आपला अवतार संपविला.

# श्रीमद्विवेकानंद.

यांचा जन्म कलकत्त्याजवळील सिमुलिया गांवांत तारीख ९ जानेवारी सन १८६२ रोजीं झाला. यांचें पाळण्यांतलें नांव वीरेश्वर. ते थोडे मोठे झाल्यावर त्यांचें नांव नरेंद्रनाथ ठेवलें. यांच्या वडिलांचें नांव विश्वनाथ दत्त. ते कलकत्ता हायकोर्टांत अटर्नी होते. विवेकानंद लहानपणापासूनच तीक्ष्ण व चौकसबुद्धीचे होते. ते सोळाव्या वर्षी म्याट्रिक व अठराव्या वर्षी बी. ए. झाले. पुढें अभ्यास करणार होते; पण वडील वारल्यामुळें त्यांनीं नौकरी धरली. परमहंसांची गांठ पडेपर्यंत ते धर्मविषयासंबंधानें फार साशंक असत व ते वाटेल तो प्रश्न तज्ञांना करून त्यांना घोंटाळ्यांत टाकीत. ते कांहीं दिवस ब्राह्मो होते; पण ब्रह्मसमाजाचा फोलपणा त्यांच्या प्रत्ययाला येतांच त्यांनीं समाजाला सोडचिठ्ठी दिली. पुढें रामकृष्ण परमहंसांचे तत्वविचार त्यांच्या कानावर गेल्यावर ते त्यांच्या दर्शनाला गेले व तेथें त्यांच्या प्रत्येक शंकेचें प्रतीतीच्या शब्दांनीं उत्तर मिळाल्यामुळें ते सर्वसंगपरित्याग करून परमहंसांचे शिष्य झाले. अध्यात्माचा विलक्षण अभ्यास करून ते पट्टशिष्य झाले. आपल्या असामान्य वाणीनें हिंदुधर्माचें विषद स्वरूप सर्व जगाला दाखवून त्यांनीं सर्व धर्मियांकडून 'हिंदुधर्माचा जयजयकार असो' असे उद्गार काढविले. स्वामींनीं आपलें अवतारकृत्य तारीख ४ जुलै सन १९०२ रोजी संपविलें.



श्रीमत् स्वामी विवेकानंद.

# महात्मा-परिचय.

## माझे गुरुदेव.

भगवान् श्रीकृष्ण भगवद्गीतेंत अर्जुनाला सांगतात,

> ' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
> अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ १ ॥

' जेव्हां जेव्हां धर्माचा लोप होत जातो व अधर्म जिकडे तिकडे जोरावतो, तेव्हां तेव्हां मनुष्यजातीला सहाय्य करण्याकरितां मी अवतार घेतों.' जेव्हां जेव्हां वाढीमुळें किंवा अगांतुक परिस्थितीमुळें ह्या आपल्या जगाला पुनः सुस्थित होण्याची जरूरी भासते, तेव्हां तेव्हां महत् शक्तीची एक लाट येते. मनुष्य अध्यात्माच्या व अधिभूताच्या दोन्हीही मैदानावर प्रयत्न करीत असल्यामुळें ह्या पूर्वस्थितीवर नेणाऱ्या लाटा दोन्हीही मैदानावर येतात. एकीकडे आधिभौक्तिकाला पूर्वस्थितीवर नेण्याला अलीकडच्या कालांत मुख्यतः यूरोप हें कार्यक्षेत्र झालें आहे; तर दुसरीकडे, आध्यात्मिकाच्या बाबतींत जगाच्या इतिहासभर आशिया हेंच कार्यक्षेत्र आहे. जडविषयक कल्पना आपल्या वैभवाच्या व सामर्थ्याच्या शिखरावर पोहोंचल्या आहेत; दिवसेंदिवस जडावर ज्यास्त ज्यास्त अवलंबून रहात गेल्यामुळें मनुष्य आपला दिव्य स्वभाव विसरून जाण्याचा संभव आहे; इतकेंच नाहीं, तर तो स्वतःच केवळ पैसा बनविण्याचें यंत्र बनण्याचा संभव आहे; तेव्हां अशा चालनेची आज जरूरीच आहे. मागणी झाली आहे आणि जमत चाललेल्या जडवादाच्या ढगांना पार घालवून देण्याकरितां महत् शक्ति येते आहे. शक्तीला चालन मिळालें आहे आणि

ती लवकरच मनुष्याला ' तूं कोण आहेस ' याची जाणीव देईल. फिरून्ही ह्या शक्तीच्या उत्पत्तीस्थानाचा मान आशियालाच मिळेल. विश्व श्रमविभागाच्या तत्वावर चाललेलें आहे. एकच मनुष्य संपूर्ण वस्तुजाताचा मालक होईल असें म्हणणें शुद्ध वेडेपण आहे; पण आपल्या कल्पना नेहमींच किती पोरकट असतात! लहान मुलाला त्याच्या अज्ञानामुळें वाटतें, सगळ्या जगांत आपलें खेळणें हीच काय ती संग्राह्य वस्तु आहे. तसेंच जड सामर्थ्य लाभल्यामुळें मोठें झालेल्या राष्ट्रालाही वाटतें कीं, ' मिळविण्यासारखें काय तें हेंच आहे ; प्रगति म्हणून म्हणतात ती हीच; सुधारणा म्हणून जी कांहीं आहे ती हीच ; ह्या जडशक्तीची पर्वा न करणारीं किंवा ज्यांना ही जडशक्ति मिळाली नाहीं अशीं, जर कांहीं राष्ट्रें असलीं तर तीं मुळीं जगण्यालाच योग्य नाहींत ; त्यांचें सर्व जीवन निरर्थक आहे !' दुसरीकडे दुसऱ्या एकाद्या राष्ट्राला वाटेल कीं, नुसती जडविषयक सुधारणा अगदीं निरुपयोगी आहे. मनुष्याला आकाशाच्या छताखालीं असलेली प्रत्येक वस्तु मिळाली, पण जर त्याला सत्तत्त्व मिळालें नाहीं, तर त्याचा काय उपयोग ? जगाला एकदां असें सांगणारा हा नाद पूर्वेकडून निघाला. ही पूर्वेच्या विचारांची दिशा ! पश्चिमेच्या अगदींच उलट ! !

ह्या दोन्हीही कल्पना आपापल्यापरी भव्य आहेत, वैभवयुक्त आहेत. हल्लींच्या चालनेनें हीं दोन्हीं ध्येयें एकत्र होऊन जातील, बेमालुम सांधलीं जातील. पाश्चात्याला इंद्रियांचें जग जितकें खरें वाटतें तितकेंच पौरस्त्याला आत्म्याचें जग खरें वाटतें. पौरस्त्याला जें कांहीं त्याला पाहिजे, ज्याची त्याला आशा आहे, तें सगळें दिव्यांत, सूक्ष्मांत सांपडतें; ज्याच्या योगानें जीवन हें भासरहित होतें, तें सगळें त्याला त्याच्यांत दिसतें. पाश्चात्याला तो स्वप्नसृष्टींत वावरतो आहे असें वाटतें. पौरस्त्याला पाश्चात्य क्षणभंगुर खेळणीं खेळत स्वप्नांत रंगला आहे असें वाटतें. चांगलीं प्रौढ स्त्रीपुरुषें —आज नाहीं उद्यां जिला सोडणें त्यांना भागच आहे—त्या मूठभर मातीची इतकी प्रौढी कशी गातात ह्या विचारानें त्याला हंसूच येतें. दोघेही एकमेकाला स्वप्नांत आहे समजतात; पण पूर्वेचें ध्येय पश्चिमेच्या ध्येयाइतकेंच

मनुष्य जातीच्या प्रगतीकरितां आवश्यक आहे; मला वाटतें त्याची त्याहून देखील ज्यास्त जरूरी आहे. यंत्रांनीं आजपर्यंत मनुष्याला सुखी केलें नाहीं, पुढेंही तीं करणार नाहींत. यंत्रापासून सुख होतें ह्या कल्पनेवर आमचा विश्वास बसावा म्हणून जो प्रयत्न करील त्याच्या मतें सुख यंत्रांत आहे; पण सुख मुळीं नेहमीं मनांत असतें. आपल्या मनावर ज्याचा ताबा आहे तोच मनुष्य सुखी होऊं शकेल. दुसऱ्याला तें शक्यच नाहीं. आणि इतकें झालें, तरी हें यंत्राचें सामर्थ्य म्हणजे काय आहे? ज्या मनुष्याला एकाद्या तारेंतून विजेचा प्रवाह पसरवितां येतो, त्याला श्रेष्ठ, बुद्धिवान् कां म्हणावयाचें? प्रत्येक क्षणांत ह्याहून लाखोपटीनें अधिक गोष्टी निसर्ग नाहीं कां करीत? मग निसर्गापुढें विनत होऊन त्याची कां नाहीं पूजा करीत? विश्वांतल्या अणुरेणुवर तुम्ही स्वामित्व मिळविलें असलें, सर्व जगावर तुमची सत्ता चालत असली, तरी त्याचा काय उपयोग? तुमच्यांत स्वतःतच सुखाची शक्ति असल्याशिवाय, आणि तुम्ही स्वतःलाच जिंकीपर्यंत, त्यांत तुम्हांला सुखी करण्याचें सामर्थ्य नाहीं. निसर्गावर जय मिळविण्याकरितां मनुष्य जन्माला आला आहे हें खरें आहे; पण पाश्चात्याला निसर्ग म्हणजे हें जें बाहेर दिसतें आहे-हें जें जड आहे—तेवढेंच वाटतें. मोठमोठ्या पर्वतांनीं, गंभीर सागरांनीं, नद्यांनीं आणि असंख्य शक्तींनीं व प्रकारांनीं भरलेली बाह्य सृष्टि भव्य आहे हें खास; पण सूर्य, चंद्र, तारे ह्यांच्याहून उंच, ह्या आपल्या पृथ्वीहून उन्नत, जड विश्वाहून श्रेष्ठ, आपल्या ह्या लहान लहान जीवितांच्या पलीकडची, मनुष्याची अन्तःसृष्टि भव्यतर आहे. मननाला ती एक दुसरा विषय देते. पहिल्यांत पाश्चात्य श्रेष्ठ आहेत, तसेंच दुसऱ्यांत पौरस्त्य श्रेष्ठ आहेत. तेव्हां आध्यात्मिक चालना पूर्वेकडून यावी हें योग्यच आहे. तसेंच, पूर्वेला यंत्र कसें करावें हें शिकावयाचें असलें, तर पश्चिमेच्या पायाजवळ बसून तिनें शिकावें हेंही युक्त आहे. पाश्चात्याला जर सूक्ष्म तत्वाबद्दल, परमेश्वराबद्दल, आत्म्याबद्दल, विश्वाच्या गुह्याबद्दल व अस्तित्वाबद्दल धडे घ्यावयाचे असतील, तर त्याला पौरस्त्याच्या पायांजवळ बसलेंच पाहिजे.

भारतवर्षांत अशा लाटेला ज्यानें चलन दिलें आहे, अशा एका पुरुषाचें जीवनचरित्र मी आपणांस सांगणार आहे; पण तें सांगण्यापूर्वी हिंदूचें रहस्य—हिंद म्हणजे काय—हें मी आपणास सांगतों. जडवस्तूच्या तेजानें ज्यांचे डोळे अंध झाले आहेत, ज्यांनीं आपलें सगळें आयुष्य अशन, पान, आणि भोग ह्यांना देऊन टाकलें आहे, जमीन आणि सोनें ह्यालाच जें संपत्ति समजतात, इन्द्रियांच्या द्वारा मिळणारें सुखच ज्यांना ठाऊक आहे, पैसा म्हणजेच ज्यांचा परमेश्वर, सुखाचें आणि चैनीचें आयुष्य हेंच ज्यांचें अंतिम, आपल्या भोंवतीं पसरलेल्या इन्द्रियगम्य पदार्थांपेक्षां अधिक श्रेष्ठ असलेल्या अतींद्रिय वस्तूंबद्दल ज्यांनीं क्वचितच विचार केला आहे, अशा लोकांपैकीं जर कोणी हिंदभूमींत गेले, तर त्यांना काय दिसतें ? दारिद्र्य, घाण, वेड्या धर्मसमजुती, अज्ञान, विद्रूपता! जिकडे तिकडे त्यांना हें दिसतें. पण याचें कारण काय? कारण, त्यांच्या मतानें सुधारणेचा प्रकाश म्हणजे कपडे, शिक्षण, सुधारलेले रीतिरिवाज! पाश्चात्यानें आपली आधिभौतिक स्थिति सुधारण्याकडे प्रत्येक प्रयत्न लावला; भरतवर्षानें निराळ्या दिशेनें लाविला. जगांत जर असे कोणी लोक असतील कीं, जे मानव्याच्या सर्व इतिहासांत दुसऱ्याला आपले गुलाम बनविण्याकरितां आपल्या देशमर्यादेच्या बाहेर कधींही गेले नाहींत; ज्यांनीं जें दुसऱ्याचें आहे, त्याचा कधींही लोभ धरिला नाहीं, ज्यांचा एकच दोष म्हणजे त्यांची भूमि फार सुपिक होती, आणि त्यांनीं स्वतःच्या काबाडकष्टानें विपुल संपत्ति मिळविली आणि अशा रीतीनें इतर राष्ट्रांना, येऊन आपल्याला लुटून न्यावयाचा मोह उत्पन्न केला! मी म्हणतों, असे जर कोणी लोक असतील, तर ते फक्त भारतांतच आहेत. इतरांनीं त्यांना लुबाडलें, त्यांना रानटी म्हटलें, तरी त्यांतही त्यांना समाधान आहे; इतकेंच नाहीं, तर त्याच्या मोबदला ह्या जगाला त्या सर्वश्रेष्ठाची कल्पना त्यांना द्यावयाची आहे, मनुष्यांच्या निसर्गाचें रहस्य स्पष्ट करून दाखवावयाचें आहे, ज्या पडद्यांनीं मनुष्यांतील सत्तत्व झांकून टाकिलें आहे, ते पडदे त्यांना फाडून टाकावयाचे आहेत. कारण त्यांना माहित आहे कीं, ह्या जडाच्या मागें पापानें जें मलिन होत

नाहीं, भयंकर कृत्यांनीं जें विकृत होत नाहीं, विकार प्राबल्यानें जें कलंकित होत नाहीं, अग्नीनें जें जळत नाहीं, पाण्यानें जें भिजत नाहीं, उष्णतेनें जें सुकत नाहीं, मृत्युला जें मारतां येत नाहीं, असें सत्य, दिव्य, तत्व आहे. आणि पाश्चात्याला इन्द्रियग्राह्य वस्तु जितकी सत्य भासतें, तितकेंच त्यांना हें मनुष्यांतलें सत्तत्व खरें वाटतें. आनंदाची गर्जना करीत तोफेच्या तोंडावर उडी घालण्याचें धाडस जसें तुमच्यांत आहे, आपल्या देशाकरितां निश्चल उभे राहून प्राण द्यावयाला—राष्ट्रप्रेमाकरितां कांहींही करावयाला-जसें तुम्ही तयार आहांत; त्याचप्रमाणें ईशप्रेमाकरितां वाटेल तें दिव्य करावयाला तें तयार आहेत. जग हें कल्पनामय आहे, सगळें स्वप्न आहे! असें म्हटल्याबरोबर, ज्यावर आपला विश्वास आहे, व जें आपल्याला पटतें तें सत्य आहे, असें दाखविण्याकरितां वस्त्रें फेंकून देऊन, संपत्ति तृणवत् समजणारे महात्में तेथेंच आहेत! जीवित चिरंतन आहे असें समजल्याबरोबर, नदीच्या तीरावर बसून, जशी एकादी गवताची काडी तुम्ही सहज टाकून द्याल, त्याप्रमाणें कांहींच नाहीं अशा रीतीनें आपल्या देहाचा त्याग करणारे महापुरुष तेथेंच आहेत! आपल्याला मुळीं मरणच नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें, मृत्यूला सख्याभावाप्रमाणें भेटावयाला तयार असण्यांतच त्यांचें वीरत्व आहे. आज शेंकडो वर्षें परकीयांनीं ज्या स्वाऱ्या केल्या, अरेरावी गाजविली, जुलूम केले, त्या सर्वांतूनही ज्या शक्तीमुळें ते अजिंक्य राहिले ती त्यांची शक्ति ह्यांतच आहे. आज तें राष्ट्र जिवंत आहे; आणि महत्संकटाच्या काळांत सुद्धां त्या राष्ट्रांत आध्यात्मिक महापुरुषांचा उदय झाल्याशिवाय राहिला नाहीं. राजकारणांतलें जड विषयक शास्त्रांतले महापुरुष पश्चिमेनें दिले, तर धर्मांतले महावीर आशियानें दिले. ह्या शतकाच्या आरंभीं जेव्हां पाश्चात्यांचें प्रस्थ हिंदभूमींत वाढूं लागलें, पाश्चात्य जेते हातांत शस्त्र घेऊन जेव्हां ऋषींच्या अपत्यांना सांगूं लागले कीं, ‘ तुम्ही रानटी आहां, स्वप्नशीलांच्या कुटुंबापैकीं आहां; तुमचा धर्म म्हणजे दंतकथांचा बाजार आहे; ज्याच्याकरितां तुम्ही झगडतां तो परमात्मा, जीवात्मा आणि इतर सर्व गोष्टी म्हणजे निव्वळ अर्थरहित शब्द आहेत; ह्या झगड्यांत

घालवलेलीं हजारो वर्षें—त्याग करण्यांत घालविलेलीं हजारो वर्षें—सर्व फुकट गेलीं;’ तेव्हां विश्वविद्यालयांतल्या तरुणांना एक प्रश्न नेहमीं त्रास देऊं लागला. आजपर्यंतचें आपल्या राष्ट्राचें जीवित निष्फळ झालें काय? आपलीं पुराण-पुस्तकें फाडून, आपलें तत्वज्ञान जाळून, आपल्या धर्मोपदेशकांना हाकलून देऊन व आपलीं देवळें पाडून पुनः आपल्याला पाश्चात्यांच्या तऱ्हेनें प्रयत्न केला पाहिजे काय? तरवारींवर व तोफांवर आपला धर्म स्थापणाऱ्या पश्चिमेकडच्या जेत्यांनीं जुनी दिशा म्हणजे धर्मवेडेपणा व मूर्तिपूजा असें सांगितलें नाहीं काय? पाश्चात्य तऱ्हेवर काढलेल्या शाळांतून शिकून संस्कृत झालेल्या मुलांच्या मनांत ह्याच कल्पना शिरल्या; तेव्हां शंका उत्पन्न झाल्या ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; पण वेड्या धर्मसमजुती टाकून देऊन सत्याचा खरा शोध करण्याऐवजीं ‘पश्चिम काय म्हणते’ हीच सत्याची परीक्षा होऊन बसली. ब्राह्मणवर्ग नाहींसा झाला पाहिजे, वेद जाळून टाकले पाहिजेत; कारण? पश्चिम असें म्हणतें. अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या अस्वस्थतेच्या वृत्तींतून जिला सुधारणा म्हणून म्हणतात तिची एकलाट हिंदुस्थानांत उत्पन्न झाली.

जर तुम्हाला खरे सुधारक व्हावयाचें असेल, तर तीन गोष्टींची जरूरी आहे. पहिली गोष्ट म्हणजे **मनाला लागून राहणें.** तुमच्या बांधवांकरितां खरोखर तुम्हाला मनांतून कांहीं वाटतें का? जगामध्यें इतकें दुःख, इतकें अज्ञान, इतक्या वेड्या धर्मसमजुती भरल्या आहेत; ही गोष्ट तुमच्या अगदीं जिव्हाळी लागली आहे का? जितके मनुष्य तितके तुमचे भाऊ, अशी तुमची बालंबाल कल्पना आहे का? हे विचार तुमच्या सर्व शरीरांत संचार करीत आहेत का? तुमच्या रक्ताबरोबर ते वाहत आहेत का? ते तुमच्या नाड्यांतून उडत आहेत का? तुमच्या नसानसांतून, तुमच्या रोमांरोमांतून ते पसरत आहेत का? सहानुभूतीच्या ह्या कल्पनेचेच तुम्ही बनले आहां का? असें जर असलें, तर फक्त पहिली पायरी तुम्ही चढलां. नंतर, ह्यावर आपल्याला **कांहीं इलाज आढळतो** का? ह्याचा तुम्हाला विचार केला पाहिजे. जुन्या कल्पना म्हणजे वेड्या धर्मसमजुती अस-

तील; पण ह्या वेड्या धर्मसमजुतींच्या संचयाच्या मध्यें व भोंवतालीं सोन्यारुप्याचे गोळे भरलेले आहेत. अशुद्ध तेवढें काढून टाकून शुद्ध सोनें तेवढें ठेवावयाचा कांहीं मार्ग तुम्हांला सांपडला आहे का? तो जर तुम्हांला सांपडला असला, तर आतांशीक कोठें तुम्ही दुसरी पायरी चढून गेलांत. अजून एक गोष्ट आवश्यक आहे. तुमचा हेतु काय? सोन्याच्या लोभानें, किंवा कीर्तीच्या अथवा सत्तेच्या हांवेनें तुम्हीं हें करावयाला उद्युक्त झाला नाहीं ही तुमची खात्री आहे का? सर्व जगाच्या मनांतून जरी मला चिरडून टाकावयाचें असलें, तरी मी माझ्या ध्येयाला धरून एक सारखा कार्य करीत राहीन, असें तुम्हांला अगदीं नक्की वाटतें आहे का? मला काय पाहिजे हें मला माहित आहे, मी आपलें कर्तव्यच करीन, आणि माझें जीवितही त्यांत जाणार असलें, तरी तेंच करीत राहीन, अशा बद्दल तुम्ही अगदीं निश्चित आहां कां? माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत, नाडीचा एक तरी ठोका पडतो आहे तोंपर्यंत, मी नेट धरीन असा तुमचा पूर्ण भरंवसा आहे का? जर असेल तर मग तुम्ही खरे सुधारक आहां; जगाला शिकविण्याचा अधिकार तुमचा; तुम्हीं गुरुदेव आहां; तुमच्यामुळें मनुष्य जाति धन्य आहे. पण मनुष्य किती अदूरदृष्टि! थांबण्याइतका धीर त्याच्यांत नाहीं, पहाण्याइतकी शक्ति त्याच्यांत नाहीं, त्याला अधिकार गाजवावयाला पाहिजे, पेरल्याबरोबर उगवावयाला त्याला पाहिजे. पण असें कां? तर त्याला तें पीक स्वतःलाच पाहिजे आहे; त्याला दुसऱ्याची वास्तविक काळजी नाहीं. कर्तव्याकरितां कर्तव्य त्याला नको आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।'

'कर्म करावयाचा तुझा अधिकार आहे; फलाशीं तुला काय करावयाचें? श्रीकृष्णांची ही आज्ञा आहे. परिणामाकडे लक्ष्य कां? कर्तव्य हें आपलें आहे. फलाचा विचार त्याचा त्यालाच करूं द्या. पण, मनुष्य जातीला धीर कोठें आहे? कांहीं तरी मार्ग तो एकदम धरतो. ह्याच सदराखालीं जगांतल्या पुढें होणाऱ्या सुधारकांपैकीं बहुतेक मोडणार.

मी सांगितलेंच आहे कीं, भारताच्या किनाऱ्यावर येऊन आदळलेली जडवादाची लाट ऋषींचा उपदेश आपल्याबरोबर पार घेऊन जाईल, असें जेव्हां दिसूं लागलें, तेव्हां सुधारणेची ही कल्पना हिंदभूमींत आली. पण त्या राष्ट्रानें घडामोड करणाऱ्या अशा हजारों लाटांचे तडाके सोसले आहेत. त्याच्या मानानें ही सौम्य होती. आड येईल तें मोडीत फोडीत, शेंकडों वर्षें त्या भूमीमध्यें लाटांवर लाटा येऊन पसरत होत्या. तरवार चमकली, व 'अल्ला हो अकबर' नें हिंदुस्थानचें आकाश भरून गेलें; पण अखेरीस हे पूर ओसरून गेले; व राष्ट्राची ध्येयें तशींच्या तशींच कायम राहिलीं.

आर्यांचें राष्ट्र मारलें जाणार नाहीं. मृत्यूला मारून तें उभें आहे. आणि जोंपर्यंत त्या जोराचा त्याला आधार आहे, जोंपर्यंत तेथले लोक आपले आध्यात्मिक विचार सोडीत नाहींत, तोंपर्यंत तें तसेंच राहील. तें दारिद्र्यानें गांजलेलें, गरीब भिकारी बनलें असलें; घाण आणि दुर्गंधी त्याच्या भोंवतीं एकसारखी पसरत असली; तरी त्यांनीं परमात्म्याला सोडतां कामा नये. इकडे पश्चिमेकडे रस्त्यावरल्या भिकाऱ्यालासुद्धां जसें आपल्या वंशावळीचें मूळ मध्ययुगांतल्या एकाद्या दरोडेखोर सरदारापर्यंत नेऊन भिडवावेंसें वाटतें, तसें भरतवर्षांत सिंहासनावरच्या बादशहालासुद्धां आपण वल्कलें नेसून झाडाचीं फळें खाऊन परमात्म्याशीं संवाद करीत बसलेल्या, वनांतल्या निर्धन ऋषींच्या कुळांत उत्पन्न झालों आहों, असें दाखवावेंसें वाटतें. अशा वंशांतला जन्म आम्हाला हवा आहे आणि जोंपर्यंत पावित्र्य इतकें महनीय मानलें जाईल, तोंपर्यंत हिंदभूमि मरणें शक्य नाहीं.

'नाइन्टीन्थ सेंचरी' (एकोणवीसावें शतक) ह्या मासिकांतल्या अलिकडच्या एका अंकांत 'खरा महात्मा' ह्या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला प्रोफेसर मॅक्स मुल्लर यांचा लेख बहुतेकांनीं वाचलाच असेल. भगवान् रामकृष्णांचें चरित्र फार मननीय आहे. कारण त्यांनीं जीं तत्वें शिकविलीं त्यांचें ते जीवंत उदाहरण आहे. हिंदुस्थानांतल्याहून अगदीं भिन्न वातावरणांत पश्चिमेकडे रहाणाऱ्या तुम्हाला कदाचित् तें जरासें

अद्भुत वाटेल. कारण पश्चिमेच्या, कामाच्या गडबडींतल्या आयुष्य-क्रमाच्या पद्धति व रीतिरिवाज, हिंदुस्थानांतल्या पद्धतींहून व रीतीरिवाजांहून अगदीं भिन्न आहेत. पण कदाचित्, म्हणूनच तुमचें त्यांत ज्यास्त मन रमेल; कारण, तुमच्यापैकीं पुष्कळांनीं आधीं ऐकलेल्या गोष्टींवर तें निराळाच प्रकाश पाडील.

निरनिराळ्या सुधारणा हिंदुस्थानांत प्रस्थापित होऊं लागल्या, तोंच बंगालच्या एका कोनाकोपऱ्यांतल्या खेड्यांत १८३३ च्या फेब्रुवारीच्या २० व्या तारखेस एका गरीब ब्राह्मण दंपत्याला एक मूल झालें. बाप आणि आई दोघेंही फार जुन्या मताचीं होतीं. खऱ्या कर्मठ ब्राह्मणाचें जीवन म्हणजे एकसारख्या परित्यागानें भरलेलें. त्याला फारच थोड्या गोष्टी करावयाची परवानगी असते. त्यांच्याशिवाय दुसऱ्या कांहीं संसारिक गोष्टींमध्यें त्याला लक्ष्य घालतां येत नाहीं. तसेंच कोणी आपण होऊन दिलें, तरी त्याला दान घेतां येत नाहीं. असें आयुष्य किती कठीण ह्याची आपण कल्पना करा. आपण ब्राह्मण आणि त्यांचा ब्राह्मणी कावा ह्याबद्दल पुष्कळ गोष्टी ऐकल्या असाल; पण आपल्या पैकीं फारच थोड्यांनीं थांबून आपल्या मनाला असा प्रश्न विचारला असेल कीं, ह्या विलक्षण मनुष्यसमूहाला आपल्या इतर समाजावर जो अधिकार प्राप्त झाला आहे तो कां? देशांतल्यां सर्व जातींत त्यांच्या इतकी निर्धन जात कोणाचीही नाहीं; पण त्यांच्या ह्या अधिकारांचें रहस्य ते करीत असलेल्या त्यागांत आहे. धनाचा ते कधींही लोभ करीत नाहींत. जगांतला सर्वांत गरीब भिक्षुकवर्ग म्हणजे हिंदुस्थानांतला; पण म्हणूनच तो सर्वांत ज्यास्त सामर्थ्यवान् आहे. अशा दारिद्र्यावस्थेंत सुद्धां ब्राम्हाणाची बाई आपल्या गांवांतून भुकेलेल्याला उपाशी जाऊं द्यावयाची नाहीं. मातृपदाचें हें सर्वश्रेष्ठ कर्तव्य हिंदुस्थानांत समजलें जातें. आणि ति गृहमाता म्हणूनच तिनें सर्वांच्या पाठीमागून जेवावयाला बसलें पाहिजे. आपल्या आधीं सर्वांचीं जेवणें झालीं आहेत कां नाहीं, हें तिनें पाहिलें पाहिजे. एवढ्याचसाठीं भरतवर्षांत मातेला देवता समजतात. ही बाई आपल्या

चरित्रनायकाची आई–म्हणजे हिंदू आई कशी असते याचें उत्कृष्ट उदाहरण होती. जाती जसजशी उच्च दर्जाची, तसतशीं तिचीं बंधनेही ज्यास्त. अगदीं हलक्या जातीच्या लोकांना वाटेल तें खातांपितां येतें; पण जसजशी त्यांची पायरी वरच्या दर्जाची होते; तसतसे त्यांना नियमही ज्यास्ती पाळावे लागतात. आणि ते अगदीं वरच्या–भरतवर्षांतल्या वंशपरंपरागत असलेल्या धर्मोपदेशकाच्या–ब्राह्मणाच्या–जातींतले असले म्हणजे त्यांचें आयुष्य फारच नियमबद्ध. पाश्चिमात्यांच्या वागण्याच्या रीतीशीं तुलना केली, तर त्यांचें आयुष्य म्हणजे यतीचें आयुष्य. सर्व जगांत परग्रहणविन्मुख राष्ट्र म्हणजे हिंदूंचें. इंग्लिशांच्या सारखाच त्यांच्यांत पक्का धिम्मेपणा आहे; पण तो त्याहून विस्तृत आहे. एकादी कल्पना त्यांच्या डोक्यांत आली म्हणजे ते तिला अगदीं शेवटापर्यंत पूर्णत्वाला नेऊन पोंचवितात; आणि मग तिच्यांतून कांहीं 'तत्वमसि' निघेपर्यंत, पिढ्यानपिढ्या तिला सोडीत नाहींत. त्यांच्या डोक्यांत एकदां एकादी कल्पना शिरवून द्या; मग ती तेथून काढणें कांहीं सोपें नाहीं. पण आधीं त्यांना नवीन विचार स्वीकारावयाला लावणेंच फार कठीण.

तेव्हां कर्मठ हिंदु म्हणजे फारच परग्रहणपराङ्मुख. आपल्याच विचारांत आणि भावनांत ते पूर्णपणें गढलेले. आमच्या प्राचीन पुस्तकांत बारीकसारीक गोष्टींतही त्यांनीं कसें वागावें ह्याबद्दल नियम आहेत आणि त्यांतल्या क्षुल्लक गोष्टींनाही ते अगदीं चिकटून राहतात. आपल्या लहानशा जातीच्या बाहेरच्या माणसानें शिजवलेलें अन्न खाण्यापेक्षां ते उपास काढतील. पण त्यांच्यांत उत्कटता आणि मन:पूर्वकता फार. तंतोतंत धार्मिक आचरणामुळें व आपल्या धर्मावरच्या पराकाष्ठेच्या विश्वासामुळें त्यांच्यांत एक प्रकारची शक्ति आढळते. कारण आपण करतों तें अगदीं बरोबर असा त्यांचा पूर्ण विश्वास. ज्याला ते इतके चिकटून राहतात तें सगळेंच अगदीं बरोबर आहे, असें कांहीं आपल्यापैकीं सर्वांनाच वाटणार नाहीं; पण त्यांना अगदीं तें तसें वाटतें. आतां आमच्या धर्मपुस्तकांत सांगितलें आहे कीं, गरीबाला प्रत्येकानें दीनांनीं देखील दान केलेंच पाहिजे;

मग त्या गुणाचा अतिरेक झाला तरी चालेल. भरतवर्षाच्या वाङ्मयाशीं जे परिचित आहेत त्यांना महाभारतांत सांगितलेली या पराकाष्ठेच्या दीन-दातृत्वाची एक सुंदर गोष्ट आठवतच असेल. आपला उरलेला शेवटचा भाकरीचा तुकडाही तितक्यांत आलेल्या भिकाऱ्याला देऊन, अन्नावांचून मरणोन्मुख झालेल्या एका सबंध कुटुंबाच्या कुटुंबानें मरण स्वीकारलें. ह्यांत अतिशयोक्ति अगदीं नाहीं. आजसुद्धां तेथें अशा गोष्टी घडतात. माझ्या गुरुदेवांच्या मातापितरांचें शील बहुतेक असेंच होतें. तीं फार गरीब होतीं, तरीही गुरुमाता, एकाद्या गरीबाला मदत करण्याकरतां पुष्कळ वेळां दिवसच्या दिवस उपास काढीत. अशा आईबापांच्या पोटीं हें बालक जन्माला आलें; आणि बाल्यापासूनच त्यांत इतरांहून कांहीं निराळें होतें. जन्मतःच याला आपलें पूर्वचरित्र आठवलें; आपण जगांत कोणच्या कार्याकरतां आलों आहों याची त्याला जाणीव उत्पन्न झाली; आणि तें कार्य साधण्याकडे त्यानें आपली प्रत्येक शक्ति लावली.

त्यांचे वडील वारले त्यावेळीं ते अगदीं लहान होते. नंतर त्यांना शाळेंत घातलें. ब्राम्हणाच्या मुलानें शाळेंत जाऊन अध्ययन केलेंच पाहिजे. त्याच्या उच्चवर्णामुळें विद्यापरिशीलनांतच त्यानें आयुष्य घातलें पाहिजे असा नियम आहे. भरतवर्षांतली शिक्षणाची जुनी पद्धति अलिकडच्या पद्धतीहून फार निराळी होती. अजून सुद्धां, विशेषतः संस्थानांच्या बाबतींत खेडे गांवांतून वगैरे तीच चालते. विद्यार्थ्याला फी द्यावी लागत नाहीं. त्यावेळेला असें वाटे कीं, ज्ञान हें इतकें पवित्र आहे कीं, तें विकतां कामा नये. ज्ञान अगदीं मोफत, कांहींही न घेतां, दिलें पाहिजे. गुरु शिक्षणाकरतां विद्यार्थ्यांपासून कांहींही घेत नसत; इतकेंच नाहीं तर, बहुतेक त्यांना अन्न आणि वस्त्र देखील पुरवीत. श्रीमंत लोक लग्नकार्यासारख्या प्रसंगीं त्यांना देणग्या देत. कांहीं दांनाना पहिला आणि मुख्य त्यांचाच हक्क समजला जात असे; आणि म्हणून, त्यांच्या बाजूनें त्यांना विद्यार्थ्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागे. कोठेंही लग्न कार्य झालें—आणि त्यांत तें श्रीमंताच्या घरीं असलें—म्हणजे हटकूनच ह्या अध्यापकांना आम

त्रण असावयाचेंच. आणि मग ते जमल्यावर त्यांचा निरनिराळ्या विषयावर वादविवाद व्हावयाचा. अशा एका प्रसंगीं, हा मुलगा तेथें गेला. शास्त्री मंडळाचें ज्योतिष, न्याय वगैरेसारख्या विविध विषयावर वादविवाद चालले होते. त्यापैकीं कांहींच समजण्याइतकें त्याचें वय नव्हतें. मी सांगितलेंच कीं, हा मुलगा विलक्षण होता. त्यानें त्याच्यांतून असें तात्पर्य काढलें. 'त्यांच्या सर्व ज्ञानाचें फल म्हणजे हे वाद. इतके ते कशासाठीं भांडतात? केवळ पैशासाठीं. ज्याची विद्वत्ता येथें सर्वांत ज्यास्त दिसून येईल त्याला सर्वांत उत्तम शालजोडी मिळेल. एवढ्याचसाठीं ह्यांचा हा इतका खटाटोप चालला आहे. अतःपर मी शाळेंत जाणार नाहीं.' आणि खरेंच तो नंतर शाळेंत गेला नाहीं. त्याच्या शाळेंतल्या शिक्षणाची येथेंच इतिश्री झाली. पण ह्या मुलाला एक वडील भाऊ होता. तो विद्वान् शास्त्री होता. त्यानें त्याला तसेंच, आपल्याजवळ शिकावयाला म्हणून; कलकत्याला नेलें. थोडक्याच वेळांत बालकाची खात्री झाली कीं, ह्या येथल्या सर्व शिक्षणाचा उद्देश म्हणजे आधिभौतिक प्रगति आहे, दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां त्याने निश्चय केला कीं, हा अभ्यासक्रम सोडून देऊन अध्यात्मज्ञानाच्या शोधाला आपण आपल्याला वाहून घ्यावयाचें. वरतीं बापाचें छत्र नव्हते, घरचीं अगदीं गरीबी, तेव्हां आपल्या उदरपोषणाची व्यवस्था त्याची त्यालाच पहावयाला पाहिजे होती. कलकत्त्याजवळ एका ठिकाणीं तो गेला व एका देवळांत पुजारी म्हणून राहिला. पुजारी रहाणें म्हणजे ब्राह्मण फार कमीपणा समजतात. तुम्ही ज्या अर्थानें चर्च शब्द योजतां, त्या अर्थाचीं द्योतक आमचीं देवळें नसतात. सार्वजनिक पूजेचीं तीं स्थानें नसतात. कारण, वास्तविक पाहिलें, तर हिंदुस्थानांत सार्वजनिक पूजाच नाहीं. बहुतकरून एक पुण्यप्रद धर्मकृत्य म्हणून हीं देवळें श्रीमंत लोक बांधतात.

एकाद्या माणसाजवळ बरीच मालमत्ता असली, तर तो एक देऊळ बांधतो, त्यांत परमेश्वराच्या एकाद्या अवताराची मूर्ति स्थापितो, आणि ईश्वराच्या नांवानें तेथें पूजाअर्चा सुरू होते. वेद वगैरे पवित्र पुस्तकांतून कांहीं मंत्र म्हणून ही पूजा करितात. रोमन क्याथलिक देवळांत ज्याप्रमाणें

'मास' ( प्रार्थना ) करितात; त्याचप्रमाणें बहुतेक ही पूजा असते. एकाद्या महापुरुषाला आपण जसा मान देऊं तसा मूर्तीला देतात आणि तिच्यापुढें धूपदीप ओंवाळून आरती करतात. देवळांत जें काय करावयाचें तें एवढेंच. त्यामुळें जो मनुष्य रोज नेमानें देवदर्शनाला जातो त्याची योग्यता अगदीं देवाला न जाणाऱ्या माणसापेक्षां मुळींच ज्यास्त समजत नाहींत. आणि आधिक खरें सांगावयाचें म्हणजे न जाणाराच ज्यास्त धर्मशील असतो. कारण, भारतांत धर्म ज्याच्या त्याच्या स्वतः करितां आहे लोकांना दाखविण्याकरितां नाहीं. असें समजलें जातें. प्रत्येक गृहस्थाच्या घरीं एक देवघर किंवा देव ठेवावयाची जागा असतेच. तेथें तो रोज सकाळ संध्याकाळ एकांतांत बसून पूजा करितो. आणि ही पूजा शुद्ध मानसपूजा असते. तो काय करितो आहे, हें दुसऱ्याला ऐकावयाला येत नाहीं का कळत नाहीं. त्याला फक्त तो कदाचित् विशिष्ट तऱ्हेनें ओटें हालवीत किंवा नाक दाबून प्राणायाम करीत बसलेला दिसतो. ह्याच्या पलीकडे तो काय करितो आहे, हें कोणाला कळत नाहीं. प्रत्यक्ष बायकोला सुद्धां हें क्वचितच माहित असतें. ह्याप्रमाणें सर्व पूजन आपल्या घरीं एकांतांत चाललें असतें. ज्यांच्या घरीं अशी एकांतवासाची जागा नसेल ते नदीच्या, सरोवराच्या, किंवा समुद्रकाठीं जर रहात असले, तर समुद्राच्या किनाऱ्यावर जातात. देवदर्शन घेण्याकरितां म्हणून देवळांतही कधीं कधीं लोक जातात. देवळासंबंधीं एवढेंच त्यांचें कर्तव्य. म्हणून फार पुरातन काळापासून पुजाऱ्याचा धंदा अगदीं कमी दर्जाचा समजतात. स्मृतिकार मनूचें तसें वचन आहे. कांहीं धर्मपुस्तकांत तर असें देखील म्हटलें आहे कीं, तें निंद्य आहे. त्याच्या मुळाशीं दुसरी एक कल्पना आहे. अध्यापनाच्या बाबतींत देखील पैसे घेणें हें जर निंद्यतर, तर धार्मिक दृष्टीनें पाहिलें तर, पुजाऱ्यानें आपल्या कामाकरितां पैसे घेणें म्हणजे पवित्र वस्तूचा क्रयविक्रयच नाहीं कां? तेव्हां दारिद्र्यामुळें, आपल्याला करितां येईल असा तेवढाच पुजाऱ्याचा धंदा स्वीकारतांना, त्या मुलाला काय वाटलें असेल याची आपणच कल्पना करा.

सर्व समाजांत ज्यांचीं कवनें पसरलीं आहेत असे बरेच कवि बंगाल्यांत झाले आहेत. कलकत्याच्या रस्त्यांतून आणि खेडोपाडींतीं कवनें गायलीं जातात. त्यांच्यापैकीं बहुतेक धर्मपर आहेत. त्याच्यातलीं मुख्य कल्पना म्हणजे साक्षात्काराची. हिंदुस्थानांतल्याच धर्मांत ही कल्पना प्रमुखत्वानें आढळते. हिंदी धर्मपुस्तकांत ही कल्पना नाहीं, असें पुस्तकच नाहीं. ईश्वराचा साक्षात्कार झाला पाहिजे, ईश्वर अनुभविला पाहिजे, ईश्वर प्रत्यक्ष पाहिला पाहिजे, ईश्वराशीं संभाषण झालें पाहिजे; हाच धर्म. सत्पुरुषांना ईश्वरी साक्षात्कार झाल्याच्या गोष्टींनीं हिंदभूमींतला कोणताही भाग भरलेला आहे. अशा तऱ्हेचीं तत्वें हा त्यांचा धर्माचा पाया आहे. सर्व पुराणपुस्तकें आणि धर्मपुस्तकें ज्यांना आत्मानुभव आला अशाच पुरुषांनीं लिहिलीं आहेत. बुद्धीची कुशाग्रता वाढावी म्हणून हे ग्रंथ लिहिलेले नाहींत; किंवा तें वादविवादानेंही कळावयाचें नाहींत. कारण त्यांत ज्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्या ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्या अशा पुरुषांनीं ते लिहिलेले आहेत; आणि तितक्या पायरीवर जे गेले अशानांच ते कळतील. त्याचें म्हणणें असें आहे कीं, ह्या देहांतसुद्धां प्रत्यक्षानुभूति होते; वाटेल त्याला ती घेतां येते आणि असें म्हणतां येईल कीं, ह्या अनुभूतीची क्षीति उत्पन्न होणें हाच धर्माचा आरंभ. सर्व धर्मांतलें मुख्य तत्व हेंच आहे. एकीकडे, ज्याची वक्तृत्वशक्ति अगदीं परिपूर्णतेला गेली आहे आणि विवादपद्धति अशी आहे कीं, कोणाचीही खात्री पटलीच पाहिजे, असा एक मनुष्य उच्चतम तत्वावर उपदेश करितो, पण त्याचें म्हणणें ऐकावयालाच कोणी जात नाहीं! आणि दुसरीकडे असें आढळतें कीं, ज्याला आपली जन्मभाषादेखील धड बोलतां येत नाहीं असा एकादा अगदीं गरीब मनुष्य असतो आणि पहावें तों त्याच्या आयुष्यांतच अर्धे राष्ट्र त्याला देव म्हणून भजूं लागतें. ह्याचेंही कारण तेंच आहे. भरतवर्षांत, कोणत्याना कोणच्या मार्गानें अशी बातमी पसरली पुरे कीं, 'अमुक एका मनुष्याला साक्षात्कार झाला आहे. आतां धर्म म्हणजे त्याला 'अनुभवेंविण ज्ञान' राहिलें नाहीं. धर्म, आत्म्याचें अमरत्व, ईश्वर; असल्या महत्वाच्या

प्रश्नाविषयीं आतां तो अंधेरांत चांचपडत हिंडत नाहीं;' म्हणजे चारी दिशांनीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या दर्शनाकरितां येतात आणि हळू हळू देवासारखी त्याची पूजा करूं लागतात.

त्या देवळांत देवी कल्याणीची मूर्ति होती. बालकाला दररोज सकाळ संध्याकाळ पूजा करावी लागे. हळू हळू त्याचें मन एका कल्पनेनें भरून गेलें. 'ह्या मूर्तीच्या मुळाशीं कांहीं आहे का? ह्याविश्वांत खरोखरच कल्याणी माता आहे का? खरेंच का ती येथें राहून हें विश्व चालवितें? धर्मामध्यें कांहीं सत्य आहे का? कां हें सगळें स्वप्न आहे?' हिंदुमुलाच्या मनांत ह्या शंका उत्पन्न होतात. 'आम्ही करितों हें सारें भासमय तर नाहीं ना? अशा तऱ्हेचा अविश्वास आमच्या देशांत उत्पन्न होतो. जीवात्मा आणि परमात्मा ह्यांच्याबद्दल आजपर्यंत जितक्या कांहीं कल्पना बसविल्या आहेत तितक्या सगळ्या आम्हाला माहित आहेत; पण नुसत्या कल्पनांनीं आमचें समाधान होत नाहीं. धर्मपुस्तकांनीं आमचें समाधान होत नाहीं. प्रचलित तर्कांनीं आमचें समाधान होत नाहीं. आमच्या-पैकीं हजारो लोकांच्या डोक्यांत जो एक विचार असतो तो 'प्रत्यक्षानु-भवाचा' ईश्वर आहे, हें खरें आहे का? जर खरें आहे, तर तो मला दिसेल का? हें सत्य मला अनुभवितां येईल का? पाश्चात्याच्या दृष्टीला हें अगदीं अव्यवहार्य दिसेल; पण आम्हाला तें पूर्णपणें शक्य दिसतें. ह्या कल्पनेकरितां आमचे लोक आपला प्राण अर्पण करितील. ज्यांनीं गिरिकंदर सेविण्याकरितां आपल्या सर्व चैनींवर व सुखावर पाणी सोडलें, असें पुरुष पुरातन काळापासून भरतवर्षांत झालेले आहेत, असें मी आतांच सांगितलें. ह्या कल्पनेची पूर्ण प्रतीति घेण्याकरितां गृहत्याग करून शेंकडो लोक नदीतीरावर बसले आहेत. नुसतें ठाऊक होण्याकरिता नाहीं, किंवा मनाला समजण्याकरितांही नाहीं, किंवा दृश्यवस्तुप्रमाणें बुद्धीनें ग्रहण करण्याकरितांही नाहीं, नुसत्या अंधकारांत चांचपडण्या-करितां नाहीं, तर आपल्या बाह्येन्द्रियांना ह्या जगाची जितकी प्रतीति येते त्याहूनही उत्कट प्रतीति घेण्याकरितां ते तेथें जातात. अशी ती कल्पना

आहे. त्याबद्दल आतांच मी कांहींही सिद्धांत सांगत नाहीं, पण त्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबलेली ही एक गोष्ट आहे. शेंकडों मारले गेले, तर त्यांच्या जागीं पुनः हजारों तयार होतील; ह्या एकाच कल्पनेवर तें राष्ट्र आज शतकेंच्या शतकें सुखापासून दूर रहात आहे, आत्मत्याग करीत आहे. ह्याच कल्पनेकरितां दरवर्षीं सहस्रावधि हिंदू आपलीं घरेंदारें सोडतात, आणिं त्यांच्यापैकीं बरेच पडणाऱ्या असह्य कष्टाखालीं मरून जातात. पाश्चात्यांच्या दृष्टीला हें सगळें अगदीं कल्पित वाटेल; आणि असें वाटावयाचें कारणही मला माहित आहे. पण जरी मी ह्या पश्चिमेकडल्या देशांत राहिलों आहें, तरी मला ही कल्पना ह्या आयुष्यांतल्या अगदीं शक्य गोष्टींतली एक वाटते.

ज्या क्षणीं दुसऱ्या कोणच्याही गोष्टीचा—मग ती गोष्ट म्हणजे शास्त्रीय विषयांतले अद्भुत शोध का असेना—माझ्या मनांत विचार येतो, तो माझ्या आयुष्यांतला क्षण फुकट गेला! ह्या विचारापासून जें मला दूर नेतें तें सारें व्यर्थ आहे. देवदूतांइतके तुम्ही ज्ञानी असलांत किंवा पशूंइतके अडाणी असलांत, तरी जीवित हें क्षणभंगुरच असणार. अंगावर चिंध्या घालणाऱ्या भिकाऱ्याच्या दारिद्र्यांत तुम्ही जन्मलेले असा, अगर विद्यमान श्रीमन्त श्रेष्ठाच्या संपत्तींत तुम्ही लोळत असा, जीवित हें क्षणभंगुरच असणार. पश्चिमेकडल्या प्रचंड शहराच्या विस्तीर्ण रस्त्यांत भटकणारे विपन्न गृहस्थ तुम्ही असा, वा कोट्यवधि प्रजेचे मूर्धाभिषिक्त सम्राट् असा, जीवित हें क्षणभंगुरच असणार. तुमची शरीरप्रकृति सर्वोत्कृष्ट असो वा अगदीं निकृष्ट असो जीवित हें क्षणभंगुरच असणार. काव्यसृष्टींत आढळणारा मधुर स्वभाव तुमचा असो अथवा तो अगदीं क्रूर असो जीवित हें क्षणभंगुरच असणार. ह्या जीविताच्या कोड्याचा हिंदूच्या दृष्टीनें उलगडा एकच; आणि तो उलगडा म्हणजे **ईश्वर आणि त्याचा साक्षात्कार.** हें जर सत्य असलें, तर जीविताचें कोडें उलगडलें. मग जीवित सह्य आहे, मग जीवित उपभोग्य आहे. नाहींतर तें निरुपयोगी ओझें आहे. ही आमची कल्पना आहे. पण कितीही विवरण केलें तरी ती बरोबर सांगतां

यावयाची नाहीं. कदाचित् ती बरीच कळेल. बस, इतकेंच. विद्येच्या कोणच्याही शाखेच्या सहाय्यानें कितीही विवरण करून सांगितलें, तरी फार तर एकादी सत्य गोष्ट असणें शक्य आहे, एवढें कळेल; ह्याहून ज्यास्त कळावयाचें नाहीं. भौतिकशास्त्रानें ज्या गोष्टी अगदीं सत्य गोष्टी म्हणून आपण सांगतों, त्या फक्त शक्य गोष्टी आहेत, प्रत्यक्ष अस्तित्वांत असलेल्या गोष्टी नाहींत. प्रत्यक्ष गोष्टींचें ज्ञान इन्द्रियानांच होतें. त्यांचा अनुभव घेतां येतो. तेव्हां आपला धर्म जर अशा गोष्टींच्या कोटींत आणावयाचा असला, तर आम्हाला त्याचा प्रत्यक्षानुभव घेतां आला पाहिजे. ईश्वर आहे, अशी आमची खात्री पटण्याकरितां आम्हांला ईश्वराचा साक्षात्कार झाला पाहिजे. दुसऱ्या कशानेंही कितीही विवरण केलें, तरी प्रत्यक्ष प्रतीतीशिवाय ह्या गोष्टी आम्हांला सत्य वाटणार नाहींत; आमचा त्यांच्यावर दृढ विश्वास बसणार नाहीं. ही माझी समजूत आहे; आणि भरतवर्षाची हीच समजूत आहे.

ह्या कल्पनेनें त्या मुलाचें डोकें भरून गेलें आणि मग त्याचा सगळा जीव तिच्याकडे लागला. रोजच्या रोज त्यानें रडावें आणि म्हणावें, "आई, तूं आहेस हें खरें ना? का हें सगळें कल्पनेचें काव्य आहे? कल्याणी देवी म्हणजे कवींची किंवा मार्ग चुकलेल्या लोकांची नुसती कल्पना आहे, का खरोखरच कांहीं आहे?" आपण ज्याला शिक्षण म्हणतो तें पुस्तकी ज्ञान त्याला मुळींच नव्हतें हें आपण पाहिलेंच आहे, आणि त्यामुळेंच त्याचें मन ज्यास्त अविकृत, ज्यास्त निरोगी होतें. त्याचे विचार ज्यास्त शुद्ध होते. दुसऱ्यांच्या विचारांचा त्यांत लेशही नव्हता. तो विश्वविद्यालयांत गेला नाहीं, म्हणूनच त्यानें स्वतःशीं स्वतंत्र विचार केला. आपण आपलें अर्धें आयुष्य विश्वविद्यालयांत घालविलें, म्हणून दुसऱ्यांच्या विचारांनीं आपलें मन भरून गेलें आहे. 'स्वामीजी अगदीं निर्मळ व स्वतंत्र पुरुष होते' असें जें मी आतां सांगितलेल्या लेखांत प्रोफेसर मॅक्समुल्लरनीं लिहिलेलें आहे, तें अगदीं खरें आहे. आणि ह्या स्वतंत्र विचारांचें कारण ते विश्वविद्यालयाच्या कक्षेंत वाढले नव्हते, हेंच होय. असो. अखेरीस ईश्वर दिसेल का? हा त्याच्या मनांत प्रामुख्यानें वागणारा विचार दिवसे-

दिवस इतका प्रबळ होत चालला कीं, त्याला दुसरें कांहींच सुचेनासें झालें. आतां त्याला ती पूजा करणें, तिच्यातलें ते अगदीं बारिक सारिक विधि करणें अशक्य झालें. केव्हां तो नैवेद्य दाखवावयाला विसरे, तर केव्हां आरतीच ओंवाळावयाला विसरे; आणि कधीं कधीं तर त्यानें तासच्या तास आरतीच ओंवाळीत बसावें व सगळें विसरून जावें.

आणि नेहमीं त्याचें मन त्या एकाच कल्पनेनें भरलेलें. 'आई, तूं आहेस हें खरें ना? मग तूं कां गे बोलत नाहींस? कां तूं मला सोडून गेलीस?' आपल्यापैकीं कांहींना अनुभव आला असेल कीं, आपल्या आयुष्यांत असें कांहीं क्षण असतात कीं, तेव्हां ह्या 'घटपटादि लटपटीला' आपण कंटाळतों; पुस्तकावर पुस्तकें वाचून त्रासून जातों;—कारण इतकेंही करून त्यांच्या पासून खरें ज्ञान तरी मिळतें कोठें? तीं नुसतीं बुद्धीचीं मादक खाद्यें मात्र होऊन बसतात; वेळेवर घेतलीं तर बरें, नाहीं तर प्राण कासाविस व्हावयाचा.—तेव्हां ह्या सर्वांनीं आपण त्रस्त होतों आणि आपल्या हृदयांतल्या हृदयांत एक तीव्र कळ उठते. 'मला प्रकाश दाखवूं शकेल असा कोणीच कां ह्या जगात नाहीं? ईश्वरा, जर तूं खरोखर असलास, तर हा प्रकाश मला दाखव. तूं बोलत कां नाहींस? तुझें दर्शन इतकें दुर्लभ का? उगाच इतके मधले दूत धाडण्यापेक्षां तूं स्वतःच माझ्याकडे कां येत नाहींस? ह्या जगांत जिकडे तिकडे दुफळ्या झाल्या आहेत, कलह माजले आहेत, तेव्हां मी विश्वास तरी कोणावर ठेवूं आणि मागें तरी कोणाच्या जाऊं? ह्या जगांतल्या प्रत्येक स्त्रीचा व पुरुषाचा जर तूं देव आहेस, तर आपल्या मुलाशीं बोलावयाला तूं का येत नाहींस? तो तयार आहे का नाहीं, हें तर तूं पहा.' अत्यंत उदासीनता पसरली म्हणजे आपल्यापैकीं प्रत्येकाच्या मनांत असे विचार येतात; पण आपल्या भोंवतीं इतक्या मोह पाडणाऱ्या वस्तु पडल्या आहेत कीं, दुसऱ्याच क्षणीं आपण ते विसरून जातों. स्वर्गाचीं द्वारें उघडत आहेत असें क्षणभर वाटतें, दिव्य तेजांत आपण बुडणार असा क्षणभर भास होतो; पण इतक्यांत आपली पशुबुद्धि जागृत होते व हे सर्व दिव्य देखावे पार विरून जातात. चालला मग अधः

पात होत! खायचें, प्यायचें व मरावयाचें, व मरून पुनः खायचें व प्यायचें हें गाडें झालें सुरू! पण, अशीही कांहीं अपवादात्मक अंतःकरणें आहेत कीं, तीं इतक्या सहज परतत नाहींत. तीं एकदां ओढलीं गेलीं कीं चिकटलींच; मग वाटेल तितकी का मध्यें आकर्षणें असेनात. मरण जर येणारच, तर सत्याचा शोध तरी कां न लावा? तीं म्हणतात, जीवित जर क्षणभंगुर, तर एकादा मोठा विजय मिळवण्यांत तरी तें खर्च होऊं द्या: आणि आपल्यांतल्या पशुवृत्तीला–तमोगुणाला–जिंकण्यापेक्षां; जन्ममरणाचें, पापपुण्याचें कोडें उलगडण्यापेक्षां; अधिक श्रेष्ठ विजय कोणचा आहे?

सरतें शेवटीं देवळांत नोकरी करणें त्याला अशक्य झालें. त्यानें तें सोडून दिलें आणि जवळच असलेल्या एका जंगलांत जाऊन तो राहिला. स्वामीजींच्या ह्या आयुष्याविषयीं त्यांनीं मला पुष्कळदां सांगितलें आहे. सूर्य केव्हां उगवे व केव्हां मावळे याचें त्यांना भान नसे. आपण कसें रहातों ह्याची देखील त्यांना जाणीव नव्हती. आपल्या विषयींचा विचार देखील त्यांच्या मनांत येईना. खाणेंपिणें देखील ते विसरून गेले. ह्या काळांत त्यांच्या एका नातेवाईकानें प्रेमानें त्यांच्यावर लक्ष्य ठेवलें. तो अगदीं त्यांच्या तोंडांत अन्न घाली, व मग ते यंत्रासारखें नुसतें गिळीत.

ह्याप्रमाणें, रात्रीमागून दिवस व दिवसामागून रात्र चालली. सबंध दिवस जाऊन संध्याकाळ झाली आणि देवळांतल्या घांटेचा आणि आरतीचा आवाज त्या अरण्यांत ऐकूं आला म्हणजे मुलानें अगदीं खिन्न व्हावें आणि करुणरवानें म्हणावें 'आई, आणखी एक दिवस फुकट गेला; अजून तूं आली नाहींस! ह्या लहानशा आयुष्याचा आणखी एक सबंध दिवस गेला आणि अजून मला सत्य कळलें नाहीं!' हृदयांत वेदना उत्पन्न होऊन कधीं कधीं त्यानें जमीनीवर डोकें घांसावें आणि रडावें, आणि त्याच्या तोंडांतून नेहमीं हीच प्रार्थना निघावी 'हे विश्वजननी, माझ्यांत अजून तुला मी–पण दिसतें आहे कां? पहा, मला फक्त तूं पाहिजेस; दुसरें कांहीं नको!' आपल्या ध्येयाला अगदीं चिकटून रहावयाचा त्याचा निश्चय होता. त्यानें ऐकलें होतें कीं, आईकरितां सर्वसंगपरित्याग केल्याशिवाय

आई कधीं भेटत नाहीं. त्यानें ऐकलें होतें कीं, आईची इच्छा तर प्रत्येकाकडे यावयाची असते; पण त्यांनाच ती नको असते. त्यांना कसले तरी देव्हाऱ्यांतले देव आपली करमणुक करण्याकरितां पाहिजे असतात; खरोखर आई नको असते. त्यांना जेव्हां अगदीं मनापासून, आत्म्यापासून तीच भेटावयाला पाहिजेशी होते, दुसरें कांहींही नको असतें, त्याच क्षणीं ती आपण होऊन येऊन भेटते. त्याच्या मनांत हे विचार आले. अगदीं अक्षरशः असें वागावयाचें त्यानें ठरविलें. जें कांहीं थोडेंसें त्याजवळ होतें तें सुद्धां त्यानें देऊन टाकलें. 'मी पैशाला शिवणार नाहीं' अशी त्यानें शपथ घेतली. आणि 'मी पैशाला शिवणार नाहीं' ही शपथ त्याच्या शरीराचाच एक भाग होऊन बसली. पुढें कित्येक वर्षांनींसुद्धां, ते निजलेले असतांनाही, जर मी त्यांच्या अंगाला पैशाचा स्पर्श केला, तर त्यांचा हात पटकन पालथा होई व सर्वशरीर ताठून जाई. कोणाला ही कांहीं तरी किमया वाटेल, पण हें अगदीं सत्य आहे. काम हा आपला दुसरा शत्रु, अशी दुसरी कल्पना त्याच्या मनानें पूर्णपणें घेतली. मनुष्य हा आत्मा आहे आणि आत्म्याला तर कांहींच लिंग नाहीं, तो पुरुषही नाहीं व स्त्रीही नाहीं. त्याला पक्कें वाटलें कीं, द्रव्य आणि काम ह्या दोन विचारांचा आपल्याला आईचें दर्शन व्हावयाच्या मार्गांत अडथळा होतो. हें सगळें जग म्हणजे आईचेंच दृश्यरूप आहे आणि ती प्रत्येक स्त्रीच्या देहांत रहाते. प्रत्येक स्त्री म्हणजे जर आईची एकेक मूर्ति, तर मला कोणच्याही स्त्रीकडे दुसऱ्या कसल्याही दृष्टीनें कसें पहातां येईल? हीच त्याची कल्पना. 'प्रत्येक बाई माझी आई आहे. अशा स्थितीला मला जाऊन पोहोंचलें पाहिजे कीं, कोणाही स्त्रींत आईशिवाय मला कांहींच दिसणार नाहीं.' सर्व आयुष्यभर हें तत्व त्यांच्यांत बाणलेलें होतें.

मनुष्याच्या हृदयाला लागणारी ही तहान म्हणजे फार कठीण. पुढें एकदां स्वामीजीच मला म्हणाले कीं, "बाळ, हें पहा; एका खोलींत सोन्यानें भरलेली पिशवी आहे व दुसऱ्या खोलींत एक चोर आहे. त्या चोराला मग तेथें स्वस्थ झोंप येईल, असें तुला वाटतें का? त्याला तशी

झोंप येणें शक्यच नाहीं. त्याच्या मनांत त्या खोलींत जाऊन तें सोनें कसें लांबवावयाचें, हा एकच विचार घोळत राहील. तेव्हां, ज्याचा अगदीं पूर्ण विश्वास आहे कीं, ह्या दिसणाऱ्या आकारांच्या मूळाशीं सत्तत्व आहे, ज्याला केव्हांही मरण नाहीं, जो कल्याणाचा अनंत सागर आहे, ज्या सौख्यसमुद्रापुढें हीं इंद्रियांपासून मिळणारीं सुखें म्हणजे पोरांचीं खेळवणीं आहेत; अशा ईश्वराला मिळविल्याशिवाय तो स्वस्थ राहील, असें तुला वाटतें का? तो प्रयत्न केल्याशिवाय एक क्षणभर तरी शांत बसेल का? कधींच नाहीं. त्या आशेनें तो वेडा होऊन जाईल." हें दिव्य वेड त्या मुलाला लागलें. त्यावेळीं त्याला कोणीही गुरु नव्हता. त्याला कांहींही सांगावयाला कोणीच नव्हतें. सर्वांना वाटे कीं, मुलाचें डोकें बिघडलें. नेहमीं जगांत असेंच घडतें. एकाद्या मनुष्यानें जगांतल्या ह्या क्षुद्र गोष्टींचा त्याग केला, म्हणजे त्याला वेडा म्हटलेलें आपण ऐकतों. पण खरें पाहिलें, तर हेच महात्मे जगाचा निष्कर्ष आहेत. आजपर्यंत सगळ्या जगाला हालवून सोडणाऱ्या शक्ति ह्याच वेडांतून उद्भूत झाल्या आहेत; आणि ह्यानंतरही सगळ्या जगाला हालवून सोडणाऱ्या भविष्यकाळच्या शक्ति कोठून जर निघावयाच्या असतील, तर त्या ह्याच वेडांतून.

ह्याप्रमाणें सत्याला पोहोंचण्याकरितां चाललेल्या ह्या आत्म्याच्या झगड्यांत दिवसांचे आठवडे आणि आठवड्यांचे महिने होऊन गेले. त्या मुलाला अद्भुत गोष्टी दिसूं लागल्या; विलक्षण साक्षात्कार होऊं लागले. त्याच्या मूळ स्वरूपाचें रहस्य त्याच्यापुढें उघडें होऊं लागलें. जणूं काय पडद्यामागून पडदा निघून जाऊं लागला. प्रत्यक्ष भगवती आई गुरु झाली आणि मुलाला ज्या सत्याचा तो शोध करीत होता, त्याचा अनुभव देऊं लागली. अशा स्थितींत तेथें एक बाई आली. ती अत्यंत सुंदर होती. तिचें ज्ञान अगाध होतें. पुढें स्वामीजी तिच्याबद्दल म्हणत असत कीं, ती विदूषी नव्हती, विद्येची अधिष्ठात्री देवता होती; मनुष्य देहांत प्रत्यक्ष विद्याच आली होती. ह्या गोष्टींत सुद्धां हिंदीराष्ट्राचा विशेष तुम्हाला दिसून येईल. भोंवतालच्या सामान्य हिंदू स्त्रियांच्या अज्ञानांतूनच,-ज्याला पाश्चात्य लोक स्त्रियांचें पार-

तंत्र्य म्हणतात, त्या स्त्रीपारतंत्र्यांतूनच श्रेष्ठतम अध्यात्मज्ञानानें संपन्न स्त्री निघूं शकते. ती संन्यासिनी होती. भरतवर्षांत बायकासुद्धां संसारत्याग करितात, आपली संपत्ति टाकून देतात, लग्न करीत नाहींत, आणि त्या भगवंताच्या सेवेला आपल्याला वाहून घेतात. ती आल्यावर जेव्हां तिला कळलें कीं, असा एक मुलगा अरण्यांत रहातो, तेव्हां ती स्वत: त्याला भेटावयाला अरण्यांत गेली. त्याला पहिली मदत तिचीच मिळाली. त्याच्या अडचणी काय आहेत हें तेव्हांच तिच्या लक्ष्यांत आलें, आणि ती त्याला म्हणाली "बाळ, ज्याला असें वेड लागतें तोच खरा भाग्यवान. सर्व जगच मुळीं वेडे आहे. कांहीं धनाकरितां वेडे झाले आहेत, तर कांहीं सुखाकरितां वेडे झाले आहेत. कांहीं कीर्तीकरितां वेडे झाले आहेत, तर दुसरे आणखी शेकडो गोष्टीकरितां वेडे झाले आहेत. कोणी सोन्याकरितां, कोणी बायकां-करितां, तर कोणी नवऱ्यांकरिता. कोणी इतर क्षुद्र गोष्टीकरितां, कोणी दुस-ऱ्यावर जुलुम करण्याकरितां, तर बाकीचे श्रीमंत होण्याकरितां. ह्याप्रमाणें परमेश्वराखेरीज इतर सर्व मुर्खपणाच्या गोष्टीकरितां ते वेडे झाले आहेत. आणि त्यांना आपण जिच्याकरितां वेडे झालों आहों. त्याच गोष्टींत फक्त वेडे बनविण्याचें सामर्थ्य आहे, असें वाटतें. जेव्हां एकादा सोन्याकरितां वेडा होतो तेव्हां त्याबद्दल त्यांना कळवळा उत्पन्न होतो, सहानुभूति वाटते. ज्याप्रमाणें वेड्याला वेडा तेवढा शहाणा वाटतो, त्याप्रमाणें त्यांना त्याचें तें करणें अगदीं बरोबर वाटतें; पण एकाद्याला प्रेममूर्तीचें-भगवंताचें-वेड लागलें, तर त्यांना त्या वेडाचा अर्थ कसा कळणार? त्यांना वाटतें तो आतां बहकला. ते म्हणतात आपण आतां त्याच्याशीं संबंध ठेवतां कामा नये. म्हणूनच ते तुला वेडा म्हणतात; पण बाळ, तुझेंच वेड खरें आहे. परमा-त्म्याचें ज्याला वेड लागलें तोच भाग्यवान. असे महात्मे फार थोडे." ही बाई त्या मुलाजवळ पुष्कळ वर्षें राहिली. हिंदुस्थानांतले निरनिराळे धर्म तिनें त्याला शिकविले. योगाच्या निरनिराळ्या मार्गांत त्याचा प्रवेश करून दिला आणि आपल्या नजरेखालीं अध्यात्माच्या महानदीशीं त्याला जणूं काय एक जीव करून टाकलें.

नंतर त्या अरण्यांत एक संन्यासी आला. हे संन्यासी भिक्षावृत्तीनें देशभर हिंडत असतात. तो फार विद्वान होता, तत्वज्ञानी होता. तो इतर जगाहून भिन्नवृत्तीचा मनुष्य होता. तो मनाच्या काव्यांत रमणारा होता. जग हें खरोखर असें कांहीं आहे, ह्या गोष्टीवर त्याचा मुळींच विश्वास नव्हता; आणि हें सिद्ध करण्याकरितां तो; कधींच घरांत म्हणून रहात नसे. मोठें वादळ असो वा प्रखर उन्ह असो, तो घराबाहेर भटकत असे. हा संन्यासी त्या मुलाला वेदांतलें तत्वज्ञान शिकवूं लागला; आणि त्याला लवकरच आढळून आलें कीं गुरूपेक्षां शिष्यच कांहीं गोष्टींत अधिक ज्ञानी आहे. हें पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. बरेच महिने त्या मुलाच्या सहवासांत घालविल्यावर त्यांनें त्याचा संन्यासमार्गांत प्रवेश करून दिला; आणि तो तेथून निघून गेला.

हा मुलगा पुजारी असतांना, त्याची ती विलक्षण पूजा पाहून जेव्हां लोकांना याचें डोकें फिरलें असें वाटलें, तेव्हां त्याच्या नातेवाइकांनीं, त्याचे विचार बदलून त्याचें चित्त ठिकाणावर येईल, या आशेनें त्याचें लग्न करून दिलें होतें; पण तो परत आल्यावर आपण पाहिलेंच कीं, अधिकच त्या वेडांत शिरला. आमच्या देशांत कधीं कधीं लहानपणींच मुलांचीं लग्नें करितात, आणि त्या बाबतींत त्यांचें मत मुळींच घेत नाहींत. त्यांचे आईबापच त्यांचें लग्न करून देतात. असें लग्न म्हणजे वास्तविक नुसता वाङ्निश्चयच. लग्न झाल्यावरही ते आपल्या आईबापांजवळच रहातात. आणि खरें लग्न म्हणजे वधू मोठी झाल्यावर जेव्हां वहिवाटीप्रमाणें नवरा जाऊन तिला आपल्या घरीं आणतो तेव्हांच म्हणावयाचें; पण प्रस्तुतच्या उदाहरणांत आपल्याला बायको आहे, हीच गोष्ट मुळीं नवरा विसरून गेला होता. आपल्या माहेरीच मुलीनें ऐकलें कीं, आपला नवरा अगदीं धर्ममार्गांत रंगून गेला आहे, आणि कांहीं तर त्याला वेड लागलें आहे असेंच समजतात. ह्यांतलें इंगित काय आहे, हें शोधून काढण्याचा तिनें निश्चय केला. ती निघाली आणि ज्या ठिकाणीं आपला नवरा होता त्या अरण्यांत गेली. हिंदुस्थानांत पुरुषानें अगर स्त्रीनें संन्यास घेतला म्हणजे

बाकीच्या सगळ्या बंधनापासून तीं मोकळीं होतात. तरीही अखेरीस जेव्हां ती नवऱ्याला भेटली, तेव्हां त्यानें आपल्या जीवितावरचा तिचा हक्क कबूल केला. तो तरुण आपल्या बायकोच्या पाया पडला आणि म्हणाला ' माझ्याविषयीं म्हणशील, तर आईनें मला दाखवून दिलें आहे कीं, ती प्रत्येक स्त्रीमध्यें वास करिते. आणि म्हणून मी सर्व स्त्रियांना आईप्रमाणें मानतों. तुझ्याविषयींही माझ्या मनांत हीच कल्पना असणार. पण तुझ्या मनांतून जर मला पुनः संसारांत पाडावयाचें असेल, तर ज्याअर्थीं माझें तुझ्याशीं लग्न लागलें आहे, त्याअर्थीं मला तुझें म्हणणें ऐकलें पाहिजे.

भगवती फार उदार आणि शुद्ध अंतःकरणाची होती. आपल्या पतीचें साध्य काय आहे हें समजण्याची आणि त्याबद्दल सहानुभूति दाखविण्याची तिची पात्रता होती. तिनें त्यांना चटकन् म्हटलें " आपल्याला पुनः संसारांत ओढावयाची माझी इच्छा नाहीं. आपल्या चरणाजवळ रहावें, आपली सेवा करावी आणि आपलें कुशल कळावें, एवढेंच मला पाहिजे." स्वामीजींच्या शिष्यवर्गांत त्यांच्यावर तिच्या इतकी भक्ति करणारे शिष्य फारच थोडे निघतील. ती त्यांना देव समजून मान देत असे. अशा रीतीनें बायकोच्या संमतीनेंच त्यांच्या मार्गांतला शेवटचा अडथळा दूर झाला; आणि त्यांनीं ठरविल्याप्रमाणें आपलें आयुष्य घालविण्याची त्यांना मोकळीक झाली.

आतां भगवानांच्या मनांत जी दुसरी प्रबल इच्छा उत्पन्न झाली, ती सर्व धर्मांतलें सत्य समजण्याची होती. हा काळपर्यंत स्वतःच्या शिवाय दुसऱ्या कोणाचाही धर्म त्यांना माहिती नव्हता. दुसरे धर्म कसे आहेत, ह्याचें त्यांना ज्ञान व्हावयाला पाहिजे होतें. तेव्हां दुसऱ्या धर्माच्या गुरूपाशीं ते गेले. आम्ही हिंदुस्थानांतले लोक धर्मगुरु हा शब्द नुसते पुस्तकांतले किडे या अर्थानें कधीं योजित नाहीं, तर ज्याला प्रतीति आली आहे, ज्याला त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे, दुसऱ्या मध्यस्थापासून ज्यानें त्याबद्दलचें आपलें ज्ञान मिळविलेलें नाहीं, अशा पुरुषासंबंधीं योजतों. त्यांना एक मुसलमान साधु भेटला आणि हे त्याच्याजवळ रहावयाला गेले. त्यांनीं सांगितलेल्या शिक्षणमार्गांतून ते गेले, तों त्यांना

आश्चर्याची गोष्ट अशी आढळली कीं, अगदीं न चुकतां असे मुसलमानांच्या भक्तिमार्गानें आपण गेलों, तरी ज्या ध्येयाला आपण पूर्वींच गेलों होतों, त्याच ध्येयाला येऊन पोहोंचलों. येशुखिस्ताच्या खऱ्या धर्माप्रमाणें अनुसरल्यानेंही त्यांना तोच अनुभव आला. त्यांना ज्ञात असलेल्या सर्व धर्मपंथांत ते शिरले. प्रत्येकांत ते अगदीं तनमनधनानें शिरत. जें जें गुरु सांगत त्याप्रमाणें अक्षरशः करीत. तेव्हां प्रत्येक धर्मपंथाच्या द्वारा त्यांना त्याच सत्याचा अनुभव आला. ह्याप्रमाणें प्रत्यक्षानुभवानें त्यांनीं जाणलें कीं, प्रत्येक धर्माचा उद्देश एकच आहे; प्रत्येकाला तीच गोष्ट शिकवावयाची आहे. बराचसा फरक शिकविण्याच्या पद्धतींत आहे आणि त्याहूनही ज्यास्त फरक म्हटला म्हणजे शिकविण्याच्या भाषेत आहे. मूळांत सर्व पंथांचा आणि सर्व धर्मांचा हेतु एकच आहे; पण ते स्वार्थाकरितां एकमेकाशीं भांडत आहेत. मूळ सत्याची कोणालाच काळजी नाहीं. त्यांना काळजी काय ती माझें नांव होईल, का तुझें नांव होईल याची. दोघेही एकच तत्व प्रतिपादन करितात; पण त्यापैकीं एक म्हणतो, 'ह्याचें म्हणणें खरें असणें शक्यच नाहीं. कारण त्या म्हणण्यावर माझ्या नांवाची मुद्रा कोठें बसली आहे? तेव्हां त्याचें कोणीही ऐकूं नये.' दुसरा म्हणतो, 'ह्याचें कोणीही ऐकूं नका. मी सांगतों आहें, तेंच जरी जवळ जवळ हा सांगतो आहे, तरी तें खरें नाहीं. कारण तें माझ्या नांवानें कोठें तो सांगतो आहे?'

माझ्या गुरुदेवांना जें तत्त्व आढळून आलें तें हें. नंतर ते अगदीं लीन होण्याचा प्रयत्न करूं लागले. कारण त्यांनीं अनुभविलें कीं, सर्व धर्मांची एकच कल्पना मी नाहीं तर तूं आहे. जो मी नाहीं म्हणतो, त्याचेंच अंतःकरण ईश्वर भरून टाकतो. ज्याच्यांत क्षुद्र मी अधिक थोडा, त्याच्यांत ईश्वर ज्यास्ती. जगांतल्या प्रत्येक धर्मांत हें सत्य त्यांनीं पाहिलें आणि तें साधावयाच्या मार्गाला ते लागले. मी आपल्याला सांगितलेंच कीं, गुरुदेवांना कांहीं करावयाचें असलें म्हणजे नुसत्या मोहक कल्पनेंत ते कधींही गढून जात नसत, तर लागलींच कृतीला लागत. आपण पुष्कळांना दीनदातृत्व, समता, दुसऱ्यांचे हक्क, हे आणि ते ह्या सगळ्याबद्दल फारच सुंदर गोष्टी

बोलतांना ऐकतों; पण त्या साऱ्या गप्पाच असतात. कल्पनांना मूर्त स्वरूप देणारा महात्मा माझ्या नशीबानें एक तरी आढळून आला ! जें जें त्यांना बरोबर आहे असे वाटें, तें सारें कृतींत उतरविण्याचें फारच विलक्षण सामर्थ्य माझ्या गुरुदेवांत होतें.

त्याच जागेजवळ एक महाराचे कुटुंब रहात होतें. सबंध हिंदुस्थानांत लाखो महार आहेत. त्यांची जात फारच हलकी समजतात; इतकी कीं आमची कांहीं धर्मपुस्तकें म्हणतात, एकादा ब्राह्मण घराच्या बाहेर पडला आणि त्याला महाराचें तोंड दिसलें कीं, त्यानें कांहीं आराधना केली पाहिजे, आणि सर्व दिवसभर उपास केला पाहिजे. म्हणजे तो पुनः शुद्ध झाला. कांहीं शहरांतून महाराला आपली जात दाखविणारी खूण म्हणून कावळयाचें एक पीस डोक्यांत अडकवावें लागतें आणि ‘ महार रस्त्यानें येतो आहे; दूर व्हा ’ असें ओरडावें लागतें. आणि मग जादूची कळ फिरल्याप्रमाणें लोक त्यापासून दूर पळून जातात. कारण, जर त्यांना त्याचा स्पर्श झाला, तर त्यांना आपले कपडे काढावे लागतात, आंघोळ करावी लागते आणि दुसऱ्याही पुष्कळ गोष्टी कराव्या लागतात. प्रत्यक्ष महारांनासुद्धां आज हजारों वर्षें हें चाललें आहे, हें बरोबर वाटतें. तो समजतो आपल्या स्पर्शानें दुसरे लोक अशुद्ध होतात. तेव्हां माझे गुरुदेव एका महाराच्या घरीं जात आणि त्यानें त्याचें घर आपल्याला झाडूं द्यावे, म्हणून त्याची प्रार्थना करीत. ह्या महारांचा धंदा म्हणजे शहरांतले रस्ते आणि घरें झाडावयाचा. पुढच्या दारानें आंत जावयाची त्याला परवानगी नसते; पाठीमागच्या दारानें त्यानें आंत गेले पाहिजे. आणि तो परत गेल्यावर ज्या जागेवरून तो चालला असेल, ती जागा आधीं साधें पाणी शिंपडून व मग त्यावर थोडेंसें गंगोदक टाकून शुद्ध करून घेतात. ब्राह्मण आपल्या जन्मामुळेंच पवित्र्याचें निदर्शक आहे. महार त्याच्या अगदीं उलट. पण ह्या ब्राह्मणानें महाराच्या घरीं अगदीं हलक्या दर्जाचें काम करूं देण्याबद्दल याचना केली ! महार तसें करूं देईना. कारण, त्याची ठाम समजूत कीं ब्राह्मणाला असें करूं दिल्यानें आपल्याला महापातक लागेल व मग आपलें सगळें कुल

निर्मूल होईल. महार असें करूं देईना, तेव्हां भगवान् श्रीरामकृष्ण मध्यरात्रीं सगळे निजल्यावर त्या घरीं जात. त्यांचे केंस लांब होते. त्या केंसांनीं ते ती जागा झाडीत आणि म्हणत "आई, मला महाराचाही चाकर कर आणि माझ्या मनांत बिंबू दे कीं, मी महारापेक्षांही खालच्या दर्जाचा आहें." '**मद्भक्तानां च ये भक्ता ते मे भक्ततया मताः ।**' 'माझ्या भक्तांना जे भजतात ते माझे सर्वोत्कृष्ट भक्त. हीं माझीं मुलें आहेत आणि त्यांच्या उपयोगी पडावयाचें हाच माझा हक्क.' सर्व हिंदुशास्त्रें हेंच शिकवितात.

दुसरींही पुष्कळ साधनें त्यांनीं केलीं; पण तीं सर्व सांगावयाला फार वेळ लागेल. आणि माझ्या मनांतून आपल्याला त्यांच्या सर्व जीवनचरित्राची थोडक्यांत कल्पना द्यावयाची आहे. ह्याप्रमाणें चाळीस वर्षें त्यांनीं आपल्याला तयार करण्यांत घालविलीं. पूर्णतेला जावयाला 'ती व तो' ही कल्पना नाहींशी झाली पाहिजे अशी त्यांची खात्री. कारण, आत्म्याला लिंग नाहीं. आत्मा स्त्रीही नाहीं व पुरुषही नाहीं. लिंगभेद हा शरीरांतच. तेव्हां ज्याची ब्रह्माला पोंचावयाची इच्छा आहे, त्याचें लिंगभेद लक्ष्यांत ठेवून चालावयाचें नाहीं. पुरुष देहांत जन्म झाला होता म्हणून ह्या पुरुषाला आतां प्रत्येक वस्तूंत स्त्रीची भावना आणावीशीं वाटली. आपण स्त्रीच आहोंत अशीं ते आपल्या मनाची भावना करवून घेऊं लागले. ते बायकांच्या सारखा पोषाक करूं लागले, बायकांच्या सारखें बोलूं लागले; त्यांनीं पुरुषांचे धंदे सोडून दिले आणि एका चांगल्या घराण्यांतल्या बायकांच्या दासीवर्गांत ते राहिले. कांहीं वर्षें ह्या शिक्षणांत घालविल्यावर अखेरीस त्यांच्या मनोवृत्तींत बदल झाला. स्त्रीपुरुषांची कल्पना त्यांच्यांतून समूळ नाहींशी झाली. ह्याप्रमाणें जीवितच्या जीवितच त्यांना आतां निराळें दिसूं लागलें.

पाश्चात्यांत बायकांना फार भजतात हें आम्हांला माहित आहे; पण ते बहुधा तिच्या यौवनाकरितां व रूपाकरितां. 'स्त्रीपूजा' ह्या शब्दाचा ह्या पुरुषाचा अर्थ असा होता कीं, त्याला कोणाही स्त्रीच्या चेहऱ्यांत

कल्याणी मातेच्या चेहऱ्या शिवाय दुसरें कांहींही दिसत नसे. ज्यांना समाज स्पर्श देखील करणार नाहीं, अशा बायकांच्या पुढें स्वामीजी उभे रहात आणि म्हणत " आई, एका रूपानें तूं रस्त्यांत उभी आहेस; आणि दुसऱ्या रूपानें सगळ्या विश्वांत भरली आहेस; मी तुला नमस्कार करतों; आई, मी तुला नमस्कार करितों." हें मी स्वतः पाहिलें आहे. ज्या महात्म्यांतून सर्व विकार नाहींसे झाले होते आणि ज्याला कोणच्याही बाईच्या मुखाकडे अशा प्रेमानें व आदरानें पाहता येई कीं, त्या मुखाचें एकदम रूपांतर होऊन त्या ठिकाणी केवळ दिव्य मातेचें, मानवजातीचें रक्षण करणाऱ्या देवी कल्याणीचें मुख दिसें, त्या महात्म्याचे तें जीवन किती सुखमय असेल, याची आपणच कल्पना करा. आपल्याला जें पाहिजे तें हेंच. नारी देहांतली दिव्यता आपल्याला फसवून झाकून ठेवतां येईल असें कां तुमचें म्हणणें आहे! असें कधींही घडलें नाहीं; असें कधींही घडणार नाहीं. जेथें तेथें ती दिव्यता आपल्याला प्रस्थापित करील. ती कपट बिनचुक हुडकते, ढोंगें शोधून काढतें; सत्यांतलें सुख, ब्रह्मांतलें तेज, शुद्धतेंतलें पावित्र्य तिला अगदीं बरोबर जाणतां येतें. जर खरें ब्रह्मस्वरूप मिळवावयाचें असेल तर इतकी पवित्रता अगदीं अवश्य आहे.

असल्या निर्मळ निष्कलंक पावित्र्यानें ह्या पुरुषाचें जीवन परिपूर्ण झालें. आपल्या आयुष्यांत आपल्याला जे नाना झगडे झगडावे लागतात, त्याची त्यांना आतां जरूरी नव्हती. आपले तीन चतुर्थांश आयुष्य खर्चून अतिशय कष्टानें मिळविलेलीं ब्रह्मविद्येचीं रत्नें, त्यानीं आपल्याला-जगाला-द्यावीं म्हणून त्यांच्याजवळ अगदीं तयार होतीं. तेव्हां आतां त्यांचें जीवनकार्य सुरू झालें. त्यांचें शिकवणें, त्यांचे उपदेश हीं इतरांहून भिन्न होतीं. आमच्या देशांत गुरूला अतिशय पूज्य मानतात; त्याला प्रत्यक्ष परमेश्वर समजतात. तितका मान आईबापांना देखील नसतो. कारण, आईबाप आम्हाला आमचा देह देतात; पण गुरू मोक्षाचा मार्ग दाखवितो. आम्ही त्याचीं अपत्यें! धार्मिक बाबतींत आमचा तो पूर्वज!! असामान्य गुरू असला कीं, त्याला सगळे हिंदू अतिशय पूज्य

समजतात. त्याच्या भोंवतीं ते जमा होतात. आतां असा एक गुरु निघाला; पण पूज्यापूज्यतेची त्याला कल्पनाच नव्हती. आपण गुरुश्रेष्ठ आहोंत याची तर त्याला मुळींच जाणीव नव्हती. त्याची भावना आई सगळें करते, आपण कांहींच करीत नाहीं. ते नेहमीं म्हणत "जर माझ्या तोंडांतून कांहीं कल्याणकारक निघत असेल, तर त्याचें कारण त्यांतून ती बोलते आहे. माझा त्याच्याशीं काय संबंध ?" आपल्या कार्यासंबंधीं त्यांची अशी कल्पना होती आणि मरेपर्यंत ती कायम होती. ते कोणाचा शोध करीत कोणाकडे गेले नाहींत. त्यांचीं तत्वें म्हणजे, पहिल्यानें शील बनवा, पहिल्यानें ब्रह्म मिळवा. मग बाकीचे परिणाम आपोआपच घडून येतील. ह्यावर त्यांचा एक आवडता दृष्टांत असे. 'कमल उघडलें कीं भुंगे आपण होऊनच मधाचा शोध करीत येतात. तुमच्या शीलाचें कमल प्रफुल्ल होऊं द्या; मग पहा, बाकीच्या गोष्टी आपोआपच घडतील.' हें फार लक्ष्यांत ठेवण्यासारखें तत्व आहे. हा शिकावयाचा अत्यंत महत्वाचा धडा आहे. माझ्या गुरुदेवांनीं हा धडा मला हजारवेळा शिकविला; पण मी तो वारंवार विसरून जातों. मननाचें सामर्थ्य फारच थोड्यांच्या लक्ष्यांत आलें असेल. एकादा मनुष्य एका गुहेंत गेला, तेथें त्यानें आपल्याला कोंडून घेतलें आणि एकाद्या मोठ्या कल्पनेवर विचार करितां करितां त्यानें आपला देह सोडला, तर तो विचार त्या गुहेच्या भिंतींना फोडून बाहेर येईल, आकाशांत स्फुरेल, आणि अखेरीस सर्व मानव जातीला वेढून टाकील! विचाराची इतकी शक्ति आहे! तेव्हां आपले विचार दुसऱ्यांना द्यावयाची घाई करूं नका. अगोदर देण्या करितां देण्यासारखे कांहीं तरी मिळवा. ज्याच्याजवळ दुसऱ्याला देण्यासारखें कांहीं आहे, तोच गुरु. कारण शिकविणें म्हणजे कांहीं बोलणें नाहीं, किंवा शिष्याच्या डोक्यांत मतें भरवून देणें नाहीं, तर प्रत्यक्ष उचलून देणें आहे. ज्याप्रमाणें मला तुम्हाला एकादें फूल उचलून देतां येतें, अगदीं तसेंच ब्रह्मज्ञान प्रत्यक्ष उचलून देतां येतें. अगदीं शब्दाच्या धात्वर्थाप्रमाणें हें खरें आहे. भरतवर्षांत ही कल्पना अगदीं जुनी आहे. आणि अपॉसलची ( ख्रिस्तीधर्म

प्रसार करणारे येशूच्या नंतरचे १२ धर्म गुरु.) परंपराही ह्या कल्पनेचें पश्चिमेकडील उत्कृष्ट उदाहरण आहे. तेव्हां पहिल्यानें शील बनवा. आपल्याला करावयाचें सर्वांत श्रेष्ठ कर्तव्य तें आहे. अगोदर स्वतः सत्य जाणा. मग ज्यांना तुम्हाला तें शिकवितां येईल असे पुष्कळ आढळतील. ते सगळे होऊन तुमच्याकडे येतील. माझ्या गुरुदेवांची ही पद्धति होती. ते कोणावरही टीका करीत नसत. मी त्यांच्यापाशीं पुष्कळ वर्षे घालविलीं आहेत; पण त्या ओठांतून कोणच्याही पंथाबद्दल निंदेचा एकही शब्द निघालेला मी कधीं ऐकला नाहीं. सर्व धर्मांबद्दल त्यांना सारखीच सहानुभूति होती. त्या सर्वांत त्यांना एकवाक्यता सांपडली होती. मनुष्य ज्ञानी असतो, भक्त असतो, चमत्कार करणारा असतो किंवा कार्य करणारा असतो. निरनिराळे धर्म ह्यांपैकीं कशाचेंना कशाचें तरी निदर्शक आहेत. पण एकच मनुष्य ह्या चारी तऱ्हेचा असणें शक्य आहे. ह्यापुढें मनुष्य जातीला हेंच साधावयाचें आहे. ही त्यांची कल्पना होती. त्यांनीं कोणाचीच निंदा केली नाहीं; तर, सर्वांतलें चांगलें तेवढें शोधून काढलें.

ह्या विलक्षण पुरुषाला पहावयाला व त्याचा उपदेश ऐकावयाला हजारों लोक येऊं लागले. स्वामी गांवठी भाषेंत बोलत असत; पण त्यांचा प्रत्येक शब्द ज्ञानानें सजीव आणि ओजपूर्ण असे. बोलणारा जें कांहीं बोलतो तें त्याचें बोलणें कांहीं श्रोत्यांवर परिणाम करीत नाहीं; ज्या भाषेंत तो बोलतो त्या भाषेंत हें सामर्थ्य त्याहुनही कमी. ऐकणाऱ्यावर जे कांहीं परिणाम करितें, तें त्याच्या त्या सर्व बोलण्यांतून दिसून पडणारें त्याचें स्वतःचें महत्त्व. आपल्यापैकीं प्रत्येकाला नेहमीं असा अनुभव येतो. मोठीं तेजस्वी वक्तृत्वें आपण ऐकतों, विलक्षण तर्ककौशल्यानें भरलेले वादविवाद आपण ऐकतों, आणि घरीं जातों तों ते सारे विसरून जातों. पण कधीं, अगदीं साध्या भाषेंत दोनच शब्द आपण ऐकतों, तोंच ते आपल्या अगदीं जीवनांत उतरतात, आपला एक अवयवच होऊन बसतात आणि चिरस्थायी परिणाम करितात. ज्याला आपल्या वाणींत आपली विभूति ओततां येते, त्याचेच शब्द परिणाम करितात. पण त्याच्यांत स्वतःत मह-

द्विभूतिमत्व असलें पाहिजे. सर्व शिक्षण म्हणजे देव घेव आहे. गुरु देतो व शिष्य घेतो; पण गुरुजवळ द्यावयाला कांहीं पाहिजे; व शिष्य स्वीकारावयाला तयार असला पाहिजे.

गुरुदेव कलकत्त्याजवळ येऊन राहिले. कलकत्ता हें हिंदुस्थानांतलें मुख्य शहर आहे. तेथें सर्वांत मोठें विश्वविद्यालय आहे. त्यांतून दर वर्षीं शंकावादी व जडवादी बाहेर पडतात. उच्च तत्वांवर विश्वास न ठेवणाऱ्या व ईश्वर आहे कां नाहीं, हें कळणें शक्य नाहीं; असें म्हणणाऱ्या ह्या मंडळीपैकीं बरेच त्यांचा उपदेश ऐकावयाला जाऊं लागले. मी त्यांच्या विषयीं हकीगत ऐकली आणि मीही त्यांचा उपदेश ऐकावयाला गेलों. ते अगदीं सामान्य माणसासारखे दिसत. विलक्षण असें त्यांच्यांत कांहीं नव्हतें. तसेंच, ते अगदीं साध्या भाषेंत बोलत. 'हा मनुष्य म्हणतात तसा एवढा महागुरु असूं शकेल का' असा माझ्या मनांत प्रश्न उभा राहिला. मी हळूच त्यांच्या जवळ गेलों आणि त्यांना एक प्रश्न विचारला. कोणीही असा भेटला कीं, नेहमीं मी त्याला ह्याच प्रश्न विचारीत असे.

"स्वामीजी, ईश्वर आहे अशी तुमची खात्री आहे का?"

"हो" ते म्हणाले.

"स्वामीजी, आपल्याला हें सिद्ध करून दाखवितां येईल का?"

"हो."

"कसें?"

"जसा तूं मला येथें दिसतो आहेस, तसाच तोही मला येथें दिसतो आहे, पण तुझ्यापेक्षां अत्यंत स्पष्ट."

ह्याचा माझ्यावर एकदम परिणाम झाला. मी डोळ्यांनीं ईश्वर पहातों; हें जग जसें आपल्याला प्रत्यक्ष दिसतें त्याहूनही उत्कटतेनें प्रत्यक्ष दिसणारें, अगदीं स्पर्श करून प्रत्यक्ष पहाता येण्यासारखें 'धर्म' हें सत्य आहे; असें विश्वस्ततेनें म्हणणारा पुरुष मला पहिल्यानेंच आढळला. मी दररोज त्यांच्याकडे जाऊं लागलों आणि धर्म हा एकाद्या पदार्थाप्रमाणें प्रत्यक्ष उचलून देतां येतो, हें माझ्या प्रत्यक्षच अनुभवाला आलें. नुसत्या स्पर्शानें,

एका दृष्टिक्षेपानें-जीवनच्या जीवन बदलतें. भगवान् बुद्ध, खिस्त, महमद वगैरे पुराणकाळच्या तेजोगोलासंबंधानें मी अशा पुष्कळ गोष्टी वाचल्या होत्या कीं, ते उभे रहात आणि म्हणत 'तूं पूर्ण हो' म्हणजे तो मनुष्य पूर्ण होई! आतां तें अगदीं खरें आहे हें माझ्या अनुभवाला आलें. मी स्वत: या पुरुषाला पाहिलें आणि माझा संशयवाद झाडून नाहींसा झाला. हें अगदीं शक्य आहे. स्वामीजी नेहमीं म्हणत 'जगांतल्या दुसऱ्या कोणच्याही वस्तुपेक्षां अधिक प्रत्यक्षपणें-अगदीं हातानें उचलून-धर्म देतां येतो.' तेव्हां आधीं स्वतः ब्रह्मपूर्ण व्हा. देण्यासारखें कांहीं मिळवा आणि मग जगापुढें उभे राहून जगाला तें द्या. धर्म म्हणजे कांहीं वडबड नाहीं, मतमतान्तरें नाहींत, नुसत्या कल्पना नाहींत किंवा पंथपरताही नाहीं. समाजांत किंवा पंथांत धर्माला राहतां येत नाहीं. **जीवात्मा आणि परमात्मा ह्यांच्या मधला तो संबंध आहे.** त्याचा समाज कसा बनवितां येईल! मग त्याचें अध:पतन धंद्यांत होईल. आणि एकदां का धर्मांत धंदा आणि धंद्यांतली तत्वें शिरलीं कीं, मग त्यांतली दिव्यता गेलीच. देवळें बांधण्यांत, चर्चे उभारण्यांत किंवा सार्वजनिक प्रार्थनेला हजर राहण्यांत कांहीं धर्म भरलेला नाहीं. तसाच तो पुस्तकांत, शब्दांत, व्याख्यानांत किंवा संघटनेंतही रहात नाहीं. धर्म हा साक्षात्कारांत असतो. त्याला प्रत्यक्ष अनुभवण्यांत आसतो. आपल्याला त्यातलें सत्य पटल्याशिवाय आपलें कशानेंही समाधान व्हावयाचें नाहीं, हें आपल्याला सर्वांना माहित आहे. आपण कितीही प्रतिपादन केलें, कितीही वाद ऐकलें, तरी एकच गोष्ट आपलें खरें समाधान करील. आणि ती गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष अनुभव. आपण प्रयत्न मात्र केला पाहिजे म्हणजे हा अनुभव आपल्यापैकीं प्रत्येकाला येणें शक्य आहे. धर्माचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या ह्या प्रयत्नांतली पहिली गोष्ट म्हणजे **त्याग.** शक्य तितका आपल्याला त्याग केला पाहिजे. काळोख आणि उजेड, ब्रह्मानंद आणि इंद्रियानंद हे हातांत हात घालून कधींही जावयाचे नाहींत. 'पैशाची आणि देवाची तुम्हाला एकाच कालीं आराधना करितां यावयाची नाहीं.' कोणाला असें

वाटत असेल तर त्यांनीं खुषाल प्रयत्न करावा. मी प्रत्येक देशांत–ज्यांनीं त्यांनीं असा प्रयत्न केला आहे–असे हजारो लोक पाहिले आहेत; पण अखेरीस काय? कांहीं नाहीं. जर एकादा बोल सत्य असला, तर तो हा आहे. 'परमेश्वराकरितां प्रत्येक वस्तूचा त्याग कर.' हें मोठें कठिण आणि कंटाळवाणें काम आहे. पण आपण येथून आरंभ करावा. म्हणजे हळू हळू आपण त्याच्याकडे जाऊंच जाऊं.

माझ्या गुरुदेवापासून मला जें दुसरें तत्व कळलें–आणि कदाचित् तेंच सर्वांत महत्वाचें तत्व असेल–तें असें. जगांतले धर्म एकमेकांशीं विसंगतही नाहींत आणि एकमेकाच्या विरुद्धही नाहींत. हें अगदीं चमत्कारिक वाटेल; पण तें अक्षरशः खरें आहे. त्या एका चिरंतन धर्मांचीं हीं निरनिराळीं स्वरूपें आहेत. तो चिरंतन धर्मच निरनिराळ्या जीवनपरिस्थितींना आणि निरनिराळ्या मनुष्यांच्या मतांना व जातींना लावल्यामुळें ते उत्पन्न झाले आहेत. माझा धर्म आणि तुमचा धर्म, माझ्या राष्ट्राचा धर्म आणि तुमच्या राष्ट्राचा धर्म असें केव्हांही नव्हतें. अनेक धर्मच कधीं अस्तित्वांत नव्हते. जिकडे तिकडे फक्त तो एकच धर्म आहे. अनादिकालापासून एक अनंत धर्म चालत आला आहे आणि पुढेंही नेहमीं तोच असणार; आणि हाच धर्म निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या मर्गानें आविष्कृत होत आहे. तेव्हां सर्व धर्मांबद्दल आपल्या मनांत आदर पाहिजे; आणि त्यांना मानण्याचा आपण शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे. धर्म देशपरत्वें व जातिपरत्वें आविष्कृत होतात. इतकेंच नाहीं, तर ते व्यक्तिव्यक्तिच्या शक्तिपरत्वेंही आविष्कृत होतात. एकाद्यांत धर्म उत्कट योगाच्या, कर्तृत्वाच्या रूपांत दिसतो; तर दुसऱ्यांत पराभक्तीच्या रूपानें दिसतो. कोणांत अंतर्ज्ञानाच्या स्वरूपांत, तर कोणांत तत्वज्ञानाच्या स्वरूपांत दिसतो. 'तुझे मार्ग बरोबर नाहींत' असें दुसऱ्याला म्हणणें चुकीचें आहे. ज्याचा ओढा भक्तीकडे आहे, अशा एकाद्या माणसाला एकादेवेळ दुसऱ्यावर उपकार करीत जाणाऱ्या माणसाबद्दल वाटतें कीं, धर्माच्या खऱ्या रस्त्यानें कांहीं तो जात नाहीं. कारण तो मार्ग माझ्याहून भिन्न आहे; तेव्हां तो बरोबर नाहीं. जर

ज्ञात्याला वाटलें, 'अरेरे! गरिब बिचारे लोक! ईश्वर, प्रीति, ईश्वराची भक्ति, ह्यांची त्यांना काय कल्पना असणार! आपण काय करतों हें त्यांचें त्यांनाच कळत नाहीं,' तर त्याचें हें वाटणें चुकीचें आहे. कारण त्यांचाही मार्ग बरोबर असेल, आणि त्याचाही मार्ग बरोबर असेल. आपल्याला अवश्य शिकलेंच पाहिजे तें अगदीं मूळभूत तत्व हेंच कीं, सत्य एकच असूनही आपण निरनिराळ्या स्थानांहून त्या सत्याकडे पहात असल्यामुळें तें निरनिराळ्या आकाराचें दिसूं शकेल. आणि मग, दुसऱ्याशीं विरोध होण्याच्या ऐवजीं आपलें दुसऱ्याशीं अनंत ऐक्य होऊन जाईल. जोंपर्यंत ह्या जगांत भिन्न भिन्न प्रकृति उत्पन्न होणार, तोंपर्यंत एकाच सत्य धर्माला त्या त्या प्रकृतीप्रमाणें स्वरूप घ्यावें लागेल, 'हें तत्व आपल्याला कळलें कीं, इतर सर्व धर्म आपल्याला सहन केले पाहिजेत; हें आपल्या लक्ष्यांत येईल. ज्याप्रमाणें निसर्ग म्हणजे विविधतेंतली एकता आहे-असंख्य प्रकारचे चमत्कार दिसतात पण ह्या सर्व प्रकारच्या चमत्कारांतून अनंत, अविकार्य, केवळ अद्वैत वाहत असतें-त्याचप्रमाणें मनुष्याची गोष्ट आहे. पिण्ड म्हणजे ब्रह्माण्डाची चिमुकली आवृत्ति आहे. ही जरी इतकी विविधता दिसते, तरी सर्वांतून चिरंतन एकतानता वाहत असते. आम्ही ही एकदां जाणली पाहिजे. आज काल अत्यावश्यक अशी जर कोणची गोष्ट असेल, तर ती हीच कल्पना. धर्म-पंथांच्या पिकाला ज्या देशाइतकी सुपिक जमीन दुसरी नाहीं, व कोणीही नवीन धर्मकल्पना काढली कीं, त्याला ज्या देशांत, त्या देशाच्या सुदैवानें म्हणा अगर दुर्दैवानें म्हणा-आपले गुरःप्रवर्तक पाठवावेसे वाटतात, अशा देशांतला मी असल्यामुळें लहानपणापासूनच जगांतल्या भिन्न पंथांशीं माझा परिचय झाला. मार्मन्ससुद्धां धर्मोपदेश करावयाला हिंदुस्थानांत आले! येऊं देत. सर्वांचें सुस्वागत असो! धर्मोपदेश करावयाला तीच योग्य भूमि. दुसऱ्या कोणच्याही देशापेक्षां तेथें तो जोरानें मूळ धरितो. तुम्ही हिंदूनां राजकारण शिकवावयाला या, त्यांना तें कळावयाचें नाहीं! पण जर तुम्ही धर्म शिकवावयाला आलेत-मग तो धर्म कितीही चमत्कारिक असेना-तर तुम्हाला हजारो अनुयायी

मिळावयाला वेळ लागावयाचा नाहीं. तुमच्या ह्याच आयुष्यांत तुम्ही देव बनावयाचा पुरा संभव! असें आहे ह्यांत मला आनंद आहे. आम्हाला हिंदूनां नेहमीं हीच गोष्ट हवी असते.

हिंदूमध्यें धर्मपंथ विविध आहेत. त्यांचा आंकडाही मोठाच निघेल. आणि त्यांतले कांहीं कांहीं तर इतके विसंगत आहेत कीं, त्यांची एकवाक्यता करावयाची आशाच नको. तरीही एकाच धर्माचीं तीं भिन्न स्वरूपें आहेत, असें आपल्याला ऐकूं येईल.

७५३

रूचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां।
नृणामेको गम्यत्वमसि पयसामर्णव इव ॥

'ज्याप्रमाणें निरनिराळ्या पर्वतांवर उगम पावलेल्या निरनिराळ्या नद्या सरळ किंवा वांकड्या वाहत जाऊन अखेरीस सार्‍या येऊन समुद्रास आपले पाणी मिळवून देतात, त्याप्रमाणें नाना पंथ आपल्या नाना मतांसह अखेरीस तुझ्यापाशींच येतात.' ही नुसती कल्पना नाहीं. ती मान्य करावी लागेल; पण कांहीं लोक कांहीं गोष्टींना ज्याप्रमाणें आपला 'उदार आश्रय' देतात, त्याप्रमाणें ती मान्य व्हावयाला नको आहे. "हो, हो, त्यांच्यामध्यें पुष्कळ चांगल्या गोष्टी आहेत. आम्ही ज्यांना मूर्तिपूजकांचे धर्म म्हणतो ते हे. ह्या मूर्तिपूजेच्या धर्मांत सुद्धां कांहीं चांगलें आहे." कांहींच्या तर ह्याहूनही फार विलक्षण उदार कल्पना असतात! "हे धर्म म्हणजे प्रागैतिहारिक उत्क्रमणाचे लहान लहान हप्ते आहेत. आणि आमचा धर्म म्हणजे सर्वांची परिणती आहे." एक म्हणतो, माझा धर्म सर्वांत जुना म्हणून चांगला. दुसरा म्हणतो, माझा सर्वांत नवा म्हणून चांगला. कसेंही असलें, तरी दोघांमध्येंही तारण्याचें सामर्थ्य आहे, हें आपण कबूल केलें पाहिजे. देवळांत किंवा चर्चमध्यें धर्मांच्या भिन्नतेविषयीं जें ऐकूं येतें तें धर्मवेडाचें बंड होय. एकच देव सगळ्यांचे धावे ऐकून धाव घेतो. अणुइतक्याही प्राण्याच्या सुरक्षिततेबद्दल व मुक्ततेबद्दल तुम्ही किंवा मी किंवा दुसरा कोणीही मनुष्यप्राणी कांहींही करूं शकत नाहीं, तोच सर्व शक्तिमान

परमेश्वर सारें करितो. आमचा ईश्वराच्या अस्तित्वावर पूर्ण विश्वास आहे, असें जें जोरानें सांगतात, तेंच ईश्वरानें सर्व सत्याचा मक्ता थोड्याशा लोकांच्या स्वाधीन केला आहे आणि त्यांना बाकीच्या मानव जातीचे पालक केले आहे, असें कसें समजतात हें मला कळत नाहीं! ह्याला धर्म कसें म्हणतां येईल? धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभव. नुसती बडबड, अंधारांत चांचपडणें, पूर्वजांच्या वचनावर पोपटपंची, धर्मांचीं तत्त्वें घेऊन तीं कांहीं तरी राजकीय गोष्टींना लावून त्यालाच धर्म हें नांव देणें; हा कांहीं धर्म नाहीं. प्रत्येक पंथांत, ज्यांना आम्ही अगदीं परग्रहणपराङ्मुख समजतों, त्या महमदी धर्मांत सुद्धां, आपल्याला असें आढळतें कीं, जेव्हां कोणी महात्मा धर्माचा प्रत्यक्षानुभव घ्यावयाचा प्रयत्न करितो, तेव्हां त्याच्या ओंठांतून हेच जीवंत शब्द बाहेर पडतात. 'तूं सर्वांचा प्रभू आहेस; तूं सर्वांच्या हृदयांत राहतोस; तूं सर्वांचा मार्गदर्शक आहेस; तूं सर्वांचा गुरु आहेस; आणि तुझ्या लेकरांच्या भूमीकरितां आमच्या सर्वांच्यापेक्षां अनंतपटीनें अधिक काळजी तुला आहे'! एकाद्याची स्वधर्मनिष्ठा नाहींशी करावयाचा प्रयत्न करू नका. तुम्हाला शक्य असेल, तर त्याला त्याहून अधिक चांगलें असेल तें द्या. ढकलता येईल तर जेथें मनुष्य उभा असेल, तेथून त्याला पुढें ढकला. असें करा पण; त्याच्याजवळ जें कांहीं आहे, त्याचा नाश करूं नका. ज्याला क्षणांत हजारो माणसांसारखे होता येईल, तोच फक्त खरा गुरु. ज्याला लागलींच शिष्याच्या पायरीवर उतरतां येईल. शिष्याच्या आत्म्यांशीं आपला आत्मा मिळविता येईल, शिष्याच्या कानानें ऐकतां येईल, शिष्याच्या मनानें विचार करितां येईल, तोच खरा गुरु. अशाच गुरुला खरोखर उपदेश करितां येईल. दुसऱ्या कोणाला तें शक्य नाहीं. ह्या जगांत भरलेल्या विनाशक, विध्वंसक, प्रतिकुल गुरूंना कांहींच कल्याण करितां यावयाचें नाहीं.

माझ्या गुरुदेवांच्या सहवासानें मला दिसून आलें कीं, मनुष्याला ह्या देहांतसुद्धां पूर्ण होतां येईल. त्यानीं आपल्या ओठांनीं कधीं कोणाबद्दल कटु उद्गार काढले नाहींत. कोणावर नुसती टीकासुद्धां केली नाहीं. त्यांचे डोळे,

वाईट गोष्ट पहाण्याच्या शक्यतेच्या पलिकडेच होते. त्यांच्या मनांत वाईट विचार करण्याची शक्तीच राहिली नव्हती. त्यांना चांगल्याशिवाय कांहीं दिसतच नसे. तें परम पावित्र्य, तो परिपूर्ण त्याग, म्हणजे ब्रह्माचें मूल रहस्य होय. संपत्तीनें नाहीं व संततीनेंही नाहीं, तर त्यागेनैकेन अमृतत्वमानशुः' केवळ त्यागानेंच अमर होतां येतें, असें वेद सांगतात. ख्रिस्त म्हणतो, "तुझ्यापाशीं आहे तें सगळें विकून टाक, ते पैसे गरिबांना वाटून टाक, आणि माझ्या पाठीमागें ये." सर्व साधूंनीं आणि धर्मप्रस्थापकांनीं असेच उद्गार काढले आहेत आणि ते आपल्या जीवनक्रमांतही उतरविले आहेत. त्यागाशिवाय परा अवस्था कशी प्राप्त होईल? कोठलाही धार्मिक विचार असो तो त्यागाच्या आधारावर वाढतो; आणि त्यागाची कल्पना नाहींशी होत चालली म्हणजे धर्मातली ऐहिक सुखाची कल्पना वाढत जाते आणि त्या प्रमाणांत आध्यात्मिकता कमी होत जाते.

माझे गुरुदेव त्यागाचा प्रत्यक्ष अवतार होते. आमच्या देशांत जो संन्यास घेतो त्याला आपली सर्व संपत्ति व सामाजिक पायरी सोडून द्यावी लागते. माझ्या गुरुदेवांनीं हें अक्षरशः अमलांत आणलें. पुष्कळ लोकांना स्वामींनीं त्यांच्या देणगीचा स्वीकार केला असतां, तर महदुपकार वाटले असते. स्वामींनी जर त्यांच्यापासून घेतले असते, तर स्वामींना हजारो रुपये देण्यांत त्यांना फार आनंद वाटला असता; पण स्वामींना अशाच लोकांपासन फक्त दूर रहावेंसें वाटे. स्वामी म्हणजे काम आणि धनतृष्णा ह्यांच्या पराभवाचें जीवंत प्रत्यक्ष प्रमाण—विजयी उदाहरण—होते. दोहोंबद्दलच्या कल्पनेच्याही ते अगदीं पलिकडे होते. आणि अशाच महात्म्यांची ह्या शतकांत जरूरी आहे. माणसांना असें वाटतें आहे कीं, ज्यांना ते 'जीवनाला आवश्यक गोष्टी' म्हणतात आणि दिवसेंदिवस ज्या सदराखालील गोष्टींची ते अप्रतिबंध वाढ करीत आहेत, त्यांच्यावाचून रहतां येणें आपल्याला शक्य नाहीं. तेव्हां अशा या वेळीं असल्या त्यागाची जरूरी आहे. ह्या काळांत फार जरूरी आहे कीं, एकादा महात्मा निघावा आणि त्यानें या अनिष्ठावादी जगाला सिद्ध करून द्यावें कीं या जगांतल्या

साऱ्या कांचनाला आणि साऱ्या कीर्तीला जो तृणसमान लेखतो असा एक तरी पुरुष आज हयात आहे आणि असे महात्मे आजही आहेत !

त्यांच्या जीवनांतला आणखी एक विशेष म्हणजे त्यांचें दुसऱ्यावरचें अत्युत्कट प्रेम. माझ्या गुरुदेवांचा आयुष्यांतला पहिला भाग ब्रह्मज्ञान मिळविण्यांत गेला आणि बाकीचीं वर्षें तें वांटण्यांत गेलीं. सन्याश्यांच्या किंवा धर्मगुरूंच्या दर्शनाला जावयाची आमच्या देशांतली पद्धति तुमच्या देशच्याहून निराळी आहे. कांहीं त्यांना एकादी गोष्ट विचारावयाला येतात. कांहीं एकादा प्रश्न विचारावयाला अगर त्यांच्या तोंडातून निघणारा एकादा शब्द ऐकावयाला, शेंकडो मैलावरून पायीं चालत येतात. 'मला मोक्षाला नेणारा एक शब्द मला सांगा' एवढ्यासाठीं ते येतात. जेथें तो बहुधा बसलेला आढळतो, तेथें ते पुष्कळजण जमून जातात. ह्यांत शिष्टाचाराला मुळींच वाव नसते. एकाद्या झाडाखालीं तो बसलेला असला तरी तेथेंच त्याला प्रश्न विचारतात; आणि पहिले गेले नाहींत तोंच दुसरे येतात. अशा तऱ्हेनें, जर एकाद्याबद्दल फार पूज्यता पसरली असली तर त्याला रात्रंदिवस विसावा मिळत नाहीं. एकसारखें त्याला बोलावें लागतें. तासांचे तास लोकांच्या झुंडी येत असावयाच्या आणि हा महात्मा त्यांना शिकवीत असावयाचा.

अशा तऱ्हेनें लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्यांचा उपदेश ऐकावयाला येऊं लागल्या आणि स्वामीही चोवीस तासापैकीं वीस वीस तास त्यांच्याशीं बोलत बसावयाचे. आणि असें एक दिवस नाहीं, तर महिनेच्यामहिने चाललें. अखेरीस ह्या भयंकर परिश्रमानें शरीराला धक्का बसला. त्यांच्या कृपाभिक्षेसाठीं जे हजारो लोक येत असत त्यांतला अगदीं हलक्या दर्जाचा मनुष्यदेखील स्वामींच्या मानव जातीवरील अलोट प्रेमामुळें विन्मुख जात नसे. यामुळें आस्ते आस्ते घशांत रोगाचा उद्भव झाला. तरीपण, त्यांचे जे विलक्षण श्रम चालले होते, त्यांपासून त्यांना परावृत्त करणें कोणालाही शक्य झालें नाहीं. आपल्या दर्शनाला लोक आले आहेत, असें त्यांनीं ऐकलें पुरें कीं, लागलींच ते त्यांना आंत सोडा म्हणून हट्ट घेऊन बसत

आणि आलेल्यांच्या सर्व शंकांचें निराकरण करीत. त्यांच्या असें करण्याबद्दल जर त्यांच्यापाशीं तक्रार केली, तर म्हणत, "त्याचें काय मोठेसें. मला त्याचें कांहीं वाटत नाहीं. एका मनुष्याला मदत करतां येते आहे, तर असे वीस हजार देह मी घालवीन. केवळ एकाच मनुष्याला तरी मदत करतां येणें हें मोठें वैभव आहे." विश्रांति त्यांना कशी ती नव्हतीच. एकदां एकानें त्यांना विचारलें "स्वामीजी, आपण मोठे योगी आहांत; आपण आपलें थोडेंसें लक्ष्य देहावर लावून आपला रोग कां नाहीं बरा करीत?" पहिल्यानें ते कांहींच बोलले नाहींत; पण तोच प्रश्न जेव्हां पुनः विचारला गेला, तेव्हां ते सौम्यपणानें म्हणाले, "आपण ज्ञानी आहां असे मी समजत होतों; पण जगांतल्या इतर माणसांसारखेंच तुम्ही बोलतां. हें अंत:करण परमात्म्याला वाहिलें आहे; तें तेथून परत घेऊन आत्म्याचें बंदीगृह बनलेल्या ह्या देहाकडे लावूं, असें कां तुमचें म्हणणें?"

अशा रीतीनें ते लोकांना उपदेश करीतच चालले. आतां त्यांचें देहावसान होणार अशी बातमी जिकडे तिकडे पसरली, आणि त्यावेळपर्यंत आले नाहींत इतके लोकांचे थवे त्यांच्याकडे लोटूं लागले. हिंदुस्थानांत लोक ह्या मोठ्या धर्मगुरुकडे कसे येतात, त्याच्या भोंवतीं कसा घोळका घालतात, आणि जीवंतपणींच त्यांना कसे देव मानूं लागतात; ह्याची आपल्याला कल्पना देखील यावयाची नाहीं! त्यांच्या वस्त्राच्या कांठाला तरी आपल्याला स्पर्श करावयाला मिळावा, म्हणून हजारो वाट बघत असतात. दुसऱ्यांतली ब्रम्हमयता जाणल्यानें आपल्यांत ब्रम्हमयता उत्पन्न होते. मनुष्याला ज्याची योग्यता कळेल व जरूरी भासेल तें तो मिळवील. राष्ट्राचीही गोष्ट अशीच आहे. आपण आर्यवर्तांत जाऊन राजकीय विषयांवर व्याख्यान झोडलेत, तर–मग ते कितीही चांगलें असो,–लोक ऐकावयाला तरी येतील कां नाहीं, याची वानवाच आहे; पण जा, आणि त्यांना धर्म शिकवा; नुसता तोंडानें धर्म बडबडूं नका, तर शरीरानें तो आचरा; आणि मग पहा, शेकडो तुमचें दर्शन तरी मिळावें म्हणून, तुमच्या पायाचा स्पर्श तरी व्हावा म्हणून, तुमच्या भोंवतीं जमतील. हा

परम पवित्र महात्मा आपल्याला सोडून लवकरच जाणार, असें जेव्हां लोकांनीं ऐकलें तेव्हां नेहमींपेक्षां ज्यास्त लोक त्यांच्या भोंवतीं जमूं लागले; आणि माझ्या गुरुदेवांनीं प्रकृतीची काडीइतकी परवा न करितां त्यांना उपदेश करणें चालविलें. आम्हाला हें बंद करितां येईना. बरेच लोक किती तरी अंतरावरून येत; आणि त्यांच्या सर्व शंकांचें समाधान केल्याशिवाय स्वामी विसावा घेत नसत. त्यांनीं म्हणावें, "जोंपर्यंत मला शब्द उच्चारतां येतो आहे, तोंपर्यंत मला उपदेश केला पाहिजे," आणि असें अक्षरशः अमलांत आणावें. एके दिवशीं त्यांनीं आम्हाला सांगितलें कीं, मी आज देह ठेवणार. त्यादिवशीं वेदांतले परम पवित्र मंत्र म्हणून त्यांनीं समाधि घेतली आणि ते हें जग सोडून गेले.

त्यांचा उपदेश आणि त्यांनीं जगाला पोंचवलेली ईश्वराची आज्ञा ह्याची ज्यांना माहिती झाली होती, त्यांच्यामध्यें तीं पुढें दुसऱ्याला देण्याचें सामर्थ्य असणारे फारच थोडे होते. त्यांत कांहीं तरुण शिष्य होते. त्यांनीं संसाराचा त्याग केला आणि ते स्वामींचें कार्य पुढें चालवावयाला सिद्ध झाले. त्यांना चिरडून टाकण्याचे पुष्कळ प्रयत्न करण्यांत आले; पण ते मेरूसारखे अचल उभे राहिले. त्यांच्यामध्यें स्फूर्ति उत्पन्न करावयाला ते महज्जीवन त्यांच्या पुढें होतें. त्या कल्याणमय जीवनाचा सहवास कांहीं वर्षें घडल्यामुळें त्यांनीं आपला हेतु सोडला नाहीं. त्या तरुणांनीं सन्यासाश्रम स्वीकारला. त्यांच्यापैकीं कांहीं फारच उच्च कुळांतले होते; तरी ज्या शहरांत त्यांचा जन्म झाला, त्याच शहरांतून त्यांनीं निःशंकपणें भिक्षा मागितली! पहिल्यानें त्यांना फार विरोध झाला; पण त्यांची चिकाटी दांडगी! त्या महापुरुषाचा निरोप सर्व भरतवर्षभर ते एकसारखा पसरीत चालले; आणि अखेरीस सगळा देश स्वामींनीं उपदेशिलेल्या विचारांनीं भरून गेला. बंगाल्यांतल्या एका कोनाकोपऱ्यांत जन्मलेल्या ह्या पुरुषानें कांहीं शिक्षण नसतां, केवळ आपल्या निश्चयाच्या बळावर तें सत्य शोधून काढलें आणि सर्व जगाला दिलें; पण तें जीवंत राखणारे कांहीं थोडेसेच तरुण निघाले.

भारत वर्षांत लाखो लोकांना आज श्रीरामकृष्ण परमहंसांचें नांव परिचित आहे. इतकेंच नाहीं, तर त्या पुरुषाचें सामर्थ्य भारताची मर्यादा फोडूनही बाहेर पडलें आहे. सत्याचा किंवा अध्यात्माचा जो जो शब्द माझ्या तोंडांतून निघाला असेल, तो माझ्या गुरुदेवांचा आहे. त्यांत जर चुका झाल्या असतील, तर त्या मात्र माझ्यामुळें झाल्या आहेत.

आधुनिक जगाला श्रीरामकृष्णांचा हा निरोप आहे 'मतांकडे लक्ष्य देऊं नका; देवळाकडे, चर्चेकडे, पंथाकडे, अगर भिन्न विचारांकडे लक्ष्य देऊं नका; मनुष्याच्या जीवनाच्या साराच्या दृष्टीनें त्यांचें महत्व कांहींच नाहीं. तें जीवनसार म्हणजे आध्यात्मिकता, ब्रह्ममयता आहे. ती जसजसी वाढेल तसतसा तो अधिकाधिक कल्याण करावयाला समर्थ होत जाईल. आधीं पहिल्यानें ती संपादा, तिच्याकरितां श्रम करा. कोणावर टीका करूं नका. सर्व पंथांत आणि मनांत कांहीं तरी चांगलें आहे. धर्म म्हणजे शब्दजाल नाहीं, नामनाहीं, पंथ नाहीं, तर आध्यात्मिक साक्षात्कार आहे, हें आपल्या जीवनानें प्रत्यक्ष सिद्ध करून द्या. विज्ञानाशिवाय खरें ज्ञान नाहीं. ज्यांनीं जाणलें आहे त्यांनाच फक्त कळेल. जे उमजले आहेत त्यानांच फक्त समजेल. जे ब्रह्ममय झाले आहेत त्यांनाच फक्त दुसऱ्याला ब्रह्मज्ञान देतां येईल. मानवजातीचे महागुरु त्यांनाच होता येईल. तेच फक्त प्रकाशाचे सत्ताधारी आहेत.''

असले महात्मे ज्या देशांत अधिक निर्माण होतील, तो देश अधिक वरच्या पायरीवर जाईल. असले महात्मे ज्या देशांत मुळींच नाहींत, त्या देशाचें नशीब ठरलेलें! कोणच्याही गोष्टींत त्याला वाचविण्याचें सामर्थ्य नाहीं. म्हणून, मनुष्यजातीला माझ्या गुरुदेवांचा निरोप आहे. 'आध्यात्मिक व्हा; आणि स्वतः सत्याचा अनुभव घ्या.' आपण आपल्या बांधवाकरितां स्वतःच त्याग करावा हें त्यांना हवे आहे. बंधूप्रीतीबद्दल नुसतें बोलण्याचें थांबवून आपण एकदम आपले शब्द सिद्ध करावयाला लागावे हें त्याना हवे आहे. त्यागाचा, प्रत्यक्ष प्रतीतीचा काल आलेला आहे. तें केल्यावर तुम्हाला सर्व धर्मांतली एक वाक्यता दिसून येईल; आणि मगच

तुम्ही मनुष्य जातीला मदत करावयाला योग्य व्हाल. सर्व धर्मांच्या मूळाशीं असलेली एकवाक्यता विशद करणें आणि जगाला जाहिर करणें, हेंच माझ्यागुरुदेवांचें अवतार कृत्य होतें. इतर धर्मवीरांनीं त्यांच्या त्यांच्या नांवांनीं प्रसिद्ध असलेले धर्म स्थापले; पण ह्या एकोणिसाव्या शतकांतल्या महागुरूनें त्याला आपलें नांव देतां यावें म्हणून कोणचाही नवीन धर्म काढला नाहीं. त्यांनीं प्रत्येक धर्म जशाच्या तसाच ठेवला. कारण सर्व धर्म एकाच सनातन धर्माचे अवयव आहेत, हें तत्व त्यांनींच खरोखर अनुभविलें होतें.

---

# देवदूत ख्रिस्त.

महासागरावर लाट उठते आणि पुनः तेथें पोकळी होते. पुनः कदाचित् पहिल्यापेक्षां मोठीच दुसरी लाट उठते, पुनः ती पडते. ह्याप्रमाणें पुनः उठाव होतो—आणि प्रवाह पुढेंच जातो. येथील घडामोडींच्या मार्गक्रमणामध्येंही आपल्याला हा उदय आणि अस्त, उन्नति आणि अवनति दिसते; आणि अस्त अगर अवनति विसरून जाऊन आपण फक्त उदयाकडे, उन्नतीकडे पहातों. पण हीं दोन्हींही अवश्य आहेत, दोन्हींही महत्वाचीं आहेत. विश्वाचा हा धर्म आहे. आपल्या विचारांच्या जगांत असो, आपल्या समाजांतील संबंधाच्या जगांत असो, अगर आपल्या आध्यात्मिक बाबतींत असो; ही परस्परानुवर्तत्वाची, ही उदयास्ताची चळवळ एकसारखी चालली आहे. म्हणूनच कालाच्या संक्रमणांतल्या मोठमोठाल्या गोष्टी, उदारध्येयें,—तीं चांगली पचनीं पडावीं म्हणून, तीं चांगलीं चघळलीं जावीं म्हणून, परिस्थितीला अनुरूप अशीं तीं बनावीं म्हणून, त्यांच्यांत टिकण्याची चिकाटी यावी म्हणून, उन्नतीकरितां आणि मोठ्या उन्नतीकरितां त्यांना सामर्थ्य मिळवितां यावें म्हणून,—पुनः बुडण्याकरतांच कीं काय पुढें ढकललीं जातात.



देवदूत खिस्त.

राष्ट्रांचा इतिहाससुद्धां नेहमीं अशाच तऱ्हेचा आहे. आज ज्याच्या चारित्र्याचा आपल्याला विचार करावयाचा आहे, तो देवदूत, तो महात्मा, त्याच्या जातीच्या इतिहासांतल्या ज्या कालाला आपल्याला मोठ्या अवनतीचा काल म्हणतां येईल, अशा कालीं जन्माला आला. त्याच्याबद्दल जी कांहीं थोडीशी माहिती मिळते, तीवरून त्याच्या वचनांची आणि कार्यांची मधून मधून थोडीशी चुणुक आपल्या दृष्टीस पडते. कारण, महात्म्यांचीं वचनें आणि कृत्यें सर्वच जर लिहून ठेवलीं गेलीं असतीं, तर त्यांनीं हें जग भरून गेलें असतें, असें जें म्हणतात तें अगदीं बरोबर आहे. आणि महात्मा येशूच्या धर्मोपदेशाचीं तीन वर्षें म्हणजे, कोंबून भरलेलें, केंद्रीभूत झाललें संपूर्ण युग आहे. त्याचा आविष्कार व्हावयाला, त्यांच्यांतलें कार्य स्पष्ट व्हावयाला आज एकोणवीसशें वर्षें लागलीं; आणि देवाला माहिती आणखीही किती लागतील तीं! तुमच्या माझ्या सारखीं क्षुद्र मनुष्यें म्हटलीं म्हणजे त्यांच्यांत तेज, कर्तृत्वशक्ति अत्यल्प असते. ती सर्व खर्च करावयाला, जणूं काय ती पूर्णपणें लांबच लांब पसरावयाला, थोडीं मिनिटें, थोडे तास, फारच झालें तर थोडीं वर्षें पुरीं होतात आणि मग आपण कायमचेच नाहींसे होतों. पण ह्या अवतरलेल्या महा पुरूषाकडे लक्ष्य द्या. शतकें आणि युगें गेलीं; तरी त्यानें जगांत जी कर्तृत्व शक्ति ठेवली, जें तेज ठेवलें, तें अजूनही आविष्कृत झालें नाहीं, अजूनही पूर्णपणें खर्च झालें नाहीं. जसजशीं युगें लोटतात, तसतसा त्याला अधिकाधिकच जोर मिळत आहे.

महात्मा ख्रिस्ताच्या जीवनामध्यें जें कांहीं तुम्हाला दिसतें तें सर्व भूतकालाचें जीवन आहे. प्रत्येक मनुष्याचें जीवन म्हणजे, एका दृष्टीनें भूतकालाचें जीवन आहे. त्याच्या कुलाचा भूतकाल, अनुवंशिकत्वांतून, भोंवतालच्या परिस्थितींतून, शिक्षणांतून, त्याच्या स्वतःच्या पुनर्जन्मांतून त्याच्याकडे येतो. ह्या पृथ्वीचा भूतकाल, संपूर्ण विश्वाचा भूतकाल, एका दृष्टीनें प्रत्येक आत्म्यावर मुद्रित झालेला आहे. आज जे आपण आहोंत ते काय आहोंत? अनंत भूतकालाच्या हातांतला एक परिणाम, एक कार्य आहोंत.

घडामोडींच्या अखंड प्रवाहांतल्या, अप्रतिहततेनें पुढें आणि मागें ढकलल्या जाणाऱ्या, विसांवा घ्यावयाला असमर्थ असलेल्या वीचितरंगाशिवाय आपण काय आहोंत? पण तुम्ही आणि मी म्हणजे अगदीं क्षुद्र गोष्टी, नुसते बुड-बुडे आहोंत. कार्याच्या महासागरांत नेहमींच कांहीं प्रचंड लाटा उठलेल्या असतात. तुमच्यांत आणि माझ्यांत आपल्या वंशाच्या भूतकालाचें जीवन अत्यल्प प्रमाणांत भरलेलें असतें; पण असे कांहीं महापुरुष आहेत कीं, त्यांच्यांत बहुतेक सगळा भूतकाल सांठविलेला असतो! आणि भविष्यका-ळालाही कवटाळावयाला त्यांनीं आपलें हात पसरलेले असतात. हे महा-पुरुष म्हणजे मानव्याची प्रगति दाखविणारे, मधून मधून रोंवलेले मार्ग-दर्शक स्तंभ आहेत. ते खरोखर राक्षसी आहेत. त्याच्या सांवलीनें सर्व पृथ्वी आक्रमिली आहे. ते अमृत, अनंत असे उभे आहेत! ह्याच देवदूतानें म्हटल्याप्रमाणें 'कोणाही मनुष्याला, केव्हांही, ईश्वराच्या पुत्राशिवाय अन्यत्र कोठें ईश्वर दिसलेला नाहीं.' हें खरें आहे. आणि ईश्वराच्या मुलाशिवाय दुसऱ्या कोठें आपण ईश्वराला पहाणार! हें खरें आहे कीं, तुमच्यांत आणि माझ्यांत आपल्यापैकीं अगदीं दारिद्र्यांत, अगदीं नीचांतसुद्धां ईश्वर भर-लेला आहे; आपण त्याचीं प्रतिबिंबें आहोंत. तेजाचें स्फुरण सर्वभर होत असतें, तें सर्वगत आहे; पण आपल्याला तें तेज पहातां यावें म्हणून आधीं दिवा पेटवावा लागतो. पृथ्वीवरल्या ह्या राक्षसी दिव्यांच्या, ह्या धर्मोपदे-शकांच्या, ह्या मानवी देवांच्या, ह्या अवतारांच्या, ह्या देहधारी ईश्वरांच्या—प्रकाशानें स्पष्ट झाल्याशिवाय तो विश्वांत सर्वभर भरलेला परमेश्वर दिसूं शकत नाहीं.

आपल्याला सर्वांना माहिती आहे कीं, देव आहे; तरी पण तो आपल्याला दिसत नाहीं, आपल्याला तो कळत नाहीं. प्रकाश घेऊन येणाऱ्या ह्या महान् देवदूतांपैकीं कोणचाही एक घ्या; ईश्वराबद्दल अगदीं जगाच्या आरंभापासून आजपर्यंत जी कांहीं उच्चतम कल्पना आपण केली असेल, त्या कल्पनेशीं त्याच्या प्रत्यक्ष चारित्र्याची तुलना करा; म्हणजे तुम्हाला असेंच आढळून येईल कीं, तुमचा देव ह्या ध्येयाला कमी पडतो. ह्या धर्मसंस्था-

पकांचें चारित्र्य तुमच्या कल्पनाशक्तीच्या आटोक्याच्या बाहेरचें आहे. ह्या प्रत्यक्ष देहभृतांनीं वस्तुतः जें जीवन घालविलें आणि जें उदाहरणीय म्हणून आपल्यापुढें ठेविलें, त्याच्याहून ईश्वराबद्दलची अधिक उच्च कल्पना-सुद्धां आपल्याला करतां यावयाची नाहीं. तेव्हां ह्यांची ईश्वर म्हणून पूजा करणें चुकीचें आहे काय? ह्या मनुष्य देह धारण केलेल्या देवांच्या पायां-वर लोटांगण घेऊन, ह्या जगांत तेच केवळ दिव्य आत्मे असें त्यांना मानणें हें पाप आहे काय? वस्तुतः ईश्वराबद्दल ज्या कांहीं आपल्या कल्पना आहेत, त्यांच्याही वरच्या दर्जाचे ते जर खरोखर आहेत, तर त्यांची पूजा करण्यांत काय नुकसान? त्यांत कांहीं नुकसान नाहीं. इतकेंच नाहीं, तर पूजेचा प्रत्यक्ष आणि शक्य असा एवढाच मार्ग आहे. झगडे झगडून, केवळ विचारांच्या जगांत जाऊन, तुम्हाला जो मार्ग आवडेल त्या मार्गानें, तुम्ही कितीही प्रयत्न केला, तरी जोंपर्यंत ह्या मनुष्याच्या जगांतलें एक मनुष्यच तुम्ही आहांत, तोंपर्यंत तुमचें विश्व मानवी, तुमचा धर्म मानवी, आणि तुमचा परमेश्वरही मानवीच असणार. तें तसेंच असलें पाहिजे. ज्याची आपल्याला स्पष्ट कल्पनाही करितां येत नाहीं, आणि एकाद्या प्रत्यक्ष मध्यवर्ति वस्तूच्या साहाय्याशिवाय ज्याच्याजवळ पोंचणें कठिण, असें फक्त विचारांत रहाणारें, ध्येय टाकून देऊन, प्रत्यक्ष अस्तित्वांत असलेल्या वस्तूचा स्वीकार करणार नाहीं, असा व्यवहारशून्य कोण असणार? म्हणूनच सर्व युगांत आणि सर्व देशांत ईश्वराचे हे अवतार पूजले गेले आहेत.

ज्यू लोकांतल्या एका अवताराच्या, महात्मा ख्रिस्ताच्या जीवनाचा आपल्याला आज थोडासा विचार करावयाचा आहे. जेव्हां ख्रिस्ताचा जन्म झाला, तेव्हां ज्यू लोक ज्या स्थितीला मी दोन उन्नत लाटांच्या मधलीं अवनत पोकळी म्हणतों, त्या स्थितींत होते. पूर्वपरंपरेला अगदीं चिकटून राहण्याचा तो काल होता. जेव्हां मनुष्याचें मन त्या वेळेपुरतें तरी जसें कांहीं पुढें जाण्याला अगदीं कंटाळून जें पूर्वीच मिळविलेलें आहे, त्याची काळजी घेत असतें, तेव्हांचा तो काळ होता. जेव्हां जीवनाच्या महत्वांच्या; सर्वसाधारण, मोठमोठ्या अशा नव्या प्रश्नांकडे लक्ष्य लागण्या-

ऐवजीं पूर्वींच सोडविलेल्या प्रश्नांच्या अंगोपांगाकडे, बारिकसारिक गोष्टीं-कडेच तें अधिक लागलेलें असतें, त्यावेळचा तो काळ होता. पुढें मार्ग आक्रमिण्याच्या ऐवजीं त्यावेळीं प्रगति अगदीं खुंटली होती. करण्यापेक्षां होऊं देण्याचा तो काल होता. त्या परिस्थितीला मी दोष देत नाहीं, हें आपल्या लक्ष्यांत असूं द्यावें. तिच्यावर टीका करण्याचा आपल्याला काडीचाही अधिकार नाहीं. कारण असें जर सगळें झालें नसतें, तर नाझा-रीथच्या येशूमध्यें सस्वरूप झालेला, त्याच्या रूपानें दृग्गोचर झालेला पुढचा उदय अशक्य झाला असता. ज्यू लोकांपैकीं कर्मठ फॅरिसी किंवा उद्धट आणि संशयवादी सॅडयूसी हे आपले विधि अगदीं मनापासून करीत असतील; ज्या गोष्टी ते करीत असतील, कदाचित् ते ढोंगीसुद्धां असतील; पण–ते कसे कां असेनात–हें अगदीं खरें कीं, ज्या कारण समुच्चयाचें ह्या देवदूताचें आगमन हें कार्य होतें, त्याचे तेच घटकावयव होते. एका टोंकाला असलेल्या फॅरिसी आणि सॅडयूसी यांच्याच योगानें बसलेला धक्का दुसऱ्या टोंकाला नाझरीथच्या येशूच्या विलक्षण डोक्याच्या स्वरूपांत दिसला.

दररोजच्या धर्म कृत्यांतल्या बारिक सारिक गोष्टी, रूढ पद्धति, ठराविक नमुने, नेहमींचे विधि यांच्याकडे लक्ष्य देणें कधीं कधीं हास्यास्पद समजत असतील, पण तरीही त्यांच्यामध्यें शक्ति आहे. बऱ्याच वेळां पुढें जाण्यांत आपली पुष्कळ शक्ति खर्चीं पडते. धार्मिक बाबतींत उदार मताच्या अस-लेल्या मनुष्यापेक्षां धर्मवेडा हा अधिक सामर्थ्यवान् असतो, ही सत्य गोष्ट आहे. तेव्हां धर्मवेड्यामध्येंसुद्धां एक मोठा गुण असतो. तो कर्तृत्वशक्तीचा फारच मोठा सांठा राखून ठेवतो. जशी ही व्यक्तीची गोष्ट झाली, तशी संबंध जातीची गोष्ट असते. तीही तसाच राखून ठेवण्याकरितां कर्तृत्व-शक्तिचा, स्फुरणशक्तिचा संग्रह करते. बाह्य शत्रूंमुळें सर्व बाजूंनीं कोंडली गेलेली; रोमन लोकांमुळें, बौद्धिक जगांत रूढ होत चाललेल्या ग्रीक विचारप्रचारामुळें, इराण, अलेक्झान्ड्रिया, हिंदुस्थान वगैरेकडून येणाऱ्या लाटांमुळें मध्यवर्ति केन्द्राकडे हांकलून दिली गेलेली; मनानें, शरीरानें, नीतीनें; सर्वच दृष्टीनें खुंटली गेलेली; ज्यूची सबंध जात, त्यांच्या वंश-

जांतून अजूनही नाहींशा न झालेल्या, आंतर, संकलित, प्रचंड अंशा आपल्यांतल्या शक्तीनें उभी होती. त्या जातीला आपली सर्व स्फुरणशक्ति जेरुसलेम आणि ज्यू धर्म ह्यांच्या ठिकाणीं सांठवून ठेवावी लागली, केन्द्रीभूत करावी लागली. आणि जगांतल्या सर्व शक्तींच्या धर्माप्रमाणें एकदां जमा झाल्यावर तिला तसेंच एके ठिकाणीं राहतां येईना. तिचा व्यय झाला पाहिजे, तिचा विस्तार झाला पाहिजे. पृथ्वीवर अशी एकही शक्ति नाहीं, कीं, जी बराच वेळपर्यंत आकुंचित मर्यादेंत कोंडून ठेवतां येईल. पुढील काळांत ती विस्तार पावावी म्हणून ती पुष्कळ वेळपर्यंत दाबून ठेवतां येणार नाहीं.

ज्यू वंशामध्यें केन्द्रीभूत झालेली ही स्फुरणशक्ति, पुढच्या काळांत ख्रिस्तिधर्माच्या उदयाच्या रूपानें प्रकट झाली. साठलेल्या निरनिराळ्या प्रवाहांचा एक मोठा प्रवाह झाला. हळू हळू सर्व लहान प्रवाह एकत्र होऊन त्यांची प्रचंड लाट बनली आणि तिच्या शिखरावर नाझारीथचा येशू उभा असलेला जगाला दिसला. अशा रीतीनें कोणचाही धर्म संस्थापक त्याच्या वेळच्या कालानें बनलेला असतो; त्याच्या वंशाच्या भूतकालानें बनलेला असतो; आणि तो स्वत: भविष्यकाळाचा उत्पादक असतो. आजची वस्तु भूतकाळचें कार्य आहे आणि भविष्यकाळाचें कारण आहे. देवदूत ह्या स्थितींत असतो. त्याच्या वंशांत जें जें कांहीं उत्तम असतें, जें जें कांहीं महत्वाचें असतें त्याची तो प्रतिमा असतो. ज्या मानवी वंशांत त्याचा जन्म झाला, तो वंश युगानुयुगें ज्याच्याकरितां झगडत असतो, तें जीवन, तो अर्थ त्याच्यांत भरलेला असतो; आणि तो स्वतः भविष्यकाळाला स्फूर्ति देतो; आणि ती स्फूर्ति केवळ त्याच्याच वंशाला नाहीं, तर जगांतल्या दुसऱ्या असंख्य वंशांना दिलेली असते.

दुसरी ही गोष्ट आपल्याला लक्ष्यांत ठेवली पाहिजे. ह्या नाझारीथच्या महा धर्मसंस्थापकाविषयींचे माझे विचार पूर्वेच्या दृष्टीनें असणार. तसेंच पुष्कळ वेळां तुम्ही हेंही विसरतां कीं, स्वतः नाझारीथसुद्धां पौरस्त्यांतला पौरस्त्य होता. नील नेत्र आणि पिंगट केंस देऊन त्याला रंगविण्याचा

तुम्ही कितीही प्रयत्न केला, तरी तो पौरस्त्य होता. त्याच कल्पनांत, दृष्टान्तांत आणि उपमांत बायबल लिहिलेलें आहे. बायबलामध्यें असलेले देखावे, स्थलें, मनःप्रवृत्ति, जनसमाज, काव्य, प्रतिमा; ते सर्व कांहीं आपल्याला पूर्वेचा बोध करून देतात. त्यांत वर्णिलेलें तें निरभ्र आकाश, ती उष्णता, तो सूर्य, तीं रेताड मैदानें, तृषाक्रान्त झालेले मनुष्य आणि इतर प्राणी, विहिरीवरून भरून नेण्याकरितां डोक्यावर घट घेऊन येणारीं तीं स्त्रीपुरुषें, ते जनावरांचे कळप, ते नांगर हाके, सभोंवती चाललेली ती लागवड, त्या पाणचक्क्या, तीं रहाट गाडग्गीं, तीं तळीं, तीं दळण्याचीं जातीं, हीं सर्व कांहीं आज आशियांत दृष्टोत्पतीस येतात.

आशियाचें स्वीकृत काय म्हणजे धर्म आहे. युरोपचें स्वीकृत कार्य म्हणजे राजकारण आहे. आपापल्या परीनें दोन्हींही महत्वाची आहेत. युरोपची आजची शिकवण म्हणजे जुन्या ग्रीसची शिकवण आहे. ग्रीक विचारांनीं भरलेल्या मनाला त्याच्या लगतचा समाज म्हणजे त्याचें सर्व कांहीं आलें. त्याच्या पलीकडे सर्व रानटीपणा. ग्रीकाशिवाय दुसऱ्या कोणालाही जगण्याचा अधिकार नाहीं. ग्रीक जें जें करतो तें सर्व न्याय्य, अगदीं बरोबर. त्याशिवाय दुसरें जर कांहीं जगांत असलें, तर तें सर्व अन्याय्य, सर्व चुकीचें; जगांत तें तसेंच चालूं देतां कामा नये. ग्रीक विचारांत उत्कट ऐहिकता, उत्कट सृष्टिपरता व म्हणूनच उत्कठ कृत्रिमता आहे. ग्रीक पुर्णपणें ह्याच लोकांत राहतो. कल्पनेच्या भराऱ्यांची तो पर्वा करीत नाहीं. त्याचें काव्यसुद्धां अगदीं व्यवहारमय. त्याचे देव आणि देवता म्हणजे नुसते मनुष्यप्राणीच नाहींत, तर त्यांच्यांत मनुष्याचे गुणदोषही उत्कटतेनें वास करीत आहेत. आपल्यामध्यें ज्याप्रमाणें असतात त्याप्रमाणेंच बहुतेक त्यांच्यांत मानवी मनोविकार आणि भाव पूर्ण भरलेलें आहेत. जें जें सुंदर आहे, त्याच्याबद्दल ग्रीकाला प्रेम वाटतें. पण हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे कीं, ती सुंदर वस्तु बाह्य निसर्गापैकींच नेहमीं असावयाची. टेंकड्यामधलें, हिमसंहतींतलें, फुलांतलें सौंदर्य; निरनिराळ्या रचनेंतलें आणि आकारांतलें सौंदर्य; मानवी चेहऱ्यांतलें सौंदर्य आणि ह्याहूनही ज्यास्त

वेळा म्हणजे मानवी आकृतींतलें सौंदर्य. ग्रीक लोकांना जें कांहीं आवडे तें हें. आणि त्यांच्या नंतरच्या यूरोपच्या विचाराच्या दिशेचे उपदेशक आणि प्रवर्तक ग्रीकच असल्यामुळें युरोपचा मंत्र म्हणजे ग्रीसचाच मंत्र होय.

आशियामध्यें विचाराची दिशा अगदीं निराळी. ज्यांचीं उत्तुंग शृंगें मेघमंडळाला भेदून आकाशाच्या नील वितानाचें जणूं चुंबनच घेत आहेत अशा पर्वतश्रेणी, जेथें गवताची एक काडीही उगवत नाहीं आणि पाण्याचा एक थेंबही आढळत नाहीं, असें कोसच्या कोस पसरलेलें वालुकामय मैदान, जीं कधीं संपतच नाहींत अशीं अरण्यें आणि समुद्रांत उड्या घेणाऱ्या महा नद्या यांनीं युक्त असें तें विस्तीर्ण महा खंड आपल्या डोळयापुढें आणा. ह्या सर्व भोंवतालीं पसरलेल्या परिस्थितींत, भव्यावरचें आणि सौंदर्यावरचें पौरस्त्यांचें प्रेम स्वाभाविकच निराळया दिशेनें परिणत झालें. त्यानें बहिर्मुखता टाकून ते अंतर्मुख झालें. निसर्गाची आवड तेथेंही आहे; सत्तेची तीच आकांक्षा तेथेंही आहे; श्रेष्ठत्वाची तितकीच तहान तेथेंही लागलेली आहे; ग्रीक आणि बार्बेरिअन, आर्य आणि दस्यु ही कल्पना तेथेंही आहे. पण त्यांची मर्यादा बरीच विस्तृत झालेली आहे. आशियांत आजसुद्धां जन्म, वर्ण, अगर भाषा यांनीं मुळींच जात निर्माण होत नाहीं; जात जर कशानें उत्पन्न होत असेल, तर ती धर्मानें. आम्ही सर्व खिस्ती म्हणजे एक; आम्ही सर्व मुसलमान म्हणजे एक; आम्ही सर्व हिंदू म्हणजे एक; आम्ही सर्व बौद्ध म्हणजे एक; मग तो बौद्ध चिनी मनुष्य असो अगर तो इराणमध्यें राहत असो,—आपण ज्या अर्थी तोच धर्म पाळतो त्या अर्थी तो आपला भाऊ असें त्यांना वाटतें. सबंध मनुष्य-जातीला एकें ठिकाणीं बांधणारें बंधन म्हणजे धर्म आहे. आणि तशांत पुनः ह्याच कारणामुळें पौरस्त्य हा भासांत जगणारा, कल्पनेंत रमणारा आहे. प्रपातावरचे वीचितरंग, पक्षांचीं गाणीं, सूर्य, चंद्र, तारे, आणि ही सर्व पृथ्वी यांच्यांतली रम्यता हीं अगदीं प्रसन्न करणारीं आहेत; पण पौरस्त्य मनाला इतकीच पुरीं होत नाहींत. त्यांच्या पलीकडचें स्वप्न अनु-भवावयाला त्याला पाहिजे आहे. वर्तमानाला पार ओलांडून त्याला जाव-

याचें आहे. जगूं काय वर्तमान म्हणजे त्याला कांहींच नाहीं. आज युगानुयुगें पूर्व ही ज्या पाळण्यांत मानवी वंश वाढला, तो पाळणा झालेली आहे. तेथें वैभवाचे सर्व प्रकार आहेत. राज्या मागून राज्यें उत्पन्न होत आहेत. साम्राज्यांच्या जागीं साम्राज्यें उभारलीं जात आहेत; मानवी सत्ता, वैभव, संपत्ति, सर्वांचें संक्रमण तेथें होत आहे. सत्ता आणि शहाणपण यांचें समाधिस्थानच तें. पूर्व ही सत्ता, राज्यें, विद्वत्ता, ह्यांची एक समाधीच आहे. तेव्हां पौरस्त्य मत ह्या जगांतल्या वस्तूंकडे तिरस्कारानें पहातें ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. साहजिकच जें विकाररहित आहे, जें मरत नाहीं, दुःख आणि मृत्यु यांनींच जिकडे तिकडे जग भरलें असतांना जे अनंत आहे, जें कल्याणमय आहे, जें अमृत आहे, असें कांहीं त्याला पाहिजे आहे. पौरस्त्य धर्मसंस्थापकांना ह्या प्रातव्यावर जोर द्यावयाचा कधींच कंटाळा येत नाहीं. आणि आपल्या लक्ष्यांत असेलच कीं, एक उदाहरण सोडून दिलें, तर ह्या महा धर्मसंस्थापकांपैकीं बाकीचे सगळे पौरस्त्य आहेत.

तेव्हां 'जगण्या'चा निरोप घेऊन येणाऱ्या ह्या देवदूताच्या जीवनांत आपल्याला पहिलें तत्व हें आढळतें कीं, "हें जीवन नाहीं; तर, ह्याच्या पलिकडचें कांहीं तरी आहे." आणि पूर्वेच्या खऱ्या पुत्राप्रमाणें त्यानें तें व्यवहारांत, कृतींत उतरविलें. तुम्ही पश्चिमेकडली मंडळी तुमच्या तुमच्या विषयांत,–युद्धसंबंधीं बाबतींत तसेंच राजकीय संघ अगर दुसऱ्या तशाच गोष्टींत–कृतिपूर्ण आहांत. कदाचित् पौरस्त्याला ह्या गोष्टी व्यवहार्य करतां येत नसतील; पण त्याच्या त्याच्या क्षेत्रांत तो कृतिपूर्ण आहे; धर्म त्याला अगदीं व्यवहार्य झालेला आहे. त्यांतल्या गोष्टी त्याला नुसत्या मनानें उत्कृष्टतेनें जाणतां येतात किंवा त्यांचा वाणीनें सम्यक् ऊहापोह करतां येतो असें नाहीं, तर त्याला त्या हातांनीं करून दाखवितां येतात. जर त्यानें तत्वज्ञान उपदेशिलें, तर उद्यां हजारो आपल्या ह्या आयुष्यांतच तें कृतींत उतरवण्याकरतां शक्य तितकें झगडतील. जर एकाद्यानें उपदेश केला कीं, एका पायावर उभें राहिल्यानें मनुष्य मोक्षाला जाऊन पोहोंचतो,

तर लागलींच त्याला एका पायावर उभें रहावयाला तयार असणारे पांचशे लोक भेटतील. तुम्ही ह्याला हवेंतर हास्यास्पद म्हणा; पण लक्ष्यांत ठेवा कीं, ह्याच्या मूळाशीं त्यांचें तत्वज्ञान–कल्पना व्यवहारांत–कृतींत उतरवावयाची त्यांची उत्कट प्रवृत्ति आहे. पश्चिमेकडे, मोक्षमार्गाची तत्वें म्हणजे, नुसत्या बुद्धीला तालीम देणाऱ्या, ज्या कधींही कृतींत आल्या नाहींत, ज्या कधींही आयुष्यांतल्या व्यवहारांत दिसल्या नाहींत, अशा गोष्टी आहेत. पाश्चात्यांत ज्या धर्मोपदेशकाला सर्वांत चांगलें बोलतां येईल, तो सर्वांत श्रेष्ठ धर्मोपदेशक!

तेव्हां पहिल्यानें आपल्याला हें दिसतें कीं, नाझारीथचा येशू हा पूर्वेचा खरा पुत्र होता. तो पराकाष्ठेचा कृतिपूर्ण होता. हें नाहींसें होणारें जग आणि त्यांतल्याच इतर गोष्टी ह्यावर त्याचा मुळींच विश्वास नव्हता. ह्या काळांत पश्चिमेला जशी संवय लागली आहे, त्याप्रमाणें पुस्तकांना पिळून त्यांच्यांतून अर्थ काढण्याची, आतां ह्याच्या पलिकडे ओढाताण होणें शक्य नाहीं, इतकी पुस्तकांची ओढाताण करण्याची, कांहीं जरूरी नाहीं. धर्मपुस्तकें म्हणजे कांहीं रबर नाहींत. आणि त्या रबराच्या ताणलें जाण्यालासुद्धां मर्यादा असतेच. आतां, ह्या युगांतल्या आपल्या मोठेपणाच्या कल्पनांना उत्तेजित करण्यासाठीं, पुष्टी देण्यासाठीं, धर्मावलंबन नको! हें पहा, आपण सगळे विश्वासू होऊं या; ढोंगासोंगांना अगदीं रजा देऊं या. आपलें जें ध्येय आहे त्याला जर आपल्याला बरोबर अनुसरतां येत नसलें, तर आपण आपली अक्षमता कबूल करणें चांगलें. त्या ध्येयालाच खालीं ओढणें निंद्य. तेव्हां त्यालाच खालीं ओढण्याचा हा प्रयत्न कोणीही करूं नये. पाश्चात्य लोक ख्रिस्ताच्या चरित्राच्या ज्या निरनिराळ्या हकीगती सांगतात त्या ऐकून जीव अगदीं कंटाळून जातो. तो कसा होता किंवा तो कसा नव्हता हें कांहींच माझ्या लक्ष्यांत येत नाहीं! एक उठतो आणि त्याला मोटा राजकारणपटु बनवतो, तर दुसरा त्याला लढवय्या सेनापति करतो आणि तिसऱ्याला तो एक महादेशभक्त ज्यू दिसतो. अशा किती तरी तऱ्हा. ह्या अशा कल्पना धरून चालावयाला मूळ पुस्तकांत कांहीं आधार आहे का? श्रेष्ठ धर्मोपदेशकांच्या चरित्रावर सर्वोत्कृष्ट टीका म्हणजे त्यांनीं प्रत्यक्ष

घालविलेलें जीवनच. "कोल्ह्यांना रहावयाला मोठालीं बिळें किंवा गुहा असतात, हवेंतल्या पक्षांना घरटीं असतात; पण मनुष्यप्राण्याला सुरक्षिततेनें आपलें डोकें टेकतां येईल असें स्थान नाहीं." ख्रिस्त म्हणतो, मोक्ष मिळविण्याचा एवढाच मार्ग आहे. तो दुसरा कोणचाही मार्ग सांगत नाहीं. आपण अगदीं प्रांजलपणानें कबूल करूं या कीं, तसें करण्याची आपल्यांत शक्ति नाहीं. अजून आपल्याला 'मी' आणि 'माझें' याची आवड आहे. आपल्याला मालमत्ता, पैसा, धन पाहिजे! धिक्कार असो आपल्याला! चला आपण आपल्यांतले दोष तरी कबूल करूं या! मनुष्यजातीच्या त्या गुरुश्रेष्ठाला लज्जास्पदता आणण्याचा तरी नीच मार्ग नको! त्याला कौटुंबिक बंधनें मुळींच नव्हतीं. त्या पुरुषांत एकादा तरी जडविषयक विचार किंवा ऐहिक कल्पना असेल, असें आपल्याला वाटतें का? हा तेजाचा गोळा, ज्यांच्यांतून मनुष्यत्व गेलें आहे, अशांचा हा देव; पशूंचा सहचारी बंधू व्हावयाला या जगांत आला, असें तुम्हाला वाटतें का? आणि तरीही, लोक त्याला सर्व तऱ्हेचा उपदेश करावयाला लावतात. पुरुष स्त्री ह्या कल्पनाच त्याच्यांत मुळीं नव्हत्या! तो केवळ आत्मा होता! मनुष्यजातीच्या कल्याणाकरतांच देहाकडून काम करवून घेणारा तो आत्मा होता; दुसरें कांहींही नव्हता. त्याचा शरीराशीं संबंध म्हणजे एवढाच. आत्म्याला मुळींच लिंग नाहीं. शरीरापासून अलिप्त झालेल्या केवलात्म्याचा प्राणांशीं कांहीं संबंध नाहीं आणि देहाशींही कांहीं संबंध नाहीं. हें ध्येय आपल्या शक्तीच्या फार पलिकडचें असेल; पण कांहीं हरकत नाहीं. ध्येयाला चिकटून रहा. आपण प्रांजलपणानें कबूल करूं या कीं, हें आमचें ध्येय आहे; पण अजून आम्ही तें गांठण्याला असमर्थ आहोंत.

त्याच्या आयुष्यांत त्याला कोणचाही धंदा नव्हता; त्याला कोणचाही विचार नव्हता. 'मी आत्मा आहे' एवढाच एक त्याला विचार होता. देहाच्या पिंजऱ्यांतून सुटलेला, विशृंखल, बंधन रहित असा तो आत्मा होता. आणि इतकेंच नाहीं, तर त्यानें आपल्या विलक्षण अंतर्ज्ञानानें जाणलें होतें कीं, प्रत्येक पुरुष आणि स्त्री, मग तीं ज्यू असोत किंवा

त्यांच्याहून इतर धर्माचीं असोत, श्रीमंत असोत वा गरीब असोत, साधु असोत वा पातकी असोत, त्याच्याचसारखीं त्या अमर्त्य आत्म्याचीं स्वरूपें आहेत. म्हणून त्याच्या सर्व जीवनांत जे एक कार्य दिसतें, तें त्यांना, आपलें आध्यात्मिक स्वरूप जाणावयाला, त्याची प्रतीति घ्यावयाला बोलावणें हें दिसतें. तो म्हणतो आपण नीच आहोंत, आपण गरीब आहोंत, असे हे असद्धर्ममूलक स्वप्नांतले विचार टाकून द्या. गुलामासारखा आपल्यावर जुलुम चालला आहे, आपण पायाखालीं तुडवलें जातों आहों, असें वाटूं देऊं नका. कारण तुमच्या आंत असें कांहीं आहे कीं, त्याच्यावर केव्हांही जुलुम करतां यावयाचा नाहीं. ते केव्हांही पायाखालीं तुडवलें जावयाचें नाहीं. त्याला कधींही त्रास देतां यावयाचा नाहीं, त्याचा कधींही वध करतां यावयाचा नाहीं. तुम्ही सर्व ईश्वराचे पुत्र, अमर्त्य आत्मे आहांत. तो उपदेश करतो, "स्वर्गांतलें राज्य तुमच्यांत भरलेलें आहे, हें जाणून घ्या." "मी आणि माझा बाप आम्ही एकच आहोंत." नुसतें "मी ईश्वराचा मुलगा आहे" इतकेंच नाहीं, तर माझ्या अंत:करणांतल्या अंत:करणांत मला असें पटलेलें आहे कीं, "मी आणि माझा बाप आम्ही एकच आहोंत." असे उभें राहून सांगण्याचें धैर्य तुमच्यांत आहे का? नाझारीथच येशु असे म्हणाला. हें जग आणि हे जीवन ह्याबद्दल तो कधींच बोलत नाहीं. त्याला त्याच्याशीं कांहींच करावयाचें नाहीं. जर त्याला त्याच्याशीं कांहीं करावयाचें असेल, तर इतकेंच कीं, जसें आहे तसें जग घ्यावयाचें; त्याला एक धक्का द्यावयाचा; आणि ईश्वराच्या प्रखर तेजांत सगळेंच्या सगळें जग मिळेपर्यंत, प्रत्येकाला आपल्या आध्यात्मिक स्वरूपाची प्रतीति होईपर्यंत, मरणावर विजय संपादीपर्यंत, आणि दु:ख हद्दपार होईपर्यंत, त्याला पुढें पुढेंच ढकलावयाचें.

त्याच्याबद्दल ज्या निरनिराळया गोष्टी लिहिल्या आहेत, त्या आपण वाचल्या आहेत. ते बुद्धिवान लेखक, त्यांचे ते लेख, आणि त्यांच्या त्या उच्च दर्जाच्या टीका आपल्याला माहिती आहेत. आणि त्यांच्यावरच्या अभ्यासानें प्रचलित झालेल्या सर्व गोष्टीही आपल्याला माहित आहेत.

नव्या करारांतला किती भाग खरा आहे, ह्यावर वाद करावयाला आपण येथें जमलों नाहीं, किंवा त्याच्या चरित्रांतलें ऐतिहासिक किती आहे, यावरही वाद करावयाला आपण येथें जमलों नाहीं. नवा करार येशुच्या जन्मदिवसापासून पांचशें वर्षांच्या आत लिहिला होता कीं नाहीं, या चर्चेंत मुळींच महत्व नाहीं; तसेंच त्याचें चरित्र तरी किती खरें आहे, हें पाहण्यांत सुद्धां अगदीं महत्व नाहीं. त्या चरित्राच्या मागें, त्याच्या मुळाशीं, कांहीं तरी—आपल्याला ज्याचें अनुकरण करावेंसें वाटतें असें कांहीं तरी—आहे. खोटें सांगावयाला, खोटें अगदीं बरोबर पटवून द्यावयाला, तुम्हाला सत्याचा अनुवाद करावा लागतो; आणि तें सत्य म्हणजे खरीच गोष्ट असतें. जें कधींही अस्तित्वांत आलेलें नाहीं, त्याचें तुम्हाला अनुकरण करणें शक्य नाहीं; जें कधींही तुमच्या लक्ष्यांत आलें नाहीं, त्याचें तुम्हाला अनुकरण करणें शक्य नाहीं. तेव्हां त्या चरित्रांत आध्यात्मिक तेजाचें थक्क करून सोडणारें प्रकट स्वरूप, खालीं उतरलेली प्रचंड शक्ति, असें आधारभूत कांहीं तरी असलेंच पाहिजे. आणि आपण आज त्याच्याच विषयीं बोलत आहों. तें तेथें स्पष्ट आहे. म्हणून आम्हाला विद्वानांच्या टीकेची, चर्चेची मुळींच भीति वाटत नाहीं. जर मला नाझारीथच्या येशुला पौरस्त्याप्रमाणें भजावयाचें असलें, तर मला एकच मार्ग मोकळा आहे. तो मार्ग म्हणजे त्याला ईश्वराप्रमाणें—आणि अगदीं ईश्वराप्रमाणेंच, दुसऱ्या कशाप्रमाणेंही नाहीं—पूजावयाचें. आम्हाला त्याप्रमाणें त्याला पूजावयाचा हक्क नाहीं, असा का तुमच्या म्हणण्याचा उद्देश आहे? जर त्याला आपल्या दर्जाला आणून, एकाद्या मोठ्या पुरुषाला देतात त्याप्रमाणें केवळ थोडासा मान द्यावयाचा असला, तर मुळीं त्याला भजावयाचेंच कारण काय? आमचे धर्मग्रंथ सांगतात "त्या तेजाचीं हीं श्रेष्ठ मुलें, त्या तेजाचें प्रकटस्वरूप आहेत;—नाहीं प्रत्यक्ष तें तेजच आहेत.—जर त्यांचीं पूजा केली, तर तीं जशीं कांहीं आपल्याशीं एकच होऊन जातात आणि आपणही त्यांच्याशीं एक होऊन जातों."

कारण, हे पहा, मनुष्य तीन तऱ्हांनीं ईश्वराला पहातो. पहिल्यानें अशिक्षित, असंस्कृत मनुष्याच्या अपरिपक्क बुद्धीला देव फार दूर, उंच, आकाशांत कोठें तरी, मोठ्या न्यायाधिशासारखा, आपल्या अन्यायांचे निवाडे निवडीत, सिंहासनावर बसलेला दिसतो. त्याला तो अग्नीसारखा भयोत्पादक असा वाटतो. आतां, हें चांगलें आहे. कारण त्यांत वाईट असें कांहींच नाहीं. तुम्हाला हें नेहमीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, मानव्याचा मार्ग असत्यापासून सत्याला जात नाहीं, तर एका सत्यापासन पलिकडच्या दुसऱ्या सत्याला जातो. तुम्हाला जर तसें म्हणणें अधिक बरोबर वाटत असेल, तर असें म्हणतां येईल कीं, तो खालच्या दर्जाच्या सत्यापासून वरच्या दर्जाच्या सत्याकडे जातो. तुम्ही येथून निघालांत आणि अगदीं सरळ रेषेंत सूर्याकडे चालला आहांत, अशी कल्पना करा. येथून सूर्य आकारानें अगदीं लहान दिसतो. कल्पना करा कीं, तुम्ही दहा लाख मल त्याच्याकडे गेलांत म्हणजे सूर्य मग किती तरी मोठा दिसेल ! जसजसें ८ जाल, त्याप्रमाणें सूर्य अधिकाधिक मोठा होत जाईल. समजा कीं तुमच्या ह्या प्रवासांतल्या निरनिराळ्या मुक्कामापासून सूर्याचे वीस हजार फोटोग्राफ घेतलें आहेत. हे वीस हजार फोटोग्राफ सगळे एकमेकांहून भिन्न असणारच ; पण त्यांपैकीं प्रत्येक एकाच सूर्याचा फोटोग्राफ आहे, हें तुम्हाला नाकबूल करतां येईल काय ? तशींच धर्मांचीं सर्व स्वरूपें—मग तीं उन्नत असोत वा अवनत असोत,—म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराच्या अनंत तेजोमय स्थितींत जावयाच्या निरनिराळ्या पायऱ्या आहेत. कांहींमध्यें खालच्या दर्जाचें स्वरूप प्रतिबिंबित झालें आहे, कांहींमध्यें वरच्या दर्जाचें झालें आहे. हाच काय तो त्यांच्यातला फरक. तेव्हां जगांतल्या कोणत्याही भागांतल्या विचारहीन मनुष्याचा धर्म म्हणजे, जगाच्या बाहेर असणाऱ्या, स्वर्गांत राहणाऱ्या, तेथून संपूर्ण विश्वावर सत्ता चालविणाऱ्या, वाईटाला शिक्षा करणाऱ्या आणि चांगल्याला बक्षिस देणाऱ्या, अशा देवाचा धर्म होय. जसजशी माणसाची आध्यात्मिक उन्नति होत गेली, तसतसें त्याला भासूं लागलें कीं, ईश्वर हा सर्वगत आहे, तो आपल्यांत असला पाहिजे, तो

प्रत्येक ठिकाणीं असला पाहिजे, तो कोणी दूरचा देव नाहीं, तर सर्व आत्म्यांचा आत्मा आहे. ज्याप्रमाणें माझा आत्मा माझ्या देहाला चालन देतो, त्याप्रमाणें ईश्वर माझ्या आत्म्याला चालन देतो. तो आत्म्याला आत्मा, अंतरात्मा आहे. आणि, ज्यांची तितकी परिणति झाली होती आणि जे तितके शुद्ध होते, असे थोडे माहात्मे याच्याही पुढें गेले आणि अखेरीस त्यांनीं ईश्वर शोधून काढला. कारण नव्या करारांत सांगितलें आहे, "ज्यांचें अंतःकरण शुद्ध आहे, ते भाग्यशाली आहेत. कारण त्यांना देवाचें दर्शन होईलच." आणि त्यांना अखेरीस आढळलें कीं, ते आणि त्यांचा पिता हे एकच आहेत.

ह्या तिन्हीही पायऱ्या त्या महाधर्मोपदेशकानें नव्या करारांत शिकविल्या आहेत. 'स्वर्गांत असणाऱ्या आमच्या बापा, तुझें नांव महनीय असो,' ही त्यानें शिकविलेली 'सामान्य प्रार्थना' आणि अशाच दुसऱ्या प्रार्थना ह्या नीट लक्ष्यांत घ्या. किती साधी ही प्रार्थना! अगदीं लहान मुलां योग्य. हिचें नांव 'सामान्य प्रार्थना' आहे, इकडे नीट लक्ष्य द्या. कारण ती असंस्कृत, अशिक्षित जनसमूहाकरतां आहे. वरच्या वर्गांतल्या मंडळींना, ह्याच्यापुढें जरासें गेलेल्या मंडळींना, त्यानें ह्याहून जरा उच्च उपदेश केला. "मी माझ्या बापांत आहे आणि तरीही, माझ्यांतही आहे आणि तुमच्यांतही आहे." तुम्हाला हें आठवतें ना! आणि मग, जेव्हां ज्यू लोकांनीं विचारलें कीं, 'तूं कोण आहेस?' तेव्हां त्यानें प्रतिपादलें कीं, "मी आणि माझा बाप एकच आहोंत." ज्यूंना वाटलें कीं, हें पाखंड आहे, ही ईश्वराची निंदा आहे. त्याच्या त्या सांगण्याचा अर्थ काय? तुमच्या जुन्या धर्मसंस्थापकांनीं सुद्धां हेंच सांगितलें आहे. "तुम्ही देव आहां. तुमच्यापैकीं सगळे त्या परात्पराचीं लेंकरें आहेत." त्याच तीन पायऱ्या येथेंही कशा सापडतात, इकडे नीट लक्ष्य द्या. तुम्हाला आढळून येईल कीं, पहिलीपासून आरंभ करून तिसरीमध्यें शेवट करणें, हें आपल्याला अधिक सोपें आहे.

हा देवदूत मार्ग दाखविण्याकरितां आला. दृश्य वस्तूंत, बाह्याकारांत कांहीं ब्रह्म नाहीं. तत्वज्ञानाच्या कंटाळवाण्या आणि कूट सिद्धांच्याद्वारा कांहीं तुम्हाला ब्रह्मज्ञान व्हावयाचें नाहीं. तुमच्यांत मुळींच विद्वत्ता नसणें हें अधिक चांगलें. तुमच्या सगळया आयुष्यांत तुम्ही मुळींच पुस्तक वाचलें नसलें, तर तें फार चांगलें. मोक्ष मिळविण्याला ह्यांची मुळींच जरूरी नाहीं. संपत्ति नको; सत्ता नको; सामर्थ्य नको; विद्वत्तासुद्धां नको; अगदीं आवश्यक आहे अशी एकच गोष्ट. शुद्धता पाहिजे. "अंतःकरणानें शुद्ध असलेले धन्य आहेत." कारण, ब्रह्म आपल्या मूळ स्वरूपांत शुद्ध आहे आणि शुद्धाव्यतिरिक्त अन्य कांहीं तें कसें असूं शकेल? तें ईश्वराचें स्वरूप आहे. ईश्वरापासून त्याचा उगम आहे. बायबलच्या शब्दांत सांगावयाचें तर "तें ईश्वराचा श्वास आहे." कुराणाच्या शब्दांत सांगावयाचें असलें तर "तें ईश्वराचा आत्मा आहे." तुम्हाला असें वाटतें कां? कीं, ईश्वराचें तें तेज कधीं तरी अशुद्ध असूं शकेल! पण दुःखाची गोष्ट आहे कीं, आपल्याच चांगल्या अगर वाईट कृतींच्या योगानें, युगांच्या धुळीनें आणि घाणीनें तें तेज आच्छादून गेलें आहे! ज्यांची दिशा बरोबर नव्हती किंवा जीं स्वतःच सत्य नव्हतीं अशा नाना कार्यांनीं तेंच तेज युगानुयुगांच्या अज्ञानाच्या धुळीनें आणि घाणीनें भरून टाकलें आहे! ती धूळ, ती घाण काढून टाकण्याची फक्त आवश्यकता आहे. मग लागलींच तें चकाकेल. "अंतःकरणानें शुद्ध असलेले धन्य आहेत, कारण त्यांना ईश्वर दिसेलच." "स्वर्गाचें राज्य तुझ्यांत आहे." नाझारीथचा येशू विचारतो, देव-लोक धुंडाळावयाला तूं कोठें चाललास? तो तर येथें तुझ्यांतच आहे? त्या तेजावरचा केर झाडून टाक. तें तिथेंच आहे. तें केव्हांचें तुझेंच आहे. जें तुझें नाहीं तें तुला कसें मिळेल? तें तेज अगदीं हक्कानें तुझें आहे. तुम्ही अमृतत्वाचे वारस आहांत; अनंत पित्याचीं लेकरें आहांत.

त्या देवदूतानें उपदेशिलेलें हें एक महत्तत्व आहे. आणि सर्व धर्मांना आधारभूत असलेलें दुसरें महत्तत्व म्हणजे त्याग. आपल्याला तें आत्मतेज शुद्ध कसें करतां येईल? त्यागानें. एका श्रीमान् तरुणानें येशूला विचारलें, "महाराज, अनंत जीवनाची मला प्राप्ति होण्याकरितां मी काय करूं?" येशूनें त्याला उत्तर दिलें, 'एका गोष्टीची तुझ्यांत उणीव आहे. आपल्या मार्गानें जा; जें कांहीं तुझ्याजवळ आहे तें सगळें विक; आणि आलेलें मूल्य गरिबांना देऊन टाक. मग स्वर्गातले खजिनें तुला मिळतील. मग ये, आपला क्रॉस हातांत घे आणि माझ्या पाठीमागें चल." तें सांगणें ऐकून त्याला खेद वाटला आणि दुःखी मुद्रेनें तो परत गेला; कारण त्याच्याजवळ विपुल संपत्ति होती. कमी अधिक प्रमाणानें आपण सारे असेंच आहोंत. तो नाद रात्रंदिवस आपल्या कानांत घुमतो आहे. आपल्या सुखाच्या आणि आनंदाच्या भरांत, ह्या ऐहिक गोष्टींत रमलों असतांना, दुसरें सगळें कांहीं आपण विसरून गेलों आहों असें आपल्याला वाटतें, तों एक क्षण भर स्तब्धता उत्पन्न होते आणि आपल्या कर्णरंध्रांत एक ध्वनि घुमतो. "तुझ्याजवळचें सर्वस्व देऊन टाक; त्याचा त्याग कर; तें दिनांना वाटून दे. आणि माझ्या पाठीमागें ये." तो ज्याचा उपदेश करतो तें हें एक ध्येय आहे आणि जगांतल्या सर्व धर्मसंस्थापकश्रेष्ठांनीं हेंच ध्येय उपदेशिलें आहे. **त्याग.** ह्या त्यागाचा अर्थ काय? नीतीमध्यें एकच प्राप्तव्य आहे. निःस्वार्थता. स्वार्थरहित व्हा. नितांत निःस्वार्थता हें ध्येय आहे. माणसाच्या उजव्या गालावर जर कोणी मारलें, तर त्यानें डावा गाल पुढें करावा. जर त्याचा आंगरखा कोणी नेला, तर त्यानें आपलें उपरणेंही देऊन टाकावें.

आपल्या शक्य त्या सर्वांत चांगल्या मार्गानें आपण प्रयत्न करावा. तें ध्येय खालीं ओढतां कामा नये. हें तें ध्येय आहे. ज्या मनुष्यामध्यें आतां मुळींच स्वार्थ राहिला नाहीं, ज्याच्याजवळ मालमत्ता उरली नाहीं, ज्याला 'मी' किंवा 'माझें' म्हणतां येईल असें त्याच्यापाशीं कांहींच नाहीं, ज्यानें आपल्याला अगदा पूर्णपणें देऊन टाकलें, जणूं काय आपल्याला नाहींसेंच केलें, तो मनुष्य म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर. कारण त्याच्यांतली

स्वार्थेच्छा नाहींशी झाली आहे, अगदीं चिरडून गेली आहे, निर्मूल झाली आहे. तोच ध्येय-भूत मनुष्य. हल्लींच आपल्याला त्या स्थितीला जातां यावयाचें नाहीं. आतां आपण त्या ध्येयाला भजूं, आणि जरी आपले पाय अडखळले तरी हळूहळू त्याला जाउन पोहोंचण्याकरतां झगडूं. उद्यां असो का हजार वर्षांनीं असो; पण त्या ध्येयाला जाऊन पोहोंचलेंच पाहिजे. कारण तें नुसतें साध्य नाहीं, तर साधनही आहे. निःस्वार्थ, पूर्ण आत्मरहित होणें, हीच मुक्ति आहे. कारण मग आंतला 'मनुष्य' नाहींसा होतो; आणि केवळ परमेश्वर राहतो.

आणखी एक मुद्दा, मानव्याचें सर्व शिक्षक अगदीं स्वार्थरहित असतात. नाझारीथचा येशू उपदेश करतो आहे, अशी कल्पना करा. इतक्यांत एक मनुष्य तेथें आला आणि त्यानें सांगितलें, "आपण जें शिकवता तें फार सुंदर आहे, पूर्णतेला जाण्याचा हाच मार्ग आहे, असा माझा विश्वास आहे; आणि त्या मार्गानें जावयाला मी तयार आहें; पण आपणच फक्त ईश्वराच्यापासून प्रत्यक्ष उत्पन्न झालेले असे त्याचे पुत्र आहांत, अशा भावनेनें आपल्याला भजावयाला मला नको आहे." ह्याला नाझारीथच्या येशूनें काय उत्तर दिलें असतें? "ठीक आहे. तुझ्या मार्गानें तूं खुषाल जा. ध्येयाच्या मागें गेलास म्हणजे झालें. हें शिक्षण देण्याचा मान तूं मला देतो आहेस का नाहींस याच्याशीं मला कांहीं करावयाचें नाहीं. मी कांहीं दुकान मांडलेलें नाहीं. मी कांहीं धर्माचा व्यापार करीत नाहीं. मी फक्त सत्तत्वें शिकवितों. आणि सत्तत्वांवर 'माझीं' म्हणून कोणाचाच हक्क नाहीं. सत्याचा मक्ता कांहीं कोणाला घेतां यावयाचा नाहीं. सत्य म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर. पुढें मार्ग आक्रमण कर." पण आज ह्या महात्म्याची शिष्यशाखा काय म्हणते? "तुम्ही त्याच्या उपदेशाप्रमाणें आचरतां का नाहीं, याचें कांहीं मोठेंसें महत्व नाहीं. त्या माहात्म्याला तुम्ही मानतां का नाहीं? जर येशूला तुम्ही मानीत असाल तर तुम्ही बचावलेत; पण जर तुम्ही त्याला मानीत नसला, तर मग तुम्हाला मोक्ष नाहीं." अशा रीतीनें त्या धर्मसंस्थापकाचा सर्व उपदेश दूषित केला गेला आहे,

खालच्या पायरीवर आणला गेलेला आहे; आणि सर्व वाद आणि झगडा जो कांहीं चालला आहे तो त्या धर्मसंस्थापकाच्या व्यक्तीकरतां चाललेला आहे. त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं कीं, हा जो भेद त्यांनीं उत्पन्न केला आहे त्यानें त्यांना ज्याला मान द्यावयाचा आहे, त्याच पुरुषाला एका दृष्टीनें ते लाज आणीत आहेत. तो पुरुष ही कल्पना लज्जास्पद वाटून तीपासून दूर पळाला असता. जो त्याला स्मरतो असा जगांत एक तरी पुरुष आहे कीं, नाहीं, याच्याशीं त्याला काय करावयाचें होतें? त्याला ईश्वराचा नियोग, निरोप, पोहोंचवावयाचा होता; आणि त्यानें तो पोहोंचवलाही. आणि जर त्याला वीस हजार प्राण असते, तर त्यानें ते सारे जगांतल्या अगदीं गरीब माणसाकरतां अर्पण केले असते. तुच्छ मानलेल्या लाख सॅमॅरिटन्स करतां जर लाखो वेळां त्याचा छळ झाला असता आणि त्या प्रत्येकाकरतां त्याच्या जीविताचा बळी हीच केवळ जर मुक्तीची अट असती, तर त्यानें त्यासाठीं आपलें जीवित अर्पण केलें असतें. आणि हें सगळें, आपलें नांव एका तरी मनुष्याला कळावें इतकीसुद्धां इच्छा न धरितां केलें असतें. ईश्वर जसा शांत, न कळत, न बोलतां हा जगाचा गाडा चालवितो, त्याप्रमाणें त्यानें काम केलें असतें. आतां, त्याचा शिष्य काय म्हणेल? तो तुम्हांला सांगेल कीं, 'तुम्हीं पूर्णतेला जाऊन पोहोंचाल, अगदीं स्वार्थरहित व्हाल, पण ह्या सर्वांचें श्रेय जर तुम्ही आपल्या धर्मसंस्थापकाला, आपल्या साधूला दिलें नाहीं, तर त्याचा कांहींही उपयोग नाहीं' कां? ह्या अज्ञानाचें, ह्या धर्मखुळाचें मूळ कशांत आहे? शिष्याला वाटतें ईश्वर फक्त एकदांच अवतार घेतो. सगळी जी चूक आहे ती ह्याच्यांत आहे. तुमच्यासाठीं ईश्वर मनुष्यांत सगुण होतो; पण निसर्गात जिकडेतिकडे जें एकदां होतें, तें पूर्वीही झालेंच असलें पाहिजे आणि पुढेंही होणारच. जें नियमानें बद्ध नाहीं, असें निसर्गात कांहींही नाहीं. आणि ह्याचा अर्थ असा कीं, जें कांहीं घडतें आहे, तें असेंच घडत राहील आणि असेंच घडत असलें पाहिजे.

आर्यावर्तांत ईश्वराच्या अवतारांसंबंधानें हीच कल्पना आहे. त्यांच्या महा अवतारांपैकीं श्रीकृष्ण हे एक अवतार आहेत. त्यांचें तें भव्य धर्म-व्याख्यान, भगवद्गीता तुमच्यापैकीं कांहींनीं वाचली असेल. ते सांगतात,

अजोपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ १ ॥
यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ २ ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ३ ॥

"मला जरी जन्म नाहीं, मी विकाररहित आहें, सर्व प्राणिमात्रांचा ईश्वर आहें तरी माझ्या प्रकृतीचा निरोध करून माझ्या मायेने मी जन्म घेतों. जेव्हां सद्गुण कमी होत जातात आणि अनीति जिकडे तिकडे माजते, तेव्हां मी देह धारण करतों. सज्जनांचें रक्षण करण्याकरितां आणि दुष्टांचा नाश करण्याकरतां; तसेंच धर्माचें संस्थापन करण्याकरितां मी प्रत्येक युगांत अवतार घेतों." जेव्हां जगाचें अधःपतन होऊं लागतें, तेव्हां परमेश्वर त्याला वर उचलून धरण्याकरितां अवतरतो. अशा तऱ्हेनें भिन्न भिन्न काळीं आणि भिन्न भिन्न स्थळीं तो अवतार घेतो. दुसऱ्या एका श्लोकांत ते सांगतात,

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव च ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥ १ ॥

"जेव्हां जेव्हां सामर्थ्यवान् आणि शुद्ध महात्मा ह्या मानव्याला वर उचलावयाचा प्रयत्न करतांना तुम्हाला आढळेल, तेव्हां तेव्हां तो माझ्या तेजापासून उत्पन्न झालेला आहे, मी त्याच्याद्वारां कार्य करतों, आहें हें लक्ष्यांत ठेवा."

तेव्हां, फक्त नाझारीथच्या येशूमध्येंच नाहीं, तर त्याच्या पूर्वी ज्या विभूति निर्माण झाल्या, त्याच्या नंतर ज्या निर्माण झाल्या, आणि अजू-

नही ज्या निर्माण व्हावयाच्या आहेत, त्या सर्वांमध्यें आपल्याला ईश्वर दिसला पाहिजे. आपली भक्ति मर्यादित किंवा बद्ध नसली पाहिजे. ते सगळेच त्या अनंत परमेश्वराचे अवतार आहेत. ते सगळेच स्वार्थरहित आणि शुचि आहेत. त्यांनीं प्रयत्न केला आणि स्वत:चें जीवित आपल्या-सारख्या क्षुद्र प्राण्यांकरतां अर्पण केलें. ते सगळे, त्यांच्यापैकीं प्रत्येक आप-ल्यापैकीं प्रत्येकाच्या, आणि अजून जे जन्माला यावयाचे आहेत, त्या सर्वांच्या सुद्धां पापक्षालनाकरतां कष्ट भोगीत आहेत.

एका अर्थानें तुम्ही सारेच धर्मसंस्थापक आहां. तुमच्यापैकीं प्रत्येकजण धर्मसंस्थापक आहे. आणि त्याच्या खांद्यावर सगळ्या जगाचें ओझें आहे. शांतपणानें धिम्मेपणानें आपल्या लहान जीविताचें ओझें सहन करीत नाहीं, असा एक तरी पुरुष, एक तरी स्त्री, तुम्ही पाहिली आहे का? त्या मोठ्या धर्मसंस्थापकांचें सामर्थ्य प्रचंड होतें. त्यांनीं सगळ्याच राक्षसी जगाचें ओझें आपल्या खांद्यावर घेतलें. त्यांच्याशीं तुलना केली, तर आपण अगदीं क्षुद्र आहोंत यांत कांहीं शंका नाहीं; तरी आपणसुद्धां तेंच काम करतों आहों. आपल्या मर्यादित मंडळांत, आपल्या लहानशा घरांत, आपण आपले लहानसे क्रॉस उचलले आहेत. आपण कितीही चुका केल्या कितीही पापी विचार केले किंवा दुष्ट कृत्यें केलीं, तरी आपल्यामध्यें कोठें तरी त्या तेजाचा अंश आहे, कोठें तरी, आपल्याला निरंतर त्या दिव्याशीं सांधणारा सोनेरी धागा आहे. कारण, ह्याबद्दल खात्री असू द्या कीं, ज्या क्षणीं त्या दिव्याशीं असलेला तुमचा संबंध तुटेल, त्या क्षणींच पूर्ण निर्मूलन होईल. आणि ज्या अर्थी कशाचाच पूर्ण नाश करणें शक्य नाहीं, त्या अर्थीं, आपण कितीही नीच असलों, आपला कितीही अध:पात झाला असला, तरी आपल्या अंत:करणांतल्या अंत:करणांत कोठें तरी असें एक लहान तेजो-मंडळ आहेच आहे, कीं, तें त्या दिव्याशीं निरंतर सांधलें गेलेलें आहे.

आजपर्यंत झालेल्या सर्व धर्मसंस्थापकांना आमचा प्रणाम असो. त्यांचा उपदेश आणि त्यांचें जीवन आपल्याला प्राप्त झालेलें आहे. त्यांची जात, त्यांचा देश, त्यांचा पंथ कोणचा का असेना.

मनुष्य जातीला सहाय्य करणाऱ्या त्या सर्व ईश्वरी पुरुषांना आणि स्त्रियांना आमचे प्रणाम असोत. त्यांचा जन्म कोणच्याही कुळांत झालेला असो; त्यांचा वर्ण कोणचाही असो; त्यांची जात कोणचीही असो.

ह्याच्यापुढें, आमच्या वंशजांसाठीं निःस्वार्थ कार्य करावयाला येणाऱ्या त्या जीवंत देवांना आमचे प्रणाम असोत.

---

# जगाचे महागुरु.

विश्वाच्या प्रगमनाबद्दल आर्यांची उपपत्ति अशी आहे. तें मंडलें घेत पुढें चाललें आहे. आणि तीं मंडलें सुद्धां मध्य बिंदूपासून कोठेंही समांतर असलेल्या एकसारख्या वक्र रेषेनें घेत नाहीं, तर लाटां सारख्या उन्नतावनत रेषेनें घेतें. तें वर वर जातें, अगदीं सर्वांत उंच बिंदूला जाऊन पोहोंचतें; मग खालीं पडतें आणि जणूं काय कांहीं काळपर्यंत त्या खाचेंत राहतें. ह्या नीच स्थितींत सुद्धां पुनः उन्नत होण्याकरितांच तें जातें, आणि अशाच तऱ्हेनें, लाटांवर लाटा आणि पतनावर पतनें घेत तें पुढें मार्ग आक्रमण करित असतें. संपूर्ण विश्वाच्या बाबतींत जें सत्य आहे, तें त्याच्या प्रत्येक अंशाच्या बाबतींतही सत्य आहे. मनुष्यसंबंधीं गोष्टींचें प्रगमन ह्याच नियमानुसार होतें, राष्ट्रांचें प्रगमनही ह्याच नियमानुसार होतें, तीं उदय पावतात आणि त्यांचा अस्त होतो. तीं वर जातात आणि पुनः खालीं येतात. उत्पतनाच्या पाठीमागून पतन होतें, आणि पतनाच्या पाठीमागून पुनः मोठ्या जोराचें उत्पतन होतें. ही गति एकसारखी चालली आहे. धार्मिक जगांत हेंच चलन दृष्टीस पडतें. प्रत्येक राष्ट्राच्या धार्मिक जीवनांत जसा एक उदयाचा काल असतो त्याप्रमाणें एक अस्ताचाही काळ असतो. राष्ट्र अधोगत होतें; आणि असें वाटतें कीं, प्रत्येक वस्तु निर्मूल होतें आहे! पण इतक्यांत त्याच्यांत शक्ति उत्पन्न होतें, आणि त्याचा अभ्युदय होतो. एक प्रचंड लाट येते–कधीं कधीं ती भरतीची राक्षसी लाट असते; आणि प्रत्येक वेळीं त्या लाटेच्या मस्तकावरच्या तुऱ्यावर एक महात्मा प्रकाशत

असतो; देवदूत खालीं येतो! तो स्वतः उत्पादकही असतो आणि उत्पन्न केलेली वस्तूही असतो. ज्या धक्याच्या योगानें ती लाट उठते, तें राष्ट्र वर चढतें, त्या धक्याचें तो कारण असतो; आणि त्याच वेळीं, ज्या शक्तींच्या योगानें ती लाट बनलेली असते त्याच शक्तींच्या योगानें तो स्वतः निर्माण होतो. ह्याप्रमाणें हा दुसऱ्यावर परिणाम करतो आणि दुसऱ्याचा ह्याच्या-वर परिणाम होत असतो. आपली प्रचंड शक्ति समाजाकडे तो खर्ची घालतो; आणि समाज त्याला तो आहे तसा करीत असतो. हे सर्व जगाचा विचार करणारे महात्मे असतात; हे जगाचे धर्मसंस्थापक होत; हे ईश्वरा-कडून जीवनाचा निरोप घेऊन येतात. हे ईश्वराचे अवतार होत.

मनुष्याची कल्पना अशी आहे कीं, जगांत फक्त एकच धर्म असूं शकेल, तो धर्म देणारा एकच धर्मसंस्थापक असूं शकेल आणि ईश्वराचा अवतारही एकच असूं शकेल; पण ही कल्पना खरी नाहीं. ह्या सर्व देव-दूतांच्या जीवनचरित्रांचें सूक्ष्म निरीक्षण केलें, म्हणजे आपल्याला असें आढळतें कीं, ह्यांच्यापैकीं प्रत्येकाचा जन्मच मुळीं ह्या कार्याचा एक आणि एकच भाग अंगावर घेऊन पार पाडण्याकरितां झाला होता. सर्वांच्या कार्याच्या बेरजेंत, संपूर्णता, सुयंत्रता, एकतानता आहे; प्रत्येक भागांत नाहीं. निरनिराळया मानवी वंशाच्या बाबतींतही असेंच आहे. सर्व जगाचा एकटीनेंच उपभोग घेण्याकरतां कोणचीच जात निर्माण झाली नाहीं. कोणाचीही असें म्हणण्याची छाती नाहीं. राष्ट्रांच्या ह्या स्वर्गीय एकतानतेंत प्रत्येक वंशाला आपला आपला भाग उरकावयाचा आहे. प्रत्येक जातीला एक स्वतंत्र कार्य करावयाचें आहे, कर्तव्य पार पाडावयाचें आहे. ह्या सर्वांच्या बेरजेनें ती भव्य एकतानता,-ती सर्वांगिक परिपूर्णता-बनते.

तेव्हां या धर्मसंस्थापकांपैकीं कोणींच ह्या जगावर आपल्या विचारांचें चिरंतन राज्य चालवावयाला आलेला नाहीं. अजूनपर्यंत ह्या बाबतींत कोणालाही यश आलें नाहीं आणि ह्या पुढेंही कोणी चिरकाल हें राज्यपद भोगणार नाहीं. प्रत्येकजण एकेक अंग पुरवितो. आणि त्याच अंगाविषयीं

विचार केला तर, हें खरें आहे कीं, अखेरीस प्रत्येक धर्मसंस्थापक जगावर आणि त्याच्या भवितव्यावर आपलें स्वामित्व चालवील.

आपल्यापैकीं बहुतेकांची जन्मतःच अशी श्रद्धा आहे कीं, धर्म हा जगाला कोणा तरी पुरुषाच्या द्वाराच मिळावयाचा. आपण तत्वाची चर्चा करतों, प्रमेयांबद्दल विचार करतों, येथपर्यंत सर्व ठीक आहे; पण प्रत्येक विचार आणि प्रत्येक हालचाल, आपल्या कृत्यांपैकीं प्रत्येक कृत्य, असें दाखवितें कीं, कोणचेंही तत्व, जेव्हां तें एकाद्या पुरुषाकडून आपल्याला मिळतें, तेव्हांच आपल्याला कळणें शक्य आहे. जेव्हां एकादी कल्पना, एकाद्या देहधारी, ध्येयभूत, पुरुषाकडून आपल्याला मिळते, तेव्हांच ती आपल्याला ग्रहण करतां येते. प्रत्यक्ष उदाहरणानेंच आपल्याला धर्माज्ञांचा बोध होतो. ईश्वरानें आपल्यापैकीं सर्वांचीच जर इतकी परिणति केली असती कीं, आपल्याला दृष्टान्ताची जरूर पडली नसती, आपल्याला कोणा मधल्या पुरुषाची गरज लागली नसती, तर किती बरें झालें असतें? पण आपण कांहीं तसें नाहीं. आणि मग स्वाभाविकच, मनुष्यजातीपैकीं बहुतेकांनीं आपलें आत्मे ह्या विलक्षण पुरुषांच्या, ह्या धर्मसंस्थापकांच्या, ह्या देवाच्या अवतारांच्या—खिस्त्यांनीं, बौद्धांनीं, हिंदूंनीं पूजलेल्या ह्या अवतारांच्या—पायांवर वाहिले.

आरंभापासूनच मुसलमान ह्या असल्या व्यक्तिपूजेच्या विरुद्ध होते. ह्या धर्मसंस्थापकांची, ह्या देवदूतांची पूजा करणें किंवा त्यांना दुसरा कसलाही मान देणें हें त्यांना अगदीं संमत नव्हतें. ह्याच्यापासून ते अगदीं दूर होते; पण वास्तविक एका धर्मसंस्थापकाऐवजीं हजारावर हजार साधु पुरुष भजले जात आहेत! सत्य गोष्टींच्या विरुद्ध जातां यावयाचें नाहीं. विभूतींच्या पूजा करणें, त्यांना भजणें, आपल्याला भाग आहे आणि तें चांगलेंही आहे.

जेव्हां त्या महा धर्मसंस्थापक खिस्ताला विचारलें "भगवान्, आम्हाला त्या पित्याचें दर्शन करून द्या" तेव्हां त्यानें जें उत्तर दिलें तें नीट लक्ष्यांत ठेवा. "ज्यानें मला पाहिलें, त्यानें त्या पित्यालाही पाहिलें आहे." आप-

त्यापैकीं कोणाला ईश्वराची मनुष्यत्वाव्यतिरिक्त कल्पना करतां येते? आपल्याला तो मनुष्यांतच आणि मनुष्याच्याद्वाराच दिसतो. ह्या खोलींत सर्वभरच प्रकाशाच्या लाटा उठत आहेत. मग आपल्याला त्या सर्वभर कां दिसत नाहींत? तुम्हाला त्या फक्त त्या दिव्यांतच दिसतात. ईश्वर हें एक सर्वभर भरलेलें तत्व आहे. पण आज आपण अशा स्थितींत आहोंत कीं, आपल्या तो फक्त मनुष्यरूप देवांतच आणि मनुष्यरूप देवाच्या योगानेंच दिसतो; जाणतां येतो. आणि जेव्हां हे मोठाले तेजोगोल येतात, तेव्हां मनुष्याला ईश्वराचा अनुभव येतो.

आपण येतो त्याहून ते निराळ्या मार्गानें येतात. आपण भिक्षेकरी होऊन येतो; ते सर्वसत्ताधारी होऊन येतात. आपण ह्या जगांत पोरक्या पोरांसारखे येतों; ज्यांचा रस्ता चुकला आहे, आणि आतां त्यांना तो कोठें सापडत नाहीं, अशा लोकांसारखे येतों. आतां आपण कसें करावयाचें, आपल्या जीवनांचा अर्थ काय, हें आपल्याला कळत नाहीं. तो आपल्याला अनुभवितां येत नाहीं. आज आपण एक गोष्ट करतों, उद्या दुसरीच करतों. पाण्यांत इकडून तिकडे झोंके घेणाऱ्या गवताच्या काडीसारखी आपली अवस्था असते. वावटळींत सांपडलेल्या पिसासारखी आपली गत होते. पण मनुष्यजातीच्या इतिहासांत तुम्हाला असें आढळून येईल कीं, हे देवदूत येतात, आणि त्यांच्या अगदीं जन्मापासून त्यांचें कार्य ज्ञात आणि निश्चित असतें. त्यांचा सर्व मसुदा त्यांच्यापुढें पसरलेला असतो आणि त्यापासून एक तसूभरसुद्धां ते ढळत नाहींत असें आपल्याला आढळून येतें. आणि ज्या अर्थी ते एक विशिष्ट कार्यक्रम घेऊन जन्माला येतात, त्या अर्थी ते ईश्वरी आज्ञाही बरोबर घेऊन येतात. वादविवाद, चर्चा करावयाला त्यांना नको असते. हे मोठे शिक्षक, हे धर्मगुरु, त्यांनीं जें शिकविलें त्यावर वादविवाद करीत असत, तें अनुमानादि प्रमाणानीं सिद्ध करीत बसत असत, असें तुम्हीं कधीं ऐकलें किंवा वाचलें आहे काय? नाहीं. त्यांच्यापैकीं एकानेंही असें केलें नाहीं. ते एकदम तत्व सांगतात. त्यांनीं तें अनुमानादि प्रमाणांनीं तें सिद्ध करावयाच्या भानगडींत कां पडावें? तें सत्य

त्यांना प्रत्यक्ष दिसत असतें. आणि नुसतें त्यांना तें सत्य दिसतें इतकेंच नाहीं, तर ते दुसऱ्यांनासुद्धां तें दाखवितात.

तुम्ही मला विचारलेंत कीं, 'ईश्वर आहे का?' आणि मी 'होय; आहे.' म्हणून उत्तर दिलें, तर लागलींच माझ्या ह्या म्हणण्याला आधार काय? म्हणून तुमचा प्रश्न येतो, आणि दुर्बळ अशा मला माझ्या म्हणण्याच्या सिद्धयर्थ कारणें देण्याकरतां माझ्या सर्व शक्ति खर्चाव्या लागतात. जर तुम्ही ख्रिस्ताकडे गेलां असता आणि त्याला विचारलें असतें, "ईश्वर आहे काय?" तर त्यानें उत्तर दिलें असतें कीं, "होय; आहे." आणि मग तुम्ही जर विचारलें असतें कीं, "ह्याला कांहीं आधार?" तर त्यानें सांगितलें असतें "हा पहा देव."

तेव्हां असें दिसतें कीं, त्यांचें ज्ञान हें प्रत्यक्ष ज्ञान असतें. वादविवादानें अनुमानानें काढलेले तर्क नसतात. तेथें अंधारांत चांचपडणें मुळींच नसतें, तर प्रत्यक्ष प्रत्ययाचें सामर्थ्य तेथें चमकतें. मला हें मेज दिसतें आहे. आतां अनुमानादि कितीहि प्रमाणें पुढें आणली, तरी माझ्यांतला हा विश्वास जावयाचा नाहीं. तो प्रत्यक्ष प्रत्यय आहे. असा त्यांचा विश्वास असतो. त्यांच्या ध्येयावर त्यांचा विश्वास असतो; त्यांच्या अवतार कृत्यावर त्यांचा विश्वास असतो; आणि ह्या सर्वांहूनही ज्यास्ती त्यांचा आपल्या स्वतःवर विश्वास असतो. ह्या तेजस्वी आत्म्यांत दुसऱ्या कोणांतही नसेल इतका आत्मविश्वास असतो.

लोक म्हणतात, "तुमचा देवाच्या अस्तित्वावर विश्वास आहे काय? भावी जीवनावर तुमचा विश्वास आहे काय? तुमचा ह्या मतांवर विश्वास आहे, का त्या तत्वावर विश्वास आहे?" पण येथें मुळीं ज्याच्यावर पुढची इमारत उभारावयाची तो पायाच नसतो. तो पाया म्हणजे आपल्या स्वतःवरचा विश्वास. हें पहा! ज्या माणसाला स्वतःवरच विश्वास ठेवतां येत नाहीं, तो दुसऱ्या कशावरही विश्वास ठेवील असें त्यांना कसें वाटतें? माझ्या स्वतःच्याच अस्तित्वाबद्दल मुळीं माझी खात्री नाहीं. एकक्षणीं मला असें वाटतें कीं, "मी आहे आणि माझा नाश करण्याची शक्ति कशांतही

नाहीं;" तोंच दुसऱ्या क्षणीं मरणाच्या भीतीनें मी थरथर कांपत असतों. पहिल्या मिनिटाला मला वाटतें कीं, मी अमर आहे. दुसऱ्याच मिनिटाला माझ्यापुढें पिशाच उभें राहतें आणि मी कोण आहें किंवा मी कोठें आहें हें देखील मी विसरून जातों. मी जिवंत आहे का मेलेला आहे, हें देखील माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. आतां वाटतें कीं, मी अमर्त्य ब्रह्म आहे, मी अगदीं शुद्ध आचरणाचा आहें. तोंच दुसऱ्या क्षणाला एक तडाखा बसतो आणि मी माझ्या पाठीवर आदळतों. असें कां? तर माझ्यावरचा माझा विश्वास नाहींसा झाला आहे—माझा नीतिरूप पाठीचा कणा मोडून गेला आहे.

पण ह्या शिक्षकांमध्यें तुम्हाला ही खूण नेहमीं आढळेल. त्यांचा स्वतः-वर पराकाष्ठेचा विश्वास असतो. असा उत्कट आत्मविश्वास अन्यत्र कोठें आढळत नाहीं. आणि म्हणून आपल्याला त्याची कल्पनाच येत नाहीं. ह्यामुळेंच हे धर्म शिक्षक स्वतः विषयीं जे उद्गार काढतात त्यांचा आपण निर-निराळ्या तऱ्हानीं उलगडा करण्याचा प्रयत्न करतों. तसेंच, लोक त्यांच्या साक्षात्कारांविषयीं त्यांचे जे उद्गार असतात त्याचा उलगडा करावयाला वीस हजार उपपत्ति लावीत बसतात. त्याच दृष्टीनें आपण विचार करीत नाहीं आणि मग स्वाभाविकच आपल्याला कांहीं त्यांच्या गोष्टी जाणतां येत नाहींत.

तसेंच आणखी, जेव्हां ते बोलतात तेव्हां जगाला तिकडे लक्ष्य देणें भाग पडते. जेव्हां ते बोलतात तेव्हां प्रत्येक शब्द 'प्रचीती'चा असतो; तो एकाद्या बॉंब गोळ्यासारखा येऊन आदळतो. पाठीमागें शक्ति अस-ल्याशिवाय शब्दाची किंमत काय? तुम्ही कोणच्या भाषेंत बोलतां किंवा तुम्ही आपल्या भाषेची कशी जुळणी करतां याच्याशीं काय करावयाचें आहे? तुम्ही अगदीं व्याकरण शुद्ध बोलतां अगर अगदीं वक्तृत्वपूर्ण बोलतां याच्याशीं काय करावयाचें आहे? तुमची भाषा अलंकारप्रचुर आहे, का नाहीं याच्याशीं काय करावयाचें आहे? प्रश्न हा आहे कीं, तुमच्या जवळ द्यावयाला त्या योग्यतेचें कांहीं आहे का नाहीं? हा देवघेवीचा, हातानें उचलून द्यावयाचें आणि हातानें घ्यावयाचें असा प्रश्न आहे; नुसत्या

ऐकण्याचा नाहीं. तुमच्या जवळ देण्यालायक कांहीं आहे का? हा पहिला प्रश्न. जर तुमच्याजवळ तसें कांहीं असलें तर द्या. शब्द, फक्त ही देणगी पोहोंचविण्याचें काम करतात; त्यांतल्या पुष्कळ मार्गांपैकीं हा एक मार्ग. कधीं कधीं मुळींच बोलावें लागत नाहीं. एका जुन्या संस्कृत श्लोकांत म्हटलें आहे; "श्रीगुरु एका झाडाखालीं बसलेले मी पाहिलें. ते तरुण, सोळा वर्षांचे होते; आणि शिष्य ऐंशी वर्षांचा म्हातारा होता. श्रीगुरुंचा उपदेश म्हणजे मौन होतें; शिष्याच्या सगळ्या शंका पार पळून गेल्या!"

कधीं कधीं ते मुळींच बोलत नाहींत; पण तरीही सत्यज्ञान ह्या मनांतून त्या मनांत नेऊन पोंचवितात. देण्याकरितांच मुळीं ते जन्माला आले असतात. ते आज्ञा करतात, अंमल चालवितात; ते देवदूत असतात. तुम्हाला ती आज्ञा पाळावी लागते. तुमच्या धर्मग्रंथांत ख्रिस्त किती अधिकारयुक्त वाणीनें बोलतो हे तुम्हाला आठवत नाहीं का? "तेव्हां तुम्ही जा, आणि सर्व राष्ट्रांना शिकवा. ज्या गोष्टी करा म्हणून मी तुम्हाला आज्ञापिलें आहे त्या गोष्टी पाळण्याबद्दल त्यांना सांगा." आपण पोहोंचविलेल्या ईश्वरी निरोपावरचा भयंकर विश्वास हाच त्याच्या सर्व उद्गारांतून खेळत असतो. जग ज्यांना आपले धर्मसंस्थापक म्हणून भजतें त्या ह्या साऱ्या महापुरुषांच्या जीवनांत तोच तुम्हाला आढळून येईल.

हे मोठे धर्मगुरु म्हणजे ह्या पृथ्वीवरचे जिवंत देव आहेत. ह्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाची आपण पूजा अर्चा करणार? मी आपल्या मनांत ईश्वराची कल्पना करावयाचा प्रयत्न करावा तों मला आढळून येतें कीं, कसली असत्य, क्षुद्र गोष्ट माझ्या कल्पनेनें उभी होते! त्या ईश्वराला भजणें हें पाप आहे! मी माझे डोळे उघडतों आणि ह्या पृथ्वीवरच्या महात्म्यांनीं जें प्रत्यक्ष जीवन घालविलें त्याच्याकडे पाहतों. मला ईश्वराबद्दल केव्हांही जी कल्पना करतां येईल तिच्याहून ते किती तरी वरच्या दर्जाचे! कारण, जर कोणी माझ्यापासून कांहीं वस्तु चोरली, तर मी त्या माणसाच्या पाठीमागें लागणार आणि त्याला तुरुंगांत पाठवणार. तेव्हां माझ्यासारख्याला दयेची काय कल्पना करतां येणार? आणि क्षमेचें माझें ध्येय तरी कोणचें

असणार? माझ्या पलिकडचें कांहीं तें नसणारच. तुमच्यापैकीं कोणाला आपल्या देहाच्या बाहेर उडी मारतां येते आहे? तुमच्यापैकीं कोणाला आपल्या मनाच्या बाहेर उडी मारतां येते आहे? एकाला देखील नाहीं. तुम्ही जी प्रत्यक्ष आपल्या जीवनांत अनुभवतां तिच्याशिवाय दिव्य प्रेमाची तुम्हाला काय कल्पना करतां येणार? ज्याचा आपण कधींही अनुभव घेतला नाहीं, त्याची आपल्याला कल्पनाच करतां यावयाची नाहीं. म्हणून ईश्वराची कल्पना करण्याचे माझे सारे उत्तमोत्तम प्रयत्न केव्हांही फसणारच. आणि ह्या उघड सत्य गोष्टी आहेत; कल्पनावडंबर नाहीं. प्रीतीच्या, दयेच्या, शुचित्वाच्या प्रत्यक्ष गोष्टी; त्यांची मात्र मुळींच कल्पना व्हावयाची नाहीं. तेव्हां ह्या पुरुषांचे मी पाय धरावे आणि त्यांची पूजा अर्चा करावी ह्यांत काय नवल? आणि दुसरा तरी कोणी ह्याहून निराळें तें काय करणार? नुसत्या पुष्कळ बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, प्रत्यक्ष जर ह्याहून निराळें कांहीं ज्याला करतां येते आहे, असा कोणी असला, तर त्याला पाहावयाची माझी इच्छा आहे. बोलणें म्हणजे कांहीं प्रत्यक्ष करणें नाहीं. ईश्वर आणि निर्गुण आणि हें आणि तें ह्याबद्दल नुसतें बोलणें फार सोपें; पण हे मनुष्यरूपी देव म्हणजे सर्व राष्ट्रांचें आणि सर्व जातींचे खरोखरीचे परमेश्वर आहेत. हे दिव्य आत्मे आजपर्यंत पूजले गेले आहेत आणि ह्याच्यापुढेंही जोंपर्यंत मनुष्य हा मनुष्यच आहे तोंपर्यंत ते पूजले जाणारच. सत्स्वरूपावरचा आपला विश्वास, सत्स्वरूपाबद्दलची आपली आशा हीं त्यांच्यातच आहेत. नुसतें गूढ तत्व काय उपयोगाचें!

मला जें कांहीं तुम्हांला सांगावयाचें आहे, त्याचें कारण आणि उद्देश हा आहे कीं, माझ्या आयुष्यांत त्या सर्वांना पूज्य मानणें आणि अजूनही पुढें होणाऱ्या सर्वांना पूज्य मानावयाला तयार असणें हें शक्य आहे असें मला आढळून आलें आहे. मुलगा आईपुढें कोणच्याही पोषाखांत जाऊन उभा राहिना, आई त्याला ओळखते आणि जर एकादीला तसें करतां आलें नाहीं, तर मी निश्चयानें सांगेन कीं, ती त्या मुलाची आईच नाहीं. तेव्हां तुमच्यापैकीं ज्यांना असें वाटतें कीं, जगांतल्या फक्त एकाच धर्म-

संस्थापकांत, सत्यता, दिव्यता, ईश्वरता आपल्याला दिसते, दुसऱ्या कोणांत आपल्याला ती दिसत नाहीं त्यांच्याविषयीं साहजिकच मी असें अनुमान काढतों कीं, त्यांना कोणांतलीच दिव्यता कळत नाहीं. त्यांनीं फक्त उपदेशाचे शब्द गिळून टाकले आहेत आणि ज्याप्रमाणें राजकारणांत तुम्ही आपल्या मनाच्या बाबतींत करतां त्याप्रमाणें त्यांनीं एका पंथांशीं आपलें तादात्म्य केलें आहे. पण हा मुळींच धर्म नाहीं. हें लोक म्हणजे "तातस्थ कूपोयमिति ब्रुवाणा । क्षारं जलं का पुरुषा पिबन्ति!" ह्या कोटींतलें. जवळच उत्कृष्ट गोडें पाणी असतांना ही खाऱ्या पाण्याची विहीर आमच्या वडिलांनीं बांधली म्हणून खारें पाणी पिणारे जगांत जे कांहीं मूर्ख आहेत त्यांच्यापैकीं हे. माझ्या अल्पशा अनुभवानें आतां मी हें ज्ञान मिळविलें आहे. एकाद्या धर्माला राक्षसी कृत्याबद्दल कितीही दोष देत असले, तरी त्यांत धर्माचा कांहीं मुळींच दोष नाहीं. कोणच्याही धर्मानें आजपर्यंत मनुष्यांना छळलें नाहीं; कोणच्याही धर्मानें आजपर्यंत चेटक्यांना जिवंत जाळलें नाहीं. कोणच्याही धर्मानें आजपर्यंत ह्यापैकीं एकही गोष्ट केली नाहीं. तर मग लोकांना ह्या गोष्टी करावयाला कोणी चिथवणी दिली? राजकारणानें! धर्मानें कधींच हें केलें नाहीं आणि असलीं राजकारणें धर्माच्या नांवानें मिरवूं लागलीं, तर त्यांत दोष कोणाचा?

म्हणून जेव्हां एकादा मनुष्य उभा राहतो आणि म्हणतो, "माझा धर्मस्थापक हाच फक्त खरा धर्मस्थापक" तेव्हां तो अगदीं चुकत असतो. त्याला धर्माचा ओनामा देखील कळला नाहीं. धर्म म्हणजे कांहीं शब्द नाहींत, किंवा प्रमेयें नाहींत, किंवा बौद्धिक कबूलीही नाहीं. धर्म म्हणजे आपल्या हृदयांतल्या हृदयांत प्रतीति घेणें आहे, ईश्वराला स्पर्श करणें आहे, विश्वात्मा आणि त्याचीं सर्व महत्स्वरूपें यांच्याच जातींतला मी एक आत्मा आहे हें अनुभवणें, हें जाणणें आहे. जर तुम्ही त्या बापाच्या घरांत खरोखरच प्रवेश केला असलांत, तर त्याचीं मुलें तुम्हाला दिसून तीं तुम्हाला ओळखतां कशी नाहीं यावयाची? आणि जर तुम्हाला तीं ओळखतां येत नाहींत, तर बापाच्या घरांत तुम्ही प्रवेशच केलेला नाहीं. आई

आपल्या मुलाला कोणच्याही पोषाखांत ओळखते, आणि त्यानें कितीही वेषांतर केलें असलें, तरी तिला तो कळतो. प्रत्येक युगांत आणि प्रत्येक देशांत झालेल्या सर्व मोठ्या, आध्यात्मिक, पुरुषांना आणि बायकांना ओळखा; आणि मग तुम्हाला दिसेल कीं, वास्तविक ते एकमेकांशीं विरुद्ध कोठेंच नाहींत. जेथें म्हणून प्रत्यक्ष धर्म-दिव्याशीं जडलेला हा संबंध, आत्म्याची दिव्याशीं झालेली ही प्रत्यक्ष भेट-दृष्टीस पडला, तेथें तेथें मनाचा विकास झाला आणि त्यामुळें तें सर्वभर प्रकाश पहावयाला समर्थ झालें. आतां, मुसलमान ह्या बाबतींत सर्वांत पाठीमागें राहिलेले आणि सर्वांत अतिशय पंथपर आहेत. त्याचें आदितत्व हे. " जगांत फक्त एकच देव आहे; आणि हा महंमद हाच त्याचा धर्मस्थापक " ह्याच्या-शिवाय प्रत्येक गोष्ट म्हणजे केवळ वाईटच नाहीं, तर तिचा ताबडतोब नाशच केला पाहिजे. ज्यांचा ह्याच्यावर तंतोतंत विश्वास नाहीं, असा पुरुष किंवा बायको एका क्षणाचाही अवसर न देतां मारून टाकलीं पाहिजेत. जिचा ह्या पूजण्याचा प्रकाराशीं संबंध नाहीं, अशी प्रत्येक वस्तु एकदम फोडून टाकली पाहिजे. जें पुस्तक ह्याहून निराळें शिकवतें, तें जाळून टाकलें पाहिजे. पॅसिफिक महासागरापासून तो अटलांटिक महासागरापर्यंत सर्व जगभर पुरीं पांचशें वर्षें रक्ताचे प्रवाह वहात होते. हा मुसलमानी धर्म! तरीही ह्या मुसलमानांत जेव्हां जेव्हां एकादा तत्ववेत्ता आढळे तेव्हां तेव्हां तो ह्या क्रूरपणाचा निषेध करीच करी. त्याच्या ह्या करण्यांत त्याचा दिव्याशी संबंध जुळला आहे, सत्याच्या कांहीं अंशाचा त्याला प्रत्यक्ष अनुभव आला आहे हें दृष्टोत्पत्तीस येई. तो कांहीं धर्माशीं खेळत नसे; कारण आपल्या पूर्वजांनीं पाळलेला धर्म कांहीं तो सांगत नसे तर मनुष्या-सारखा एकदम सत्यच सांगे.

अलिकडील उत्क्रांतीच्या तत्वाच्या जोडीनेंच दुसरी एक गोष्ट दृष्टीस पडते. आपलें मूल प्रवर्तन आपलें मूळाकडे उलटावयाची आपली प्रवृत्ति. धर्माच्या बाबतींत आपल्या जुन्या कल्पनाकडे पुनः पुनः परतावयाची आपली प्रवृत्ति असते. कांहीं तरी नवीन गोष्टीचा आपण विचार करूं

या. मग ती गोष्ट चुकलेली कां असेना. तरीही नवीन गोष्टीचा विचार करणें चांगलें. लक्ष्यभेद करावयाचा तुम्हीं कां प्रयत्न करूं नये? अपयश येऊन येऊनच आपण शाहणें होत जातों. काल अनंत आहे. ह्या भिंतीकडे लक्ष्य द्या. ही भिंत आजपर्यंत कधीं तरी खोटें बोलली काय? पण ती अजून भिंतच्या भिंतच आहे. मनुष्य खोटें बोलतो,—आणि तोच देवही होतो. तेंव्हां कांहीं तरी करणें चांगलें. तें चुकीचें ठरलें, तरी कांहीं हरकत नाहीं. कांहींच न करण्यापेक्षां तें अधिक चांगलें. गाय कधीं खोटें बोलत नाहीं. पण ती नेहमीं गायच राहते. कांहीं तरी करा, कसल्या तरी गोष्टीवर विचार करा; तुम्ही बरोबर आहां कां चुकलां आहां हा प्रश्न नाहीं. आपला विचार करीत जा. माझ्या वाडवडिलांनीं ह्या दृष्टीनें विचार केला नाहीं, म्हणून, मी स्वस्थ बसून हळू हळू माझी जाणीव आणि माझी विचार करण्याची शक्ती गमावूं काय? मी तसाच मृत सुद्धां होईन. आणि जर आपल्यांत जर कांहीं जिवंत कल्पना नसल्या, धर्मासंबंधीं आपली स्वतःची खात्री अशी कांहीं नसली, तर जीविताची किंमत काय? नास्तिकांना सुद्धां कांहीं तरी आशा आहे. कारण जरी इतराहून त्यांची मतें भिन्न असलीं, तरी ते आपल्या पुरता आपण स्वतः विचार करतात. जे लोक स्वतः कधींच विचार करीत नाहींत, त्यांचा धर्माच्या जगांत अजून जन्मच झालेला नाहीं. त्यांचें अस्तित्व म्हणजे चिकाच्या गोळयासारख्या दिसणाऱ्या एक प्रकारच्या माशा सारखें. ते विचार करावयाचे नाहींत. त्यांना धर्माची पर्वा नाहीं; पण ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास न ठेवणाऱ्या त्या नास्तिकाला त्याची पर्वा आहे, आणि तो प्रयत्न करीत असतो. तेंव्हां कांहीं तरी विचार करा! ईश्वराकडे जाण्यासाठीं झगडा! आपल्याला अपयश येईल का? याच्याकडे लक्ष्य देऊं नका; आपण कांहीं विक्षिप्त कल्पना तर कवटाळून नाहींना बसणार? याच्याकडे लक्ष्य देऊं नका. जर कोणी विक्षिप्त म्हटल्यानें तुम्हांला लाज वाटत असली. तर ती कल्पना मनांतच ठेवा;—जाऊन दुसऱ्याला ती उपदेशावयाची कांहीं जरूरी नाहीं. पण कांहीं तरी करा. देवाला गांठण्याकरतां कंबर कसा. प्रकाश आलाच पाहिजे. माझ्या आयुष्यभर दररोज

मला जर दुसरा कोणी भरवूं लागला, तर अखेरीस माझ्या हातांचा उपयोगच मला करतां यावयाचा नाहीं. मेंढ्याच्या कळपाप्रमाणें एकमेकाच्या पाठीमागें अंधतेनें जाण्याचा परिणाम आहे. चलनशील व्हा; आणि जेथें चलन दृष्टीस पडतें तेथें भेद दिसणारच. भेद हें आयुष्याचें तोंडी लावणें आहे. ते प्रत्येक गोष्टींतलें सौंदर्य, प्रत्येक गोष्टींतला सुरेखपणा आहे. ह्या जगांत सुंदरता उत्पन्न करणारा म्हणजे भेदच आहे. भिन्नतां हीच जिवनाचा उमग आहे; जिवंतपणाचें चिन्ह आहे. आपल्याला तिची भीति कां वाटावी?

आतां, ह्या धर्मसंस्थापकांविषयींच्या हकीगती कळण्याच्या स्थितींत आपण येतों आहों. धर्माच्या समुद्रांत नुसत्या गोळयासारख्या जगणाऱ्या माशांच्या स्थितींत असणाऱ्यांची गोष्ट बाजूला राहूंद्या. आतां हें आपल्याला कळून आलें कीं, ऐतिहासिक पुरावा असा आहे कीं, जेथें जेथें म्हणून कांहीं खरोखर विचार, ईश्वराची खरोखर भक्ति आढळली, तेथें तेथें आत्मा ईश्वर-प्रवण झाला, त्याला जसें कांहीं वारंवार ओझरतें दर्शन झालें, आणि सर्व आयुष्यांत एकदां, एक क्षणभर तरी प्रत्यक्ष साक्षात्कार झाला. लागलींच "सर्व संशय कायमचे छिन्न होतात; हृदयाची सर्व वक्रता नाहींशी होऊन तें सरळ होतें; सर्व बंधनें तुटून जातात; आणि कर्मांचे सर्व परिणाम पळून जातात. कारण, जो अत्यंत निकट वस्तूंपेक्षांही निकट आहे, आणि अत्यंत दूरच्या वस्तूंपेक्षांही दूर आहे त्याचें दर्शन झालें आहे." ह्याला धर्म म्हणतात. धर्मांतलें सर्व कांहीं ह्यांत आलें. बाकीचे सारें म्हणजे नुसत्या कल्पना, स्वीकृत तत्व, त्या प्रत्यक्ष साक्षात्काराच्या स्थितीप्रत जावयाचे अनेक मार्ग; ह्यांपैकीं कांहीं तरी आहे. सध्यां आपण टोपली करतां भांडत आहों; फळें तर केव्हांच खंदकांत पडलीं आहेत.

जर दोघेजण धर्मावर वाद करीत असले, तर त्यांना जाऊन एवढा प्रश्न विचारावा. 'तुम्ही देव पाहिला आहे कां?' ह्या सर्व गोष्टी तुम्ही पाहिल्या आहेत का?" एक म्हणतो ख्रिस्तच तेवढा एक धर्मसंस्थापक. बरें त्यानें ख्रिस्त पाहिला आहे का? "तुझ्या बापानें तरी तो पाहिला का?"

"नाहीं." "तुझ्या आजानें तरी त्याला पाहिलें कां?" "नाहीं." "तूं तरी त्याला पाहिलें आहे काय?" "नाहीं." तर मग तूं भांडतोस कशाकरतां? फळें तर खड्ड्यांत पडून गेलीं, आणि तुम्ही टोपलीकरतां भांडता आहां? सुज्ञ स्त्रीपुरुषांना अशा रीतीनें भांडत राहण्याची लाज वाटली पाहिजे.

हे देवदूत, हे धर्मसंस्थापक श्रेष्ठ आणि खरे होते. कारण, त्यांच्यापैकीं प्रत्येक एकेका महत्तत्वाचा उपदेश करावयाला अवतरला होता. उदाहरणार्थ भारताचे धर्मसंस्थापक घ्या. धर्मस्थापना करणाऱ्यामध्यें ते सर्वांत जुने आहेत. पहिल्यानें आपण भगवान् श्रीकृष्ण घेऊ. आपल्यांपैकीं ज्यांनीं गीता वाचली आहे त्यांना माहित आहे कीं, सर्व पुस्तकांत जें एक मुख्य तत्व भरलें आहे, तें 'अनासंग' हें आहे. अनासक्त रहा. हृदयांतलें प्रेम फक्त एकाकरतांच आहे. कोणाकरितां? ज्याला कधींच विकार होत नाहीं त्याच्याकरतां. हा एक म्हणजे कोण? परमेश्वर. जें बदलतें, ज्याला विकार होतात, त्याला आपलें अंतःकरण द्यावयाची चूक करूं नका. कारण दुःख तें तेंच. एकाद्या मनुष्याला तुम्ही आपलें अंतःकरण द्याल; पण जर तो मेला तर दुःख हाच त्याचा परिणाम होणार. एकाद्या मित्राला तुम्ही ते द्याल; पण उद्यांच तो तुमचा शत्रु बनेल. तुम्ही तें आपल्या पतीला अर्पण कराल; पण तो एकादे दिवशीं तुमच्याशीं भांडेल. तुम्ही आपल्या प्रिय पत्नीला तें अर्पण कराल; पण उद्याचा दिवस जात नाहीं, तोंच ती हें जग सोडून जाईल. आतां अशा तऱ्हेनें हें सगळें जग चाललें आहे. तेव्हां श्रीकृष्ण गीतेंत म्हणतात, ज्याला कधींही विकार होत नाहीं असा फक्त एक परमेश्वरच. त्याचें प्रेम कधीं नाहींसें होत नाहीं. आपण कोठेंही असलों आणि आपण कांहींही करीत असलों, तरी नेहमीं त्याचें अंतःकरण सारखेंच सकरुण, सारखेंच प्रेममय. तो अविकार्य आहे; आपण कांहींही करा तो कधींच रागावत नाहीं. ईश्वर आपल्यावर रागावेल तरी कसा? तुमचें मूल पुष्कळ खोड्या करतें. तुम्ही त्या मुलावर कधीं रागावतां का? आपण काय होणार आहों, हें काय ईश्वराला माहित नाहीं? त्याला माहित आहे. लवकर

किंवा उशीरा आपण सारे पूर्णतेला जाणार आहों. त्याला धीर आहे, त्याच्या धीराला अंत नाहीं. आपण त्याच्यावर प्रेम केलें पाहिजे ; आणि प्रत्येक सजीव वस्तूवरही प्रेम केलें पाहिजे—पण तें फक्त तिला पाहून त्याच्या ठिकाणीं किंवा त्याच्याद्वाराच केलें पाहिजे. ही गुरु किल्ली आहे. तुम्ही आपल्या पत्नी-वर प्रेम केलें पाहिजे ; पण तें त्या पत्नी करतां नाहीं. "प्रियतमे, पति हा तो पति आहे म्हणून केव्हांच प्रिय नसतो, तर त्याच्यांत भरलेल्या परमेश्वरा-करतां तो प्रिय असतो." वेदान्त तत्वज्ञान सांगतें, पति आणि पत्नी यांच्या मधल्या प्रेमांतसुद्धां, माता आणि मुलें यांच्या प्रेमांतसुद्धां, जरी पत्नीला वाटतें आपण पतीवर प्रेम करीत आहों, जरी आईला वाटतें आपण मुलांवर प्रेम करीत आहों, तरी वास्तविक तें प्रेम ओढून घेणारा त्यांच्यामध्यें वसत अस-लेला परमेश्वरच होय. तोच फक्त विलोभनीय आहे ; दुसऱ्या कशांतही आप-ल्याकडे ओढून घ्यावयाची शक्ति नाहीं. पण त्या पत्नीला बहुदा हें असें आहे, हें कळत नाहीं ; तरी पण न कळत का होईना ती बरोबरच वर्तन करते. त्या ईश्वरावरच प्रेम करते. फरक इतकाच, जेव्हां न कळतां ही गोष्ट एकादा करतो तेव्हां त्यापासून दु:ख उत्पन्न व्हावयाचा संभव आहे ; कळून जर एकाद्यानें ही गोष्ट केली, तर मुक्ती म्हणजे तीच. आमचीं शास्त्रें सांग-तात तें हेंच. जर कोठें प्रेम आढळलें, जर कोठें आनंदाची ज्योती चम-कली, तरी खात्री असूं द्या कीं, तिथें तो हजर आहे ; कारण तो आनंदमय आहे, कल्याणमय आहे, प्रत्यक्ष प्रेमच आहे. त्याच्याशिवाय मुळी प्रेम असणेंच शक्य नाहीं.

ही श्रीकृष्णांच्या उपदेशाची नेहमींची दिशा आहे. त्यांनीं तो उपदेश आपल्या समाजांत पक्का पेरून ठेवला आहे ; त्यामुळें जेव्हां एकाद्या हिंदूगृह-स्थानें कांहीं गोष्ट केली, नुसतें पाणी प्यायलें, तरी तो म्हणतो, "जर ह्यांत कांहीं चांगलें असेल, तर तें परमेश्वराला अर्पण होवो." एकादी चांगली गोष्ट केली, तर बुद्धभक्त म्हणतो, "ह्या सत्कृत्याचें पुण्य जगाला प्राप्त होवो ; मी करतो ह्यांत जर कांहीं पुण्यमय असलें, तर तें जगाला अर्पण होवो आणि जगांतलीं पापें माझ्याकडे येवोत." हिंदू म्हणतो, ईश्वर सर्व शक्ति

आहे, सर्व भर भरलेल्या आत्म्यांचा देखील तो आत्मा आहे; हिंदू म्हणतो, जर मी माझी सर्व सत्कृत्यें त्याला अर्पण केलीं, तर तोच महा यज्ञ; सर्व सत्कृत्याचें श्रेय संपूर्ण विश्वाला मिळेल.

आतां हें एक अंग झालें. भगवान कृष्णांचा दुसरा उपदेश काय आहे?

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः।**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥**

" जो कोणी ह्या संसारांत राहून कर्म करतो आणि त्या कर्मांचें सर्व फल ईश्वराला अर्पण करतो, त्याला ह्या जगांतल्या वाईट गोष्टींचा कधींही स्पर्श होत नाहीं. जलांत उत्पन्न झालेलें कमल जसें वर येतें आणि त्या पाण्यावरती फुलतें त्याप्रमाणेंच जो जगांतल्या कृत्यांत गुंतलेला असतो आणि त्या सर्व कर्मांची फलें ईश्वराला अर्पण करतो, त्या पुरुषाची स्थिती असते"

उत्कट कर्मयोगाच्या उपदेष्ट्याचें काम करतांना श्रीकृष्णांच्या गीतांतून दुसरा सूर निघतो. गीता सांगते, " कर्म कर, कर्म कर, रात्रंदिवस कर्म करीत रहा " तुम्ही कदाचित् विचाराल, मग शांति कोठें आहे?—जर सर्व अयुष्यभर गाडीला जुंपलेल्या घोड्यासारखे श्रम करीत राहून पाठीवर खोगीर असतांनाच मरावयाचें, तर मग मी येथें जन्माला तरी कशाला आलों? श्रीकृष्ण सांगतात, " तुम्हाला शांति मिळेल. ' न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोश्नुते ' कामा पासून पळून जाऊन कधीं शांति मिळत नाहीं." जर तुम्हाला शक्य असलें, तर तुमचीं कर्तव्यें टाकून द्या; आणि पर्वताच्या शिखरावर जा. तिथें सुद्धां मन—कर्म—एकसारखें भ्रमण,—करीतच राहील. एकानें एका संन्याशाला विचारलें, " महाराज, आपल्याला निरामय असें स्थल सांपडलें आहे का? आपण किती वर्षें हिमालयांत फिरलांत,?" संन्याशानें उत्तर दिलें " चाळीस वर्षें " " चांगलीं निवड करून निवास करण्यासारखीं तेथें पुष्कळ सुंदर स्थलें आहेत; तुम्ही कां नाहीं असें केलेंत?" " कारण, ह्या चाळीस वर्षांत माझें मन मला तसें करूं देईना " आपण सर्वजण म्हणतों " चला, आपण शांति शोधून काढूं;" पण आपलें मन आपल्याला तसें करूं देणार नाहीं.

तार्तारला पकडणाऱ्या त्या माणसाची गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे. एक शिपायी शहराच्या बाहेर गेला होता; जेव्हां तो बराकीजवळ आला, तेव्हां तो ओरडला, "मी एका तार्तारला पकडला आहे." आंतून कोणी तरी म्हणालें. "त्याला आंत घेऊन ये." "तो आंत नाहीं येत साहेब," "मग, तूंच आंत ये." "तो मला आंत नाहीं येऊं देत साहेब." अशा सारखेंच, ह्या आपल्या अंतःकरणांतही आपण तार्तार पकडला आहे. आपल्याला त्याला शांत करतां येत नाहीं, तें आपल्याला शांत होऊं देत नाहीं. आपण सर्वांनींच तार्तार पकडले आहेत. आपण सारेच म्हणतों; चंचलता सोडून द्या; शांत व्हा. अशाच आणखी दुसऱ्याही पुष्कळ गोष्टी; पण प्रत्येक लहान मुलाला देखील असें म्हणतां येतें; आणि त्याला वाटतें आपल्याला तसें करतां येईल. पण वास्तविक तें फार कठिण आहे. मी त्याबद्दल प्रयत्न केला आहे. मी आपलीं सर्व कर्तव्यें समुद्रांत बुडवून टाकलीं आणि पर्वताच्या शिखरावर पळालों. मी गुहांत वास केला; गहन अरण्यांत दिवसच्या दिवस काढले. पण काय? तरीही तेंच. मी तार्तारच पकडला; कारण ह्या सर्व काळभर माझें सगळें जग माझ्या बरोबरच मी घेऊन गेलों होतों. माझ्या मनांत जें कांहीं होतें तें तो तार्तार. तेव्हां बाहेरच्या गरीब लोकांना आपण नांवें ठेवतां कामा नये. येथें आंत जोंपर्यंत तो तार्तार असतो, तोंपर्यंत आपण म्हणतों, "अशी अशी परिस्थिति चांगली आणि अशी अशी परिस्थिति वाईट." आपल्याला जर त्याला चूप बसवतां येईल, तर सर्व सुरक्षित चालेल.

म्हणून कृष्णभगवान् आपल्याला उपदेश करतात कीं, आपलीं कर्तव्यें दूर सारूं नका, तर मर्दाप्रमाणें तीं अंगावर घ्या. आणि परिणामाबद्दल विचारच करूं नका. चाकराला असें कां म्हणून विचारावयाचा हक्कच नाहीं. शिपायीगड्यानें विचार करावयाचें काम नाहीं. पुढें चला; आपल्याला कशा तऱ्हेचें काम करावयाचें आहे, याचा उगाच फार विचार करीत बसूं नका. मी स्वार्थरहित आहेना? असें आपल्या मनाला विचारा. तुम्ही तसें असलांत, कीं मग कशाकडे लक्ष्य देऊं नका. तुम्हाला विरोध

करण्याचें सामर्थ्य कशांतच नाहीं! आंत बुडी मारा. पुढें असलेलें कर्तव्य करा. आणि तुम्ही असें केलेंत म्हणजे मग हळू हळू तुम्हाला सत्याची प्रतीति होत जाईल.

कर्मण्य कर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥

"ज्याला पराकाष्ठेची गडबड चालली असतां नितांत शांति सांपडते आणि अत्यंत शांतता असतांना सुद्धां जो नितांत कर्मपर असतो, तोच योगी, तोच महात्मा, तोच पूर्णत्वाला जाऊन पोहोंचला."

तेव्हां आतां तुम्हांला दिसतेंच कीं, ह्या सर्व उपदेशाचें सार हें कीं, ह्या जगांतलीं सर्व कर्तव्यें पावन आहेत; ह्या जगांत असें एकही कर्तव्य नाहीं, कीं, ज्याला शुद्र म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे. तसेंच, प्रत्येक माणसाचें कार्य सिंहासनावर अधिष्ठित झालेल्या राजेश्वराच्या कार्याच्या योग्यतेचें आहे.

बुद्धांनीं आणलेल्या ईश्वरी आज्ञेकडे लक्ष्य द्या. फारच भयंकर ती आज्ञा आहे. आपल्या अंतःकरणांत तिचेंही एक स्थल आहे. बुद्ध सांगतात, 'स्वार्थ साधूपणाचें निर्मूलन करा, ज्या ज्या गोष्टी मुळें तुम्ही स्वार्थपर बनता, ती ती गोष्ट पार नाहींसी करा. पत्नीचा त्याग करा, मुलाचा त्याग करा, आपल्या कुटुंबाला सोडून जा. ह्या जगांतलेच राहू नका; पूर्ण स्वार्थ-पराङ्मुख व्हा.' संसारी मनुष्याला वाटतें आपण स्वार्थरहित होऊं; पण पत्नीच्या तोंडाकडे दृष्टि गेली कीं, झालाच पुनः तो स्वार्थपरायण आईच्या मनांत येतें, आपण अगदीं स्वार्थ टाकून द्यावा, पण एकदा का मुलाचें गोड तोंड दृष्टीस पडलें, कीं, लागलीच आली स्वार्थपरता. जगांतल्या प्रत्येक वस्तूची हीच स्थिति, मनांत स्वार्थाची इच्छा उद्भवली, एकाद्या स्वार्थपर गोष्टीच्या पाठीमागें आपण लागलों, कीं, लागलींच आपल्यांतलें सगळें मनुष्यपण, ज्याच्या योगानें आपल्याला मनुष्य म्हणतां येईल, तें निघून जातें. आपण पशु बनतों, निवळ गुलाम बनतों, आपल्या बांधवांना विसरतों. अतःपर आपल्या तोंडांतून 'तूं आधीं आणि मी पाठीमागून

असें उद्गार निघत नाहींत; मग नेहमींचे उद्गार म्हणजे 'मी आधीं. बाकीच्यांनीं आपापली सोय बघावी.'

आपल्याला आढळतें कीं, कृष्णांच्या आज्ञेलाही आपल्या हृदयांत एक स्थल आहे. त्या उपदेशाशिवाय आपल्याला मुळींच हालचाल करता याव-याची नाहीं. श्रीकृष्णांच्या उपदेशाकडे लक्ष्य दिल्याशिवाय आपल्याला आपल्या आयुष्यांतलें कोणचेंच कर्तव्य, सदसद्विवेक बुद्धीला सारून, आणि शांततेनें, आनंदानें, सुखानें अंगावर घेतां यावयाचें नाहीं. "तुमच्या कर्मांत कांहीं वाईट असलें तरी भिऊ नका; असें कार्यच नाहीं कीं, ज्यांत वाईटाचा अंश सांपडावयाचा नाहीं." "तें सर्व ईश्वरावर सोंपवा आणि फलाकडे लक्ष देऊं नका."

ह्याप्रमाणेंच आपल्या हृदयाचा एक कोंपरा दुसऱ्या एका उपदेशाकरतां आहे. आयुष्य चंचल आहे. हें जग अंतवंत आहे. दुःखकारण आहे. अरे झोंपीं गेलेल्या प्राण्या, तुला खावयाला चांगलें अन्न आहे, अंगावर घाला-वयाला सुंदर कपडे आहेत आणि रहावयाला सोयीचें घर आहे, तेव्हां कधीं तरी तुझ्या स्मरणांत तरी येतें कां? कीं, आपले लक्षावधी बंधु उपास काढून मरत आहेत. जिकडे तिकडे दुःख, क्लेश, आपत्ति. ह्या ढळढळीत दिसणाऱ्या प्रत्यक्ष गोष्टीकडे लक्ष्य दे. मूल जेव्हां ह्या जगांत प्रवेश करतें तेव्हां पहिल्यानें त्याच्या तोंडातून कोणचा ध्वनि निघतो इकडे लक्ष्य दे. तें रडतें ही सत्य गोष्ट आहे, ही मुळीं रडण्याचीच जागा आहे. आपण जर ह्या देवदूताच्या उपदेशाकडे लक्ष्य दिलें, तर आपण अगदीं स्वार्थ सोडून देऊं.

दुसरा एक देवदूत पहा. तो नाझारीथचा आहे. तो उपदेश करतो, "तयार व्हा; कारण स्वर्गाचें राज्य अगदीं हाताशीं आहे." श्रीकृष्णांच्या उपदेशाचा मी पुष्कळ विचार केला आहे; त्याप्रमाणें संगरहित होऊन वागण्याचा मी प्रयत्न करीत आहें; पण कधीं कधीं मी विसरतों. मग लागलींच बुद्धांचा उपदेश माझ्यापुढें येऊन उभा राहतो. "सावध रहा; कारण ह्या जगांतली प्रत्येक गोष्ट क्षणभंगूर आहे, आणि ह्या जीवनांत

नेहमीं दुःखच भरलेलें असतें.'' मी त्याचा विचार करतों; कोणच्या उपदेशाचा स्वीकार करावा, हें माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. तों इतक्यांत पुनः आणखीं एक उपदेश वज्रपातासारखा माझ्यावर येऊन आदळतो. तयार हो. स्वर्गाचे राज्य अगदीं हताशीं आहे. एक क्षणभरही उशीर करूं नकोस. उद्यांवर कांहींच सोंपवूं नकोस. त्या शेंवटाकरता तयार रहा. तो तुला केव्हांच, अगदीं आतां सुद्धां, येऊन गांठील. ह्याही उपदेशाला स्थल दिलें पाहिजे. आपल्याला हें कबूल आहे. त्या देवदूताला आपण नमन करतों; त्या परमेश्वराला आपण प्रणाम करतों.

आणि नंतर समतेचा निरोप देत महंमद येतो. तुम्ही विचारतां, "त्याच्या धर्मांत चांगलें तें काय असणार?" जर त्यांत कांहींच चांगलें नसतें, तर तो मुळीं जिवंतच कसा राहिला असता? चांगलें तेवढेंच जीव धरतें, तेंच पाठीमागें राहतें. कारण फक्त चांगलेंच तेवढें बलवान् आहे. तेव्हां झगड्यांत तेंच शिल्लक राहिलें पाहिजे. अगदीं ह्याच जन्माचा विचार करा. अशुद्ध आचरणाच्या माणसाचें आयुष्य किती तरी ज्यास्ती नसतें का? ह्याबद्दल शंकाच नको. कारण शुद्धता हेंच बल आहे, चांगलेंपणा हेंच बल आहे. जर त्याच्या उपदेशांत कांहींच चांगलें नसतें, तर मुसलमानी धर्म आजवर जिवंत कसा राहिला असता? त्यांत चांगलें असें पुष्कळच आहे. महंमद हा समतेचा पुरस्कर्ता होता. सर्व माणसें, सर्व मुसलमान, भाऊ भाऊ आहेत.

तेव्हां आपल्याला असें दिसतें कीं, प्रत्येक धर्म संस्थापकाचें, प्रत्येक देवदूतांचें विशिष्ट कार्य आहे, प्रत्येकाचा विशिष्ट उपदेश आहे. पहिल्यानें त्या उपदेशाकडे लक्ष्य दिलें आणि मग त्या उपदेश कर्त्याच्या जीवनचरित्राकडे बघितलें कीं, त्याचे सर्व जीवन कार्य स्पष्ट होतें, प्रकाशित होतें.

आतां अज्ञानी मूढजन हजारों उपपत्ति काढीत बसतात; आणि त्यांच्या त्यांच्या मानसिक परिणती प्रमाणें, त्यांच्या कल्पनांना जुळतील असे खुलासे देतात; आणि ते सर्व ह्या दैवी शिक्षकांवर लादतात. त्या देवदूतांचे उपदेश घेतात आणि त्यांवर आपले चुकीचे अर्थ बसवतात. प्रत्येक धर्मसंस्थापकाच्या

उपदेशावर खरी अशी एकच टीका म्हणजे त्याचें जीनवचरित्र. त्याच्या जीवन चरित्राकडे लक्ष्य द्या; त्यानें जें कांहीं केलें तें पाहिलें म्हणजे त्याचा सर्व उपदेश स्पष्ट होतो. गीता वाचा. तुम्हाला आढळून येईल कीं, श्रीकृष्णांच्या जीवनांत ती पूर्णपणें उतरली आहे.

महंमदानें आपल्या चरित्रानें दाखविलें कीं, सर्व मुसलमानांत पूर्ण समता पाहिजे, पूर्ण बंधुता पाहिजे. तो कोणच्या वंशाचा आहे, कोणच्या जातीचा आहे, कोणच्या पंथाचा आहे, कोणच्या वर्णाचा आहे, स्त्री आहे का पुरुष आहे, हा मुळीं तेथें प्रश्नच नव्हता. तुर्कस्थानचा सुलतान अफ्रिकेच्या बाजारांत गुलाम खरेदी करून सांखळदंडानें बांधून त्याला तुर्कस्थानांत आणीना. पण तो मुसलमान झाला आणि त्यांत पुरेसे गुण आणि सामर्थ्य असलें म्हणजे त्याला खुद्द सुलतानाच्या मुलीशीं लग्न करावयाला कांहीं हरकत नाहीं. ह्या गोष्टीची, ह्या देशांत (अमेरिकेंत) ज्या तऱ्हेनें निग्रो लोकांना आणि अमेरिकन इन्डियन लोकांना वागवण्यांत येते त्या तऱ्हेशीं तुलना करा! आणि हिंदु तरी काय करतात? तुमच्या एकाद्या धर्मोपदेशकांचा चुकून एकाद्या कर्मठ हिंदूच्या अन्नाला स्पर्श झाला म्हणजे तो तें फेंकून देतो. आमचें तत्वज्ञान इतकें उच्च प्रतीचें आहे, तरी व्यवहारांत आमची दुर्बलता तुम्हाला आढळतें; पण इतर सर्व जातींपेक्षा मुसलमानांत ह्या दृष्टीनें कसें मोठेपण आढळतें तें पहा. तें त्यांचें मोठेपण त्यांच्या त्या समतेंत, जेथें जातीचा आणि वर्णाचा प्रश्नच उरत नाहीं, अशा त्या समतेंत; दिसून येतें.

ह्यांच्याशिवाय आणखी असेंच मोठाले धर्मसंस्थापक अवतरतील कां? खात्रीनें ते ह्या जगांत अवतार घेतील. पण त्या पुढच्या आशेवर राहूं नका, तुमच्यापैकीं प्रत्येकानें स्वतःच सर्व जुन्या करारानीं बनलेला हा प्रत्यक्ष दिसणारा नवा करार उपदेशिणारा धर्मसंस्थापक व्हावें हें मला अधिक आवडेल. सर्व पूर्वीचा उपदेश घ्या; आपल्या स्वानुभवाची त्याला पुष्टी द्या, आणि मग दुसऱ्याचे गुरू व्हा. ह्या उपदेष्ट्यांपैकीं प्रत्येक जण मोठा होता, प्रत्येकानें आपल्याकरतां कांहीं तरी मागें ठेवलें आहे, ते

आपले देव आहेत. आपण त्यांना वंदन करतों; आपण त्यांचें चाकर आहोंत. आणि ह्याचा अर्थ हाच कीं, आपण आपल्यालाच वंदन करितों. कारण जसे ते ईश्वराचीं लेंकरें आहेत, ईश्वराज्ञांचे उपदेशक आहेत, त्याप्रमाणेंच आपणही आहों. ते पूर्णतेला जाऊन पोहोंचलें; आपण आतां पूर्णतेला जाऊन पोहोंचणार आहों. येशूचे शब्द लक्ष्यांत ठेवा. " स्वर्गाचें राज्य अगदीं हाताशीं आहे! " अगदीं ह्याच क्षणाला आपण प्रत्येकजण असा पक्का निश्चय करूं. " मी धर्मसंस्थापक होईन; मी प्रकाश आणणारा दूत होईन; मी ईश्वराचें मूल होईन; इतकेंच नाहीं प्रत्यक्ष देवच होईन."

---

# पव्हारी बाबा.

धर्माच्या बाकीच्या बहुतेक बाजूंना त्या वेळेपुरत्या तरी पार दूर सारून, भगवान बुद्धांनीं ज्या महत्कार्याला महत्व दिलें तें, महत्कार्य म्हणजे ह्या दुःखानें गांजलेल्या जगाला साहाय्य करणें हें होय. पण, त्यांनाही व्यक्तीच्या स्वार्थाला चिकटून राहण्याच्या पोकळपणाचें महत्सत्य अनुभवावयाला आत्मशोधनांत कित्येक वर्षें घालवावीं लागलीं. त्यांच्याहून अधिक निःस्वार्थी आणि अविश्रान्त श्रम करणारा कार्यकर्ता आपल्या सोज्वळ कल्पनेलाही कल्पितां यावयाचा नाहीं. तरीही, ह्या वस्तुजाताचा अर्थ पटावयाला त्यांच्यापेक्षां कठिण परिश्रम कोणी केले आहेत? जितकें कार्य मोठें तितकीच त्याच्या मुळाशीं असलेली त्याला कल्पिणारी शक्तीही मोठी असली पाहिजे हें कालाबाधित सत्य आहे. आधींच कल्पिलेली बिनचुक योजना सांगोपांग व्यवहारांत उतरावयाला विचाराच्या अतिशय एकाग्रतेचा जोर लागत नसेल; पण, जगाला पुढें ढकलणारे प्रचंड जोर म्हणजे तरी अत्यंत एकाग्रतेचींच दुसरीं रूपांतरें आहेत हें निर्विवाद. क्षुल्लक गोष्टी करावयाला नुसती त्यांची मनांत कल्पना येणें पुरे असेल. पण, वीचितरंग उमटविणारी थोडीशी खळबळ आणि मोठी लाट उठवणारा प्रचंड धक्का

हीं अगदीं भिन्न भिन्न आहेत. आणि तरीही वीचितरंग म्हणजे मोठी लाट उठविणाऱ्या शक्तीच्या अत्यल्प अंशाचेंच प्रकट स्वरूप आहे.

सत्य गोष्टी, कल्पनांच्या अवगुंठनांतून बाहेर काढलेल्या सत्य गोष्टी, मग त्या दृष्टीला अगदीं कृश आणि भयानक दिसोत; सत्य, विशुद्ध सत्य, मग त्याच्या स्फुरणानें हृदयांतले एकूणएक धागे तुटून जावोत; हेतु, स्वार्थरहित आणि प्रामाणिक हेतु, मग त्यांना गांठावयाला अवयवापाठीमागून अवयव तोडावा लागो;—ह्यांच्याकडे आधीं गेलें पाहिजे, त्यांना शोधून काढलें पाहिजे, त्यांना प्राप्त करून घेतलें पाहिजे. हें झाल्यावर मग कार्यक्षमतेच्या खालच्या पायरीवर असलेलें मन कार्याच्या प्रचंड लाटा उठवूं शकेल. कालाच्या चक्रावर फिरतां, फिरतां सुक्ष्म आपल्या भोंवतीं जडाला गुंडाळून घेतें आणि सुस्पष्ट होतें, अदृश्याचें दृश्यांत रूपांतर होतें, शक्याचें व्यवहार्य बनतें, कारणाच्या जागीं कार्य तयार होतें, आणि विचाराच्या जागीं प्रत्यक्ष कृत्य उभें राहतें.

कारण—मग तें हजारों परिस्थितींनीं जखडून टाकलेलें असो—आज नाहीं उद्यां कार्याच्या रूपानें दिसणारच. आणि ज्याचें सामर्थ्य गुप्त आहे, असा विचार—तो आज कितीही दुर्बल दिसो—स्थूल कृत्याच्या क्षेत्रांत आपल्या वैभवाचा दिवस केव्हांना केव्हां तरी पाहणारच. इन्द्रियांना सुख देण्याच्या वस्तूच्या सामर्थ्यावरून तिची किंमत ठरवण्याचें मापच मुळीं खरें नाहीं.

प्राण्याची जाती जितकी ज्यास्त नीच, तितके इन्द्रियांनींच केवळ घेतां येण्यासारखे त्याचे सुखोपभोग ज्यास्ती, तितकें त्याचें इन्द्रियांतलेंच जीवन ज्यास्ती. पशुगुणविशिष्ट मनुष्याला त्याच्या बाह्य सुखसाधनांपासून नाहीं, तर त्याला वरच्या दर्जाची अन्तर्दृष्टि देऊन आणि त्याच्यांत वरच्या दर्जाची अभिरुचि उत्पन्न करून त्याच्या इन्द्रियमय जीवनांतून बाहेर काढण्याची शक्ति हा संस्कृतीचा, खऱ्या संस्कृतीचा अर्थ.

मनुष्याला ह्याचें उपजतच ज्ञान असतें. सगळ्याच परिस्थितींत तो आपल्याशीं त्याचें स्वरूप ठरवीत नसेल. विचारमय जीवनाबद्दलचीं त्याचीं मतें मूळ सत्यापासून दूर दूर जात असतील; पण कशालाही न जुमानता

हें उपजत ज्ञान आपल्याला पुढें पुढें ढकलीत त्याच्यांत वास करीत असतें. तेंच त्याला कार्य कर्त्याला, भिषग्राजाला, जादुगाराला, धर्मोपदेशकाला किंवा ज्ञानविशारदाला मान द्यावयाला लावते. जेथें इन्द्रियें मागें राहिलीं असतात, अशा उच्च वातावरणांत संचार करण्याच्या सामर्थ्यावरून, शुद्ध विचारांचा जितका प्राणवायु आंत घेण्याची त्याच्या वायुनलिकांना ताकद आहे, तितक्या प्राणवायूच्या परिमाणावरून आणि इतक्या उंचीवर त्याला घालवितां येणाऱ्या कालाच्या मर्यादेवरूनच फक्त त्याची किती प्रगति झाली हें मोजतां येईल.

असलेली वस्तुस्थिति पाहिली, तर ही अगदीं उघड गोष्ट आहे कीं, संस्कृतीचा मनुष्य ज्यांना सुखें म्हणून म्हणतात त्यांच्याकडे जीविताला अवश्य लागणाऱ्या गोष्टीकरतां मोडाव्या लागणाऱ्या वेळेपेक्षां एक क्षणही अधिक खर्च करावयाला अगदीं नाखुष असतो; आणि जसजशी ही संस्कृति अधिकाधिक होत जाते, तसतशीं ही अवश्यक कृत्येंसुद्धां कमी कमी उत्साहानें त्याच्याकडून केलीं जातात.

त्यांच्यांत विचाराचें जीवन शक्य तितकें प्रतिबिंबित व्हावें म्हणून चैनीच्या पदार्थांची सुद्धां मांडणी एकापुढें एक कल्पनानुसार आणि ध्येयानुसार झालेली आहे.–आणि कला म्हणतात ती हीच.

" एकच तेज विश्वांत येतांना प्रत्येक स्वरूपानें प्रकट होतें आणि तरीही आणखी किती तरी उरलेलें असतें "–अगदीं पार लागणार नाहीं इतकें उरलेलें असतें. अनंत विचाराच्या अंशाला, अगदीं लहान अंशालाच आपलीं सुखसाधनें निर्माण करण्याकरतां स्थूलाच्या कक्षेंत उतरवतां येईल. बाकीचा अशा तऱ्हेनें आपला उपमर्द करूं देणार नाहीं. अतिसूक्ष्म नेहमीं आपल्या दृष्टीला चकवतें आणि त्याला खालीं आणण्याच्या (स्थूल बनविण्याच्या) आपल्या प्रयत्नाला हसतें. ह्या गोष्टींत महंमदालाच पर्वताकडे गेले पाहिजे; नाहीं म्हणून चालावयाचें नाहीं. मनुष्याला जर तेथल्या सौंदर्याचा आस्वाद घ्यावयाचा असेल, तेथल्या तेजांत न्हावयाचें असेल,

८५३

विश्वाच्या कारण जीवनाशीं आपलें जीवन एकतान होतांना अनुभवावयाचें असेल, तर त्याला, स्वतःलाच त्या उच्च पातळीवर नेऊन ठेविले पाहिजे.

चमत्काराच्या प्रांतांत नेऊन सोडणारीं प्रवेशद्वारें ज्ञानच उघडतें. मनुष्याचा देव ज्ञानच बनवतें. आणि 'जें जाणल्यानें बाकीचें सर्व ज्ञान होतें,' जें सर्व ज्ञानांचा आंतला गाभा, ज्याच्या स्फुरणानें सर्व शास्त्रांत जीवन-कला भरते, त्या धर्मशास्त्राकडे जें ज्ञान आपल्याला घेऊन जातें, तें ज्ञान निःसंशय सर्वांहून श्रेष्ठ. कारण, मनुष्याला सगळेंच्या सगळें आणि पूर्णतेला गेलेलें विचारमय जीवन जगावयाला लावण्याचें सामर्थ्य केवळ त्याच्यांतच आहे. ज्या भूमीनें त्याला 'परशास्त्र' असें नांव दिलें आहे, ती भूमी भाग्यशाली आहे.

तत्व हें पूर्णतेनें व्यवहारांत उतरलेलें क्वचितच दिसतें; पण ध्येय नाहींसें केव्हांच होत नाहीं. इकडे पाहिलें तर, ध्येयावरची आपली दृष्टि क्षणभरही न काढणें हें आपलें कर्तव्य आहे. मग आपल्याला चांगलीं पावलें टाकीत त्याच्याकडे जातां येवो, किंवा अगदीं दिसत नाहीं अशा गतीनें त्याच्याकडे रांगत जावें लागो. दुसऱ्या बाजूनें विचार केला, तर खरी गोष्ट अशी आहे कीं, त्या ध्येयाचा प्रकाश आपल्याला दिसूं नये म्हणून आपल्या हातांनीं आपले डोळे झांकून घेण्याचा आपण कितीही प्रयत्न केला, तरी तें नेहमीं आपल्यापुढें घोळत असतें.

व्यवहार्याचें सगळें जीवन आधीं विचारांत असतें; आचाराचा जन्म विचारापासून होतो. आपण तत्वज्ञानांत गढलेले असो, किंवा आयुष्यांतली रोजची कष्टाचीं कामें करण्यांत गुंतलेले असो, आपल्या सर्व जीवनांत जें अगदीं भिनून गेलेलें असतें तें ध्येयच. ध्येयाचे किरण अनेक सरळ अग्र-वक्र रेषांनीं परावृत्त अगर वक्री होत होत प्रत्येक द्वारांतून आणि छिद्रांतून आंत भरत असतात, आणि मग जाणून किंवा न कळत आपल्याला प्रत्येक कृत्य त्याच उजेडांत करावें लागतें. प्रत्येक पदार्थ त्याच प्रकाशानें भिन्नरूप झालेला, उन्नत झालेला अगर विकृत झालेला पहावा लागतो. आपण हल्लीं ज्या स्थितींत आहोंत त्यास्थितींत आपल्याला ध्येयानेंच

आणलें आहे, आणि आपल्याला ध्येयच घेऊन जाणार. आपल्या आनंदांत अगर दुःखांत, आपल्या महत्कृत्यांत अगर नीच कृत्यांत, आपल्या सद्गुणांत अगर दुर्गुणांत जी शक्ति आपल्याला जाणवते, जिनें आपल्याला वेढून टाकले आहे ती ध्येयाची शक्ति आहे.

विचाराची आचारावर इतकी सत्ता आहे! पण आचारही कांहीं विचार बनविण्याच्या कामांत कमी समर्थ नाहीं. विचाराचें खरेपण आचारांत दिसतें; ध्येयाचें सत्यत्व प्रत्यक्ष कृतींत जें उतरलेलें असतें त्याच्यावरून दिसतें. प्रत्यक्ष कृतींत उतरल्यानेंच ध्येय फलद्रुप होतें. ध्येय दिसतें आहे, हेंच मुळीं त्याला अनुरूप, कसें तरी, कोठें तरी, व्यवहार्य कृत्य आहे ह्याचे प्रमाण. ध्येय मोठें असेल, अफाट असेल; तरी ते व्यवहार्य कृत्यांचें लहान लहान तुकडे एके ठिकाणीं मिळूनच झालेलें आहे. ध्येयाचा बहुतेक भाग म्हणजे व्यवहार्य कृत्यांच्या विभागाचें समस्त आणि संकलित स्वरूप आहे.

ध्येयाचें सामर्थ्य प्रत्यक्ष कृत्यांत आहे; विचारांची शक्ति आचारांत आहे. तो आचाराच्या बाबतींत आणि आचाराच्या द्वारां आपल्यावर परिणाम करतो. प्रत्यक्ष कृत्यांच्या द्वारांच ध्येय इन्द्रियांना घेतां येईल अशा स्थितींत उतरतें, त्याचें ज्याच्याशीं आपल्याला मिळून जातां येईल अशा स्वरूपांत रूपांतर होतें. ध्येयावर जाऊन पोहोंचण्याकरतां आचाराच्या आपण पायऱ्या करतों.; आपल्या आशेचीं मंदिरें त्याच्यावर बांधलेलीं असतात; तोच आपल्याला पुढें कार्य करावयाला धैर्य देतो.

ज्याच्या जीवनांत पूर्ण ध्येय उतरलें आहे, असा एक मनुष्य, नुसत्या शब्दांनीं ध्येयाचीं हृदयंगम चित्रें रेखाटणाऱ्या, आणि त्यांतून सुंदर सुंदर तत्वें काढणाऱ्या लोकांच्या अनेक तांड्यांपेक्षां अधिक सामर्थ्यवान् असतो.

तत्वज्ञानाच्या निरनिराळ्या पंथांची धर्माशीं सांगड घातल्याशिवाय आणि त्यांना कमज्यास्त यशानें आचारांत उतरविण्यासाठीं झगडणारीं माणसें मिळाल्याशिवाय त्यांचा मनुष्य जातीला कांहींही उपयोग नाहीं. फार तर त्यांच्या योगानें बुद्धीला एक प्रकारची तालीम होईल. ज्याला एकही

प्रत्यक्ष अशी आशा नाहीं असें तत्वज्ञानसुद्धां, जेव्हां कांहीं जणांनीं तें हातांत घेऊन त्याला कांहींसें आचारांत उतरविलें, तेव्हां नेहमींच जनसमाजाला आवश्यक अशी गोष्ट झालें; आणि अत्यंत विशद केलेंले उपयुक्त विचार, त्यांना आचारांत उतरविणारें कोणी न मिळाल्यामुळें, जागच्या जागीं मरून गेले.

आपल्यापैकीं बहुतेकांना आपल्या विचारजीवनाबरोबर आपलें आचार-जीवन ठेवतां येत नाहीं. आपले विचार कृतींत उतरविण्याचें सामर्थ्य नसतें. पण कांहीं भाग्यवानांत हें सामर्थ्य असतें. आपल्यापैकीं बहुतेकांचें असें होतें कीं, गहन विचारांत शिरलें कीं, आपली कार्य करण्याची शक्ति कमी होते; आणि ज्यास्त काम करावयाला लागले कीं, गहन विचार करण्याची शक्ति कमी होते. ह्यामुळेंच महान् विचारवेत्यांपैकीं बहुतेकांना त्यांच्या मोठ्या कल्पना प्रत्यक्ष अंमलांत येणें कालावर सोंपवावें लागतें. त्यांचा प्रसार करावयाला आणि त्यांना व्यवहारांत अधिक कर्तृत्ववान डोकीं येईपर्यंत त्यांच्या विचारांना थांबावें लागते. हें आम्ही लिहित असतांनाच आमच्या दृष्टीपुढें त्याची–त्या अर्जुनाच्या सारथ्याची–मूर्ति उभी राहिली आहे. भगवान् उभय सैन्यामध्यें आपल्या रथांत उभे राहिले आहेत; डाव्या हातानें उच्छृंखळ झालेले तेजस्वी घोडे आवरीत आहेत; आंगावर कवच धारण केले आहे;–त्यांची तीक्ष्ण दृष्टि त्या विस्तीर्ण सेना-समूहावर फिरली. दोन्ही सैन्यांतल्या योद्ध्यांच्याबद्दलची प्रत्येक गोष्ट तिनें जणूं काय स्वयंस्फूर्तीनेंच जाणली–इतक्यांत निस्तब्ध बनलेल्या अर्जुनाच्या अंगावर रोमांच उभे करीत त्या ओठांतून कार्याचें अत्यद्भुत रहस्य आमच्या कानावर पडलें–

"कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥"

"ज्याला कार्यांत विश्रांति सांपडते आणि विश्रांतींत कार्य दिसतें, तो सर्व मनुष्यांमध्यें बुद्धिमान्; तोच योगी; तोच सर्व कार्य करणारा."

हें पूर्ण ध्येय झालें. पण, फारच थोडे त्याला जाऊन पोहोंचतात. म्हणून, जी वास्तविक परिस्थिति आहे ती आपल्याला धरून चाललें पाहिजे, आणि निरनिराळया महात्म्यांनीं पूर्णतेला पोहोंचविलेल्या मनुष्याच्या परिणतीच्या निरनिराळया बाजू एके ठिकाणीं जुळविल्या पाहिजेत.

धर्मांत आपल्याला गहन विचाराचा पुरुष आढळतो. दुसऱ्याला साहाय्य करण्यांत गुंतलेला महान् कार्यकर्ता आढळतो, धैर्याचा आणि दांडग्या आत्मप्रत्ययाचा मनुष्य आढळतो आणि विनयाचा आणि नम्रतेचाही आढळतो.

ह्या संक्षिप्त चारित्रात्मक लेखाचा नायक विलक्षण विनयाचा आणि उत्कट आत्मप्रत्ययाचा पुरुष होता.

पव्हारी बाबा ( हें नांव त्यांना पुढें प्राप्त झालें. ) गुझीजवळच्या एका खेडेगांवांत एका ब्राम्हणाच्या पोटीं जन्माला आले. लहानपणींच गाझीपूरला आपल्या चुलत्याजवळ ते शिकण्याकरतां येऊन राहिले.

हल्लीं हिंदु साधुपुरुषांचे संन्यासी, योगी, बैरागी आणि पंथी असे मुख्य चार पंथ आहेत. संन्यासी हे शंकराचार्यांच्या अद्वैत मताचे अनुयायी. योगी जरी अद्वैत मताचेच असतात, तरी निरनिराळया योगांच्या क्रिया करणें हें त्यांचें मुख्य अंग. बैरागी हे द्वैत पंथ प्रवर्तक रामानुज वगैरेंच्या शिष्यशाखेंतले. पंथी हे ह्या दोहोंपैकीं कोणच्या तरी पंथाचे असतात; त्यांचा पंथ मुसलमानी अमदानींत अस्तित्वांत आला. पव्हारी बाबांचा चुलता रामानुजांचा पंथाचा म्हणजे श्रीपंथाचा होता. तो नैष्ठिक ब्रम्हचारी होता. नैष्ठिक ब्रम्हचाऱ्याचें जन्मभर ब्रम्हचर्य पाळण्याचें व्रत असतें. गाझीपूराच्या उत्तरेला जवळ जवळ दोन मैलावर भागीरथीच्या कांठीं त्याचें एक शेत होतें. तेथें तो राहत असे. त्याला पुष्कळ पुतणें होते. त्यांतून पव्हारी बाबांना त्यानें आपल्या घरीं आणून आपल्या पाठीमागून आपल्या जिनगीला वारस पाहिजे म्हणून दत्तक घेतलें.

ह्या वेळच्या पव्हारी बाबांच्या चरित्राची विशेषशी माहिती उपलब्ध नाहीं. पुढें ज्या विशेषांमुळें ते प्रसिद्धीस आले त्यांचीं पूर्वचिन्हें ह्या वेळेला

अल्पप्रमाणांतही त्यांच्यांत होतीं असें दिसत नाहीं. व्याकरण, न्याय, किंवा त्यांच्या पंथाचें धर्मज्ञान ह्या विषयांतला एक मेहनती विद्यार्थी, आणि आपल्या बरोबरच्या विद्यार्थ्यांच्या गमतीनें खोड्या काढणारा एक हुषार, तरतरीत मुलगा म्हणून फक्त ते प्रसिद्ध होते.

ह्याप्रमाणें ह्या भावी महंतांनीं आपलें बाळपणचें आयुष्य पूर्वींच्या पद्धतीच्या हिंदू विद्यार्थ्याप्रमाणें नेहमींचा अभ्यासक्रम संभाळण्यांत घालविलें. त्यांचें अभ्यासाकडे जरा ज्यास्त लक्ष्य असें; तसेंच निरनिराळ्या भाषा शिकण्याकडे त्यांची बरीच प्रवृत्ति होती. ह्याशिवाय, त्यांच्या मोकळ्या, आनंदीं आणि खेळकर अशा विद्यार्थीदशेंतल्या जीवनांत, त्या अति विलक्षण आणि आदरोत्पादक यशांत जिचा कळस झाला त्या भव्य गंभीरतेचें पूर्वलक्षण कांहीं नव्हतें.

नंतर अशी एक गोष्ट घडून आली कीं, त्यामुळें ह्या तरुण विद्यार्थ्याला बहुत करून पहिल्यानेंच ह्या जीवनाचा सत्य, गंभीर अर्थ काय आहे, हें जाणवलें. त्या गोष्टीनें, त्यांना त्या वेळपर्यंत पुस्तकांतच गुंतून राहिलेले आपले डोळे उंच करून, आपल्या मनःक्षितिजाची कसून तपासणी करावयाला आणि जो नुसतें पुस्तकी ज्ञान नाहीं, तर प्रत्यक्ष अशी कांहीं तरी सत्य गोष्ट आहे, अशा धर्मांतल्या कशाची तरी अत्यंत उत्कंठा वाटावयाला लावलें. त्यांचा चुलता मरण पावला! त्या तरुण अंतःकरणांतलें सगळें प्रेम ज्यांत सांठविलें होतें तो चेहरा नाहींसा झाला! आणि दुःखानें अगदीं जिव्हाळ्यावर घाय केल्यामुळें त्या उत्कट मनोवृत्तीच्या मुलानें ती खांच कधींही न बदलणाऱ्या अशा दिव्य देखाव्यांनीं भरून टाकण्याचा निश्चय केला.

भरतवर्षांत प्रत्येक गोष्टीला आम्हाला गुरु लागतो. आमची हिंदू लोकांची अशी समजुत आहे कीं, पुस्तकें नुसतें बाह्यांग दाखवितात. प्रत्येक कलेंतलें, प्रत्येक शास्त्रांतलें—मग धर्मांतलें तर विचारावयालाच नको—आंतलें रहस्य गुरुकडूनच शिष्याला मिळालें पाहिजे.

आठवण पोंचत नाहीं इतक्या जुन्या काळापासून भारतांतले उत्कट आत्मे, आंतर जीवनाच्या रहस्याचा आपला अभ्यास अनाहत चालावा म्हणून नेहमीं निरामय स्थानाच्या आश्रयाला गेले आहेत आणि अजूनही असें एकही आरण्य, एकही टेंकडी, एकही पवित्र स्थळ क्वचितच असेल कीं, ज्याला लोकवार्तेनें अमुक एका महा साधूचा आश्रम म्हणन पूजार्हता आणली नाहीं.

ही म्हण प्रसिद्धच आहे कीं, "वहातें पाणी शुद्ध, फिरता साधु पवित्र."

आर्यवर्तांत जे ब्रह्मचर्याश्रमाचा अवलंब करतात ते बहुधा आपल्या आयुष्याचा बराचसा भाग, निरनिराळीं तीर्थें करीत भरतखंडांतल्या सर्व प्रांतांतून फिरण्यांत घालवितात. अशा रीतीनें आपल्यावर जसा कांहीं ते गंज चढू देत नाहींत आणि त्याच वेळीं प्रत्येक मनुष्याच्या घरीं धर्म नेऊन पोंचवितात. हिंदुस्थानाच्या चार कोंपऱ्यांत असलेल्या चारी आश्रमांची यात्रा ही ऐहिक गोष्टींचा ज्यांनीं त्याग केला आहे त्यांना अवश्यकच आहे.

हे सर्व विचार आपल्या तरुण ब्रह्मचाऱ्याच्या मनांत असतील; पण आमची खात्री आहे कीं, यात्रा करण्यांत ह्या सर्वांहून त्यांचा महत्वाचा हेतु म्हणजे त्याची ज्ञानतृष्णा. त्याच्या पंथाचे बहुतेक धर्मग्रंथ ज्या भाषेंत लिहिले आहेत ती द्रविडी भाषा त्याला येत होती, आणि श्री चैतन्य देवांच्या पंथाच्या वैष्णवांच्या जुन्या बंगालीशीं तो चांगला परिचित होता. ह्यावरून आपल्याला असें अनुमान काढतां येतें कीं, दक्षिण हिंदुस्थानांत आणि बंगाल्यांत त्यांचा निवास कांहीं थोडाच झाला नसेल. ह्या शिवाय त्यांच्या प्रवासाविषयीं आपल्याला फारच थोडी माहिती आहे.

पण त्याच्या तरुणपणांतले मित्र त्याच्या एका ठिकाणच्या जाण्यावर फार जोर देतात. ते म्हणतात, काठेवाडांतल्या गिरनार पर्वताच्या शिखरावर पहिल्यानें योगमार्गाच्या रहस्यांत त्यांचा प्रवेश करून दिला गेला.

बौद्ध लोक ज्याला इतका पवित्र मानतात तो हाच पर्वत. त्याच्याच पायथ्याशीं सर्व राजांतला दिव्य राजेश्वर जो अशोक त्याची पहिल्यानें शोधून काढलेली आज्ञा ज्या खडकावर खोदलेली आहे तो प्रचंड खडक

आहे. अरण्यांनीं झांकलेलें आणि पुष्कळ काळपर्यंत गिरनार पर्वतश्रेणीपैकींच लहान लहान टेंकड्या म्हणून गणले गेलेले राक्षसी स्तूपमंडप, विस्मृतीच्या अनेक शतकांत त्याच्या आंत होते. बौद्ध धर्म ज्याची आज सुधारलेली आवृत्ति समजला जातो आणि आश्चर्याची गोष्ट कीं, जो आपला हा जग जिंकीत चाललेला वंशज पुनः अर्वाचीन हिंदुधर्मात विरून जाईपर्यंत शिल्पकलेंतले विजय मिळविण्याच्या क्षेत्रांत उतरला नव्हता, त्या पंथांतही ह्या पर्वताला अद्याप कांहीं कमी पवित्र गणीत नाहींत.

महान अवधूत गुरु दत्तात्रयांनीं आपल्या निवासांनीं गिरनार पर्वत पावन केला अशी हिंदु लोकांत प्रसिद्धि आहे. आणि लोकवार्ता आहे कीं, त्याच्या शिखरावर अजूनही पूर्णतेला गेलेल्या महान योग्यांचें भाग्यवानाला दर्शन होतें.

आपल्या तरुण ब्रम्हचाऱ्याच्या आयुष्यक्रमांतला ह्या नंतरचा महत्वाचा फरक तो काशीजवळच कोठें तरी भागीरथीच्या तीरीं एका संन्याशाचा शिष्य असतांना झालेला आपल्याला दिसतो. तो संन्यासी योगी होता. नदीच्या उंच काठांत एक गुहा खणून त्यांत तो राहत असे. गाझीपूरच्या जवळ गंगेच्या कांठावरच्या जमीनींत एक खोल भुयार खणून त्यांत राहण्याची आपल्या ह्या महन्तांची जी पुढें चाल असे, ती ह्याच योग्यापासून त्यांनीं उचलली असें दिसतें.

जेथें आवाजांनीं मन चलित होत नाहीं आणि जेथील हवा समशीतोष्ण असते, अशा स्थलीं किंवा गुहेंत राहण्याच्या पद्धतीवर योगी नेहमींच विशेष जोर देतात.

ह्याच काळीं काशीमध्यें एका सन्याशाजवळ तो अद्वैत तत्वज्ञानांचा अभ्यास करीत असे, अशी आणखी आपल्याला माहिती मिळते.

ह्याप्रमाणें पुष्कळ वर्षें प्रवासांत, अभ्यासांत आणि योगांत घालविल्यावर हा तरुण ब्रह्मचारी पुनः ज्याठिकाणीं तो वाढला होता त्याठिकाणीं आला. त्याचा चुलता जर ह्या वेळेला जिवंत असता, तर कदाचित् त्याला ह्या मुलाच्या चेहऱ्यांत, पूर्वीच्या एका महर्षीला आपल्या मुलाच्या चेहऱ्यांत

जें तेज आढळलें व त्यानें जे उद्गार काढलें 'वत्सा, तुझें वदन आज ब्रह्माच्या तेजानें प्रदिप्त दिसतें आहे,' तें तेज आढळलें असतें. पण ज्यांनीं त्याचें घरीं आदरानें स्वागत केलें, ते त्याच्या बाल्यांतलें त्याचे नुसते सोबती होते. कोत्या विचाराच्या आणि न संपणाऱ्या श्रमाच्या जगांत त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं प्रवेश केला होता; अशा तऱ्हेच्या जगानें त्यांच्यापैकीं बहुतेकांवर आपला हक्क मिळवला होता.

तथापि ज्याच्या स्वभावाची त्यांना नेहमींची ओळख झाली होती, त्या त्यांच्या शाळेंतल्या सोबत्यांच्या व खेळगड्यांच्या साऱ्या वर्तनांत आणि स्वभावांत कांहीं तरी फरक गूढ—त्यांच्यामध्यें भय आणि विस्मय उत्पन्न करणारा असा फरक झाला होता. पण त्यामुळें त्यांच्यांत आपणही अशाच तऱ्हेचें शोधन करावें अशी ईर्षा उत्पन्न झाली नाहीं. तो फरक म्हणजे जो ह्या त्रासांनीं आणि भौतिक गोष्टींनीं भरलेल्या जगाच्या पलीकडे गेला आहे, अशा पुरुषांत जें अज्ञेय रहस्य असते तें होय, एवढें त्यांना कळलें; आणि इतकेंच त्यांना पुरेंही होतें. तें अन्तःस्फुर्तीनेंच त्याला मान देऊं लागलें; त्याबद्दल त्यांनीं कांहीं प्रश्न विचारलेच नाहींत.

मध्यंतरीं ह्या महापुरुषांतलें विशेष ज्यास्त ज्यास्तच सुस्पष्ट होऊं लागले. आपल्या काशींतल्या मित्रासारखेंच त्यांनीं जमीनींत एक भुयार खणलें आणि त्यांत तासच्या तास ते राहूं लागले. नंतर फारच विस्मयकारक आहारनियमांची पद्धति सुरूं झाली. सारा दिवसभर ते आपल्या लहान आश्रमांत आपलीं कर्में करीत असत. आपल्या आवडत्या श्रीरामचंद्राची पूजा करीत, सुग्रास अन्न शिजवीत—ह्या कलेंत ते अतिशय निपुण होते अशी प्रसिद्धी आहे,—देवाला निवेदन केलेलें तें सारें अन्न गरिबांना आणि आपल्या मित्रमंडळींना वाटून देत, रात्र पडेपर्यंत कोणाला काय पाहिजे इकडे लक्ष्य देत, आणि मग ते सारे निजले म्हणजे हे तरुण सत्पुरुष हळूंच निघत, पोहून गंगा ओलांडून दुसऱ्या कांठाला जात. तेथें ते सर्व रात्र आपल्या योगासनांत आणि प्रार्थनांत घालवीत, उजाडण्यापूर्वीं परत येत,

आपल्या मित्रांना उठवीत, आणि पुनः आम्हीं हिंदुस्थानांत म्हणतो तो ‘ परपूजनाचा ’ त्यांचा नित्यक्रम चालवीत.

ह्या कालांत त्यांनीं आपल्या स्वतःचा आहार रोज रोज थोडा थोडा कमी करीत आणला. असें सांगतात कीं, अखेरीस ते एक मूठभर कडु निंबाचीं पानें किंवा थोडीशीं तांबडीं मिरीं खाऊन दिवसभर रहात. नंतर त्यांनीं दररोज रात्रीं गंगेच्या परतीरच्या आरण्यांत जावयाचा आपला पाठ सोडून दिला आणि आपल्या गुहेंत आपला ज्यास्त ज्यास्तच काळ काढूं लागले. असे सांगतात कीं, एकसारखे दिवस नि महिने ध्यानांत गर्क होऊन ते गुहेंतच रहात आणि मग बाहेर येत. ह्या मधल्या एवढ्या मोठ्या कालांत ते कशावर रहात असत हें कोणालाच ठाऊक नाहीं. म्हणून लोक त्यांना पव्हारी बाबा—वायु भक्षून रहाणारे—असें म्हणूं लागले.

ही जागा आपल्या आयुष्यांत ते कधींच सोडीत नसत. एकदां असें झालें कीं, ते इतके दिवस त्या गुहेंत राहिले कीं, लोकांनीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें असें ठरविलें; पण पुष्कळ दिवसानंतर बाबा आंतून निघाले आणि साधूंच्या मोठ्या मेळ्याला त्यांनीं भंडारा वाटला.

जेव्हां ते ध्यानांत मग्न नसत तेव्हां ते गुहेच्या तोंडाशीं असलेल्या एका खोलींत रहात; तेथें असतांना ते त्यांच्या भेटीला आलेल्या मंडळींची भेट घेत. बाबांची कीर्ति पसरावयाला लागली. ह्या महात्म्याशीं आमचा परिचय करून द्यावयाचें श्रेय गाझीपूरच्या अफू खात्यांतले राय बहादूर राय गगनचंद्र यांच्याकडे आहे. राय गगनचंद्र आपल्या स्वाभाविक उदारमनस्कतेमुळें आणि आध्यात्मिकतेमुळें सर्वांना प्रिय झाले आहेत.

भरत वर्षांतल्या दुसऱ्या पुष्कळ महापुरुषांप्रमाणें बाबांच्या आयुष्यांतही कांहीं विलक्षण किंवा खळबळ करून सोडणारी बाह्य चळवळ नव्हती. गुरूनें शब्दांनीं ज्ञान द्यावयाचें नाहीं, तर प्रत्यक्ष आपल्या जीवनक्रमानें ज्ञान द्यावयाचें, मग ज्यांची स्वीकार करण्या इतकी तयारी झालेली आहे, त्यांच्याच ठिकाणीं सत्य फलद्रूप होईल, हें जें हिंदूचें शिक्षणाचें ध्येय आहे, त्याचें हें एक आणखी उदाहरण आहे. ह्या तऱ्हेचे पुरुष आपल्याला जें

कळतें तें उपदेशिण्याच्या अगदीं विरुद्ध असतात, कारण त्यांची खात्री झालेली असते कीं, नुसत्या शब्दांनीं कधींही सत्याला नेतां येत नाहीं, तर फक्त आंतल्या शिक्षणानेंच नेतां येतें. त्याच्या दृष्टीनें धर्म म्हणजे समाज-संबधीं वर्तन ठरवण्याचें एक साधन नसतें, तर ह्या जीवनांतल्या सत्याचा शोध लावण्याचा उत्कट प्रयत्न त्या सत्याची प्रत्यक्ष प्रतीति असते.

एका क्षणापेक्षां दुसरा क्षण अधिक चांगला असतो, हें त्यांनां संमत नाहीं. अनंत कालांतला प्रत्येक क्षण दुसऱ्या प्रत्येक क्षणाऱ्याच किंमतीचा असल्यामुळें धर्माचीं सत्यें मरणाची वाट न पहतां, समोरासमोर, आतां आणि येथें पाहिली पाहिजेत ह्यावर त्यांचा जोर असतो.

प्रस्तुत लेखकानें ( श्रीविवेकानंदांनीं ) एका प्रसंगीं ह्या महंतांना आपण जगाला साहाय्य करण्याकरतां आपल्या गुहेच्या बाहेर कां येत नाहीं, ह्याचें कारण विचारलें होतें. पहिल्यानें त्यांनीं आपल्या स्वाभाविक विनयाला आणि विनोदाला अनुसरून खालचें जोरदार उत्तर दिलें.

" कांहीं गुन्हा करीत असतांनां एक दुष्ट मनुष्य पकडला गेला आणि त्याबद्दल शिक्षा म्हणून त्याचें नाक कापण्यांत आलें. त्याला आपलें तें नाक नसलेलें तोंड जगाला दाखविण्याची अगदीं लाज वाटली आणि आपल्या स्वतःचा पुरा वीट आला, म्हणून तो एका अरण्यांत पळून गेला आणि तेथें जमीनीवर एक व्याघ्रचर्म पसरून कोणी जवळ पास आहे, असें त्याला वाटलें कीं, आपण ध्यानांत अगदीं निमग्न झाल्याचें तो सोंग करूं लागला. ह्या वर्तनानें लोक दूर रहाण्याऐवजीं त्यांचे घोळकेच्या घोळके ह्या चमत्कारिक साधूला मान देण्याकरतां त्याच्याजवळ ओढले गेले, आणि त्याला आढळून आलें कीं, त्याच्या वनवासानें पुनः एकदां सुखाचें जीवन त्याला मिळवून दिलें. अशा तऱ्हेनें कांहीं वर्षें लोटलीं. अखेरीस भोंवतालचे लोक ह्या मौनवृत्ति धारण केलेल्या, ध्यानस्थ सत्पुरुषाचा कांहीं तरी उपदेश ऐकावयाला अगदीं उतावीळ झाले. त्यांतल्या त्यांत एका तरुण गृहस्थाला आपला त्या पंथांत प्रवेश व्हावा अशी विशेषच उत्कंठा उत्पन्न झाली. गोष्ट अशा थरावर आली कीं, आतां ह्यापुढें यत्किंचित देखील

दिरंगाई झाली, तर साधुबुवांची कीर्ति कमी व्हावयाला लागावी. तेव्हां त्यानें एक दिवस आपलें मौन मोडलें आणि त्या उत्साही तरुण गृहस्थाला आपल्या बरोबर एक वस्तरा आणावयाला सांगितलें. तो तरुण गृहस्थ आपल्या आयुष्यांतली सर्वांत मोठी इच्छा इतक्या त्वरित तृप्त होणार, ह्या भावी आशेनें आनंदित होऊन दुसऱ्या दिवशीं उजाडलें नाहीं, तोंच वस्तरा घेऊन आला. ह्या निनाकी साधूंनीं त्याला हातांत घेतला, उघडला, आणि अगदीं गंभीर आवाजांत 'हे तरुण गृहस्था, ह्या पंथांत माझा प्रवेश अशा रीतीनें झाला. मी तसाच तुझाही करून देतों. जेव्हां तसा प्रसंग येईल तेव्हां तूंही ह्यांचप्रमाणें मोठ्या मेहनतीनें दुसऱ्यांना ह्या पंथाची दीक्षा दे.' असें म्हणत एका झटक्यानें त्याचें नाक कापून टाकलें. लाजेमुळें तरी त्या तरुण गृहस्थाला ह्या चमत्कारिक दीक्षेचें गूढ फोडता येईना. तेव्हां त्यानेंही आपल्या शक्त्यनुसार आपल्या गुरूचा उपदेश अंमलांत आणला. अशा रीतीनें नाक कापलेल्या साधूंचा एक सबंध पंथच देशभर पसरला. मी असाच दुसरा एक पथ काढावा अशी का तुझी इच्छा आहे?"

पुढें, ते ज्यास्त गंभीर मनोवृत्तींत असतांना जेव्हां पुनः प्रश्न केला, तेव्हां उत्तर मिळालें,—

"शारीरिक साहाय्य हेंच फक्त एक शक्य साहाय्य आहे, असें तुला वाटतें काय? शरीराची अगदीं हालचाल केल्यावांचूनही एका मनाला दुसऱ्या मनांना साहाय्य करणें शक्यच नाहीं काय?"

दुसऱ्या एका प्रसंगीं जेव्हां त्यांना विचारण्यांत आलें कीं, "आपल्या-सारख्या महायोग्यानें, श्रीरघुनाथजींच्या मूर्तींच्या पूजा, अगर यज्ञाग्नींत बलिहवन वगैरेंसारखीं कर्में कां करावी? नवशिक्याकरतां म्हणून हीं कर्में सांगितलीं आहेत." तेव्हां उत्तर मिळालें, "आपल्या स्वतःच्याच कल्याणाकरतां प्रत्येकजण कर्में आचरीत असतो असें धरूनच तुम्ही कां चालतां? एकाला दुसऱ्याच्या कल्याणाकरितां कर्म करणें शक्य नाहीं काय?"

तसेंच आणखीं त्यांच्या आश्रमांत चोरी करावयाला आलेल्या चोराची गोष्ट प्रत्येकानें ऐकलीच आहे. साधूला पाहिल्या बरोबर तो चोर घाबरला

आणि त्यानें चोरलेल्या जिन्नसांचें गांठोडें तसेंच टाकून देऊन पळून गेला. ह्या महन्तांनीं तें गांठोडें उचललें, त्याच्या पाठीमागें ते धांवत सुटले आणि अखेरीस पुष्कळ मैलपर्यंत वेदम धांवून त्याला गांठले. नंतर बावांनीं त्या चोराच्या पायांशीं तें गांठोडें ठेवलें आणि डोळे आंसवांनीं भरलें आहेत अशा स्थितींत त्याला हात जोडून त्याच्या करण्यांत आपण अडथळा आणला ह्याबद्दल त्याची क्षमा मागितली आणि ज्या अर्थीं आतां ते जिन्नस त्याचे आहेत, आपले नाहींत; त्या अर्थीं त्यानें त्यांचा स्वीकार करावा म्हणून त्याच्या फारच विनवण्या केल्या.

तसेंच अगदीं खात्रीलायक आधारावरून आम्हाला असें सांगितलें आहे कीं, एकदां बावांना एक नाग डसला. पुष्कळ तासपर्यंत त्यांचें देहावसान झालें असेंच लोकांना वाटलें; पण ते सजीव झाले आणि जेव्हां त्यांच्या मित्रांनी त्यांना ह्याबद्दल विचारलें तेव्हां त्यांनीं एवढेंच उत्तर दिलें कीं, 'तो नाग माझ्या आवडत्याचा निरोप घेऊन आला होता.'

त्यांची अतिशय सभ्यता, पराकाष्ठेचा विनय, आणि नितांत निसर्गप्रीति आपल्याला माहित आहे, तेव्हां ह्यावर विश्वास ठेवावयाला कांहींच हरकत नाहीं. सर्व तऱ्हेचीं शारीरिक दुःखें म्हणजे 'त्यांच्या आवडत्याकडचे दूतच' होते; आणि त्या दुःखापासून त्यांना भयंकर वेदना होत असतांनाही दुसऱ्या कांहीं नांवानें त्यांना उल्लेखलेलें त्यांना ऐकवत देखील नसे.

त्यांच्या ह्या प्रेमाचा आणि विनयाचा भोंवतालच्या लोकांवर देखील परिणाम होई. त्यांच्या ठिकाणीं देखील ते दिसूं लागत. बाबा रहात असत त्या स्थलाच्या भोंवतालच्या खेडे गावांत जे हिंडले आहेत, ते ह्या विलक्षण पुरुषाचा अगदीं न बोलतांनाही आसपासच्या मंडळीवर केवढा परिणाम होत असे ह्याबद्दल साक्ष देतील.

अलिकडे ते कोणाच्याही दृष्टीस पडत नसत. जेव्हां ते आपल्या जमीनीच्या पोटांतल्या एकांत स्थानांतून बाहेर येत, तेव्हां मध्यें दार बंद ठेवूनच ते बाहेरच्या लोकांशीं बोलत. यज्ञाच्या अग्नींत दिलेल्या हवींचा धूर

बाहेर आला किंवा पूजेचें साहित्य तयार करण्याचा आवाज ऐकूं आला म्हणजे ती ते गुहेंतून बाहेर आले असें समजण्याची नेहमींची खूण असे.

हातांत घेतलेलें काम कितीही क्षुद्र असो त्यावेळीं ते त्यांत अगदीं गढून जात हा त्यांचा मोठा विशेष होता. श्रीरघूनाथजीच्या पूजेच्या बाबतींत जी काळजी दाखविली जाई किंवा जितकें लक्ष्य पुरविलें जाई तीच काळजी आणि तितकेंच लक्ष्य एकादें तांब्याचें भांडें घांसण्यांत देखील दृष्टीस पडे. त्यांनीं आम्हाला एकदां जें कर्माचें रहस्य सांगितलें होतें, त्याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण तेंच होते. "जणूं काय साधनें हींच साध्य आहेत असें समजून साधनावर प्रीति केली पाहिजे; साध्या इतकीच त्यांच्याबद्दल काळजी घेतली पाहिजे."

दु:खें आणि यातना किंवा आत्मतिरस्कार ह्यांचा परिणाम नेहमीं दीनतेंत झालेला दिसतो; बाबांची नम्रता ह्या जातीची नव्हती. एकदां त्यांनीं फार गोड तऱ्हेनें एक तत्व आम्हाला सांगितलें. "राजा, ज्यांच्याजवळ कांहीं नाहीं—इतकेंच नाहीं, तर ज्यांनीं सर्व मिळकतीबद्दलची, आपल्या स्वत:च्या आत्म्याबद्दलची देखील इच्छाही टाकून दिली आहे—अशांचें धन म्हणजे परमेश्वर आहे." बाबांची नम्रता ह्या तत्वाच्या प्रत्यक्ष अनुभतीपासून उत्पन्न झालेली होती.

ते प्रत्यक्ष उपदेश असा कधींच करीत नसत. कारण तसें करणें म्हणजे स्वत:ला दुसऱ्यापेक्षां वरच्या दर्जाचें समजून गुरूची पदवी धारण करण्यासारखें होतें. पण एकदां कां बरोबर कळ दाबली गेली कीं, तें कारंजें अनंत ज्ञानानें फवारून जाई; तरीही त्यांचीं उत्तरें नेहमीं अप्रत्यक्षच असत. आपण स्वत: दुसऱ्याला कांहीं सांगतों आहों असें दाखविणारीं तीं नसत; तर दुसऱ्यानें तिसऱ्याला काय सांगितलें हें दाखविणारी तीं असत.

दिसण्यांत पव्हारी बाबा उंच आणि जरासे मांसल दिसत. त्यांना एकच डोळा होता; आणि त्यांच्या वास्तविक वयाच्यापेक्षां ते बरेच लहान दिसत. त्यांच्या आवाजाइतका गोड आवाज आजपर्यंत आम्हीं ऐकला नाहीं. आयुष्याच्या शेंवटच्या दहा बारा वर्षांत लोकांच्या दृष्टीला ते अगदींच

पडत नसत. त्यांच्या खोलीच्या दाराच्या मागें कांहीं बटाटे आणि थोडें लोणी ठेवण्यांत येई. ते समाधींत नसले आणि भुयाराच्या बाहेर आलेले असले, तर कधीं कधीं रात्रीं हे जिन्नस आंत घेतले जात. आपल्या गुहेंत बाबा असले म्हणजे त्यांना ह्यांची देखील गरज नसे.

ह्याप्रमाणें, योगशास्त्राच्या सत्यतेची साक्ष पटविणारें आणि शुचिता, विनय आणि प्रीति यांचें जिवंत उदाहरण असलेलें हें जीवन चाललें होतें.

आम्ही पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, बाबांनीं समाधि उतरली ह्या गोष्टीची सूचना देणाऱ्या त्या धुराला एक दिवस जळलेल्या मांसाचा वास येऊं लागला. भोंवतालच्या लोकांना हें काय होतें आहे याची कल्पना होईना; पण जेव्हां तो वास अतिशयच येऊं लागला, आणि धुराचे लोटच्या लोट येतांना दिसूं लागले, तेव्हां त्यांनीं दरवाजा फोडला. पहातात तों त्या महायोग्यानें आपल्या यज्ञाच्या अग्नींना आपल्या स्वतःचाच शेंवटचा हवी अर्पण केला होता. थोडक्याच वेळांत राखेच्या ढीगाशिवाय त्या शरीराचें कांहींच राहिलें नाहीं.

महाकवि कालिदासाचे शब्द आपण लक्ष्यांत ठेवूं या.–

अलोकसामान्यमचिन्त्य हेतुकम् ।
द्विषन्ति मन्दाश्चरितं महात्मनाम् ॥

" मूर्ख असतात ते मोठ्यांच्या कृतींना दोष देत असतात. कारण तीं कृत्यें लोकोत्तर असतात, आणि त्यामुळें सामान्य जनांना त्यांचीं कारणें जाणतां येत नाहींत."

पण आम्हाला त्यांची जी माहिती आहे त्यावरून आम्ही एवढेंच सूचवून ठेवतो कीं, त्या महात्म्याला आपला अंतकाल जवळ आला आहे हें कळलें; आणि मरणानंतरही आपला कोणाला भास होऊं नये ह्या इच्छेनें त्यानें सर्व शरीर आणि मन पूर्ण स्वाधीन असतांना आर्यांचा हा शेंवटचा महायज्ञ केला.

प्रस्तुत लेखक ह्या ब्रह्मीभूत सत्पुरुषाचा कृतज्ञतापूर्वक अत्यंत ऋणी आहे. तेव्हां तो ह्या अत्यंत क्षुद्र ओळी, त्यानें ज्यांची भक्ति आणि सेवा केली त्या अत्यंत मोठ्या गुरुदेवांपैकीं एकाच्या स्मरणार्थ अर्पण करीत आहे.

---

# भगवान् बुद्ध.

( भगवान् बुद्धांबद्दलच स्वतंत्र असें स्वामीजींचें भाषण किंवा निबंध नाहीं. अमेरिकेंत डेट्रॉइट येथील एका व्याख्यानांत, त्यांतल्या त्यांत त्यांच्याबद्दल स्वामीजी बरेंच बोलले. त्याचें भाषांतर शेंवटीं दिलें आहे. पण भगवान् बुद्धांबद्दलच्या स्वामीजींच्या मताची पुरीशी कल्पना व्हावी म्हणून आरंभीं भगिनी निवेदितांच्या 'मला जसे दिसले तसे माझे गुरुदेव' ह्या पुस्तकाच्या ह्या संबंधाच्या एका प्रकरणाचें भाषांतर देत आहों. वर सांगितलेलें व्याख्यान आणि हें भाषांतर ह्या दोहोंच्या वाचनानें, महात्म्यांचा परिचय वाचकांना स्वामीजींकडूनच व्हावा ही जी आमची इच्छा ती भगवान् बुद्धांच्याही बाबतींत पूर्ण होईल असें वाटतें. लेखक. )

स्वामींच्या बौद्धिक मनोविकारांपैकीं सर्वांत मुख्य मनोविकार म्हणजे त्यांना वाटत असलेली बुद्धांबद्दलची पूज्यबुद्धि हा होता. त्यांना जो त्याबद्दल इतका आनंद होई, त्याचें कारण ह्या भारतीय जीवनाला ऐतिहासिक आधार आहे हेंही कदाचित् असेल. ते नेहमीं म्हणत "धर्मोपदेशकांपैकीं बुद्ध आणि महंमद ह्या दोघांच्या अस्तित्वाबद्दल आपली पूर्ण खात्री आहे. कारण मित्रांप्रमाणें शत्रूंही असण्याचें भाग्य त्यांचेंच होतें." ह्या महात्म्यांतल्या, बुद्धीला पटेल तेंच सांगण्याच्या विशेषांकडे पुनः पुनः ते वळत. त्यांच्या दृष्टीनें बुद्ध म्हणजे नुसता सर्व आर्यांतला श्रेष्ठतम पुरुषच नसून जगानें आजपर्यंत पाहिलेला 'एकटाच परिपूर्ण शहाणा पुरुष' होता. स्वामी म्हणत, "बुद्ध म्हणजे कांहीं कोणी व्यक्ति नव्हती, तर ती प्रत्यक्ष प्रतीतीच होती. तुम्ही सर्व जण तींत प्रवेश करा. ही घ्या किल्ली!"

चमत्कार करण्याची ग्राम्य इच्छा त्यांना शिवलीदेखील नव्हती. सर्व मंडळीच्या देखत एका मुलानें नुसत्या एका शब्दानें कांठीच्या टोंकांतून रत्नजडित पेला काढला. त्याबद्दल कांहींच विकार न दाखवितां बुद्धांनीं त्या मुलावर धर्म बहिष्कार घातला. ते म्हणाले 'धर्म म्हणजे कांहीं जादुगारी, छां छूं, नाहीं.'



भगवान् बुद्ध.

भगवानांच्या विनयाच्या आणि स्वातंत्र्याच्या कल्पना किती विस्तृत होत्या! अंबापाली ही वेश्या होती, तरी तिनें दिलेल्या भोजनाचा त्यांनीं स्वीकार केला. हें अन्न आपल्याला मारील असें त्यांना माहित असूनही आपलें शेंवटचें कृत्य नीच, म्हणजे पतित गणले त्यांशीं संबंध ठेवल्याचें असावें ह्या इच्छेनें त्यांनीं महाराचें अन्न ग्रहण केलें. आणि अखेरीस यजमानाचे 'ही मला तूं शेंवटची मुक्ति दिलीस' म्हणून आभार मानून त्याला आदराचा निरोप पाठविला. किती शांत! किती पौरुषपूर्ण! निःसंशय बुद्ध म्हणजे जनावरांच्या कळपांतला म्होरक्या बैल, मनुष्यांमधला चंद्र होय.

आणि जरी ते अत्यंत विचारानें चालणारे होते, तरी दयेच्या बाबतींत तरी निदान ते फार विलक्षण होते. राजगृह येथें यज्ञाकरतां आणलेल्या अजापुत्रांचे प्राण वाचविण्यासाठीं ते स्वतःचे प्राण द्यावयाला तयार झाले! एकदां तर त्यांनीं एका वाघाची भूक शमवण्यासाठीं आपल्या स्वतःचा देह देऊं केला होता! दुसऱ्याकरतां सर्वस्वाचा ज्यांनीं त्याग केला आहे, अशा पांचशे पुरुषांच्या दयेचा अर्क काढला तेव्हां भगवान् बुद्ध तयार झाले!

ज्याला त्यांनीं कधीं पाहिलें नाहीं, ज्याचें नुसतें नांव देखील त्यांना माहित नाहीं, अशा कोणाच्या तरी प्रेमासाठीं ते कसे अश्रु ढाळीत होते, ती त्यांच्या तरुणपणांतली हकीकत जेव्हां ते सांगतात, आणि त्यांच्या त्या स्थितीची, मनुष्य जातीला ईश्वराबद्दल वाटणाऱ्या मनोभावनेशीं, तुलना करतात, तेव्हां, त्यांचें तें मन इतकीं सगळीं युगें ओलांडून आपल्यासुद्धां हृदयांत जाऊन बसतें. धर्माला लोकोत्तरतेच्या आधारापासून पूर्णपणें मोकळें करूनही पुनः लोकाचारांचें नियमन करण्याची त्याची शक्ति, लोकांच्या अंतःकरणाला जाऊन भिनण्याचें त्याचें जीवभूत तत्व, पूर्वीच्या इतकेंच कायम ठेवणें ही गोष्ट त्यांना एकट्यालाच करतां आली. त्यांच्या स्वतःतील अत्यंत विभूतिमत्वाच्या सामर्थ्यानें आणि त्यामुळें त्यांच्या काळच्या लोकांवर झालेल्या परिणामामुळें हें शक्य झालें.

एकदां संध्याकाळीं स्वामीजी, आमच्यापैकीं कांहीं जणांसाठीं भगवान् बुद्धांची पत्नी जी यशोधरा तिला ती एकंदर हकीकत जशी वाटली असेल, त्याप्रमाणें तिची रचना करून सांगत होते. इतिहासाच्या शुष्क हाडांचा सांफळा इतक्या पूर्ण, अगदीं मनाला खात्रीं पटणाऱ्या जीवित्वानें भरलेला, मी तोंपर्यंत कधींही पाहिला नव्हता. श्रीविवेकानंद हिंदू साधु होते. तरी त्यांना, समर्थ विभूतींत, ज्याला ते थोडक्यांत 'लग्नाच्या यूरोपीय कल्पना' म्हणत त्या कल्पना असाव्या आणि भगवान् बुद्धांप्रमाणेंच अशा विभूतींनीं स्वतःची पत्नी स्वतः पाहून पसंत करण्याचा आग्रह धरावा, हें अगदीं स्वाभाविक वाटे. स्वामींनीं त्या वाग्दानाच्या आणि उत्सवाच्या त्या आठवड्यांतील बारिक सारिक गोष्ट देखील हृदयंगम तऱ्हेनें सांगितली. नंतर लग्न होऊन बरेच दिवस झालेल्या त्या दोघांचे आणि निरोप घेण्याच्या त्या महनीय रात्रीचें चित्र आलें. देवांनीं गीत म्हटलें, "बुद्धा, जागा हो! ऊठ! आणि सर्व जगाला साहाय्य कर!" ज्याच्या मनांत विचारांचें तुंबळ युद्ध चाललें होतें, असा तो राजपुत्र पुनः पुनः स्वस्थ निजलेल्या आपल्या पत्नीच्या शयनाजवळ आला. "ज्यानें त्याला इतका त्रास दिला असा तो कोणचा प्रश्न होता? कां जगाकरतां तो जिला दुःखांत टाकणार होता ती तेथें होती? अंतःकरणांत सगळी तळमळ ही चालली होती. स्वतःची त्यांना मुळींच पर्वा नव्हती!"

नंतर तो विजय आणि त्याचा न टाळतां येणारा परिणामच असलेला तो शेंवटचा निरोप आल्यावर बुद्धांनीं त्या राजकन्येच्या पायाचें ती मुळींच जागी होऊं नये इतकें हळूच चुंबन घेतलें! स्वामी म्हणाले, "महापुरुषांच्या अंतःकरणाबद्दल तुम्ही कधींच विचार केला नाहीं कां? ते फार, फार, फार, मोठे आणि लोण्याहून मऊ असतात!"

नंतर सात वर्षांनीं, घराच्या छपरांत मुळींच न रहाणारा, हंतरुणावर कधींच न निजणारा, फलें मुळें भक्षण करणारा, भगवीं वस्त्रें धारण केलेला आणि आतां भगवान् बुद्ध झालेला, तो राजपुत्र पुनः कपिलवस्तूला आला. त्यानें यशोधरेला सोडलें तेव्हांपासून तीसुद्धां बायकांच्या मार्गा-

प्रमाणें धर्म कृत्यांत आयुष्य घालवित तेथेंच रहात होती. भगवानांनीं प्रवेश केल्यावर यशोधरेनें, पत्नीनें करावें त्याप्रमाणें त्यांच्या वस्त्राचा पदर धरला; आणि मग तिला आणि आपल्या पुत्राला भगवानांनीं सत्यज्ञानाचा उपदेश केला. पण, जेव्हां त्यांचें बोलणें संपलें आणि ते जाणार तोंच, शुद्धीवर आल्यासारखी होऊन ती आपल्या मुलाकडे वळली आणि म्हणाली, "ऊठ, लवकर जा, आणि आपल्या बापाजवळ पितृ धनांतला आपला हिस्सा माग!"

आणि जेव्हां त्या मुलानें "आई, माझा बाप कोणचा" म्हणून विचारलें तेव्हां तिनें "तो पुरुषसिंह जातो आहे, तोच तुझा बाप!" असें उत्तर दिलें. दुसरें कोणचेंही उत्तर देणें तिला कमीपणाचें वाटलें असतें. तो मुलगा, शाक्य कुलाचा तो वारस, "बाबा, माझा वारसाचा हिस्सा द्या" असें म्हणाला. तीनवेळां त्यानें तें मागणें मागितलें. तेव्हां आनंदाकडे वळून बुद्ध म्हणाले, "दे त्याला तें."

मुलाच्या अंगावर भगवें वस्त्र टाकण्यांत आलें. नंतर, यशोधरेला पाहून आणि पतिसंनिध असावें अशी तिची फार इच्छा आहे, हें जाणून तो मुख्य शिष्य म्हणाला, "आपल्या धर्मांत बायका आल्या तर चालतील का? तिला सुद्धां आम्ही हें भगवें वस्त्र देऊं का?"

बुद्ध म्हणाले, "ज्ञानाच्या बाबतींत पुरुष आणि स्त्री हा भेद कसा असेल? स्त्रीला ह्या पंथांत येतां येणार नाहीं, असें मी केव्हांही म्हटलें का? पण आनंदा, हें तुला विचारावेंसें वाटलें!"

अशा रीतीनें यशोधराही शिष्यीण बनली. आणि मग सात वर्षांत कोंडून राहिलेली सर्व प्रीति आणि दया जातक जन्मकथांत उसळून बाहेर पडली! कारण त्या सर्व कथा तिच्याकरतां निर्माण झाल्या! दोघेही पांचशेंदा आत्म विसरून गेले आणि मग दोघेही एकमेकांत मिसळूनच पूर्णतेंत पोंहोचले.

"—होय, ते अगदीं असेंच घडलें! यशोधरा आणि सीता? त्यांचें सत्व पहावयाला शंभर वर्षेंही पुरलीं नसतीं!"

स्वामींनीं गोष्ट संपविली, थोडावेळ अगदीं शांत राहिले आणि मग आपल्याशींच विचार करूं लागले, "नाहीं! नाहीं! अजून आपल्यांत मनोविकार आहेत! आपण सारेजण विनत होऊं! प्रत्येकजण म्हणूं या 'मी ह्या ध्येयाच्या स्थितीला गेलों नाहीं!' दुसऱ्या कोणाचीही भगवान् बुद्धांशीं तुलना करण्याचें धाडस कोणीं करूं नये"

स्वामी सबंध हिंदुस्थानभर फिरत होते, तेव्हां एकदां, जेथें पहिल्यानें भगवान् बुद्धांचे अवशेष सांपडले त्याच स्थळीं (बहुतकरून,) त्यांना त्या अवशेषांना स्पर्श करण्याची परवानगी देण्यांत आली होती. पुढें जेव्हां बोलण्यांत ह्या गोष्टीचा संबंध येई, तेव्हां त्यावेळीं स्वामींचें मन ज्या आदरानें व निश्चयानें परिपूर्ण झालें होतें, त्याच आदरानें व निश्चयानें त्यांचें मन भरून जाई. परमेश्वराच्या अवतारांची पूजा करावी कीं काय, ह्याबद्दल त्यांना जर कोणीं प्रश्न विचारला, तर त्यांचे उद्गार निघत, "नाझारीथच्या येशूच्या वेळीं जर मी जुड्डाला रहात असतों, तर त्याचे पाय मी माझ्या अश्रुंनीं नाहीं, तर माझ्या काळजाच्या रक्तानें प्रक्षाळिले असते."

एकदां एक गृहस्थ चुकून स्वामींना बुद्धानुयायी म्हणाला. त्याला स्वामी म्हणाले, 'बुद्धानुयायी! भगवान् बुद्धांच्या दासांच्या दासांचा मी दास आहे!' जणूं काय, त्यांच्या पूज्यबुद्धीला प्रत्यक्ष बुद्धांवर निष्ठा ठेवणारा ही पदवी आपल्या मानानें फारच वरची वाटली!

श्रीबुद्धांच्या विभूतीला इतिहासाचा आधार आहे, ह्या एकाच गोष्टीनें कांहीं स्वामी त्यांच्याविषयीं इतके मोहून गेले नव्हतें. निदान इतकेंच महत्वाचें ह्याचें दुसरें कारण म्हणजे ह्या अडीच हजारवर्षांपूर्वींच्या जगानें पाहिलेल्या जीवनाशीं स्वामींच्या डोळ्यासमोरच्या त्यांच्या गुरुदेवांच्या जीवनाचें जें नेहमीं साम्य दिसें तें होय. भगवान् बुद्धांत त्यांना श्रीरामकृष्ण परमहंस दिसत; आणि श्रीरामकृष्ण परमहंसांत त्यांना भगवान् बुद्ध दिसत.

एके दिवशीं स्वामी भगवानांच्या निधन प्रसंगाचें वर्णन करीत असतांना आवेशांत हे त्यांचें विचार परिस्फुट झाले. एका वृक्षाखालीं श्री

बुद्धांकरितां एक घोंगडी हंतरली होती आणि त्यावर महाभाग बुद्ध मरणाची प्रतीक्षा करीत 'वनराजाप्रमाणें आपल्या उजव्या कुशीवर' पडले होते. इतक्यांत कोणी त्यांच्या उपदेशाकरितां त्यांच्याकडे धांवत आलें. हा कोणी मध्येंच गडबड करावयाला आला असें समजून त्यांच्या शिष्यवृंदानें कांहींही करून गुरुदेवांच्या मरणकालच्या शय्येजवळ शांतता राखली असती; पण भगवानांनीं ती गडबड ऐकली आणि म्हणाले, "असें करूं नका; त्याला इकडे येऊं द्या. तथागत नेहमीं तयार आहे." आपल्या कोंपरावर ते टेंकले आणि त्यांनीं उपदेश केला. चारदां हें असें झालें; आणि मग आतां आपण मरणाला मोकळे झालों असें बुद्धांना वाटलें; पण पहिल्यानें आनंद शोक करीत होता, त्याच्यावर ते जरासे रागावले. ते म्हणाले, 'बुद्ध ही कांहीं कोणी व्यक्ति नाहीं; ती प्रत्यक्ष प्रतीति आहे. आणि कोणालाही त्या स्थितीला पोहोंचतां येईल.' आपल्या अगदीं शेंवटच्या शब्दांनीं त्यांनीं आपल्या शिष्यांना कोणालाही भजण्याची मनाई केली.

ही अमर्त्य कथा अशीच शेंवटपर्यंत चालली होती; पण जेव्हां स्वामी 'आपल्या कोंपरावर ते टेकले आणि त्यांनीं उपदेश केला' हें वाक्य उच्चारल्या बरोबर थांबले आणि मधेंच थोडक्यांत म्हणाले, "हें पहा; रामकृष्ण परमहंसांच्या बाबतींत हें अगदीं असेंच दिसून आलें" तेव्हांचा क्षण ऐकणारांना फारच महत्वाचा वाटला.

बौद्ध मताचें ऐतिहासिक व तात्विक महत्व नेहमीं स्वामींच्या मनांत घोळत असें. त्यांच्या भाषणांत किंवा लेखांत ह्याबद्दल एकदम मधूनच संबंध किंवा आधार येई त्यावरून त्यांचे विचार नेहमीं बौद्धमतांनीं भरलेले असत असें दिसतें. एकदां त्यांनीं बुद्धाच्या उपदेशांतले पुढील उद्गार काढले. "रूप, वेदन ( मन आणि पांच इन्द्रियें ह्यांना होणारें ज्ञान ), सन्न ( त्या प्रत्येक ज्ञानाला अनुसरून असलेली अमूर्त कल्पना ), संखर ( त्या साही इंन्द्रियांच्या प्रवृत्ति आणि शक्ति ) आणि विनन ( विचार ) हीं पंच महातत्वें एकसारखीं एकमेकांशीं खळबळ करीत असतात. आणि ह्यांच्यांत माया असते. कोणच्याही लाटेबद्दल कांहींच सांगता यावयाचें नाहीं;

कारण ती मुळी नसतेच. ती होती आणि नाहींशी झाली. मानवा, ध्यानांत धर तूं समुद्र आहेस!" स्वामीपुढें म्हणाले, "कपिलांचे तत्वज्ञान हेंच होतें; पण त्यांच्या ह्या शिष्यश्रेष्ठानें त्यांत हृदय घालून त्याला जीव आणला.

आणि मग त्या शिष्याचे (बुद्धांचे) उद्गार जेव्हां स्वामींच्या मनाच्या कर्णेंद्रियावर आदळलें, तेव्हां ते क्षणभर थांबले आणि धम्मपदांतल्या आत्म्याला सांगितलेल्या अमर कामगिरीकडे वळले.

"पुढें जा. तुला रुळलेल्या मार्गाशीं काय करावयाचें आहे! कशाचें भय धरूं नकोस; कशाची काळजी करूं नकोस. एकटाच गेंड्यासारखा भटकत रहा! सिंह कधीं आवाजांना घाबरतो का? वायु कधीं जाळ्यांत सांपडतो का? कमलदलाला कधीं पाणी भिजवतें का? अगदीं त्यांच्या-सारखाच रहा! गेंड्यासारखा एकटाच भटकत फीर!"

पहिल्या महासभेच्या अधिवेशनाबद्दल स्वामी सांगत होते; अध्यक्ष कोणाला करावें ह्याबद्दल वाद चालला होता; स्वामी म्हणाले. "त्यांची शक्ति कशांत होती ह्याची तुम्हाला कल्पना करतां येते का? एकजण म्हणाला, 'आनंदानें अध्यक्ष व्हावें. भगवानांचें त्याच्यावर फार प्रेम होतें.' पण दुसरा पुढें झाला, आणि म्हणाला, 'नाहीं! तो दोषी आहे. मृत्यु-शय्येपाशीं तो रडला.' झालें; आनंद नापसंत ठरला!"

स्वामी पुढें म्हणाले, "पण बुद्धांना, सगळेंच जग उपनिषदांच्या उच्च स्थानाला नेतां येईल असें वाटे हीच त्यांची मोठी घात करणारी चुक झाली. मग स्वार्थानें सगळी घाण केली! श्रीकृष्ण अधिक कारस्थानपटु होते; त्यामुळें त्यांच्या कल्पनेंत ज्यास्त व्यवहार्यताही आहे; पण बुद्ध एक रतिभरही मागे घ्यावयाला तयार नव्हते. तोंपर्यंत थोडेंसें मागें घेण्यामुळें अवतारांचा देखील नाश झालेला जगानें पाहिला. त्याची कोणाला ओळख पटली नाहीं आणि ते निरुपयोगी झाले. पण बुद्धांनीं एक रेंसभर मागें घेतलें असत; तर त्यांच्या आयुष्यांतच सर्व आशियाभर ते देव म्हणून पूजले गेले असते. पण त्यांचें एकच उत्तर ठरलेलें. 'बुद्धता ही प्राप्त करून घेतां

येण्याची पदवी आहे; बुद्ध म्हणजे कोणी व्यक्ति नाहीं!' निःसंशय जगांत पूर्ण समंजस असें बुद्धच झाले; आजपर्यंतच्या मनुष्यांत 'बुद्ध' असें तेवढेंच!"

क्लेशांची पूजा करण्याकडे असलेल्या ख्रिस्त्यांच्या कलाबद्दल स्वामी जो तिरस्कार दाखवीत त्यांत हिंदूची विचाराची विशदता दिसून येते. पश्चिमेकडे असतांना लोक स्वामींना म्हणाले 'बुद्धाला जर क्रूसावर चढविलें असतें, तर त्यांचें श्रेष्ठत्व अधिक परिणामकर झालें असतें.' ह्याला स्वामी 'रोम लोकांची पशुता' म्हणत. अगदीं खालच्या प्रतीची आणि पशु जीवन द्योतक आवड आचाट कर्मांकडे असते; म्हणून जगाला वीर रस प्रधान महाकव्यें नेहमीं आवडणारच; पण तरीही भारताच्या नशीबानें त्यानें 'खोल दरींत डोकें खालीं करून फेंकून दिलेल्या सैतानांचें वर्णन करणाऱ्या एकाद्या मिल्टनला जन्म दिला नाहीं. मिल्टनच्या त्या सर्व महाकाव्याची ब्राउनिंगच्या दोन ओळी देऊन योग्य खरेदी करतां आली असती. गोष्टींतलें अचाट कृत्यांचें वर्णन, स्वामींच्या मतानें, रोमन मनावर परिणाम करी. ख्रिस्ताच्या जीवनांतला त्याला क्रूसावर चढवल्याचा जो भाग आहे, त्याच्या योगानेंच ख्रिस्ति धर्माचा रोमन जगभर प्रसार झाला. स्वामी म्हणाले, "होय! होय! तुम्हाला पाश्चात्यांना कांहीं अद्भुत पाहिजे! अजून जीवनांतल्या प्रत्येक लहान सहान गोष्टींतलें काव्य तुम्हाला दिसत नाहीं! एक तरुण माता आपल्या मृत पुत्राला घेऊन बुद्धांकडे आली. त्या कथेपेक्षां अधिक सौंदर्य कशांत आहे! तसेंच तें आजा-पुत्रांचें उदाहरण! बुद्धांचा राज्य सोडण्याचा महत्त्याग कांहीं आर्यावर्तांत नवीन नव्हता. इतका त्याग तर पूर्वी कितीदां केला गेला होता. पण निर्वाणानंतर मग किती काव्य आहे पहा!"

"पावसाची रात्र होती. भगवान् एका गुराख्याच्या झोंपडीशीं आले, आणि पागळणाऱ्या छपरीखालीं भिंतीशीं उभे राहिले. पाउस धों धों पडत होता; आणि वादळ वाढत होतें."

आंत त्या गुराख्यानें खिडकींतून एक चेहऱ्याची आकृति पाहिली आणि विचार करूं लागला, 'अरे वा! भगवीं वस्त्रें! रहा तेथेंच उभा! तें ठिकाण तुझ्या मानानें चांगलें आहे!' नंतर त्यानें गाण्याला आरंभ केला.

'माझीं गुरें गोठ्यांत आहेत आणि आगटी चांगली पेटली आहे. माझी घरधणीन सुरक्षित आहे आणि माझीं पोरें गोड झोंप घेत आहेत! तेव्हां मेघांनो, तुम्हाला वाटले तर आज रात्रभर तुम्ही खुशाल वर्षाव करा!'

"बुद्ध बाहेरून उत्तर करतात, 'माझें मन संयत झालेलें आहे; माझीं इन्द्रियें अंतर्मुख बनलीं आहेत; माझें हृदय मोकळें आहे; तेव्हां मेघांनो, तुम्हाला पाहिजे तर आज रात्रभर तुम्ही खुशाल वर्षाव करा!"

पुनः गुराखी गाऊं लागला.–"पिकांची कापणी झाली आहे; आणि कडबा आंवारांत रचून ठेवला आहे. ओढे भरून गेले आहेत; आणि रस्ते पक्के आहेत. तेव्हां मेघांनो, तुम्हाला पाहिजे तर तुम्ही आज रात्रभर खुशाल वर्षाव करा."

"त्यावर भगवानांनीं उत्तर दिलें. असेंच पुढें कांहीं वेळ चाललें. अखेरीस तो गुराखी आश्चर्यचकित झाला; त्याला पश्चात्ताप वाटला; तो उठला आणि शिष्य बनला."

"तसेंच त्या न्हाव्याच्या गोष्टीहून अधिक सुंदर तें काय असणार?"

'माझ्या–एका क्षुल्लक न्हाव्याच्या–घरावरून भगवान् गेले!'

'मी–एक क्षुल्लक न्हावी–त्यांच्याकडे धांवलों, तसे ते वळले आणि माझी वाट पाहूं लागले!'

'मी म्हटलें' "भगवान् मी आपल्याशीं बोलूं का?"

आणि ते म्हणाले, "होय!"

मला–एका क्षुल्लक न्हाव्याला ते 'होय' म्हणाले!

'मग मी विचारलें,' "माझ्यासारख्यांच्या करतां निर्वाण आहे का?"

आणि त्यांनीं उत्तर दिलें, "होय!"

माझ्याकरतां–एका क्षुल्लक न्हाव्याकरतां–देखील निर्वाण आहे!

'आणि मी म्हटलें, "महाराज, मी आपला आनुयायी होऊं का?"

तेव्हां ते म्हणाले "हो, अलबत!"

मला–एका क्षुल्लक न्हाव्याला–देखील अनुयायी व्हावयाला हरकत नाहीं!

'पुनः मी विचारलें,' "देवा, मी आपणाजवळ राहूं का?"

तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, "कांहीं हरकत नाहीं!"

मला–एका क्षुल्लक न्हाव्याला–त्यांनीं उत्तर दिलें "कांहीं हरकत नाहीं!"

एकदां स्वामी बौद्धधर्म आणि त्याचीं तीं तीन युगें–पांचशें वर्षांचें धर्म युग, पांचशें वर्षांचें मूर्तियुग आणि पांचशें वर्षांचें तंत्रयुग–ह्याचा इतिहास संक्षेपानें सांगत होते. इतक्यांत मध्येंच त्यांनीं विषय सोडला आणि म्हणाले, "आपल्या स्वतःचीं देवळें आणि पुजारी असलेला बौद्धधर्म म्हणून केव्हां एक निराळा धर्म हिंदुस्थानांत होता, अशी तुम्ही कल्पना करून घेऊं नका. तसें कांहीं नव्हतें. ती कल्पना नेहमीं हिंदुधर्मांतच अंतर्भूत होती. एका काळीं बुद्धांचें वर्चस्व फार होतें आणि त्यानें सर्व राष्ट्र मठवासप्रिय बनलें इतकेंच" ह्या विचारांचें खरेंपण जसजसा काळ लोटेल आणि ह्या बाबतींत ज्यास्त अभ्यास होईल तसतसें विद्वानांना पटेल. ह्या मताप्रमाणें, काश्मीर वगैरे ज्या हिंदुस्थानच्या बाहेरच्या देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला, त्या देशांत त्या धर्माचें निराळा धर्म म्हणून स्वतंत्र अस्तित्व आहे.

मातृभूत सनातन धर्मांत आणि बौद्धधर्मांत जे कांहीं महत्वाचे विरोध आहेत त्यांतला हा एक आहे. हिंदूचा विश्वास असा आहे कीं, एकच जीवात्मा निरनिराळ्या योनींतून जातांना त्याचीं प्राक्तन कर्में सांठवत जातात. बौद्धधर्म शिकवतो, जीवात्मा एकच असतो असें जें वाटतें तें भासानें वाटतें म्हणून तें निरंतर खरें नाहीं. वास्तविक आपण जीं कर्में करतों तीं दुसरा जीवात्मा घेतो आणि नवीन बीजारोपण करण्याकरतां आपल्या अनुभूतींतून निघून जातो. ह्या परस्पर विरुद्ध मतावर स्वामी नेहमीं विचार करीत बसत असत. त्यांच्यासारखेंच ज्यांना बुद्धीच्या पलीकडचें जीवन प्राप्त झालें आहे त्यांना पूर्णत्वानें, आणि ज्यांना त्या जीवनाच्या नुसत्या सांवलींत रहातां येतें त्यांना त्याहून कमी अंशानें देह धारण केलेल्या आत्म्याची स्थिति म्हणजे एकसारखें जखडून टाकणारें पारतंत्र्य वाटतें. पिंजऱ्यांत सांपडलेला हा आत्म्याचा पक्षी, देह्याच्या पिंजऱ्याच्या दांड्यांच्या बाहेर आणि पलीकडे, त्याचें प्राप्तव्य आणि ध्येय असलेल्या, शुद्ध कल्पना,

एकाग्र झालेल्या मनोवृत्ति, अविकारी सुख, आणि छायारहित प्रकाश, ह्यांना पाहून एकसारखा त्या दांड्यांवर आपलें पंख हांपटून वंड करीत असतो. तेव्हां, अशांना देह म्हणजे एकमेकांशीं जोडण्याचें साधन वाटण्याऐवजीं, मधें आलेला एक पडदा, एक भिंत वाटते. सुखें आणि दु:खें म्हणजे व्यक्तीच्या ज्ञानाच्या लोलकांतून दिसणारीं हिरवीं निळीं किरणें आहेत. एकसारखा जो ध्यास लागलेला असतो तो ह्या विकृत प्रकाशाच्या पलिकडचा, अगदीं श्वेत, अविभक्त आणि प्रदीप्त प्रकाश मिळावा हा असतो. रूढ असलेल्या कल्पनांच्या संबंधानें स्वामी जे अगदीं मनांतून उतावळेपणानें बाहेर येणारें उत्कट उद्गार काढीत, त्यांच्यांत ही मनोवृत्ति दिसते. "देहांतलें एक आयुष्य म्हणजे बंदिवासाचीं दहा लाख वर्षें! आणि लोकांना अशा अनेक जीवनांची आठवण व्हावयाला पाहिजे आहे!" तरी अनुभवाच्या एकाच लांब सांखळींतील निरनिराळ्या जन्मांच्या दुव्यांच्या परस्परांशीं असलेल्या संबंधाचा प्रश्न सोडविण्यांत स्वामींना गंमत वाटे. पुनर्जन्माचें मत, एक निश्चित तत्व म्हणून ते केव्हांही सांगत नसत. त्यांना स्वत:ला तें मत म्हणजे वस्तुस्थितीची संगति लावणारी एक शास्त्रीय कल्पना—मनाला पूर्ण पटणारी कल्पना—वाटे. इन्द्रियांपासूनच सगळें ज्ञान मिळतें ही जी पाश्चात्यांची कल्पना त्यापेक्षां पुनर्जन्माची कल्पना किती श्रेष्ठ आहे हें ते नेहमीं तुलनेनें दाखवीत. पण तरी तत्वत: बुद्ध धर्माची कल्पना खरी ठरणें शक्य आहे हा प्रश्न रहातोच. एकच जीवात्मा इतके जन्म घेतो ही तरी कल्पना चुकीची, मायेंतलीच, नाहीं का? एक परब्रह्म, परमात्मा, तेवढा खरा. अनेक जीवात्मे हे नुसते भास आहेत. ह्या अंतिम ज्ञानाच्या वेळेला ती असत्य सांगण्यांत येते. एकांतांत पुष्कळ विचार केल्यावर एक दिवस स्वामी म्हणाले, "हो! बौद्ध कल्पना खरी असली पाहिजे! पुनर्जन्माची—एकच जीव पुन: देह धारण करतो ही—कल्पना मृगजळ आहे. पण ह्या कल्पनेला अद्वैताच्याच मार्गानें पोहोंचलें पाहिजे!"

कदाचित् ह्याप्रमाणें बौद्ध मत सिद्ध करावयाला अद्वैताची मदत घेऊन बुद्धांच्याजवळच विरोधानें शंकराचार्यांना बसविण्यांत स्वामींना मोठी गंमत

वाटत असावी. त्या दोन्ही इतिहासांचा संगम कदाचित् त्यांना इतका आनंद देत असावा. कारण अशा तऱ्हेनें त्यांपैकीं कोणचीही एकच कल्पना दुसरीच्या साहाय्याशिवाय अपूर्ण आहे असें ते दाखवीत. 'बुद्धांचें हृदय आणि शंकराचार्यांचें डोकें' ही त्यांची मनुष्याच्या शक्य असलेल्या पूर्णत्वाची नेहमींची व्याख्या असे.

हल्लींच्या आणि पूर्वीच्या हिंदू मनांतला फरक ह्याच गोष्टींत आहे कीं, हल्लींच्या कल्पनेंत बुद्धाला आणि बौद्ध धर्माला नेहमीं स्थान मिळणार; हें स्वामींनीं जाणलें असेल काय? गुप्तांच्या काळापासून भरतवर्षाच्या शिक्षणांत मुख्य वर्चस्व रामायण आणि महाभारत यांचें होतें; लोकांच्या मनःप्रवृत्तीच्या दृष्टीनें त्यांत आतां आशोकाच्या आणि त्याच्या पूर्वींच्या कालाच्या इतिहासाची भर घातली पाहिजे असें त्यांनीं आपल्या मनाशीं ठरवलें असेल का? अशा रीतीनें हिंदुधर्मांतलें जीवन बौद्ध धर्माच्या देशांच्या नाड्यांत घालावयाचें आणि उलट, ह्या कन्यास्थानीं असलेल्या देशांच्या ज्ञानानें पोसलेला मातृभूत धर्म स्वयं प्रस्थापित करून खुद्द हिंदुस्थानांतच जोम आणि बल आणावयाचें ह्या गोष्टीचा आशीयावर केवढा परिणाम होईल हा विचार त्यांच्या मनांत आला असेल का? तें कसेंही असो, आपल्याला हें केव्हांही विसरतां कामा नये कीं, ह्या दोन धर्मांच्या कमानीच्या आधाराचा दगड स्वामींना हिंदुधर्मांतच दिसे. सर्वांना आपल्यांत समाविष्ट करावयाचें सामर्थ्य त्यांना मुळींत नाहीं तर आईत आढळलें. ती माता (हिंदुधर्म) श्रेष्ठ आणि प्रियकर आहे; तेव्हां तिच्याजवळ आपल्या सर्व अवतारामध्यें अतिशय धीरोदात्त आणि पहिल्या असलेल्या ह्या अवताराला केव्हांही जागा आहे. त्याच्या संघा करतां तिच्याजवळ जागा आहे; त्याचा उपदेश धर्म तिला कळतो आणि त्याबद्दल तिला पूज्यभाव वाटतो; त्यानें तिच्याकडे आणलेल्या बालकांच्याबद्दल तिला सहानुभूति वाटते आणि त्यांचें स्वागत करावयाला ती तयार आहे. पण ती असें केव्हांही म्हणणार नाहीं कीं, त्यांच्याच अंतर्दृष्टीला तेवढें सत्य दिसते, भिक्षूच्या जीवनाच्या नियमांनींच मुक्ति मिळते, पूर्णतेचा मार्ग

फक्त एकच आहे. “ बौद्ध आणि हिंदुधर्मांतल्या विरोधांतला मुख्य मुद्दा, बौद्ध धर्म, ‘ हा सारा भास आहे हें जाणा ’ असें म्हणतो आणि हिंदुधर्म, ‘ ह्या सर्व भासांत तें सत्य आहे हें जाणा ’ असें म्हणतो, ह्या गोष्टींत आहे ” बौद्ध धर्मावर स्वामींचे सर्वांत महत्वाचे उद्गार हे आहेत. ‘ ह्या सर्व भासांत तें सत्य आहे ’ हें कसें जाणावयाचें ह्याबद्दल कांहींही रेखाटलेला मार्ग घांवण्याच्या भानगडींत हिंदुधर्म केव्हांच पडला नाहीं. बौद्ध धर्माची आज्ञा भिक्षूचें आयुष्य स्वीकारल्यानेंच पाळता यावयाची; पण कोणाच्याही आश्रमांत हिंदुधर्माची आज्ञा शेंवटाला नेतां येते. त्या एका सत्याकडे जाणारेच सर्व मार्ग आहेत. हिंदुधर्माच्या सर्वांत महात्वाच्या आणि उच्चातम तत्वांपैकीं एक तत्व एका लग्न झालेल्या स्त्रीच्या आज्ञेवरून एका संन्याशाला ( काश्यपाला ) उपदेश करणाऱ्या एका खाटकाच्या ( धर्मव्याधाच्या ) तोंडून वदविलें आहे! तेव्हां ह्यामुळें बुद्धधर्म म्हणजे मठवासीयाचाच धर्म झाला, हिंदुधर्मही वानप्रस्थाश्रमाची स्तुति करतो, तरी तो ईश्वराच्या प्रातीचा मार्ग म्हणजे आपलीं रोजचीं कर्तव्यें,—मग तीं कांहीं का असेनात—अगदीं बरोबर बजावणें हा आहे असेंच नेहमीं सांगणारा धर्म आहे.

---

## ( डेट्राइट येथील व्याख्यान ).

प्रत्येक धर्मांत आत्मनिष्ठेचें कोणचें तरी एक अंग अधिक प्रामुख्यानें परिणत झालेलें आपल्याला आढळतें. बौद्ध धर्मांत फलाशेशिवाय कर्म करावयाचें, कार्याकरितां कार्य करावयाचें, हें अंग अत्यंत परिणत झालें आहे. ब्राह्मणधर्म आणि बुद्धधर्म यामध्यें घोंटाळा करूं नका. ह्या देशांत आपल्याकडून तसें होणें अगदीं साहजिक आहे. बौद्धधर्म हा आमच्या नानापंथांपैकीं एक पंथ आहे. महात्मा गौतमांनीं तो प्रस्थापित केला. त्या वेळच्या त्या कधीं न संपणाऱ्या आध्यात्मिक वादविवादांनीं, वेड्या खुळ्या धर्म विधींनीं व विशेषतः वर्णभेदानें त्यांच्या मनांत अगदीं उद्वेग उत्पन्न झाला होता. त्यांचा त्यांना वीट आला होता. कांहीं लोकांना वाटे

आम्हाला जन्मामुळेंच एक विशिष्ट अधिकार प्राप्त झाला आहे, तेव्हां आम्ही ज्यांचा आमच्यासारखा जन्म झालेला नाहीं, त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाचे आहोंत. हीच जातिभेदाची कल्पना. तसेंच ते विलक्षण भिक्षुकी काव्याच्या विरुद्ध होते. तेव्हां त्यांनीं एक धर्म दिला. त्यांमध्यें मुळींच हेतु-शक्ती नाहीं; तसेंच ईश्वर अगर दुसऱ्या अतींद्रिय गोष्टींविषयीं आपल्याला मुळींच विचार करावयाची जरूरी नाहीं, असें तो प्रतिपादतो. भगवान् बुद्धांना नेहमीं विचारीत कीं, 'परमेश्वर आहे का'? तेव्हां 'मला माहिती नाहीं' असें तें उत्तर देत. सद्वर्तनासंबंधानें जेव्हां कोणी त्यांना प्रश्न विचारी, तेव्हां ते सांगत "चांगलें करा आणि चांगलें व्हा."

एकदां पांच ब्राह्मण त्यांच्याकडे आले आणि आमच्या वादाचा निकाल लावा, असें त्यांना म्हणूं लागले. एक म्हणाला, "महाराज, माझें धर्म पुस्तक सांगतें कीं, ईश्वर असा असा आहे, आणि अशा अशा मार्गानें त्याची प्राप्ती होते." दुसरा म्हणाला, "ह्याचें म्हणणें चुकीचें आहे. माझें धर्मपुस्तक असें असें सांगतें; आणि ईश्वर प्राप्त करून घ्यावयाचा असा असा मार्ग आहे." ह्याप्रमाणेंच सर्वांनीं सांगितलें. त्यांच्या सर्वांच्या म्हण-ण्याकडे त्यांनीं अगदीं शांतपणानें लक्ष्य दिलें आणि मग एका मागून एकाला पुढील प्रश्न केला. "तुमच्या ह्या धर्मपुस्तकांपैकीं एकाद्यांत देव रागावतो, तो दुसऱ्याला इजा करतो, तो अशुद्ध आहे, असें सांगितलें आहे का?" "नाहीं महाराज. त्या सर्वांचें म्हणणें ईश्वर शुद्ध आहे, ईश्वर चांगला आहे, असें आहे."

"तर मग मित्रांनो, ईश्वर कसा आहे हें जाणतां यावें म्हणून तुम्ही आधीं शुद्ध आणि चांगलें कां बरे होत नाहीं?"

हें तर खरेंच कीं, त्यांचीं सर्व मतें मला मान्य नाहींत. मला स्वतः-लाच पुष्कळ अध्यात्म पाहिजे आहे. पुष्कळ बाबतींत माझें मत त्यांच्या-हून अगदीं निराळें आहे. पण, माझें मत निराळें आहे म्हणून, त्या पुरुषां-तलें सौंदर्य मला पहातां येऊं नये असें कांहीं नाहीं. प्रत्येकजण कांहीं ना कांहीं हेतूनें कार्य करावयाला प्रवृत्त होतो. हेतूच्या अमलापासून अगदीं


अलिप्त असे ते एकटेच होते. दुसरे पुष्कळ मोठे पुरुष होऊन गेले. त्या सर्वांचें म्हणणें कीं, ते प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार आहेत, तेव्हां जे त्यांच्यावर विश्वास ठेवतील ते स्वर्गाला जातील. पण अगदीं अंतकाळींसुद्धां भगवान् बुद्ध काय म्हणाले? "तुला कोणीही साहाय्य करणार नाहीं. तेव्हां आपल्या स्वतःची काळजी तूंच वहा आणि स्वतःची मुक्ति करून घे." त्यांनीं आपल्याविषयीं असे उद्गार काढले. "अनंत ज्ञानाला, आकाशासारख्या अनंत ज्ञानाला, बुद्ध म्हणतात. मी गौतम, त्या स्थितीला प्राप्त झालों आहे. जर तुम्हीही प्रयत्न कराल, तर तुम्ही सारे त्या स्थितीला जाल."

मुळीं हेतूच त्यांच्यांतून नाहींसा झालेला तेव्हां त्यांना स्वर्गाला जावयाला नको होतें आणि द्रव्याचीही जरूरी नव्हती. त्यांनीं आपला राजमुकुट आणि इतर सर्व वस्तूंचा त्याग केला आणि सागराइतक्या विशाल हृदयानें मनुष्यांच्या आणि इतर प्राण्यांच्या कल्याणाकरितां उपदेश करीत आर्यवर्ताच्या रस्त्यांतून 'मूठभर आटा' मागत ते सर्वभर हिंडलें. यज्ञविधि थांबवावयाला, प्राणिमात्राकरितां आपले जीवित अर्पावयाला, केव्हांही तयार असे ते एकटेच होते. एकदां ते एका राजाला म्हणालें. "एकादे कोंकरूं बळी देऊन जर स्वर्गास जावयाला तुम्हाला मदत होते, तर मनुष्य बळी देऊन तुमचे मोठेंच कार्य साधेल; तेव्हां मलाच बळी द्या!" राजा अगदीं विस्मित झाला. असो. ह्या पुरुषाला हेतु कसा तो माहित नव्हता! कार्यकर्त्यांच्या परिपूर्णतेचें ते प्रत्यक्ष उदाहरण होते; आणि ज्या महत्पदाला ते जाऊन पोहोंचले त्या महत्पदावरून दिसतें कीं, कार्याच्या सामर्थ्यानें आपल्यालाही उच्चतम ब्रह्ममयतेला जाऊन पोहोंचतां येईल.

ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणाऱ्यांचा मार्ग पुष्कळ सोपा असतो; पण भगवान् बुद्धांच्या चरित्रावरून दिसतें कीं, जो ईश्वर आहे कां नाहीं, हें कळावयाला कठिण म्हणून त्याबद्दल विचारच करीत नाहीं, ज्याच्याजवळ आध्यात्मिकता नाहीं, जो कोणाच्या धर्मपंथाचा नाहीं किंवा एकाद्या देवळांत अगर चर्चमध्येंही जात नाहीं आणि जो अगदीं जडवादी म्हणून निश्चित आहे, असा मनुष्यही परास्थितीला जाऊन पोहोंचतो.

त्यांच्याबद्दल विचार करावयाचा आपला अधिकार नाहीं. आहाहा! माझ्यामध्यें जर श्रीबुद्धांच्या हृदयाचा अगदीं अल्पांश असता, तर परमेश्वराच्या अस्तित्वावर बुद्धांचा विश्वास असेल किंवा नसेल; याचा विचार मीं कधीं केला नसता! दुसरे भक्तिमार्गानें, योगमार्गानें अथवा ज्ञानमार्गानें ज्या पूर्णतेच्या स्थितीला जाऊन पोहोंचतात, त्याच पूर्णतेच्या स्थितीला ते गेले. विश्वासानें अगर निष्ठेनें कांहीं पूर्णता येत नाहीं. वादाची तर मुळींच किंमत नाहीं. पोपटांनासुद्धां बडबड करतां येते. अगदीं संगरहित कर्म केल्यानेच पूर्णता येते.

# प्रोफेसर मॅक्स मुल्लर.



आपल्या ब्रह्मवादिन् पत्राचें ध्येय हें पाहिजे—

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'।

'कर्म करावयाचा तुझा अधिकार आहे; पण त्याच्या फलांवर तुझा केव्हांच अधिकार नाहीं.' तरीही कोणीही मनःपूर्वक कार्य करणारा असला, तर त्याला कार्यक्षेत्रांतून, स्वतःला ज्ञात केल्यावांचून आणि प्रकाशाचे थोडेसे किरण स्वीकारल्यावांचून जातांच येत नाहीं.

आपल्या कार्याचा आरंभ फार चांगला झाला; आणि आपल्या मित्रांनीं एकसारखी दाखविलेली कळकळ स्तुतीच्या पलिकडची आहे. विश्वासाची

मनःपूर्वकता आणि हेतूची शुद्धता ही अखेरीस विजयिनी होणार; आणि ह्या जोडीनें सज्ज असलेले कांहीं थोडे लोक इतर सर्वांच्या विरुद्ध आपल्याला प्रस्थापित करणारच करणार.

अद्भुत गोष्टी करण्याचें ज्ञान आम्हाला आहे असें सांगणाऱ्या लुच्च्या लोकांपासून दूर रहा. हें ज्ञान अशक्य आहे असें नाहीं; पण माझ्या मित्रांनो, ह्या आपल्या जगांत असें सांगणारांपैकीं शेंकडा नव्वदांच्या सांगण्याच्या मुळाशीं 'कांता, कनक किंवा कीर्ति' ह्यांपैकीं कांहीं तरी गुप्त हेतु असतो आणि राहिलेल्या दहांत नऊ जणांना आध्यात्मिक ज्ञान म्हणून भलत्याच वेडामुळें मायेच्या वैद्याची खरी अवश्यकता असते.

पहिलें मोठें काम म्हणजे शील प्रस्थापित करावयाचें, आपण म्हणतों ती प्रतिष्ठिता प्रज्ञा मिळवावयाची, हें आहे. ही गोष्ट निरनिराळ्या व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या संघटित समूहांना सारखी लागू आहे. संतापून जाऊं नका; कारण कोणचाही नवीन प्रयत्न असला—मग तो आध्यात्ममार्गांतला का असेना—कीं जग त्याबद्दल शंका घेऊं लागतेंच. गरीब बिचारें जग! कितीदां तरी त्याला लुच्च्यांनीं फसविलें आहे! कोणच्याही वाढत्या चळवळीकडे जगाची दृष्टि—संसारिक दृष्टि—जसजसी ज्यास्त संशयित होऊन पाहूं लागते, तसतसें त्या चळवळीला अधिक चांगलें. जग त्याच्यांत अडथळा आणावयाला लागलें, तर तें ह्याहून चांगलें. जर एकाद्या सत्याचा ह्या चळवळीला प्रसार करावयाचा असला, जर एकादी जगाची खरी गरज दूर करण्याकरतां ती जन्माला आलेली असली, तर लवकरच निंदेच्या जागीं स्तुति ऐकावयाला येईल आणि तिरस्काराच्या जागीं प्रेम उत्पन्न होईल. अलिकडच्या काळांत कांहीं तरी सामाजिक अगर राजकीय साध्य साधण्याकरतां धर्माचा उपयोग करण्याकडे लोकांची प्रवृत्ति असणें फार शक्य आहे. तेव्हां ह्याबद्दल सावध रहा. धर्माचे प्राप्तव्य धर्म हेंच आहे. जो धर्म ऐहिक सुस्थिति प्राप्त करून घेण्याचें एक साधन होतो, त्याला दुसरें कांहीं म्हणा, पण त्याला धर्म म्हणतां यावयाचें नाहीं; आणि मनुष्याला इन्द्रियांच्या सर्व सुखांचा पूर्ण आणि मोकळेपणानें उपभोग घेणें

ह्याच्याशिवाय दुसरें कोणचेंही ध्येय नाहीं, असें मानणें; म्हणजे मनुष्याचा आणि ईश्वराचा शुद्ध अपमान आहे.

सत्य, शुचिता, आणि निःस्वार्थता;–ज्याच्याजवळ हीं आहेत, त्याला चिरडून टाकणारी शक्ति सूर्याच्याखालीं किंवा वर कोठेंच नाहीं. ह्या शस्त्रांनीं सशस्त्र झालेला एकटा पुरुष, संपूर्ण विश्व जरी विरुद्ध उभें राहिलें तरी त्याच्याशीं झगडावयाला समर्थ असतो.

सर्वांत ज्यास्ती तुम्हाला सावधगिरी ठेवावयाची आहे, ती ही कीं, आपलें मत थोडेसें सोडून दुसऱ्याशीं संधि करावयाचा नाहीं. माझें असें म्हणणें नाहीं, कीं, तुम्ही आपलें प्रत्येकाशीं विरुद्ध व्हावें; पण चांगल्या स्थितींत अगर वाईट स्थितींत आपल्या तत्वांना तुम्ही चिकटून रहा, आणि आपल्याला पुष्टी देणारे मिळावें ह्या लोभानें त्यांच्याशीं आपलीं मतें केव्हांही जुळवून घेऊं नका. तुमचा आत्मा हा संपूर्ण विश्वाचा आधार आहे. मग कशाच्या आधाराची तुम्हाला जरूरी आहे? धिम्मेपणानें, प्रेमानें आणि चिकाटीनें धीर धरा. आज जर साहाय्यकर्ते तयार नसले, तर ते वेळेवर येतील. आपल्या पाठीमागें काय इतका वाघ लागला आहे! सर्व महत्कार्यांची खरी कार्यकारी शक्ति त्यांच्या जवळ जवळ अदृश्य असलेल्या मूळांतच असते.

बंगालच्या एका कोऱ्याकोपऱ्यांतल्या खेड्यांत गरीब ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जन्माला आलेल्या एका मुलाचा उपदेश आणि जीवन, थोड्याशा वर्षांत, आपल्या पूर्वजांना जिचें अस्तित्व स्वप्नांत देखील दिसत नाहीं, इतक्या दूरच्या भूमीला जाऊन पोहोंचेल असें कोणाला वाटलें तरी असतें का? मी भगवान् रामकृष्णासंबंधानें सांगतों आहें. प्रोफेसर मॅक्स मुल्लरनीं ह्या पूर्वींच श्रीरामकृष्णावर 'एकुणिसावें शतक' (नाइन्टीन्थ सेंचरी) ह्या मासिकांत एक लेख लिहिला आहे आणि पुरेशी सामग्री मिळाली, तर भगवानांच्या जीवनासंबंधीं आणि उपदिष्ट तत्वांसंबंधीं ह्याहून विस्तृत आणि परिपूर्ण हकीकत लिहावयाला ते आनंदानें तयार आहेत, हें तुम्हाला माहीत आहे का? प्रोफेसर मॅक्स मुल्लर म्हणजे मोठे विलक्षण पुरुष

आहेत! कांहीं दिवसांपूर्वीं मी त्यांच्या भेटीला गेलों होतों, नव्हे मी त्यांच्या दर्शनाला गेलों होतों, असेंच मी म्हणतों. कारण, जो श्रीरामकृष्णांवर भक्ति करतो–मग त्याचा पंथ कसा का असेना, त्याचें मत (धर्ममत) कांहींका असेना? त्याचा देश कोणचा का असेना–त्याची भेट म्हणजे मी तीर्थयात्राच समजतों.

**मद्भक्तानांच ये भक्ता ते मे भक्ततमा मताः**

"माझ्यावर जें प्रेम करतात त्यांचे जे भक्त असतात ते माझे सर्वश्रेष्ठ भक्त" हें खरें नाहीं का?

प्रख्यात ब्राह्मो पुढारी केशव चंद्रसेन ह्यांच्या आयुष्यांत जो एकाएकी विलक्षण बदल झाला, त्याच्या मुळाशीं कोणची शक्ति आहे, ह्याची चौकशी करावी म्हणून पहिल्यानें प्रोफेसरांना वाटलें, आणि तेव्हांपासून ते श्रीरामकृष्णांच्या जीवनाचे आणि उपदेशाचे एक कळकळीचे विद्यार्थी आणि कौतुक करणारे झाले. मीं म्हटलें. "प्रोफेसरसाहेब, आज रामकृष्णांना हजारों लोक भजत आहेत." त्यांचें उत्तर मिळालें "त्यांची पूजा नाहीं करावयाची, मग पूजा तरी कोणाची करावयाची?" प्रोफेसरसाहेब म्हणजे दयाळूपणाचा अवतार होते. त्यांनीं मला आणि स्टर्डीना आपल्याबरोबर फराळाचा आग्रह केला, त्यांनीं आम्हाला ऑक्सफोर्डमधलीं निरनिराळीं कॉलेजें आणि बोल्डिअन् लायब्ररी दाखविली; ते रेलवे स्टेशनपर्यंत आम्हाला पोहोंचवावयाला आले; आणि हें सर्व त्यांनीं कशा करतां केले; तर ते म्हणाले, 'रामकृष्ण परमहंसांच्या पट्टशिष्यांची गांठ पडावयाचें नशीब कांहीं रोजचें नसतें."

खरोखर ह्या भेटींत मला नवीनच गोष्टी कळल्या. सुंदर बागेनें परिवेष्टित असलेलें तें लहानसेसें सुरेख घर; रजगधवलमौलि झालेला तो महात्मा, त्याची ती शांत आणि प्रसन्न मुद्रा, आणि सत्तर पावसाळ्यांना दाद न देतां अजून एकाद्या आर्भकासारखेंच राहिलेले त्याचे ते अगदीं सुरकुत्या नसलेले कपाळ, आंत खोल मुळाशीं अध्यात्माची खाण भरली आहे, असें दाखविणारी त्या चेहऱ्यावरची प्रत्येक रेषा; लोकांत खळबळ करून सोड-

णाऱ्या, आणि प्रतिकार आणि तिरस्कार ह्यांना पायाखालीं तुडवून अखेरीस प्राचीन भारताच्या महात्म्यांच्या विचाराबद्दल आदर उत्पन्न करणाऱ्या त्याच्या दीर्घ कालीन आणि उत्साहपूर्ण कार्यामध्यें त्याला त्याच्या आयुष्यांत साहाय्य करणारी त्याची ती उदार मनाची पत्नि;—ते वृक्ष, तीं फुलें, ती शांतता, तें प्रसन्न आकाश,—ह्या सर्व गोष्टींनीं मला कल्पनेच्या द्वारानें प्राचीन भारताच्या वैभवाच्या कालांत—त्या ब्रम्हर्षींच्या आणि राजर्षींच्या कालांत,—त्या श्रेष्ठ वानप्रस्थांच्या कालांत,—अरुंधतींच्या आणि वशिष्ठांच्या कालांत,—परत नेऊन सोडले.

भिन्न भाषांचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्या एका विद्यार्थ्याची किंवा एका विद्वानाची आणि माझी भेट झाली नाहीं, तर ब्रह्माशीं असलेली आपली एकरूपता दररोज अनुभवणाऱ्या एका आत्म्याची, सबंध विश्वाशीं एकरूप होण्यासाठीं प्रत्येक क्षणीं वाढत चाललेल्या एका हृदयाची आणि माझी भेट झाली. जेथें इतर, शुष्क बारिक सारिक गोष्टींच्या अरण्यांत गुरफटून जातात, त्याच ठिकाणीं प्रोफेसरसाहेबांनीं जीवनाचा अक्षय्य झरा शोधून काढला! खात्रीनें त्यांच्या हृदयाचे ठोके उपनिषदांच्या गीतांशीं सांथ करीत होते,—

आत्मानं वै विजानथ अन्यां वाचं विमुंचथ ।

"केवळ आत्म्यालाच जाणा, आणि बाकी सर्व गोष्टी टाकून द्या."

प्रोफेसरसाहेब जग हालवून सोडणारे विद्वान आणि तत्वज्ञ होते; तरी त्यांच्या विद्वत्तेनें आणि तत्वज्ञानानें त्यांना आत्मानुभवाकडे अधिकाधिक उंच उंचच नेले. त्यांच्या अपरा विद्येनें, खालच्या प्रतीच्या—भौतिक—ज्ञानानें, खरोखरच त्यांना पराविद्या, वरच्या प्रतीचें—अध्यात्म—ज्ञान, मिळवावयाला मदत केली. हीच खरी विद्वत्ता. विद्या ददाति विनयं—"ज्ञानानें विनयच प्राप्त होतो." जर ज्ञान आपल्याला त्या उन्नत दिव्याचा मार्ग दाखवीत नाहीं, तर त्या ज्ञानाचा काय उपयोग?

आणि हिंदुस्थानावर त्यांचें केवढें प्रेम! माझी ती मातृभूमी; पण तिच्यावर त्या प्रेमाच्या शंभरावा हिस्सा तरी माझें प्रेम असावयाचें होतें!

त्यांचें मन अति विलक्षण आणि तसेंच अत्यंत कार्यकर होतें. अशा मनानें युक्त असलेल्या त्यांनीं पन्नासाहून अधिक वर्षे भारतीय विचाराच्या जगांतच जगण्यांत, वावरण्यांत घालविलीं; आणि संस्कृत वाङ्मयाच्या अनंत अरण्यांतल्या प्रकाशाच्या आणि छायेच्या अदलाबदली, तीं सारीं त्यांच्या अगदीं आत्म्यांत बुडून जाऊन त्यांच्या सर्व जीवनाला आपला रंग चढवीपर्यंत, अत्यंत उत्कंठेनें आणि हृदयांत वाटणाऱ्या प्रेमानें त्यांनीं अवलोकन केल्या.

मॅक्स मुल्लर हे वेदान्त्यांतले वेदान्ती आहेत. मधूनच सुरेल मधूनच बेसूर असें ध्वनि निघत असतांनाही वेदान्ताच्या गीताचें खरें मर्म खरोखरच त्यांना सांपडलें होतें. जगांतल्या पंथांवर आणि मतांवर उजेड पाडणारा एकच प्रकाश, सर्व धर्म हे ज्याची निरनिराळ्या परिस्थितीला लावल्यामुळें दिसणारीं स्वरूपें आहेत, असें एकच तत्व म्हणजे वेदान्त, आणि रामकृष्ण परमहंस म्हणजे तरी कोण होते? ह्या पुरातन तत्वाचे प्रत्यक्ष उदाहरण भूत कालाच्या आर्यवर्ताचें साकार स्वरूप, भविष्यत्कालच्या भारताची प्राक् छाया, राष्ट्रांना आध्यात्माचा दिवा दाखविणारा दीपवाहक. रत्नपारखीच रत्नाचें मोल जाणतो; ही जुनी म्हण आहे. तेव्हां भारतीय विचाराच्या आकाशांतल्या प्रत्येक नवीन ताऱ्याचा, हा पाश्चिमात्य महात्मा, प्रत्यक्ष भारतवासीयांना देखील त्याचें महत्व कळावयाच्या आधींच, अभ्यास करतो आणि त्याची योग्यता ओळखतो ह्यांत आश्चर्य आहे काय?

"आपण केव्हां हिंदुस्थानांत येणार? हिंदूंच्या पूर्वजांचे विचार त्यांच्या खऱ्या स्वरूपांत जगापुढें मांडण्याकरतां आपण इतके श्रम घेतले; तेव्हां तेथलें प्रत्येक अंत:करण आपलें स्वागत करील." असें मी विचारलें. त्या वृद्ध महात्म्याच्या तोंडावर एक प्रकारचें तेज चढलें—त्यांच्या नेत्रांत एक अश्रु चमकला, थोडासा मस्तकाला हिसका बसला आणि अगदीं सावकाश पुढील शब्द बाहेर आले. "मग मी परत येणार नाहीं. तुम्हाला मग मला तेथेंच जाळावें लागेल!" ह्याच्यापुढें प्रश्न विचारणें म्हणजे ज्या प्रांतांत मनुष्याच्या हृदयांतलीं पवित्र गुह्यें सांठविलेलीं असतात त्या प्रांताच्या

मर्यादेचें अक्षय्य उल्लंघन करणेंच होतें. कोणाला ठाऊक! कवी म्हणतो त्यांतलें तर कांहीं हें नसेल!

तच्चेतसा स्मरति नूनमबोध पूर्वम् ।
भावान्तराणि जननान्तरसौहृदानि ॥

"त्याच्या हृदयांत पूर्णपणें बिंबलेल्या जन्मान्तरांच्या मैत्रींचें तो आपल्या मनानें स्मरण करतो आहे."

त्यांचें जीवन म्हणजे जगावर एक उपकार आहे! त्यांनीं आपल्या आयुष्याचें हल्लींचें क्षेत्र बदलण्यापूर्वीं आणखी पुष्कळ पुष्कळच वर्षें जावोत!

---

# रामकृष्ण; त्यांचें चरित्र आणि वचनें.

पश्चिमेकडच्या संस्कृतामधल्या विद्वानांत प्रोफेसर मॅक्स मुल्लर हे अग्रगण्य आहेत. ह्याच्यापूर्वीं जी संपूर्ण संहिता कोणाला मिळणें देखील मुष्किल पडे, ती ऋग्वेद संहिता इंडिया कंपनीच्या उदार देणगीनें आणि प्रोफेसरसाहेबांच्या कित्येक वर्षांच्या महान् परिश्रमानें फार काळजीपूर्वक आणि सुंदर तऱ्हेनें छापून होऊन लोकांना मिळण्याला सुलभ झालेली आहे. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या भागांतून मिळवलेल्या हस्तलिखित प्रतींपैकीं पुष्कळांच्या मूलाक्षरांचे आकार अगदीं भिन्न भिन्न असावयाचे आणि त्यांतले पुष्कळ शब्द चुकीचे असावयाचेच. तेव्हां एकाद्या परक्या गृहस्थाला,—मग तो कितीही विद्वान असो,—हीं संस्कृत अक्षरें बरोबर आहेत किंवा चुकीचीं आहेत हें शोधून काढावयाचें आणि त्याहूनही विशेषतः, अतिशय सूत्रमय आणि घोंटाळ्याच्या टीकेचा अर्थ विशद करावयाचा हें किती कठिण जाईल याची आपल्याला सहज कल्पना देखील करतां यावयाची नाहीं. ऋग्वेदाचें प्रसिद्धीकरण हें प्रोफेसर मॅक्स मुल्लर यांच्या आयुष्यांतलें महत्कृत्य आहे. ह्यांशिवाय प्राचीन संस्कृत वाङ्मयांतच जणूं काय ते रहात आणि आपल्या आयुष्याचा सगळा वेळ घालवीत; पण असें असलें, तरी ह्यावरून असा अर्थ निघत नाहीं कीं, प्रोफेसरसाहेबांना अजूनही आर्यवर्त—यज्ञांतून निघालेल्या धूरांनीं ज्याचें आकाश भरलें

आहे,–अनेक वशिष्ट, विश्वामित्र, जनक आणि याज्ञवल्क्य यांनीं जें युक्त आहे,–ज्यांतील प्रत्येक घर आपल्या आपल्या गार्गीच्या किंवा मैत्रेयीच्या सांनिध्यानें फुलतें आहे,–आणि जे वेदिक नियमाप्रमाणें गृह्य सूत्रांच्या आज्ञांप्रमाणें स्वतः चालतें आहे,–असें, पूर्वीप्रमाणेंच वेदमंत्राची घोषणा करणारें राहिलें आहे असें वाटें. अन्य धर्माच्या परक्या राजाच्या पाया-खालीं तुडविलें गेल्यामुळें आणि आपल्या जुन्या शिष्टाचारपद्धति, धर्म-विधि आणि चाली रीति ह्यांनीं वियुक्त झाल्यामुळें, अर्धवट मृत झालेल्या आधुनिक भारताच्या, अगदीं सहज लक्ष्य न जाणाऱ्या कोंपऱ्यांतसुद्धां काय काय नवीन गोष्टीं घडत आहेत, ह्याबद्दल प्रोफेसरसाहेबांना ते नेहमीं भारताच्या घडामोडीकडे फार लक्ष्यपूर्वक पहात असल्यामुळें, चांगली माहिती असते. त्यांचे पाय हिंदुस्थानच्या किनाऱ्याला अजून केव्हांच लागले नाहींत; म्हणून, येथील पुष्कळ ॲंग्लो इन्डियन, हिंदुस्थानांतील लोकांच्या चाली रीति, शिष्टाचार पद्धति आणि नीतिकल्पना ह्या विषयीं त्यांनीं जीं मतें दिलीं आहेत त्यांबद्दल शुद्ध तिटकारा दाखवितात. पण ह्या ॲंग्लो-इन्डियन अधिकाऱ्यांच्या हें लक्ष्यांत यावयाला पाहिजे कीं, त्यांनीं येथें जन्मभर वास्तव्य केलें, तरी किंवा ह्याच देशांत त्यांचा जन्म होऊन ते येथेंच वाढविले गेले असले, तरी सुद्धां त्यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या समाजाच्या स्थितीसंबंधानें त्यांना जी कांहीं एकादी विशेष माहिती मिळत असेल, त्याशिवाय इतर वर्गाच्या लोकांविषयीं ते पूर्ण अज्ञानीच असतात. कांहीं दिवसापूर्वीं एका प्रसिद्ध ॲंग्लोइन्डियन अधिकाऱ्यानें लिहिलेल्या 'हिंदुस्थानांतील वास्तव्य' ( रेसिडन्स इन् इन्डिया ) ह्या नांवाच्या पुस्त-कांतल्या 'तेथल्या जनान्यांतलीं रहस्यें' ( नेटिव्ह झनाना सीक्रेट्स ) ह्या प्रकरणापर्यंत मी वाचतां वाचतां आलों. रहस्य समजून घेण्याच्या मनु-ष्याच्या हृदयांतील प्रबल इच्छेमुळें कदाचित् असेल मी तें प्रकरण वाचलें; तों, मला त्यांत काय दिसून आलें? एतद्देशीय मनुष्यांच्या जीवनांतील रहस्याबद्दलची आपल्या देशबांधवांची उत्कट जिज्ञासा,–आपला भंगी, त्याची बायको आणि तिचा प्रियकर ह्यांच्यांतल्या एका प्रेमाच्या लाथ-

ळयाचें वर्णन करून—पुरी तृप्त करण्याचा ह्या बढ्या अँग्लोइन्डियन लेखकाचा निश्चय दिसला! आणि अँग्लोइन्डियन समाजानें त्या पुस्तकाचें जें अगदीं मनापासून स्वागत केलें, त्यावरून दिसतें कीं, लेखकाचा हेतु शेंवटास गेला आणि आपलें पुस्तक पाहून त्याला कृतकृत्य झालेंसें वाटलें! "प्रिय मित्रांनो, अशीच तुमची भरभराट असो!" ह्याहून अधिक तें आम्ही काय म्हणणार? गीतेंत भगवान् म्हणतात तें किती बरोबर आहे,—

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोभिजायते ॥

"मनुष्य विषयांचा विचार करावयाला लागला म्हणजे त्याच्यांत त्यांच्याबद्दल आसक्ति उत्पन्न होते; आसक्तिपासून काम, आणि मग कामापासून क्रोध तयार होतो."

ह्या असल्या बाष्कळ गोष्टी तशाच राहूं द्या. आतां आपल्या विषयाकडे वळूं. तेव्हां एकंदरीनें प्रोफेसर मॅक्स मुल्लरांची, सामाजिक चालीरीति आणि नीतितत्वें, तसेंच आधुनिक भारताच्या निरनिराळ्या भागांत हल्लीं ज्या गोष्टी घडतात त्या, ह्या सर्वांबद्दलची, माहिती पाहिली म्हणजे कोणालाही आश्चर्य वाटतें; ह्याला आपल्या स्वानुभवाचा आधार आहे.

विशेषतः, प्रोफेसरसाहेबांचें, भरतवर्षाच्या निरनिराळ्या भागांत धर्माच्या कोणच्या नवीन लाटा उठतात इकडे फार लक्ष्य असतें; आणि पश्चिमेकडचें जग त्या बाबतींत काळोखांत राहूं नये म्हणून ते आपल्याकडून कांहींही श्रम घ्यावयाची बाकी ठेवीत नाहींत. देवेन्द्रनाथ ठाकूर आणि केशवचंद्र सेन ह्यांनीं चालविलेला ब्रह्मोसमाज, स्वामी दयानंद सरस्वतींनीं स्थापिलेला आर्यसमाज, थीऑसफीची चळवळ, हीं सारीं त्यांच्या लेखणीच्या स्तुतीच्या किंवा निंदेच्या तडाख्यांत सांपडलीं आहेत. सुस्थापित झालेल्या प्रबुद्ध भारत आणि ब्रह्मवादिन् या दोन मासिकांतून प्रसिद्ध झालेली श्रीरामकृष्णांचीं वचनें आणि उपदेश ह्यांनीं ते एकदम आश्चर्यचकित झाले; तसेंच ब्रह्मो उपदेशक प्रतापचंद्र मुझुमदार यांनीं श्रीरामकृष्णांविषयीं जें लिहिलें, तेंही त्यांच्या वाचनांत आलें; आणि ह्या गोष्टी-

मुळें त्या महात्म्याच्या जीवनचरित्राकडे त्यांचें लक्ष्य वेधलें. कांहीं दिवसांपूर्वी असेंच 'धि इंपीरिअल अँड एशिआटिक क्वार्टर्ली रिव्ह्यू' ( साम्राज्य आणि आशिया यांचें त्रैमासिक समालोचन ) ह्या इंग्लंडच्या सुप्रसिद्ध मासिकांत, इंडिया हाउसमधले प्रख्यातीस आलेले लायब्ररी व्यवस्थापक सी. एच. टॉनी एम्. ए. ह्यांनीं लिहिलेलें श्रीरामकृष्णांचें संक्षिप्त चरित्र प्रसिद्ध झालें. मद्रास आणि कलकत्ता येथून बरीचशी माहिती मिळवून प्रोफेसरसाहेबांनीं 'नाईन्टीन्थ सेंचरी' ह्या सर्व श्रेष्ठ इंग्रजी मासिकांत एका लहानशा लेखांत 'श्रीरामकृष्णांचें जीवन आणि उपदेश' ह्याची चर्चा केली तींत त्यांनीं असें उद्गार काढले. 'हिंदुस्थान आज किती तरी शतकें आपल्या पुराण ऋषींच्याच विचारांचा नुसता प्रतिध्वनि काढित होतें; आणि अगदीं अलीकडे तर पाश्चिमात्य विद्वानांच्या विचारांचा नुसता अनुवाद करीत होतें; अशा वेळीं त्यांत नवीन आध्यात्मिक चैतन्य घालणाऱ्या ह्या आधुनिक ऋषीच्या स्फूर्तिकारक आणि अभिनव भाषेंतल्या अपूर्व विचारांनीं माझें हृदय सहज जिंकलें. 'प्रोफेसर मॅक्स मुल्लरनीं भारताचें धार्मिक वाङ्मय पुष्कळदां वाचलें आहे आणि त्यामुळें येथल्या ऋषींच्या आणि बऱ्याच साधूंच्या जीवन कथांशीं ते चांगलेच परिचित आहेत; पण ह्या युगांत, ह्या काळच्या हिंदुस्थानांत, असे महात्मे अवतरतील अशी अशा करणें शक्य तरी आहे काय? ह्या प्रश्नाला श्रीरामकृष्णांचें जीवन हें होकारार्थीं उत्तर आलें आणि त्यानें, आपलें सर्व आयुष्य भारताला अर्पण करणाऱ्या ह्या विद्वान महात्म्याच्या हृदयांतील भरतवर्षाच्या भावी मोठेपणाच्या आणि प्रगतीच्या आशेच्या वेलीच्या मुळांशीं पाणी घालून तींत नवीन जीवन आणलें.

हिंदुस्थानच्या कल्याणाची मनापासून इच्छा करणारे कांहीं महात्मे पश्चिमेकडे आहेत; पण प्रोफेसर मॅक्स मुल्लरपेक्षां हिंदुस्थानच्या सुस्थितीबद्दल ज्याला अधिक कळकळ वाटते असा दुसरा हिंदुस्थानचा हितचिंतक यूरोपला दाखवितां येईल असें आम्हाला वाटत नाहीं. मॅक्स मुल्लर हिंदुस्थानचे नुसते हितचिंतकच नाहींत, तर भारतीय तत्वज्ञानावर व भारतीय

धर्मावर त्यांचा दृढ विश्वास आहे. अद्वैतमत हा धर्माच्या प्रांतांतला उच्चतम शोध आहे, हें प्रोफेसर साहेबांनीं कितीकदां उघडपणें कबूल केलें आहे. देहाला आणि आत्म्याला एकच समजणाऱ्या ख्रिश्चनाला ज्याचें इतकें भय वाटतें त्या पुनर्जन्माच्या मतावर त्यांचा दृढ विश्वास आहे; कारण त्यांच्या स्वतःच्या अनुभवांतच त्यांना त्याचा पूर्ण पडताळा आला आहे. आणखी अधिक काय सांगावें; कदाचित् त्यांचा मागचा जन्म भारतांतच झाला असेल. आतां हिंदुस्थानांत गेलों, तर एकदम पुनरुत्थित झालेल्या पूर्व स्मृतींच्या जोराच्या प्रवाहाखालीं आपली म्हातारी देहयष्टि पार सोडून जाईल, ह्याचेंच भय ह्या देशाला भेट देण्याच्या बाबतींत त्यांच्या मनांत प्रामुख्यानें येतें. पण ते कोणी जरी असले, तरी ते एक संसारांतले मनुष्य आहेत; तेव्हां त्यांना सर्व बाजूंचा विचार करावा लागतो आणि त्याप्रमाणें वागावें लागतें. जेव्हां जगांतल्या सर्व विषयांचा पूर्ण त्याग केलेला संन्याशीसुद्धां, त्याला जे वास्तविक शुद्धतम वाटतात असे योग आचरावयाच्या बाबतींत, केवळ ते ज्या लोकांत तो रहातो त्यांनीं ते त्याज्य गणले आहेत म्हणून लोकमताच्या भयाच्या योगानें कचरतांना दिसतो; जेव्हां नांव, कीर्ति, उन्नत पदवी, हीं मिळविण्याची आशा आणि तीं मिळवल्यानंतर तीं जातील कीं काय ह्याबद्दल वाटणारी भीति, ह्या दोन गोष्टी सर्वश्रेष्ठ योग्याच्यासुद्धां—मग तो नुसत्या शब्दांनीं अशी इच्छा म्हणजे अतिशय निंद्य आणि तुच्छ आहे असें कितीका म्हणेना—वागण्याची दिशा ठरवितात; तेव्हां, ज्याला जगभर मानीत आहेत, आणि जो समाजाची इतराजी होऊं नये म्हणून नेहमींच जपत असतो, अशा एका संसारांतल्या मनुष्याला त्याचीं स्वतःचीं जीं मतें असतात तीं सरसहा बाहेर दाखविण्याच्या बाबतींत फार काळजी घ्यावी लागावी, ह्यांत आश्चर्य ते काय? योगाच्या गूढ मानसिक शक्तींसारख्या अतींद्रिय गोष्टींवर प्रोफेसरसाहेबांचा अगदींच गैर विश्वास आहे, ही कांहीं सत्य गोष्ट नाहीं.

"थोडींच वर्षें झालीं," प्रोफेसर मॅक्स मुल्लरना· "भरतखंडांत,—" "ज्याला वारंवार आणि यथान्याय, तत्वज्ञ ऋषींची भूमि असें म्हणण्यांत

येतें, आणि ज्याच्याबद्दल इंग्लंडमध्यें बऱ्याचशा विपरीतार्थ द्योतक गोष्टी सांगण्यांत येतात आणि बरीचशी चुकीची कल्पना करण्यांत येते, असें" त्यांना "दिसतें, त्या भरतखंडांत,"–हल्लीं जी नवीन धार्मिक चळवळ सुरू झाली आहे, तिजबद्दल आपण कांहीं तरी बोलावयाला पाहिजे, असें वाटूं लागलें. ह्या चुकीच्या समजुती दूर कराव्या; "हल्लीं भारतांत विद्यमान असून उपदेश करणाऱ्या साधूंच्या आणि सत्पुरुषांच्या विषयीं, हिंदुस्थान अमेरिका आणि इंग्लंड येथील वर्तमानपत्रांतून सरास प्रसिद्ध व प्रसृत होत असलेल्या वाटेल तशा आणि अतिशयोक्त वर्णनांचा" प्रतिकार करावा; "आणि पुनः भारतीय ब्रह्मज्ञान (इन्डियन थिऑसफी), गुह्य बौद्धधर्म आणि इतर साऱ्या चमत्कारिक दिसणाऱ्या नांवांच्या मुळाशीं कांहीं तरी सत्य आहे, कांहीं तरी जाणण्यायोग्य आहे, हें दाखवावे;"–किंवा दुसऱ्या शब्दांत, भरतवर्ष म्हणजे कांहीं पक्षिगणांसारखें हवेंत उडणें, किंवा माशासारखें पाण्यांत रहाणें किंवा फिरणें, किंवा कांहीं तरी तंत्र मंत्र करून सर्व तऱ्हेचे रोग बरे करणें, किंवा किमयेनें, हलक्या पदार्थापासून सोनें, रुपें अगर हिरे तयार करणें, किंवा सिद्धींच्या सामर्थ्यानें श्रीमंत पुत्रहीनांना सशक्त पुत्र देणें, अशा तऱ्हेचें "अत्यंत मूर्खपणाचे चमत्कार" करण्याचें सामर्थ्य मिळवून किफायतशीर धंदा चालविण्याकरितां "अतिशय भयोत्पादक योग क्रिया करणाऱ्या मनुष्य प्राण्यांच्या अगदीं नवीनच जातीनें" भरलेला देश नाहीं–तर, ज्यांनीं आपल्या आयुष्यांतच मोठाल्या अतींद्रिय सत्यांची प्रत्यक्ष प्रतीति घेतली आहे, जे खरे ब्रह्मज्ञ, खरे योगी, परमेश्वराचे खरे भक्त आहेत, अशा लोकांची भारतांत केव्हांच उणीव नव्हती, असें यूरोपच्या विचारी लोकाच्या निदर्शनास आणावें; आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे, हिंदुस्थानांतले सारेच आर्य लोक, अलिकडच्या मनुष्य रूप घेतलेल्या जिवंत देवांचा त्याग करून, आणि "लहान मोठे" सगळेच, रात्रंदिवस, पूर्वीं सांगितलेले मूर्खपणाचे चमत्कार करणाऱ्यांचीच पायधूळ चाटीत बसून, पशुसंततीच्या स्थितीला जाण्याइतके नीच अजून झाले नाहींत, हें दाखवावें;–म्हणून, प्रोफेसर

मॅक्स मुल्लरनीं, 'नाइन्टीन्थ सेंचरी' ह्या मासिकाच्या १८९६ सालच्या ऑगष्टच्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या 'खरा महात्मा' ह्या लेखांत, श्रीरामकृष्णांचें जीवनचरित्र, यूरोपच्या विद्वान् जनसमूहापुढें ठेवलें.

यूरोपांतील आणि अमेरिकेंतील विद्वानांनीं मोठ्या उत्सुकतेनें तो लेख वाचला; आणि पुष्कळांचें त्यांच्या विषयाकडे–श्रीरामकृष्ण देवाकडे लक्ष्य वेधलें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थान म्हणजे नागव्या उघड्या, बालहत्या करणाऱ्या, मूढ, भेंकड, नरमांस भक्षण करणाऱ्या, बलात्कारानें विधवांना जाळणाऱ्या, सर्व तऱ्हेच्या पापांत आणि अंधकारांत गळ्यापर्यंत बुडलेल्या, जवळ जवळ पशुरूपच अशा लोकांचा देश आहे, अशी जी सुधारलेल्या पश्चिमेची चुकीची समजूत होती–खिस्ती धर्मोपदेशकांनीं आणि मला कबूल करावयाला लाज आणि दुःख वाटतें कीं, माझ्या कांहीं देशबांधवांनींही अशी जी तिची समजूत करून दिली होती–ती पुनः दुरुस्त होऊं लागली. ह्या दोन तऱ्हेच्या लोकांच्या एकसारख्या प्रयत्नांनीं पाश्चात्यांच्या डोळ्यावर जो अज्ञानांधकाराचा पडदा ओढला गेला होता, तो हळूं हळूं पार निघून जात आहे. ज्या देशानें श्रीभगवान् रामकृष्ण देवांसारख्या जगद्गुरूला जन्म दिला आहे, तो देश खरोखरच ज्या गोष्टींवर आम्हाला विश्वास ठेवा म्हणून सांगण्यांत येतें, तशा अगदीं तिरस्कारार्ह गोष्टींनीं भरला असेल काय? कां कांहीं स्वार्थी उपटसुळांच्या संघांनीं आम्हाला मूर्ख बनवून खऱ्या हिंदुस्थानाबद्दल आम्हाला अगदीं अज्ञानांत आणि खोट्या समजुतींत आणून ठेवले आहे?–असा प्रश्न पाश्चिमात्यांच्या मनांत प्रत्यक्ष येऊं लागला आहे.

हिंदुस्थानांतील धर्म, तत्वज्ञान आणि वाङ्मय ह्या बाबतींत ज्यांचा अधिकार पाश्चिमात्यांत सर्वांत वरचा समजला जातो त्या प्रोफेसर मॅक्स मुल्लरनीं जेव्हां अमेरिकेंतील आणि युरोपांतील लोकांच्या उपयोगाकरितां, नाइन्टीन्थ सेंचरींत, मोठ्या भक्तिपूर्ण अंतःकरणानें श्रीरामकृष्णांचें संक्षिप्त जीवन चरित्र प्रसिद्ध केलें, तेव्हां वर उल्लेख केलेल्या दोन वर्गांतील मंडळींत जळत्या द्वेषाच्या कटु मनोवृत्ति उद्भवल्या हें सांगावयाला नकोच.

ख्रिस्तिधर्मोपदेशक हिंदु देव देवतांच्याबद्दल खोट्यानाट्या गोष्टी सांगून, अशा देवांच्या पूजकांत खरे धार्मिक लोक सांपडणें शक्य नाहीं, असें सिद्ध करण्याचा जीव तोडून प्रयत्न करीत होते; पण त्या प्रयत्नाची भरतीच्या लाटेपुढें गवताच्या काडीची जशी स्थिति व्हावी, तशी स्थिति झाली! इकडे श्रीरामकृष्णांच्या सामर्थ्याचा भराभर पसरत चाललेला वणवा विझवण्याच्या युक्त्या योजण्यांत गुंतलेला, वर सांगितलेला आमच्या देशबांधवांचा वर्ग, आपले सर्व प्रयत्न निष्फळ झालेले पाहून, निराशेच्या पूर्ण आधीन झाला! दैवी इच्छेच्या पुढें बिचारी मानवी इच्छा काय करणार!

आतां ह्या दोन्ही बाजूकडून वृद्ध प्रोफेसरांच्या निष्ठापूर्ण शीर्षावर एकसारखे जोराचे हल्ले सुरूं झालेच; पण हा वृद्ध लढवय्या कांहीं पाठ फिरवणाऱ्यांपैकीं नव्हता. अशा तऱ्हेच्या युद्धांत पुष्कळदां त्यानें विजय संपादन केला होता. ह्यावेळीं सुद्धां तितक्या सहजपणानें तो ह्या प्रसंगांतून पार पडला. प्रोफेसर साहेबांनीं आपल्या क्षुद्र प्रतिस्पर्ध्यांच्या पोकळ आरोळ्या बंद पाडण्याकरतां 'रामकृष्ण, त्यांचें चरित्र आणि वचनें' हें इमारतीचें पुस्तक प्रसिद्ध केलें. ह्या पुस्तकांत, ह्या महात्म्याच्याबद्दल आणि त्याच्या धार्मिक कल्पनांबद्दल, वाचणाऱ्या जन समाजाला चांगला परिचय व्हावा म्हणून, त्यांनीं अधिक पूर्ण माहिती ग्रथित केली आहे आणि त्यांच्या जीवनाची व वचनांची पुरी हकीकत दिली आहे. प्रोफेसरांच्या शब्दानें सांगावयाचें म्हणजे, "हे महात्मे अलिकडे, हिंदुस्थानांत आणि जेथें त्यांचे शिष्य त्यांचें धर्मज्ञान पसरविण्याचा आणि ख्रिस्ती लोकामधूनही त्यांच्या मताला आनुयायी मिळविण्याचा जोराचा प्रयत्न करीत आहेत, त्या अमेरिकेंत, बरेच प्रसिद्धीस आले आहेत." प्रोफेसर साहेब म्हणतात, "हें आपल्याला फार चमत्कारिक, नव्हें अगदीं खोटें वाटेल; पण प्रत्येक मानवी अंतःकरण धर्माकरतां अगदीं उत्कंठित होतें, त्याला त्याची भूक लागते आणि ती आज नाहीं उद्यां शमवली पाहिजे. आतां, रामकृष्णांच्या शिष्यांनीं उपदेशिलेला बाहेरच्या एकाही आधाराच्या आश्रयांशिवाय असलेला धर्म ह्या क्षुधित आत्म्यांना मिळाला म्हणजे, जीवनाचें फुकट

मिळणारें अमृत म्हणून त्यावर त्यांच्या उड्या पडतात. तेव्हां, रामकृष्णांच्या धर्माला येऊन मिळालेल्या लोकांचा जो आंकडा सांगण्यांत येतो, त्यांत जरी कांहीं अतिशयोक्ति असली, तरी, ज्या धर्माचा ह्या काळांत इतका विजय होतो, आणि जो आपल्याला पूर्ण सत्यतेनें जगांतला सर्वांत जुना—वेदान्ताचाधर्म म्हणवतो, त्या धर्माकडे आपण अतिशय काळजीपूर्वक लक्ष्य दिलें पाहिजे.

पुस्तकाच्या पहिल्या भागांत महात्मा, चार आश्रम, योग वगैरे शब्दांचा अर्थ काय, हें पहिल्यानें देऊन, नंतर दयानंद सरस्वती, पव्हारी बाबा, देवेन्द्रनाथ ठाकूर, आणि राधास्वामीपंथाचे प्रवर्तक राय शालिग्राम साहेब बहादूर; यांच्याविषयीं प्रोफेसर साहेबांनीं थोडीशी माहिती दिली आहे आणि मग श्रीरामकृष्णांच्या जीवनचरित्राला आरंभ केला आहे.

गोष्टी जशा घडल्या तशा सांगतांना सुद्धां सांगणाराचें त्यांच्याबद्दल चांगलें किंवा वाईट मत असेल, त्याप्रमाणें त्यांच्यांत फरक होतो. सर्व इतिहासावर ह्याचा परिणाम झालेला असतोच. ह्या संक्षिप्त चरित्रांतसुद्धां असें व्हावयाचें, अशी प्रोफेसर साहेबांना भीति वाटते. म्हणून, माहिती मिळवण्यांत त्यांनीं विशेषच काळजी घेतली आहे. प्रस्तुत लेखक ( विवेकानंद ) श्रीरामकृष्णांचा एक क्षुद्र सेवक आहे. जरी श्रीरामकृष्णांच्या जीवनाची मिळविलेली माहिती प्रोफेसर साहेबांच्या तर्काच्या आणि निःपक्षपाती बुद्धीच्या भट्टींतून तावून सुलाखून निघाली आहे, तरी, एकनिष्ठ शिष्यांच्या अद्भुतता दाखविण्याच्या प्रबल प्रवृत्तीचा आणि वर सांगितलेल्या कारणाचा त्यांच्या ह्या गुरुदेवांच्या वास्तविक वर्णनांतसुद्धां परिणाम दिसून येणें शक्य आहे, असें त्यांनीं म्हणून ठेवलें आहे.

ह्या पुस्तकांत, थोडक्यांत आणि साध्या, सरळ भाषेंत श्रीरामकृष्णांचें चरित्र दिलें आहे. आपल्यावर झालेल्या टीकांना उत्तर देण्याचा ह्यांत प्रोफेसर साहेबांनीं नुसता प्रयत्नही केला नाहीं; पण महात्मा रामकृष्णांच्या विलक्षण असणाऱ्या कल्पनावर आलेल्या आरोपांचें खंडन, आपल्या अगाध आणि असाधारण हृदयांतून निघालेल्या गंभीर ध्वनीनें केलें आहे.

आणि ह्या आरोपांचें खरोखरच आम्हाला आश्चर्य वाटतें. "श्रीरामकृष्णांच्या साध्या, मधुर, व्यवहारांतल्या भाषेंत अमानुषी शुद्धता असे. त्यांच्या बोलण्यांत, आपण ज्यांना ग्राम्य म्हणतों, असे कांहीं शब्द येत. तरीही त्यांच्या असाधारण निरपराध बालवृत्तीमुळें आणि त्या शब्दांतल्या कामुकवृत्तीच्या पूर्ण अभावामुळें त्यांत दोषार्हता येण्याऐवजीं आणखी ते भाषेच्या सौंदर्यांत भर टाकीत." ब्रह्मोसमाजाचे प्रख्यात प्रवर्तक, परलोकगत, पूज्य आचार्य श्रीकेशव चंद्रसेन, यांनां त्यांच्या त्या नेहमींच्या गोड पद्धतीनें असें म्हणतांना आम्ही ऐकलें आहे.--तरीही, हा एक मोठाच आरोप आहे.

त्यांच्याविरुद्ध दुसरा आरोप म्हणजे, त्यांनीं संन्यासव्रत स्वीकारण्यांत त्यांच्या पत्नीशीं जें त्यांचें वर्तन झालें, तें शुद्ध रानटीपणाचें होय. ह्याला प्रोफेसर साहेबांनीं उत्तर दिलें आहे कीं, त्यांनीं आपल्या पत्नीच्या संमतीनेंच संन्यास घेतला; आणि ते ह्या जगांत जोंपर्यंत होते, तोंपर्यंत आपल्या नवऱ्याला योग्य अशा शीलाच्या त्यांच्या पत्नीनें त्यांना आपला गुरु केला आणि त्यांच्या उपदेशाप्रमाणें आजन्म ब्रह्मचारिणी राहून ईश्वराच्या सेवेंत आपले दिवस अनंत सुखांत आणि शांतींत घालविले. शिवाय, ते विचारतात, "संतति उत्पन्न केल्याशिवाय नवराबायकोंतील प्रेम अशक्यच आहे काय?" ह्या गोष्टींत आपण हिंदूंच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवावयाला शिकलें पाहिजे. कांहींही देहिक संबंध न ठेवतां, ब्रह्मचारी नवरा आपल्या ब्रह्मचारिणी बायकोला, उच्चतम आध्यात्मिक साक्षात्काराच्या अमर्त्य सुखांत,--ब्रह्मानंदांत,--वाटेकरीण करून स्फटिकासारखें शुद्ध आयुष्य घालवूं शकतो. "आपल्या देशांतील असल्या गोष्टींबद्दल गैरविश्वास असणें बरोबर असेल." ह्या योग्य उद्गारांबद्दल प्रोफेसरांवर कल्याणांची वृष्टि होवो. परक्या राष्ट्रांत त्यांचा जन्म झाला, परक्या देशांत त्यांचें आयुष्य गेलें, तरी त्यांना देखील आमच्या ब्रह्मचर्याचा अर्थ--तें ब्रह्ममय व्हावयाचा एकच मार्ग आहे हा--कळला; आणि त्यांची खात्री आहे कीं, भरतखंडांत ह्या काळांत सुद्धां तें दुर्मिळ नाहीं. पण

आमच्या घरच्याच ढोंगी वीरांना नवराबायकोंच्या नात्यांत शरीरसंबंधाशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं? "मनुष्याच्या मनांत जसे विचार चालले असतात, त्याप्रमाणेंच त्याला बाहेरही दिसतें."

आणखी एक आरोप म्हणजे "वेश्यांबद्दल त्यांनीं पुरेसा नैतिक तिटकारा दाखविला नाहीं." ह्याला, प्रोफेसर साहेबांचें उत्तर फारच गोड आहे. ते म्हणतात, "ह्या आरोपाबद्दल धर्मसंस्थापकांपैकीं एकटे रामकृष्णच गुन्हेगार नाहींत!" अहाहा! किती तरी गोड हे शब्द! ते भगवान् बुद्धांचा दिव्य कृपाप्रसाद झालेली वेश्या अंबापाली आणि देवपुत्र येशु ख्रिस्ताला जिनें प्रसन्न केलें ती सॅमॅरिटन बाई, ह्यांची आठवण करून देतात.

अजूनही एक आरोप आहे. ज्यांना मद्यपानाचें व्यसन होतें, अशांचा ते द्वेष करीत नसत. काय विलक्षण आरोप! एखादा मनुष्य दारूचे एक दोन घुटके घेतो, म्हणून त्याच्या सांवलींत देखील कोणीं चालतां कामा नये,–हाच नाहीं का ह्याचा अर्थ? मोठा जोरदारच आरोप! त्या महापुरुषानें मद्यप्यांना, वेश्यांना, चोरांना, आणि ह्या जगांतील सर्व पाप्यांना, तिटकाऱ्यानें लाथ मारून हांकलून कां नाहीं दिलें? आणि तसेंच तो डोळे मिटून, ब्राम्हांच्या कधीं न बदलणाऱ्या हरमोनियमच्या स्वरांत ठराविक गोष्टी कां बोलला नाहीं? किंवा त्यानें आपले विचार गुप्त राखून नेहमींच्याच भाषेंत कां प्रकट केले नाहींत? आणि ह्याच्या पलिकडे, सर्वांत मोठा आरोप म्हणजे सर्व आयुष्यभर वैवाहिक बंधनांतच तो कां राहिला नाहीं!

ह्या आरोप करणारांनीं सांगितलेल्या विलक्षण शुद्धतेच्या आणि सद्वर्तनाच्या ध्येयावरून आयुष्याची दिशा आंखली नाहीं, तर हिंदुस्थानच्या नशीबीं नाश हा लिहिलेला! असल्या नैतिक नियमांच्या साहाय्यानें त्याला वरती यावयाचें असलें, तर त्यानें वरती यावें!

त्यांच्या प्रत्यक्ष जीवनवृत्तान्तापेक्षां त्यांच्या वचनांच्या संग्रहानें पुस्तकाचा अधिक भाग व्यापिला आहे. सर्व जगांतल्या इंग्रजी बोलणाऱ्या बऱ्याच वाचकांचें लक्ष्य त्या वचनांनीं वेधून घेतलें आहे, असें अनुमान

पुस्तकाचा जो सपाट्यानें विक्रय चालला आहे, त्यावरून सहज काढतां येतें. त्यांच्या प्रत्यक्ष तोंडांतून आलेलीं तीं वचनें प्रबल आध्यात्मिक जोरानें आणि सत्तेनें भरलेलीं आहेत; आणि म्हणून जगाच्या कोणच्याही भागांत त्यांचा दिव्य परिणाम होणारच. महात्मे "बहुजनहिताय, बहुजनसुखाय" जन्म घेतात. त्यांचें जीवन आणि कार्य नेहमींच्या पलीकडचें असतें आणि त्यांच्या उपदेशाची तऱ्हाही तशीच विलक्षण असते!

आणि आपण काय करतों आहों! ज्या एका गरीब ब्राह्मणाच्या मुलानें आपल्या जन्मानें आम्हाला पवित्र केलें, आपल्या कार्यानें आम्हाला उन्नतीला नेलें, आपल्या अमर्त्य वचनांनीं विजयी झालेल्या जातीची सहानुभूति आमच्याकडे वळविली—त्याच्याकरतां आपण काय करतों आहों? सत्य नेहमींच रुचतें असें नाहीं; पण अशा वेळां असतात कीं, त्या वेळेला तें सांगावेंच लागतें.—आपल्यापैकीं कांहींना कळतें आहे कीं, त्यांच्या जीवनानें आणि उपदेशानें आपला फायदा झाला. पण एवढ्यांतच बाजार आटोपतो. आपल्या स्वतःच्या जीवनांत तो उपदेश उतरविण्याचा प्रयत्न करणें देखील आपल्या शक्तीच्या पलिकडचें आहे. मग आपला सर्व देह आणि आत्मा, श्रीरामकृष्णांनीं उठवलेल्या, एकरूप झालेल्या ज्ञान आणि भक्तीच्या प्रचंड लाटावर तरंगविणें कोणीकडेच राहिलें! भगवानांची ही लीला ज्यांना कळली आहे, किंवा जे कळवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांना आम्ही म्हणतों,—"नुसत्या कळण्यानें काय होणार? कळणें कार्यावरून सिद्ध होतें. त्याच्या खात्रीबद्दल तोंडीं बोलून किंवा माझ्या स्वतःचा ह्याच्यावर विश्वास आहे; असें सांगून तुमच्यावर कोण विश्वास ठेवणार? आपल्याला काय वाटतें, तें कृति बरोबर सांगतें. तुम्हाला जें वाटतें तें कृतींत उतरवा आणि मग जगाला पाहूं द्या." नित्यंत भरलेल्या हृदयांतून येणाऱ्या कल्पना आणि मनोविकार त्यांच्या फलावरून—प्रत्यक्ष कार्यावरून—ओळखले जातात.

जे आपण फार विद्वान आहों या अभिमानानें, ह्या निरक्षर, गरीब देवळांतल्या साधारण पूजाऱ्याला क्षुद्र लेखतात, त्यांना आमची ही नम्र प्रार्थना!

आहे. ज्या देशांतल्या एका निरक्षर पूजाऱ्यानें, आत्मबलाच्या जोरावर, इतक्या थोड्या वेळांत तुमच्या पूर्वजांच्या पुराण–सनातन–धर्माचा विजय–नाद पार समुद्राच्या पलीकडील भूमींत देखील दुमदुमावयाला लावला; त्याच देशांतील आपण वीरांचे वीर, सर्वांहून पूज्य, बलिष्ठ, सुशिक्षित, विद्वानांतील विद्वान आहांत. तेंव्हां, तुम्ही फक्त मनांत आणलें तर, आपल्या जन्मभूमीच्या, आपल्या राष्ट्राच्या, कल्याणाकरितां ह्याहून किती तरी असाधारण शौर्याचीं कृत्यें करूं शकाल! तेंव्हां उठा, पुढें या, आपल्या आंतल्या श्रेष्ठ सामर्थ्याचा खेळ दाखवा, ते प्रकट करा; आम्ही अत्यंत पूज्यभावाचीं अर्घ्यें हातांत घेऊन तुमच्या पूजेकरतां वाट पहात आहों. आम्ही म्हणजे अज्ञानी, गरीब, अप्रसिद्ध, आणि क्षुद्र भिकारी; आमच्या उपजीविकेचें साधन म्हणजे आमचा भिकाऱ्याचा वेष. पण तुम्ही फार धनवान्, फार वजनाचे; तुमचें सामर्थ्य केवढें; कुलिन घराण्यांत तुमचा जन्म; सर्व ज्ञान आणि विद्या तुमच्या ठिकाणीं केंन्द्रीभूत झालेल्या! तेंव्हां मग तुम्ही कां उठत नाहीं? पुढारीपण कां घेत नाहीं? मार्ग दाखवा, जगाच्या कल्याणाकरतां केलेल्या परिपूर्ण त्यागाचें उदाहरण आम्हांला घालून द्या, आम्ही बंद्या गुलामाप्रमाणें तुमच्या पाठीमागून येऊं!"

उलटपक्षीं श्रीरामकृष्णांचा आणि त्यांच्या नांवाचा विजय आणि प्रसिद्धि पाहून निर्भेळ ईर्षेनें आणि असूयेनें उद्युक्त होऊन जे गुलाम जातीलाच योग्य अशा निष्कारण वैराची अयोग्य चिन्हें दाखवीत आहेत, त्यांना आम्ही असें सांगतों. "प्रिय मित्रांनो, तुमचे हे प्रयत्न निष्फळ आहेत. जिनें आपल्या जाभाडांत अवकाशाचीं टोकें गिळून टाकलीं आहेत, जिच्या हिमधवल शिखरावर आपल्या स्वर्गीय तेजानें ही दिव्य मूर्ति विराजते आहे, ती ही अनंत, अमर्याद, धर्माची लाट, आपलें स्वतःचें नांव, कीर्ति, संपत्ति मिळवण्याकरतां केलेल्या आमच्या उत्सुक प्रयत्नाचें कार्य असेल तर, तुमच्या अगर दुसऱ्या कोणाच्याही प्रयत्नाशिवाय, विश्वाच्या अनुल्लंघनीय नियमापुढें नम्र होऊन, ती कालाच्या अनंत, जलमय उदरांत कायमची गडप होईल! पण जर हा लोट, त्या एक विश्वमातेच्या इच्छे-

वरून आणि तिच्याच दिव्य स्फूर्तीनें, एका महात्म्याच्या हृदयांतील स्वार्थरहित प्रीतीच्या पूरानें जग बुडवून टाकीत असला, तर, हे क्षुद्र मनुष्या, सर्व शक्तिमान् जगन्मातेच्या इच्छेच्या पुढच्या चालीला ज्याच्या योगानें अडथळा आणतां येईल, अशी कोणची शक्ति तुझ्याजवळ असणार?"

---

# भरतखंडांतील महात्मे.

भरतवर्षातील सत्पुरुषांविषयीं बोलूं लागलों म्हणजे, माझें मन, इतिहासांत ज्यांचा पत्ता लागत नाहीं, आणि भूतकालाच्या अंधेरांतून ज्यांचीं रहस्यें बाहेर काढण्याचा लोकवार्तेचाही प्रयत्न फोल ठरतो, त्या कालांकडे धांव घेतें. हिंदुस्थानांत असंख्य महात्मे झाले. हजारों वर्षे सत्पुरुषांना जन्म देण्याशिवाय आर्यावर्त काम तरी काय करतें आहे? तेव्हां त्यांपैकीं अतिशय देदिप्यमान, ज्यांना कालकर्ते हें विशेषण शोभतें, अशा कांहीं थोड्यांचीं जीवनचरित्रें घेऊन तीं मी आपल्यापुढें मांडणार आहें. पहिल्यानें आमचीं शास्त्रें म्हणजे काय ह्याची आपल्याला थोडीशी कल्पना झाली पाहिजे. आमच्या शास्त्रांत सत्याचीं दोन ध्येयें आहेत. ज्याला आपण चिरंतन म्हणतों तें एक; दुसऱ्याची सत्ता, देशकाल परिस्थितींनीं मर्यादित आहे. जीवात्मा आणि परमात्मा ह्याचे धर्म काय आहेत, जीवात्म्यांचा परमात्म्याशीं काय संबंध आहे, ह्याबद्दलची चिरंतन प्रमेयें, ज्यांना आम्ही श्रुति किंवा वेद म्हणतों त्यांच्यांत ग्रथित केलीं आहेत. दुसऱ्या तऱ्हेचीं सत्यें मनु, याज्ञवल्क्यादि ऋषींच्या स्मृति ग्रंथांत आणि तंत्रापर्यंतच्या पुराणांत ग्रथित केलीं आहेत. हीं दुसऱ्या दर्जाचीं पुस्तकें आणि त्यांतील मतें हीं श्रुतीहून कमी दर्जाचीं मानतात. ह्यांच्यांत आणि श्रुतींत विरोध आला, तर श्रुतीच आधार समजला जातो; असा आमचा नियम आहे. मनुष्याचें दैव व ध्येय ह्यांचा सांगाडा वेदांत तयार केलेला आहे व मग स्मृति व पुराणें ह्यांत त्याला सांगोपांग पूर्णता आणली आहे अशी कल्पना आहे. सर्व साधारण दिशा श्रुतींत पूर्ण दाखविली आहे. अध्या-

त्मिकतेबद्दल आतां ह्याहून ज्यास्त कांहीं सांगतां यावयाचें नाहीं आणि ह्याहून ज्यास्त कांहीं जाणतांही यावयाचें नाहीं. ज्याची जरूरी आहे, तें सगळें जाणलें गेलें आहे, आत्म्याला पूर्णतेला न्यावयाला जेवढ्या उपदेशाची जरूरी आहे, तेवढा सारा श्रुतींत आहे. अंगभूत गोष्टी तेवढ्याच वगळल्या होत्या आणि त्यांची भर वेळोवेळीं स्मृतींनीं टाकली. दुसरा विशेष हा आहे कीं, त्यांतल्या सत्यांचे द्रष्टे असे श्रुतींत पुष्कळ ऋषी आहेत. त्यांच्यापैकीं बहुतेक पुरुष आहेत आणि कांहीं थोड्या स्त्रियाही आहेत. त्यांचा जन्म केव्हां झाला वगैरे त्यांच्याविषयींची फारच थोडी माहिती आहे; पण त्यांचे उत्तम विचार,—मी त्यांना त्यांचे श्रेष्ठ शोधच म्हणतों—आमच्या देशच्या पवित्र ग्रंथांत—वेदांत—ग्रथित केले आहेत. उलटपक्षीं स्मृतींत त्या महात्म्यांच्या चरित्राकडे ज्यास्त लक्ष्य दिलें आहे. आपल्याला थक्क करून सोडणारे, प्रचंड, परिणामकर, आपल्या सामर्थ्यानें सगळे जग हालवणारे; असे महापुरुष एकदम पहिल्यानेंच जणूं काय आपल्यापुढें उभे राहतात! कधीं कधीं तर ते आपल्या विचारांपेक्षांही उन्नत दिसतात!

ही एक विशेष गोष्ट आपण लक्ष्यांत ठेवली पाहिजे;—आमचा धर्म निर्गुण—सगुण ईश्वराची कल्पना देतो. त्यांत दोन्हींही—निर्गुण आणि सगुण—स्वरूपें सांगितलीं आहेत; पण आमच्या धर्माचा जो मूळ झरा, त्या श्रुतींत—वेदांत—फक्त निर्गुण स्वरूपच आहे. ईश्वराचें सगुण स्वरूप, दहा अवतार, धर्मसंस्थापक आणि इतर विभूति ह्या मग स्मृतींत आणि पुराणांत येतात. आणि तसेंच, हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, आमच्या धर्माखेरीज दुसरा कोणचाही धर्म प्रस्थापक व्यक्तीच्या जीवनावर अवलंबून आहे. खिस्ती धर्माची इमारत खिस्ताच्या जीवनावर उभारली आहे; मुसलमानी धर्माची महंमदाच्या; बौद्ध धर्माची बुद्धाच्या; जैन धर्माची जिनांच्या; बाकीच्या साऱ्या धर्मांची हीच स्थिति आहे. तेव्हां, ह्या सर्व धर्मांत, हे त्यांचे प्रवर्तक खरेच झाले का नाहीं, ह्या वादाचीं प्रचंड रणें पडणें हें स्वाभाविकच दिसतें. जर का ह्या जुन्या काळांत होऊन गेलेल्या धर्मसंस्थापकांच्या खरो-

खर अस्तित्वाविषयीं ऐतिहासिक आधार डळमळला, कीं, धर्माचा सर्व डोलारा खालीं कोसळून येऊन मोडलाच. ह्या नशीबांतून आम्ही सुटलों. कारण आमचा धर्म तत्वांवर उभारला आहे; व्यक्तीच्या अस्तित्वावर नाहीं. अमुक एका ऋषीनें हा धर्म सांगितला—नव्हे, अगदीं देवाच्या एकाद्या अवतारानें सांगितला—ह्या गोष्टीमुळें कांहीं त्याला प्रमाणता आली नाहीं. वेदांतल्या तत्वांचें प्रामाण्य श्रीकृष्णांवर अवलंबून नाहीं, तर श्रीकृष्णांची गीता वेद तत्वांना अनुसरून असल्यामुळें प्रमाण आहे. श्रीकृष्णांचें भूषण म्हणजे हें कीं, आजपर्यंतच्या वेदांच्या उपदेष्ट्यांत ते सर्वश्रेष्ठ आहेत. इतर अवतारांची हीच गोष्ट; ऋषींची हीच गोष्ट. आमचें मूळ तत्व हें कीं, मनुष्य पूर्ण व्हावयाला, मुक्त व्हावयाला, जें कांहीं लागतें, तें सारें वेदांत आहे. आतां नवीन कांहीं दिसावयाचें राहिलें नाहीं. सर्व ज्ञानांचें अंतिम म्हणजे पूर्ण अद्वैत. तुम्हाला त्याच्या पलिकडे जातां यावयाचें नाहीं. वेदांत तें अद्वैत ज्ञान सारें आलेलें आहे! त्या अद्वैताच्या पलिकडे जाणें शक्य नाहीं! जेव्हां 'तत्त्वमसि' सांपडलें, तेव्हांच धर्मज्ञानाची मर्यादा संपली आणि वेदांत तें आहे. निरनिराळ्या देशकालांना, निरनिराळ्या परिस्थितींना, अनुरूप असा जनतेला वेळोवेळीं मार्ग दाखविणें एवढेंच काय तें शिल्लक राहिलें. लोकांना सनातन मार्गानें घेऊन गेलें पाहिजे; आणि एवढ्याच करतां अवतार झाले व ऋषींनीं जन्म घेतले. श्रीकृष्ण गीतेंत सांगतात, त्याहून हें अधिक स्पष्ट तऱ्हेनें सांगतां येणार नाहीं.—

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
......विनाशायच दुष्कृताम्......संभवामि युगे युगे ॥

आमची हिंदूंची ही कल्पना आहे.

ह्यावरून काय निघतें? एक तर हीं सनातन तत्वें आपल्या पायावर उभीं आहेत. त्यांची सत्यता अनुमानादि प्रमाणांवर देखील अवलंबून नाहीं, तेव्हां ऋषींच्या—मग ते कितीही मोठे असोत—किंवा अवतारांच्या—मग ते कितीही तेजस्वी असोत—आधारांवर कोठून असणार? आम्ही

सांगून ठेवतों कीं, आमच्या धर्मांत ही विशिष्टता असल्यामुळें आम्हाला हक्कानें वाटतें कीं, वेदान्त हाच फक्त साऱ्या विश्वाचा धर्म होऊं शकेल. आज देखील जगांत विश्वधर्म असा तोच आहे. कारण तो तत्वांचा उपदेश करतो व्यक्तींचा करीत नाहीं. व्यक्तीवर ज्या धर्माची इमारत उभारली आहे, असा कोणचाही धर्म सर्व मनुष्य जात धर्माचा आदर्श म्हणून केव्हांही स्वीकारणार नाहीं. आमच्या देशांत आम्हाला किती तरी महान् विभूति झालेल्या दिसतात. एकाद्या लहान शहरांतसुद्धां निरनिराळीं मनें निरनिराळ्या किती तरी व्यक्तींना अनुकरणीय व्यक्ति म्हणून समजतात. महंमद, किंवा बुद्ध, किंवा ख्रिस्त ही एकच व्यक्ति सगळ्या जगाला आदर्श म्हणून समजणें कसें शक्य आहे? एका आणि एकाच व्यक्तीच्या मानण्यावर सद्वर्तन, नीति, आध्यात्म, धर्म ह्यांची सत्यता कशी अवलंबून राहणार? आतां वेदान्त धर्माला असा कांहीं कोणा व्यक्तीचा आधार लागत नाहीं; त्याला आधार मनुष्याच्या अनंत निसर्गाचा आहे. त्याचें नीति तत्व, मनुष्यांत आधींच असलेल्या, त्यानें पूर्वींच कमावलेल्या, आध्यात्मिकतेच्या पायावर रचलें आहे.

दुसरें, अगदीं पहिल्यापासून आमच्या ऋषींना, बहुतेक जनसमाजाला कोणी तरी मोठी व्यक्ती लागते, ह्या गोष्टीची जाणीव होती. ह्या नाहीं तर त्या स्वरूपांत त्यांना सगुण देव पाहिजे. सगुण देव नाहीं, असें प्रतिपादणाऱ्या बुद्धाला देखील, मरून पन्नास वर्षें लोटलीं नाहींत तोंच, त्याच्या शिष्यवृंदानें सगुण देव बनवला. तेव्हां हा सगुण देव अवश्यक आहे. तसेंच नुसत्या काल्पनिक सगुण मूर्तींपैकीं शेंकडा नव्याण्णव प्रतिमा पूजा करण्याच्या योग्यतेच्या नसतात, हें आपल्यास ठाऊक आहे! त्यांच्यापेक्षां मधून मधून आपल्यांतच दृष्टीस पडणारे जिवंत देव किती तरी श्रेष्ठ! आपल्या कल्पनेनें बनवलल्या देवांपेक्षां, म्हणजे देवांबद्दलच्या आपल्या कल्पनेपेक्षां हेच पूजनाला अधिक पात्र असतात. तुम्हाला किंवा मला देवाबद्दल जी कल्पना करतां येईल तिजपेक्षां प्रत्यक्ष श्रीकृष्ण किती तरी मोठे आहेत! तुम्हाला किंवा मला आपल्या मनानें जें ध्येय कल्पितां येईल

त्यापेक्षां स्वतः बुद्ध अधिक उच्च ध्येय, अधिक जिवंत आणि मूर्त कल्पना आहेत! आणि म्हणूनच काल्पनिक देवतांना टाकूनसुद्धां ह्यांचीच पूजा जन समाज आधीं करतो. आमच्या ऋषींनीं हें जाणलें होतें आणि म्हणून त्यांनीं सर्व हिंदूंना ह्या विभूतींची, ह्या अवतारांची, पूजा करण्याची मुभा ठेवली. इतकेंच नाहीं; तो पूर्णावतार तर ह्याहूनही पुढें जातो.

'यद्यद्विभूतिमत्सत्व श्रीमदूर्जितमेव च
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशं संभवम् ॥'

"एकाद्या पुरुषांत लोकोत्तर आध्यात्मिक सामर्थ्य जेव्हां जेव्हां आढळेल, तेव्हां तेव्हां, खात्री बाळग कीं, मी तेथें आहें. माझ्या अंशापासूनच हें सामर्थ्य निघालेलें असतें." ह्या वचनानें, जगांतल्या सर्व देशांतील अवतारांना पूजण्याचें हिंदूंना मुक्तद्वार झालें. हिंदूला कोणच्याही देशांतल्या सत्पुरुषाला, महात्म्याला, भजतां येतें. आम्ही पुष्कळ वेळां ख्रिस्त्यांच्या चर्चमध्यें किंवा मुसलमानांच्या मशीदींत जाऊन उपासना करतों, हें मला प्रत्यक्ष माहित आहे; आणि तें चांगलेंही आहे. तसें तें कां नसावें? मी सांगितलेंच, आमचा धर्म म्हणजे विश्वधर्म आहे. सर्व ध्येयें पोटांत सांठविण्याइतका तो विशाल आहे. आज जगांत चालू असलेल्या सर्व धर्मांतलीं मूलभूत तत्वें आतां त्याच्यांत समाविष्ट करतां येतील; आणि भविष्यकाळांत अशीं जीं तत्वें दिसतील, तीं ह्या वेदान्तधर्माच्या अनंत बाहूंत अशींच कवटाळलीं जातील! हें पहावयाला फक्त आपल्याला धिमेपणानें थांबलें मात्र पाहिजे.

ईश्वराच्या अवतारांविषयीं, मोठ्या मोठ्या विभूतींविषयीं, कमी ज्यास्त प्रमाणानें, ही आमची स्थिति आहे. ह्यांच्या खालोखाल मग दुसऱ्या दर्जाच्या विभूति येतात. वेदांत ऋषि हा शब्द वारंवार आलेला आपल्याला दिसतो आणि हल्लीं तर तो शब्द अगदीं रूढ झाला आहे. ऋषींचा आधार म्हणजे फार मोठा. ही कल्पना आपल्याला समजून घेतली पाहिजे. ऋषीची व्याख्या म्हणजे मंत्रद्रष्टा—मंत्र पहाणारा-ही आहे. धर्माला आधार काय?—फार पुरातन कालीं हा प्रश्न विचारला गेला. त्या प्रश्नाला, इन्द्रि-

यानें तो जाणतां यावयाचा नाहीं, असें उत्तर मिळालें. 'यत्र वाचो निवर्तन्ते अवाप्य मनसा सह' "जेथून शब्द, विचाराला बरोबर घेऊन ध्येयाला गांठण्यापूर्वींच परत फिरतात." 'न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति न मनो' "तेथें डोळे पोंचत नाहींत, मन पोंचत नाहीं कीं इतर इन्द्रियें पोंचत नाहींत."–युगानुयुगें हेंच उत्तर मिळालें. जीवात्म्याचें अस्तित्व, परमात्म्याचें अस्तित्व, चिरंतन जीवन, मानण्याचें ध्येय, वगैरे गोष्टींचा उलगडा बाह्य निसर्गानें व्हावयाचा नाहीं. मन अतिशय विकारी; एक सारखें वावरत असतें. तें अन्तवन्त आहे; त्याचे तुकडे तुकडे होतात. जें अनंत आहे, जें अविकारी आहे, जें अत्रुटित आहे, जें अविभाज्य आहे, जें चिरंतन आहे; त्याचें ज्ञान बाह्य निसर्गानें कोठून होणार? कधींच शक्य नाहीं. आणि जेव्हां जेव्हां मनुष्यानें, जड मृत सृष्टीपासून ह्यांचें उत्तर मिळविण्याचा प्रयत्न केला, तेव्हां तेव्हां, त्याचा परिणाम किती भयंकर झाला, ह्याची साक्ष इतिहास देतो आहे. तर मग वेदांत प्रतिपादिलेलें ज्ञान कसें प्राप्त झालें? ऋषित्व मिळवल्यानें, ऋषी झाल्यानें, तें येतें. हें ज्ञान इन्द्रियांत नाहीं. पण इन्द्रियें म्हणजे कांहीं सर्वस्व नाहीं. मनुष्याचें सर्वस्व म्हणजे इन्द्रियें असें म्हणण्याचें कोणाचें धारिष्टय आहे? मनष्याच्या आयुष्यांत, आपल्यापैकीं प्रत्येकाच्या आयुष्यांत, असें कांहीं शांततेचें क्षण येतात! आपण ज्याच्यावर प्राणापलिकडे प्रेम करतों त्याचा मृतदेह पुढें पडलेला पाहून एकदम आपल्याला धक्का बसतो, किंवा अतिशय सुखाचा प्रसंग आलेला असतो अशा वेळीं हे क्षण येतात. दुसरेही असे पुष्कळ प्रसंग येतात कीं, त्यावेळीं मन, जणूं काय अगदीं शांत होतें, एक क्षणभर त्याला स्वस्वरूपी ओळख होते, आणि जेथें वाणी पोंचत नाहीं आणि मनही पोंचत नाहीं, त्या बुद्धीच्या पलिकडे असणाऱ्या अनंताचें स्वरूप आपल्यापुढें स्पष्ट होतें. आपल्या नेहमींच्या आयुष्यांत हें असें होतें. पण तें वाढविलें पाहिजे, त्याचा अभ्यास केला पाहिजे, तें पूर्णतेला नेलें पाहिजे. पुष्कळ युगांपूर्वींच मनुष्यांनीं शोधून काढलें कीं, आत्मा हा इन्द्रियांनीं किंवा बुद्धीनें मर्यादितही नाहीं आणि बद्धही नाहीं. आपण

लक्ष्यांत ठेवावयाचें आहे कीं, ही बुद्धि म्हणजे अनंत सांखळींतला एक दुवा आहे. बुद्धि आणि सत् हीं एकच नाहींत, तर बुद्धि ही त्या सताचा एक भाग आहे. जो मोठा शोध करावयाचा आहे, तो बुद्धीच्या पलिकडे आहे. बुद्धि ही इन्द्रियांनीं बद्ध आहे. तिच्या पलिकडे इन्द्रियांच्या पलिकडे, अध्यात्माचीं सत्यें पहावयाला मनुष्याला गेलें पाहिजे आणि आज देखील इन्द्रियाच्या मर्यादा उडून जाण्यांत विजयी झालेले महात्मे हयात आहेत. ह्यांना ऋषी म्हणतात; कारण अध्यात्मिक सत्यें ते प्रत्यक्ष पहातात.

तेव्हां, माझ्यापुढें हें जें टेबल आहे, त्याचें जें प्रमाण तेंच वेदांचें प्रमाण आहे. तें प्रमाण म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण. हें टेबल मला माझ्या नेत्रेंद्रियानें दिसतें, तसेंच आध्यात्मिक सत्येंही आत्मा समाधि स्थितींत गेला म्हणजे प्रत्यक्ष दिसतात. ऋषित्व मिळवावयाला देश काल आड येत नाहीं, लिंग आड येत नाहीं, कीं, जात आड येत नाहीं. निर्भिड वात्सायन सांगतात, ऋषित्व ही महात्माची, आर्यांची, आनार्यांची, म्लेंच्छाचीसुद्धां मत्ता आहे. वेदांतलें ऋषित्व तें हें. आणि हिंदुस्थानांतल्या धर्माचें हें ध्येय आपण नेहमीं लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे. माझी इच्छा आहे कीं, जगांतल्या इतर देशांनींसुद्धां हें लक्ष्यांत ठेवावें आणि शिकावें. म्हणजे पुष्कळ भांडणें, पुष्कळ विरोध कमी होईल. धर्म कांहीं पुस्तकांत नसतो, निरनिराळ्या उपपत्तींत नसतो, मनांत नसतो, बोलण्यांत नसतो किंवा विचारांतही नसतो. धर्म म्हणजे—असणें आणि होणें आहे. माझ्या मित्रांनो, तुमच्यापैकीं प्रत्येक जण ऋषि होऊन त्याची आध्यात्मिक गोष्टींशीं प्रत्यक्ष गांठ पडेपर्यंत तुमच्या धार्मिक जीवनाला सुरवात झाली नाहीं. तुम्हाला बुद्धीच्या पलीकडे जातां येईपर्यंत, धर्म म्हणजे नुसत्या गप्पा, फार तर पूर्व तयारी आहे. दुसऱ्याचा अनुभव तिसऱ्यानें सांगितलेला तुम्ही सांगतां आहां आणि येथें बुद्धांकडे कांहीं ब्राह्मण आले असतां ते जें म्हणालें, तें त्यांचें सुंदर वचन बरोबर लागतें. ब्रह्माच्या स्वरूपाविषयीं त्यांचा वाद चालला होता; अखेरीस ते बुद्धांकडे आले. त्या महामुनींनें विचारलें, "तूं ब्रह्म पाहिलें का?" ब्राह्मण म्हणाला, "नाहीं." "तुझ्या बापानें?" "नाहीं;

त्यानें देखील नाहीं." "तुझ्या आजानें तरी?" "मला वाटतें त्यानें देखील तें पाहिलें नाहीं." "तर मग मित्रांनो, ज्याला तुमच्या बापाआजांनीं देखील पाहिलें नाहीं, त्याबद्दल वाद करून एकमेकांचा पाडाव करण्याचा तुम्हीं कसा प्रयत्न करतां?" सर्व जग जें कांहीं करतें आहे, तें हेंच. त्याला आपण वेदांच्या शब्दांत सांगू या कीं, "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन।" "हा आत्मा प्रवचनानें, कुशाग्र बुद्धीनें किंवा वेदांच्या अभ्यासानें सुद्धां जाणतां येत नाहीं." जगांतल्या सर्व देशांना आपण वेदांच्या भाषेंत सांगू या कीं, "तुमचीं भांडणें, तुमचे तंटे फुकट आहेत. ज्याचा तुम्ही उपदेश करतां, तो देव तुम्ही पाहिला आहे काय? जर तुम्ही तो प्रत्यक्ष पाहिला नसला, तर तुमचा उपदेशही फुकट आहे. तुम्ही काय सांगतां तें तुमचें तुम्हालाच कळत नाहीं. जर तुम्ही देव पाहिला, तर तुम्ही कधींच भांडत बसणार नाहीं, तुमची चर्याच दिव्य तेजानें चमकूं लागेल. उपनिषदांतल्या एका पुराण ऋषीनें आपल्या मुलाला ब्रह्मज्ञान शिकावयाला बाहेर धाडलें. कांहीं दिवसांनीं मुलगा परत आला. बापानें विचारलें, "काय शिकलास बाळ?" मुलानें इतकीं इतकीं शास्त्रें मी शिकलों, म्हणून सांगितलें; पण बाप म्हणाला, "एकूण तूं कांहींच शिकलास नाहींस; पुनः परत जा." मुलगा परत गेला. पुनः जेव्हां तो आला, तेव्हां बापानें त्याला पूर्वींचाच प्रश्न विचारला; आणि मुलानें त्याच शास्त्रांचीं नांवें सांगितलीं. पुनः एकदां त्याला परत जावें लागलें आणि मग जेव्हां तो परत आला, तेव्हां त्याचा सर्व चेहरा दिव्य दिसत होता. बापानें त्याला पाहिलें आणि एकदम म्हणाला, 'वत्सा, आज खरोखरच तुझें वदन ब्रह्मज्ञानाच्या सारखें प्रकाशतें आहे.' ईश्वर तुम्ही जाणला, कीं, तुमची चर्या बदलून जाईल, तुमचा स्वर बदलून जाईल, तुमचें सर्व स्वरूप बदलून जाईल. मनुष्य जातीला कल्याणास्पद तुम्ही व्हाल. ऋषीला प्रतिकार करण्याचें कोणाचेंही सामर्थ्य नाहीं. ऋषित्व, आमच्या धर्माचें ध्येय, तें हें आहे. बाकी सारें, हे सगळे वादविवाद, मनन, तत्वज्ञान, द्वैत, अद्वैत, प्रत्यक्ष वेदसुद्धां, नुसती पूर्व तयारी! दुय्यम गोष्टी आहेत!! मुख्य जें आहे

तें ऋषित्व. वेद, व्याकरण, ज्योतिष वगैरे शास्त्रें दुसऱ्या प्रतीचीं. जें अविकारी आहे, त्याची जें आपल्याला ओळख पटवतें तें श्रेष्ठ ज्ञान. ज्यांना त्याची ओळख पटली, ते वेदांतले ऋषि. तेव्हां आतां आपल्या लक्ष्यांत आलें कीं, एका ध्येयाचें, एका वर्गाचें, ऋषि हें नांव आहे. प्रत्येक खऱ्या हिंदूला आपल्या आयुष्यांत केव्हां तरी ती पायरी मिळविली पाहिजे; आणि ती पायरी मिळवणें हीच हिंदूची मुक्ति. एकाद्या मतांवर दृढ विश्वास, हजारों देवांचें दर्शन, जगांतील सर्व तीर्थांचें स्नान, ह्यानें मुक्ति मिळत नाहीं; तर ऋषी होण्यानें, मंत्रद्रष्टा होण्यानें मुक्ति मिळते.

जरा पुढच्या काळांत आलों कीं, मग विश्व हालवून सोडणारे महात्मे, परमेश्वराचे महावतार, लागतात. हे किती तरी होऊन गेले. भागवतांत ते असंख्य आहेत असें सांगितलें आहे. त्यांच्यापैकीं भरतवर्षांत सर्वभर पूजले गेलेले म्हणजे राम आणि कृष्ण. राम, वीरयुगाची पुराण प्रतिमा, सत्याची मूर्ति, सद्वर्तनाचा अवतार, ध्येयभूत पुत्र, ध्येयभूत पति, ध्येयभूत पिता, आणि ह्या सर्वांहून ज्यास्त म्हणजे ध्येयभूत राजा; असा हा राम महामुनि वाल्मिकी यांनीं आपल्यापुढें ठेवला. ह्या आद्यकवीनें ज्या वाणीनें श्रीरामचरित्र रंगविलें आहे, तिच्याहून अधिक शुद्ध, अधिक शुचि, अधिक सुंदर आणि तरीही अधिक सरळ अशी वाणी दुसऱ्या कोठेंही आढळणार नाहीं. आणि सीतेबद्दल तर काय बोलावें! तुम्ही जगाचें सगळें भूतकाळचें वाङ्मय धुंडाळा, मी तुम्हाला खात्रीनें सांगतों कीं, दुसरी सीता सांपडण्यापूर्वीं तुमचें सगळ्या जगाचें भविष्यत्काळचेंही वाङ्मय धुंडाळून होईल आणि अखेरीस दुसऱ्या सीतेचा पत्ता लागणार नाहींच. सीता अद्वितीय आहे. एकदांच तें चित्र रंगवलें गेलें. आतां केव्हांही त्याला जोड मिळणार नाहीं. कदाचित् राम पुष्कळ होतील; पण सीता केव्हांही एकटीच रहाणार! ती खऱ्या आर्यस्त्रीची पूर्ण प्रतिमा आहे. कारण पूर्ण स्त्रीबद्दलच्या आर्यांच्या साऱ्या कल्पना सीतेच्या जीवनांतून निघाल्या आहेत; आज हजारो वर्षें, साऱ्या आर्यवर्ताच्या कोन्याकोपऱ्यांतले देखील पुरुष, बायका, मुलें ह्या सर्वांच्या आदराला ती पात्र झाली आहे; सर्वजण तिला पूजाई

मानतात. आणि ती,–प्रत्यक्ष पावित्र्याहून पवित्र, एकसारखी सहन करीत असलेली, एकसारखी न कुरकुरतां दुःख भोगणारी, ही परमेश्वरी सीता अशीच नेहमीं पूजार्ह रहाणार. तें क्लेशाचें जीवन, क्लेशदर्शक एक उद्गारही न काढतां तिनें घालविलें! ती चिरंतनशुद्धा ती चिरंतनपवित्रा, ती मनुष्यांची, देवांची ध्येयभूत ती महती सीता, नेहमींच आमची राष्ट्रीय आदिमाता रहाणार. आम्ही तिचें अधिक वर्णन करण्याची मुळींच जरूर नाहीं; आमच्यापैकीं प्रत्येकाला ती पूर्ण माहिती आहे. आमच्या सर्व देवकथा नाहींशा होतील, वेदसुद्धां निघून जातील, संस्कृत भाषा कायमची लुप्त होईल, पण जोंपर्यंत पांच तरी हिंदू ह्या जगांत रहातील, मग ते अतिशय ग्राम्य भाषा बोलणारे का असेनात, तों पर्यंतः–माझ्या शब्दाकडे नीट लक्ष्य द्या, तोंपर्यंत–सीतेची कथाही रहाणारच. आमच्या पांची प्राणांत सीता अगदीं भिनून गेली आहे. प्रत्येक आर्यस्त्रीच्या आणि पुरुषाच्या रक्तांत ती आहे. आम्ही सर्व तिचीं अपत्यें आहोंत. त्या सीतेच्या ध्येयापासून आमच्या स्त्रियांना दूर नेण्यास त्यांच्या सुधारणेचा प्रत्येक प्रयत्न, आपण रोज पहातों त्या प्रमाणें लागलीच निष्फल होणार. भारताच्या स्त्रियांची सीतेच्याच पावलावर पाऊल टाकण्यानें प्रगति आणि परिणति होणार. त्याला एवढाच मार्ग.

ह्याच्यापुढें, नाना रूपानें ज्याची पूजा करितात तो, स्त्रियांचा तसा पुरुषांचा, बालांचा तसाच वृद्धांचा आवडता देव. त्याला नुसता अवतार म्हणून भगवद्गीताकारांचें समाधान होईना, म्हणून ते म्हणतात, "बाकीचे अवतार परमेश्वराचे अंशावतार होते. मी कृष्ण, प्रत्यक्ष परमेश्वर आहे." त्यांची सार्वांगिकता पाहिली म्हणजे, त्यांना अशीं विशेपणें लावतात त्यांत आश्चर्य नाहीं. त्यांच्यांत एकट्यांत अतिविलक्षण संन्यासी आणि अतिविलक्षण गृहस्थ यांचा योग झाला होता! राजाचा–शक्तीचा-फार विलक्षण सांठा त्यांच्यात होता आणि तरीही; त्यांचें जीवन म्हणजे फार विलक्षण त्यागाचें होतें. गीता कळल्याशिवाय श्रीकृष्ण कळावयाचे नाहींत; कारण त्यांच्या स्वतःच्या उपदेशाचेंच साकार स्वरूप ते होते. त्या अवतारांपैकीं प्रत्येकजण

आपल्या उपदेशाचें जिवंत उदाहरण बनून येथें आलें होतें. गीतेच्या उपदेष्ट्यांचें–कृष्णाचें–सर्व जीवन म्हणजे त्या दिव्य गीताचा देहावतार होता. मुक्त संगतेचें तें श्रेष्ठ उदाहरण होतें. सिंहासनाचा त्यांनीं त्याग केला! त्याची कधींच पर्वा केली नाहीं. जो संपूर्ण भरतखंडाचा नेता, ज्याच्या एका शब्दाबरोबर राजे सिंहासनावरून खालीं ओढले जात. त्याला स्वतःला राजा व्हावयाला केव्हांच नको होतें. तो त्याच्या आयुष्यांतला किती अद्भुत भाग! पण तो कोणाला कळावयाचा नाहीं. आणि आपण स्वतः पूर्ण पवित्र, पूर्ण शुद्ध झाल्याशिवाय तो जाणण्याचा कोणी प्रयत्नही करतां कामा नये. वृंदावनांतल्या त्या सुंदर रसांत, आकाशाहून विस्तृततर प्रीति, तिला साकार बनवून, वर्णिली आहे! त्या प्रीतीचें घुटके पिऊन जो बेहोप झाला आहे, वेडा बनला आहे, त्यालाच ती प्रीति कळणार! गोपींच्या प्रीतीचें मर्म कोणाला कळणार? परा कोटीला गेलेलें तें प्रेम! त्या प्रेमाला कशाची गरज नाहीं! तें प्रेम स्वर्गाची पर्वा करीत नाहीं! त्या प्रेमाला विद्यमान अगर भावी जगांतलें असें कांहींच नको आहे! माझ्या मित्रांनो, येथेंच–गोपींचा ह्या प्रेमानेंच फक्त–ईश्वराच्या सगुण आणि निर्गुण स्वरूपांतील विरोधाचा उलगडा होतो. सगुण परमेश्वर हें आपलें श्रेष्ठतम ध्येय आपण समजतों हें आपल्याला माहित आहे; तसेंच आपल्याला हेंही माहित आहे कीं, सर्व वस्तुजात ज्याचीं रूपें आहेत, जे सर्व विश्वांत पसरलें आहे, अशा निर्गुण ब्रह्मावर विश्वास ठेवणें हें तत्वदृष्ट्या युक्त आहे. पण त्याच वेळीं, ज्याला प्रत्यक्ष हातांत धरतां येईल, ज्यांच्या पायाशीं आपल्याला आपलें हृदय ओततां येईल, अशा प्रत्यक्ष कशाकरतां तरी जीव वेडा झालेला असतो. तेव्हां सगुण स्वरूप ही मानवी निसर्गाची उच्चतम कल्पना आहे. पण बुद्धि ही कल्पना पाहून दचकते. तोच तो, अगदीं जुना जुना प्रश्न. ब्रह्मसूत्रांत त्याचा खल केलेला आपल्याला दिसतो; द्रौपदी वनांत युधिष्ठिराला तोच प्रश्न विचारते. सर्वकरूण सर्वशक्तिमान् असा जर सगुण परमेश्वर आहे, तर मग ह्या पृथ्वीवरच हा निरय कां दिसतो! त्यानें येथें हा कां उत्पन्न करावा! तो पक्षपाती देव असला पाहिजे! ह्याला कांहीं उत्तर नाहीं. ह्याचा उल-

गडा जर कशानें तुम्हाला करतां आला, तर गोपींचें प्रेम वाचूनच करतां येईल. कृष्णाला लावलेल्या प्रत्येक विशेषणाचा त्यांना तिटकारा वाटे. तो सृष्टीचा निर्माण कर्ता आहे, हें कळून त्यांना काय करावयाचे होतें, तो सर्व-शक्तिमान् आहे, तो सर्व समर्थ आहे, तो असा आहे, तो तसा आहे, हें जाणण्याची त्यांना इच्छाच नव्हती. त्यांनीं एकच गोष्ट जाणली होती. तो अनंत प्रेम आहे. झालें, इतकेंच. गोपींना एकच कृष्ण माहिती होता. वृंदा-वनांतला कृष्ण! तो नेत्यांचा नेता, राजांचा राजा त्यांना गवळी—नेहमीं गोकुळांतला गवळीच—होता. "मला धन नको; मला आप्त नको; मला विद्या नको; मला स्वर्गाला जावयाची देखील इच्छा नाहीं! मला पुनः पुनः खुशाल जन्माला घाल; पण देवा, मला एवढें दे. तुझ्याठायीं माझें अढळ प्रेम पाहिजे आणि तें पुनःप्रेमाकरताच प्रेम पाहिजे" धर्माच्या इतिहासांत एक मोठें उत्क्रमण येथें लागतें. प्रेमाकरता प्रेम, कर्माकरतां कर्म; कर्तव्या-करतां कर्तव्य! त्या पूर्णावताराच्या, कृष्णाच्या, तोंडांतून हें दिव्य तत्व पहिल्यानें बाहेर आलें; मानव्याच्या इतिहासांत भरतवर्षाच्या भूमीवरच तें पहिल्यानें पेरलें गेलें. भीतीच्या आणि मोहाच्या धर्माचा कायमचा नाय-नाट झाला! नरकाच्या भीतीला आणि स्वर्गसुखाच्या मोहाला पायाखालीं घालून तें भव्यतम ध्येय,—प्रेमाकरतां प्रेम, कर्तव्याकरतां कर्तव्य, कर्माकरतां कर्म,—पुढें आलें.

आणि काय तें प्रेम! मी आतांच तुम्हाला सांगितलें कीं, गोपींच्या प्रेमाचें मर्म कळणें हें फार कठिण आहे. त्या अत्यंत विलक्षण प्रसंगाचा अत्यद्भुत अर्थ ज्यांना जाणतां येत नाहीं, अशा मूढांची आमच्यांत देखील वाण नाहीं. मी पुनः सांगतों कीं, आमच्या रक्तापासून उत्पन्न झालेले देखील असे कांहीं पापी मूर्ख आहेत, कीं, कांहीं तरी अपवित्र त्यांत आहे, असें समजून ते त्याच्यापासून दूर पळतात! त्यांना मला एवढेंच सांगाव-याचें आहे कीं, पहिल्यानें आपल्याला शुद्ध करा; तुम्हाला हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, गोपींच्या प्रेमाची कथा गाणारा दुसरा कोणी नसून शुद्ध देव आहे. गोपींचें हें अगम्य प्रेम सांगणारा इतिहासकार जो जन्मतःच

शुचि होता असा व्यासांचा पुत्र चिरंतन शुद्ध शुक आहे. जोपर्यंत हृदयांत स्वार्थ आहे, तोपर्यंत देवाचें प्रेम अशक्य आहे; मग, ती म्हणजे दुकानदारी; देवा, मी तुला हें देतों, ह्याच्या ऐवजीं तूं मला अमुक अमुक गोष्ट दे! आणि देव म्हणतो, तूं असें केलें नाहींस, तर मेल्यावर मी तुझा चांगला समाचार घेईन! बाकीच्या खऱ्या जन्मांत मी तुला भाजून काढीन, आणखी कितीकिती तरी हाल करीन! जोंपर्यंत मेंदूंत अशा कल्पना शिरल्या आहेत, तोंपर्यंत गोपींचें तें वेडें प्रेम कसें कळणार! “अरे, ह्या ओठांचें एक, एकच चुंबन दे. एकदां जिचें तूं चुंबन घेतलेंस तिची तुझ्या-बद्दलची तहान एकसारखी ज्यास्त ज्यास्तच वाढत जाते, सर्व दुःखें पळून जातात, आणि आम्हीं तुझ्याखेरीज बाकी सर्वांच्या वरचें आमचें प्रेम विसरून जातों.” अहाहा! पहिल्यानें धन, कीर्ति, नांव ह्यांच्या वरचें, ह्या आपल्या क्षुद्र जगावरचें प्रेम विसरून जा. तेव्हां, आणि तेव्हांच फक्त, गोपींच्या प्रेमाचें मर्म आपल्याला कळेल. तें इतकें पावन आहे कीं, सर्व संगपरित्याग केल्याशिवाय त्याचा प्रयत्न देखील करतां यावयाचा नाहीं; तें इतकें पवित्र आहे कीं, आत्मा पूर्ण शुद्ध झाल्याशिवाय तें जाणतांच याव-याचें नाहीं. ज्यांच्या हृदयांत, स्त्रीपुरुष भेदाच्या, द्रव्याच्या, कीर्तीच्या कल्पना प्रत्येक क्षणीं उठत आहेत. ते गोपींचें प्रेम जाणण्याचें आणि त्यावर टीका करण्याचें धाडस करतात! कृष्णावताराचें तर तें सारें सार आहे. तें श्रेष्ठ तत्वज्ञान, ती गीतासुद्धां, त्या वेडाबरोबर तुलतां यावयाची नाहीं. कारण, गीतेंत शिष्याला ध्येयाकडे कसें जावें हें हळू हळू सांगितलें आहे; पण येथें, उपभोगाचें वेड, प्रेमाची धुंदी आहे! येथें गुरु, शिष्य, उपदेश, पुस्तकें आणि ह्या जगांतल्या साऱ्या गोष्टी, भीति आणि देव, आणि स्वर्ग ह्यांच्या कल्पना देखील पार विरून जातात! सर्व टाकून दिलें आहे. जें कांहीं राहिलें आहे, तें म्हणजे प्रीतीचें वेड! वस्तुजाताची विस्मृति झाली आहे; त्या गोपीला सगळ्या जगांत कृष्णाशिवाय, त्या एका सांव-ळ्याशिवाय, कांहीं दिसत नाहीं; सगळ्यांचीं वदनें कृष्णमय झालीं आहेत; स्वतःचें वदन देखील कृष्णासारखेंच झालें आहे, स्वतःचा आत्मा कृष्णा-च्याच रंगानें रंजित झाला आहे! हें त्या सर्व श्रेष्ठ कृष्णाचें चरित्र आहे!

क्षुद्र गोष्टींत आपला वेळ फुकट दवडूं नका. त्या जीवनाचें मूळ, त्या जीवनाचें सार पहा. कृष्णचरित्रांत पुष्कळ ऐतिहासिक असयुक्तिकता असेल, पाटीमागून पुष्कळ घुसवाघुसव झाली असेल. ह्या सर्व गोष्टी खऱ्या असतील, पण तरीही, पूर्वीच्या मतांत जो इतका भयंकर बदल झाला त्याच्या मुळाशीं, त्याला आधारभूत कांहीं तरी असलेंच पाहिजे. दुसऱ्या कोणाही महात्म्याचें, धर्मसंस्थापकाचें चरित्र घ्या. आपल्याला दिसून येतें कीं, तो धर्मसंस्थापक म्हणजे त्याच्या पूर्वीच्या गोष्टींचें उत्क्रांत स्वरूप आहे; त्याच्याच काळांत ज्या कल्पना लोकांत पसरलेल्या असतात त्याच कल्पना तो उपदेशित असतो. तेव्हां तो धर्मसंस्थापक खरोखरच झाला किंवा नाहीं, ह्याबद्दल शंका असूं शकेल; पण येथें मी वाटेल त्याला आव्हान करतों कीं, ह्या गोष्टी, ह्या कल्पना,–कर्माकरतां कर्म, प्रेमाकरतां प्रेम, कर्तव्याकरतां कर्तव्य,–कृष्णाच्या केवळ स्वतःच्याच नाहींत, असें त्यानें दाखवून द्यावें. आणि म्हणून ज्याच्या डोक्यांतून ह्या कल्पना निघाल्या असा कोणी तरी असलाच पाहिजे. दुसऱ्या कोणाच्या त्या चोरलेल्या नाहींत. कृष्णाचा जन्म झाला त्यावेळेला कांहीं त्या वातावरणांत वावरत नव्हत्या; तर, भगवान् श्रीकृष्णानींच त्यांचा पहिल्यानें उपदेश केला. त्यांच्या शिष्यानें, व्यासानें, त्या उचलल्या आणि सर्व मनुष्यजातीला दिल्या. रंगवण्याला ह्याच्याहून उत्तम कल्पना नाहीं. श्रीकृष्णांतली सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे तो गोपीजनवल्लभ होता, तो वृन्दावनांतल्या गोपींच्या जिवाचा जिव्हाळा होता, ही आहे. जेव्हां हें वेड तुमच्या डोक्यांत शिरेल, जेव्हां भाग्यशालिनी गोपींना तुम्ही जाणाल, तेव्हांच तुम्हाला प्रेम म्हणजे काय हें कळेल. जेव्हां सर्व जग दिसेनासें होईल, जेव्हां सारे हेतु लोपून जातील; जेव्हां हृदयांत कांहींच उद्देश न राहिल्यामुळें तुम्ही शुद्ध हृदय व्हाल, जेव्हां सत्यान्वेषणाचा देखील ध्यास तुम्हाला रहाणार नाहीं, तेव्हां आणि तेव्हांच फक्त गोपींच्या त्या प्रेमाचें, प्रेमाकरतांच असलेल्या त्या प्रेमाचें वेड, त्या अनंत प्रेमाचें बल आणि सत्ता तुमच्यांत शिरेल. हेंच प्राप्तव्य. हें मिळालें, कीं, सर्व कांहीं मिळालें.

आतां जरा खालच्या पायरीवर–गीता सांगणाऱ्या कृष्णाकडे–येऊं. घोड्याच्या पुढें गाडी जुंपण्यासारखा एक प्रयत्न हिंदुस्थानांत करण्यांत येत आहे. आमच्यापैकीं पुष्कळांना वाटूं लागलें आहे, कीं, "गोपींचा वल्लभ कृष्ण म्हणजे कांहीं तरी हिडिस आहे, आणि युरोपियनांना कांहीं तो फारसा आवडत नाहीं. अमुक अमुक साहेबाला तो पटत नाहीं, तेव्हां गोपींना आतां फांटा दिलाच पाहिजे. युरोपियनांच्या परवानगीशिवाय कृष्ण कसा जगेल! तो जगणें शक्यच नाहीं. एक किंवा दोन स्थळें खेरीज करून महाभारतांत कांहीं गोपींचा उल्लेख नाहीं; आणि तीं स्थळेंही कांहीं महत्वांचीं नाहींत. द्रौपदीच्या धांव्यांत वृंदावनांतल्या लीलेचा उल्लेख आलेला आहे; आणि तसाच शिशुपालाच्या भाषणांत पुनः वृंदावनाचा उल्लेख आहे. हीं सर्व पाठीमागून घुसडलीं असलीं पाहिजेत! युरोपियनांना जे नको आहे, तें फेंकून दिलें पाहिजे! कृष्णाचा आणि गोपींचा तो उल्लेख म्हणजे मागून केलेली घुसवाघुसव!" बरोबरच आहे. व्यापाराच्या दृष्टीशिवाय ज्यांना दुसरी दृष्टि राहिली नाहीं, ज्यांचें धर्माचें ध्येय देखील व्यापारीच बनलें आहे; अशी ही मंडळी येथें कांहीं तरी करून स्वर्गाला जावयाचा प्रयत्न करीत आहेत. ह्या मारवाड्यांना चक्रवाढ व्याज पाहिजे आहे; येथें कांहीं तरी शिल्लक टाकून त्याचा उपभोग त्यांना तेथें व्यावयाला पाहिजे आहे. ह्या विचाराच्या पद्धतींत गोपींना खरोखरच जागा नाहीं. त्या ध्येयभूत वल्लभापेक्षां जरा खालच्या स्वरूपाकडे–गीतेच्या उपदेष्ट्याकडे आपण येऊं. वेदावर गीतेइतकी उत्तम टीका झालेली नाहीं आणि होणारही नाहीं. श्रुतींचें किंवा निषदांचें सार कळावयाला मोठें कठिण आहे. कितीः तरी टीकाकार आणि जो तो आपआपल्या मार्गानें अर्थ लावणार! तेव्हां मग, ज्यानें दिलेल्या स्फूर्तीनें श्रुति निर्माण झाल्या, तो प्रत्यक्ष परमात्मा आम्हाला त्यांचा अर्थ सांगण्याकरतां गीतेचा उपदेष्टा होऊन आला. आणि आज त्या अर्थ लावण्याच्या पद्धतीहून अधिक चांगली पद्धत भरतखंडांत सांपडणार नाहीं; साऱ्या जगांत सांपडणार नाहीं. ह्या पुढील शास्त्रार्थ लावणाऱ्यांना, गीतेवर व्याख्यान करित असतांना सुद्धां, पुष्कळ वेळा त्यांतला

अर्थ कळला नाहीं, त्याचें तात्पर्य काढतां आलें नाहीं, हें आश्चर्य आहे. गीतेंत काय आहे? आणि अगदीं अलिकडच्या टीकाकारांच्या टीकेंत काय असतें? एक अद्वैत मताचा टीकाकार उठतो, एक उपनिषद् घेतो; त्यांत किती तरी द्वैत दाखविणारीं स्थळें असतात! त्यांचा अगदीं कीस काढून, त्यांना पिळून, त्यांतून तो कांहीं अर्थ काढतो आणि तो आपल्या स्वत:च्या मताला आणून मिळवतो. द्वैतमताचा टीकाकार असला, तर मग अद्वैत-मत दर्शक जीं स्थळें असतील त्यांतून द्वैत दाखविणारा अर्थ काढण्या-करतां त्यांचा तो कीस काढीत बसतो. पण आपण गीतेंत पहा. असा किसून आपल्यासारखा अर्थ तींत कोठेंच काढलेला नाहीं. भगवान् म्हणतात, ते सारे बरोबर आहेत; कारण मानवी आत्मा हळू हळू एकेक पायरी, जडांतून सूक्ष्मांत, सूक्ष्मांतून सूक्ष्मतरांत, अशा तऱ्हेनें त्या निर्गुणाला, त्या ध्येयाला, पोहोंचेपर्यंत वर वर चढत असतो. गीतेंत, जें कांहीं आहे, तें हें आहे. कर्मकाण्डाचासुद्धां पुरस्कार केला आहे आणि दाखविलें आहे कीं, मुक्तीचा हा जरी प्रत्यक्ष मार्ग नाहीं, केवळ अप्रत्यक्ष मार्ग आहे; तरी देखील तो बरोबर आहे. मूर्ति ह्या अप्रत्यक्षतः बरोबर आहेत. समा-रंभ, विधि, सर्व कांहीं बरोबर आहे; पण एका अटीवर. अंत:करण शुद्ध पाहिजे. अंत:करण शुद्ध असलें, म्हणजे मग पूजनाचा मार्ग देखील बरोबर आहे आणि तो ध्येयाला घेऊन जाईल. इतकेंच नाहीं, तर पूजनाच्या ह्या साऱ्या तऱ्हा अवश्यक आहेत. नाहीं तर येथें कशाला आल्या असत्या? अलिकडच्या कांहीं लोकांना वाटतें त्याप्रमाणें धर्म आणि पंथ म्हणजे कांहीं ढोंगी आणि दुष्ट लोकांनीं, थोडासा पैसा मिळावा म्हणून काढलेलें थोतांड नाहीं. ही उपपत्ति किती जरी पटत असली, तरी ती खोटी आहे. अशा रीतीनें ते मुळींच काढले गेले नाहींत. मनुष्याच्या आत्म्याला भास-णाऱ्या आवश्यकतेनें त्यांना जन्म दिला आहे. निरनिराळ्या तऱ्हेच्या मनु-ष्याच्या मनांची तृषा, हांव, तृप्त करण्याकरतां ते सारे येथें आले आहेत; आणि त्यांच्या विरुद्ध उपदेश करण्याचें तुम्हाला कांहीं कारण नाहीं. ज्या दिवशीं ती आवश्यकता बंद होईल, त्या दिवशीं त्या आवश्यकतेबरोबरच

ते नाहींसे होतील; जोंपर्यंत ती आवश्यकता राहील, तोंपर्यंत, तुम्ही कितीही टीका करा, कितीही विरुद्ध उपदेश करा, ते येथें रहाणारच. तुम्ही तरवारीचा उपयोग करा कीं, बंदुकीचा उपयोग करा, सारे जग माणसाच्या रक्तांत बुडवून टाका, पण जोंपर्यंत मूर्तींची आवश्यकता आहे, तोंपर्यंत मुर्ति ह्या रहाणारच. हे विधि, आणि धर्मांतल्या साऱ्या पायऱ्या रहाणार; आणि भगवान् श्रीकृष्णांच्या उपदेशांवरून आपल्याला कळतें कीं, त्या रहाव्याही.

ह्याच्यापुढें हिंदुस्थानच्या इतिहासांतील उद्वेग आणणारा भाग येतो. पंथापंथांतील भांडणाचा लांबून येणारा आवाज गीतेंत ही आपल्याला ऐकूं येतो. पण त्यांना एकरूप करावयाला त्या वेळेला एकतानतेचे मोठे उपदेशक, एकतानतेचे महत्तम गुरु प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण असतात. ते म्हणतात, 'मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।' "एका सुतांत ज्याप्रमाणें मोते ओंवलेलीं असतात, त्याप्रमाणें हें सर्व माझ्या ठिकाणीं ओंवलेलें आहे." लांबून येणारा वादाचा ध्वनि केव्हांच आपल्या कानावर आलेला असतो; पण मध्यें थोडा निःस्तब्धतेचा, एकरूपतेचा काळ येतो, आाण मग तो ध्वनि पुनः जोरानें उठतो. आतां त्याच्या मुळाशीं केवळ धर्मच नसतो, तर अधिकप्रमाणानें जातिभेद असतो. समाजाच्या दोन प्रबल भागांत, क्षत्रियांत आणि ब्राह्मणांत, यादवी सुरू होते आणि मग, जवळ जवळ एक हजार वर्षेंपर्यंत सबंध भरतखंडाला बुडवून टाकणाऱ्या त्या प्रचंड लाटेच्या शिखरावर आपल्याला दुसरी ईश्वर मूर्ति दिसते. आपले गौतम शाक्यमुनि आले, तुम्हाला सर्वांना त्यांचा उपदेश, त्यांचीं मतें माहित आहेत. आम्ही त्याला, प्रत्यक्ष देवाचा अवतार, जगानें आजपर्यंत पाहिलेला सद्वर्तनाचा महत्तम आणि धीरतम शिक्षक, श्रेष्टतम कर्मयोगी, म्हणून पूजतों. जणू कांहीं भगवान्कृष्ण आपण सांगितलेलीं तत्वें व्यवहारांत कशा आणावीं हें दाखवण्याकरतां स्वतःचेंच शिष्य बनून येतात. गीतेंत उपदेश करणारा तोच ध्वनि पुनः एकदां येतो. 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।' "ह्या धर्माचा अल्पांशसुद्धा महा भयापासून रक्षण

करतो." 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि याति परां गतिम्।' "स्त्रिया किंवा वैश्य किंवा शूद्र देखील उच्चतम गतीला जातात." सर्व बंधन तोडून, सर्व शृंखला मोडून, उच्चतम गतीला जावयाची सर्वांना मोकळीक करून देत, गीतेचे शब्द येतात, श्रीकृष्णाचा मेघासारखा गंभीर आवाज कानावर येऊन आदळतो.

'इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः
निर्दोषंहि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः।'

"ज्यांचें मन साम्यावर स्थिर झालेलें आहे, त्यांनीं ह्याच जन्मांत स्वर्ग जिंकला; कारण ब्रह्म निर्दोष आणि सर्वांना सम आहे; तेव्हां असे महात्मे ब्रह्मांतच रहातात."

'समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम्' ॥

"ह्या प्रमाणें तोच परमेश्वर सर्व ठिकाणीं सारखा भरलेला पाहून महात्मा, आपण आपला नाश करीत नाहीं आणि त्यामुळें परागतीला जाऊन पोहोंचतो" जणूं काय ह्या उपदेशाचें जिवंत उदाहरण दाखवण्याकरतां, त्याचें एक अंग तरी निदान व्यवहारांत आणण्याकरतां, प्रत्यक्ष उपदेशक दुसरें रूप घेऊन आलें—शाक्यमुनि होऊन आले. तो दीनांचा आणि आर्तांचा उपदेशक! आपण लोकांच्या अगदीं हृदयांत शिरावें म्हणून लोकांच्या भाषेंत बोलण्याकरतां त्यांनीं देवांच्या भाषेचा त्याग केला! भणंग भिकाऱ्याबरोबर, दीनांबरोबर, पतितांबरोबर रहाण्यासाठीं त्यांनीं सिंहासनाचा त्याग केला! रामानें ज्याप्रमाणें गुहाला हृदयाशीं धरलें, त्याप्रमाणें ह्या दुसऱ्या रामानें महाराला हृदयाशीं कवटाळलें!

त्यांचें प्रचंड कार्य आणि त्यांतूनही प्रचंड चरित्र आपल्याला सर्वांना माहित आहेच. पण त्या कार्यांत एक दोष राहिला, आणि त्यामुळें आपण आज दुःख भोगतों आहों. त्यांत भगवानांचा कांहीं दोष नाहीं. ते शुद्ध आणि दिव्य आहेत. पण कमनशिबानें तसल्या उच्च कल्पना, आर्यांच्या कळपांत गोळा झालेल्या, असंस्कृत आणि अशिक्षित मनु-

ब्यांच्या जातींना आपल्याशीं मिळवून घेतां येइनात. नाना वेड्या समजुतींनी आणि हिडिस पूजाप्रकारांनीं भरलेल्या ह्या जाति आर्यांच्या कळपांत घुसल्या; आणि कांहीं काळ असें वाटलें कीं, त्या सार्‍या संस्कृत झाल्या. पण पुरें शतक लोटलें नाहीं, तोंच त्यांनीं आपले ते नाग, आपलीं तीं भूतें, आणि त्यांचे पूर्वज ज्यांच्या पूजा करीत त्या सार्‍या गोष्टी बाहेर काढल्या; आणि सारें भरतवर्ष म्हणजे वेड्या धर्मसमजुतींचा एक बाजार झाला. पहिल्या बौद्धांनीं, प्राणिवधाची जी त्यांना चीड येई, तीमुळें वेदांतले यज्ञ निंद्य म्हणून सांगितले होते; हे यज्ञ घरोघर होत असत. एका कुंडांत अग्नि जळत असे. त्यांचे पूजेचें सारें ऐश्वर्य तें एवढच असें. हें यज्ञ नाहींसे झाले आणि त्यांच्या जागीं मोठमोठालीं देवळें, भपक्याचे समारंभ, आढ्यतेचा उपाध्याय वर्ग आणि जें कांहीं आज तुम्हाला हिंदुस्थानांत दिसतें आहे, तें सारें आलें. ज्यांना वास्तविक ज्यास्त कळावयाला पाहिजे अशा अलिकडच्या कांहीं विद्वानांनीं, बुद्धानें ब्राह्मणधर्मांतील मूर्तिपूजेचा नायनाट केला, असें आपल्या पुस्तकांत प्रतिपादलेलें वाचलें म्हणजे मला हसूं येतें. ब्राह्मणधर्म आणि ब्राह्मणी मूर्तिपूजा बुद्धधर्मानेंच हिंदुस्थानांत उत्पन्न केली, हें त्या बिचार्‍यांनां माहित नाहीं. एक दोन वर्षांपूर्वीं एका रशियन् गृहस्थानें एक पुस्तक लिहिलें. येशुख्रीस्ताचा आपण फार मजेदार जीवनवृत्तांत शोधून काढला आहे, असें त्याचें म्हणणें होतें. त्या पुस्ताकाच्या एका भागांत तो म्हणतो, "येशु, ब्राह्मणाबरोबर अध्ययन करावयाला जगन्नाथाच्या देवळांत गला, पण त्यांचें सोळें आणि मूर्तिपूजा पाहून तो विटला! मग तो तिबेटच्या लामांकडे गेला, आणि तेथें पूर्ण होऊन पुनः घरीं परत गेला! ज्याला हिंदुस्थानच्या इतिहासाचें थोडेंसें ज्ञान आहे, त्याला मुळीं हें म्हणणेंच, हें सारें खोटें आहे, असें सिद्ध करून देईल. कारण जगन्नाथाचें देऊळ म्हणजे एक जुनें बौद्ध मंदिर आहे. आम्ही इतरांच्या बरोबर तें घेतलें आणि पुनः त्याला हिंदु बनवलें. अजूनही आपल्याला अशा पुष्कळ गोष्टी कराव्या लागतील. तेंव्हां जगन्नाथाचें देऊळ म्हणजे असें आहे. ख्रिस्ताच्या वेळेला तेथें एक देखील ब्राह्मण

नव्हता; तरी आम्हाला सांगण्यांत येतें कीं, येशु ब्राह्मणांबरोबर अध्ययन करावयाला तेथें आला! आपले हे प्रख्यात रशियन पुराणवस्तुशोधक असें सांगतात! तेव्हां, प्राणिमात्रावर दया करण्याचा उपदेश, भव्य नैतिक धर्म, चिरंतन आत्म्याच्या असण्या नसण्याबद्दलचा सूक्ष्म वाद; इतकें सगळें असूनही बौद्ध धर्माची इमारत तुकडे तुकडे होऊन खालीं पडली; आणि तो नाश त्याच्याकडे पहाविना इतका अगदीं बिकट झाला. बौद्ध धर्माच्या मागून जी बिकटता आली, ती आपल्याला सांगावयाला मला वेळही नाहीं आणि इच्छाही नाहीं. अत्यंत अचकट विचकट समारंभ; मनुष्याच्या हातांनीं आजपर्यंत लिहिलेल्या आणि मनुष्याच्या डोक्यांनीं आजपर्यंत कल्पिलेल्या पुस्तकांतील अत्यंत भयंकर, अत्यंत अश्लील पुस्तकें; धर्माच्या नांवाखालीं मोडणारे अत्यंत पशुयोग्य विधि; ही सारी अधःपतित बौद्ध धर्माची संतति आहे!

पण भरतवर्ष हें जगावयाचेंच. तेव्हां पुनः देवानें अवतार घेतला. ज्यानें 'यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत....तदात्मान सृजाम्यहम' असें वचन दिलें, तो पुनः आला. ह्या वेळेला देहधारणा दक्षिणेकडे झाली, आणि ज्याच्याबद्दल असें सांगितलें आहे, कीं, सोळाव्या वर्षी त्यानें आपलें ग्रंथ लिहिणें संपविलें. तो तरुण ब्राह्मण पुढ आला. तो विलक्षण मुलगा– शंकराचार्य–होय. ह्या सोळावर्षांच्या मुलानें लिहिलेलें ग्रंथ म्हणजे आज जगांतलें मोठें आश्चर्य आहे; आणि तो मुलगाही तसाच होता. त्याला भरतवर्षाला, त्याच्या मूळच्या शुद्धतेकडे आणावयाचें होतें. पण तें केवढें प्रचंड कार्य होतें ह्याची कल्पना करा! हिंदुस्थानांत त्यावेळेला कशी स्थिति होती, ह्याबद्दल मी थोड्या गोष्टी तुम्हाला सांगितल्याच. ज्यांना सुधारावयाचा तुम्ही प्रयत्न करतां, त्या ह्या साऱ्या हिडिस गोष्टी म्हणजे अधःपाताच्या राज्यांतून निघाल्या होत्या. तार्तर आणि बलूची आणि इतर अशाच मनुष्यांतील भयंकर जाति साऱ्या हिंदुस्थानांत आल्या, बौद्ध बनल्या, आणि आमच्यांत मिळून गेल्या. त्यांनीं आपल्या देशच्या चालीरीति येथें आणल्या आणि आमचें सर्व रा ्रीय जीवन म्हणजे अत्यंत

भयंकर आणि पशुयोग्य चालीच एक मोठें ठिकाण झालें. बुद्धधर्मापासून ही त्या मुलाला वारसाची मालमत्ता म्हणून मिळाली! आणि त्या वेळेपासून आजपर्यंत हिंदुस्थान म्हणजे अधःपतित बुद्धधर्मावरचा वेदांताचा पुनर्विजय आहे. अजूनही तो चालला आहे. अजून तो संपला नाहीं. महातत्ववेत्ते श्रीशंकराचार्य आले आणि त्यांनीं दाखविलें कीं, बुद्धधर्माचें आणि वेदांताचें वास्तविक सार कांहीं फार निराळें नाहीं; पण शिष्यांना गुरूचा उपदेश कळला नाहीं, त्यांनीं आपला अधःपात करून घेतला, परमात्म्याचें आणि जीवात्म्याचे अस्तित्व नाकबूल केलें आणि सारे नास्तिक बनले! हें शंकराचार्यांनीं दाखविलें; तेव्हां सारे बौद्ध पुनः पुराण धर्मांत येऊं लागले. पण हे सर्व विधि त्यांच्या हाडा मासांत शिरले होते. ह्याला काय उपाय करावा?

नंतर तेजस्वी रामानुज आले. शंकराचार्यांची बुद्धि फार मोठी होती. पण सांगण्यास भय वाटतें कीं, तितकें मोठें त्यांचें हृदय नसावें. रामानुजांचें हृदय त्यांच्याहून मोठें होतें. पायाखालीं तुडवल्या गेलेल्या वर्गाची त्यांना करुणा येई, त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटे. त्यांनीं पूर्वींचे इतके वाढलेले समारंभ घेतले, त्यांच्यांत शक्य तितकी शुद्धता आणली, आणि ज्यांना त्यांची फार जरूरी होती, अशा लोकांकरतां नवीन समारंभ, नवीन पूजापद्धति काढल्या. तसेंच ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वांना त्यांनीं उच्चतम आत्मिक पूजेची मोकळिक करून दिली. हें कार्य रामानुजांचें होतें.

तें कार्य एकसारखें वाढत चाललें; त्यानें उत्तर हिंदुस्थानही आक्रमिलें; तेथें पुनः मोठ्या नेत्यांनीं तें हातांत घेतलें; पण हें फार पुढें मुसलमानी राज्यांत झालें. आणि ह्या उत्तरेकडच्या बऱ्याच अलिकडच्या काळच्या धर्म प्रवर्तकांत सर्वश्रेष्ठ म्हणजे चैतन्य. रामानुजाच्या काळापासूनचा एक विशेष आपण लक्ष्यांत ठेवावा.—आध्यात्माचीं दारें सर्वांना मोकळीं झालीं. शंकराचार्यांच्या पूर्वींच्या धर्मप्रवर्तकांप्रमाणें रामानुजांच्या पुढच्या धर्मप्रवर्तकांचें मुख्य कार्य तें. शंकराचार्यांना तरी निषेधक म्हणून कां वगळावें हें मला कळत नाहीं. त्यांच्या ग्रंथांत निषेधक असें मला

कांहींच दिसत नाहीं. भगवान् बुद्धांच्या उपदेशांची जशी स्थिति झाली त्याप्रमाणेंच हा निषेध बहुदा शंकराचार्यांच्या उपदेशांपासून उत्पन्न झाला नसून, त्यांच्या शिष्यांच्या अयोग्यतेमुळें झाला असावा. ह्या एका उत्तरेच्या महात्म्यानं, चैतन्यानें, गोपींचें प्रेम पुनः मूर्त केलें. स्वतः ब्राह्मण, त्या काळच्या अति विद्वान कुळांत जन्म, न्याय पारंगत, तेव्हां चैतन्य एकसारखे वाद करीत आणि जय मिळवीत चालले. कारण आयुष्याचें हे उच्चतम ध्येय असें त्यांना बालकडु मिळालें होतें. पण एका सत्पुरुषाच्या कृपाप्रसादानें त्यांचे सर्व आयुष्यच बदललें. त्यांनीं वादांतला दिग्विजय सोडून दिला, भांडणें सोडून दिलीं. न्यायाच्या महा शास्त्र्यांची जागा सोडून दिली आणि ते जगानें आजपर्यंत पाहिलेल्या श्रेष्ठतम भक्तिमार्गोपदेशकांपैकीं एक—वेडे चैतन्य—झाले. त्यांची भक्ति प्रत्येकाला निववीत बंगालच्या सर्व भूमीवर पसरली. त्यांच्या प्रेमाला पार नव्हता. संत, दुरात्मा, हिंदु, मुसलमान, शुद्ध, पापी, वेश्या, रस्त्यांत भटकणारा भिकारी,—सर्वांना त्यांच्या प्रेमांत स्थान मिळालें, सर्वांना त्यांच्या दयेंत हिस्सा मिळाला. आणि आज देखील जरी कालाच्या धर्माला अनुसरून पुष्कळ नीच स्थिति आली आहे, तरी त्यांचा पंथ म्हणजे, दीनांचें, पतितांचें, बहिष्कृतांचें, दुर्बलांचें, ज्यांना सर्व समाजानें टाकून दिलें आहे, त्या सर्वांचें, आश्रयस्थान आहे. पण ह्याच वेळीं सत्य म्हणून मला सांगितलें पाहिजे कीं, आपल्याला असें दिसून येतें. तात्विक पंथांत विलक्षण उदारता असते. शंकराचार्यांचा अनुयायी म्हणवणारा असा एकही सांपडणार नाहीं कीं, जो हिंदुस्थानांतले भिन्न भिन्न पंथ म्हणजे खरोखरच भिन्न आहेत, असें म्हणेल आणि असें असूनही तो जातिभेदाच्या बाबतींत फार तीव्र असतो. पण प्रत्येक वैष्णव उपदेशक घेतला कीं, आपल्याला दिसतें कीं जातिभेदांच्या बाबतींत तो विलक्षण उदार आहे; पण धार्मिक प्रश्नांच्या बाबतींत अनुदार आहे.

एकाची बुद्धिमत्ता प्रचंड होती; एकाचें हृदय विस्तृत होतें; आणि ही बुद्धि आणि हें हृदय ह्या दोहोंनीं बनलेला महात्मा जन्मण्याचा काल आला, जो एकाच देहांत शंकराचार्यांची तेजस्विनी मेधा आणि चैतन्यांचें पूर्ण

विस्तीर्ण, अपार हृदय, ह्यांचा संगम करील, ज्याला प्रत्येक पंथांत तेंच तेज, तोच परमेश्वर, कार्य करतांना दिसेल; जो प्राणिमात्रांत परमेश्वराला पाहील; ज्याचें हृदय, हीनाकरतां, दुर्बलाकरतां, बहिष्कृताकरतां, दडपून टाकलेल्या करतां, हिंदुस्थानच्या आंतील किंवा बाहेरील जगांतील प्रत्येकाकरतां रडेल; आणि त्याच वेळीं ज्याची भव्य, तेजस्वी बुद्धिमता असे उदात्त विचार काढील, कीं, त्याच्यामुळें फक्त भारतांतल्याच नाहीं, तर भारताच्या बाहेरच्याही सर्व पंथांत एकरूपता येईल; आणि जो विलक्षण एकतानता, डोक्याचा आणि हृदयाचा, दोहोंचा, झालेला विश्वधर्म, अस्तित्वांत आणील, असा महात्मा जन्मण्याची वेळ आली. तो महात्मा जन्माला आला आणि त्याच्या चरणाची वर्षानुवर्षे सेवा करण्याचें महद्भाग्य माझें होतें. अशा महात्म्याचा अवतार होणें अवश्य होतें; तशी वेळ आली होती; आणि तो महात्मा जन्माला आला. सर्वांत आश्चर्याचा भाग म्हणजे हा त्यांचें सारें जीवनकार्य, पाश्चात्य विचारांनीं भरलेल्या, पाश्चात्य कल्पनांनीं वेडें झालेल्या, हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणच्याही शहरापेक्षां अधिक युरोपीय झालेल्या, शहराच्या अगदीं जवळ झालें. तेथें तो रहात असे. पुस्तकी शिक्षण कसें तें त्याला मुळींच नव्हतें. ही प्रचंड मेधा आपलें नांव देखील लिहावयाला शिकली नव्हती, पण आमच्या विश्वविद्यालयांतल्या अति हुषार पदवीधरांना तो म्हणजे बुद्धीचा अवतार आहे, असें आढळून आलें. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणजे फार विलक्षण पुरुष होते. ती फार लांब कथा आहे आणि आज त्याबद्दल बोलावयाला मला वेळ नाहीं. आतां मी फक्त त्या महनीय श्रीरामकृष्णांचा नुसता उल्लेखच करतों. त्यांच्या ठिकाणीं भारतांतील सर्व ऋषींचें महात्म्य फलद्रूप झालें होतें. तें काळाला योग्य असे महात्मे होते. ह्या वेळीं, ह्या अलिकडच्या काळांत, त्यांचा उपदेश फार कल्याणकर आहे. आणि ह्या पुरुषाच्या मुळाशीं कार्य करीत असलेल्या दिव्य शक्तीकडे लक्ष्य द्या. एका गरीब ब्राह्मणाचा मुलगा, एका कोन्याकोंपऱ्यांतल्या खेड्यांत जन्म झालेला, ज्याची कोणाला माहिती होणें शक्य नाहीं, ज्याच्याबद्दल कोणी विचार

करणें शक्य नाहीं, त्याला आज यूरोपांत व अमेरिकेंत अक्षरशः हजारों लोक भजत आहेत आणि उद्यां आणखी हजारो भजतील! ईश्वराचे हेतु कोणाला कळणार! माझ्या बांधवांनो, जर तुम्हाला प्रत्येक गोष्टीं ईश्वराचा हात, बोट, दिसलें नाहीं, तर त्याचं कारण, तुम्हाला दिसत न तुम्ही खरोखर जन्मांध आह, हें होय. जर तशी वेळ आली, दुसरा एकादी संधि मिळाली, तर मी त्यांच्याविषयीं ह्याहून पुष्कळ सांगेन. आतां मी इतकेंच म्हणतों कीं, जर मी आपल्याला एकादा सत्याचा शब्द सांगितला असेल, तर तो त्यांचा आणि फक्त त्यांचाच आहे; आणि जर मी ज्या खऱ्या नाहींत, चुकीच्या आहेत, मनुष्य जातीला कल्याणकारक नाहींत, अशा पुष्कळ गोष्टी सांगितल्या असल्या, तर त्या सर्व माझ्या आहेत; त्यांची जबाबदारी माझ्यावर आहे.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५३

REFBK-0000753

# प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

१ समाजकंटक.

( सामाजिक कादंबरी. )

२ दैवलीला.

( अत्यंत करुणरसमय चरित्र. )

३ सावित्री-सत्यवान.

( पौराणिक कादंबरी. )

४ प्रवासिनी.

( तरंगेची आत्मकहाणी. )

५ महात्मा-परिचय.

( विवेकानंद संकलित चरित्रें. )

## छापत असलेलीं पुस्तकें.

६ महात्मा-गौतम.

( भगवान् बुद्ध चरित्र. )

७ जाईचा मंडप.

( सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरी. )

८ पद्ममधु.

( सामाजिक कादंबरी. )

९ विवेकानंद चरित्र.

( सुमारें बाराशें पृष्ठांचें, विस्तृत. )

१० संकल्प.

( रण-रंगिनी जोन ऑफ आर्क. )

११ जहांगीर.

( जहांगीरचें आत्मचरित्र. )